31-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A
MSK/ 10:00


**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनात मोते)**

**पृ.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे

**मु.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, सुनील तटकरे, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, प्रा.जर्नादन चांदूरकर, सतिश चव्हाण, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री विक्रम काळे, आनंदराव पाटील, जयंत प्र. पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, अमरनाथ राजूरकर, अब्दुल्ला खान दुर्राणी, प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती** : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावास सुरूवात होईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहात एकही माननीय मंत्री किंवा माननीय राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहात एकही माननीय मंत्री उपस्थित नाहीत. नियम 260 अन्वये मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळ व तीव्र टंचाई या संदर्भातील तातडीचा प्रस्ताव चर्चेला आला आहे. परंतु सभागृहात गणपूर्ती देखील नाही. आम्ही गणपूर्ती संदर्भात समजू शकतो. परंतु सभागृहामध्ये माननीय मंत्री उपस्थित असले पाहिजेत. आपण माननीय मंत्री येईपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करावी.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहात माननीय मंत्री व गणपूर्ती या दोन्ही गोष्टींची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक सकाळी 10.10 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.01 ते 10.10 पर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये एक अतिशय महत्त्वाची चर्चा दाखविण्यात आली आहे. आज सभागृह सुरु झाल्यानंतर मंत्री किंवा राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक स्थगित केली व दहा मिनिटानंतर पुन्हा सभागृह सुरु झाले आहे. परंतु, अद्यापही मंत्री किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. विरोधी पक्षाने मांडलेल्या दुष्काळासंबंधीच्या प्रस्तावाचा अपमान राज्य शासनाला करायचा आहे का ? जोपर्यंत मंत्री किंवा राज्यमंत्री महोदय सभागृहात येत नाहीत, तोपर्यंत सभागृहाची बैठक आपण स्थगित करावी. मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे, याबाबत आपण त्यांना निदेश द्यावेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एका अतिशय महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु व्हायची होती. कामकाज पत्रिकेनुसार सर्वांनाच याबाबतची सूचना देण्यात आलेली आहे. परंतु, शासन या सभागृहाच्या कामकाजाकडे गांभीर्याने बघणार नसेल आणि सभागृहात चर्चा करण्यासाठी मंत्री महोदय उपलब्ध होणार नसतील तर आपण प्रत्येक वेळा दहा मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करुन नेमके काय साध्य होणार आहे ? आपण याबाबतची माहिती सभापती महोदयांनी द्यावी आणि शासनाचे कुणी प्रतिनिधी सभागृहात येणार नसतील तर अनिश्चित काळासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी, अशी आमची मागणी आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या अधिवेशनात अनेक वेळा असे बघावयास मिळाले आहे की, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी लागली आहे. या अधिवेशनातील सर्वाधिक काळ कशामुळे वाया गेला असेल तर मंत्री किंवा राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत, या कारणासाठी गेला आहे. याची आपण दखल घ्यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** विरोधी पक्षाचा दुष्काळासंबंधीचा प्रस्ताव आजच्या कामकाज पत्रिकेवर आहे. या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांचे पत्र प्राप्त झाले आहे. निधीच्या उपलब्धतेसाठी ते आज दिल्ली येथे बैठकीसाठी गेले आहेत. तथापि, आपण असे ठरविले होते की, मंत्री महोदय नसले तरी या संदर्भातील सन्माननीय सदस्यांची भाषणे आज आपण पूर्ण करुन घेऊ व उद्या मंत्री महोदयांचे उत्तर घेऊ. परंतु, त्यासाठी किमान अन्य कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. ते देखील सभागृहात उपस्थित नाहीत. ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यांनी सभागृहात उपस्थित रहावे, याबाबत निरोप देण्यात आला आहे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.13 ते 10.23 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी नियम 260 चा प्रस्ताव दिलेला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा आहे. महाराष्ट्रात वारंवार गारपीट होत आहे, काल देखील गारपीट झाली आहे. याबाबत सरकार गंभीर दिसत नाही. सभागृह स्थगित करण्याची आता तिसरी वेळ आहे. मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे यासाठी आपण निरोप पाठविला, पक्ष प्रतोदांनी निरोप पाठविला आहे. पक्षाचे प्रतोद ज्येष्ठ असताना देखील ते स्वतः मंत्री महोदयांना निरोप देण्यासाठी गेले आहेत. तरी देखील मंत्री महोदय सभागृहात आले नाहीत. हा विरोधकांचा अवमान आहे, विरोधी पक्ष जेव्हा एखादा प्रस्ताव मांडतो, तेव्हा त्या प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी कॅबिनेट मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहायला पाहिजे. अशी सभागृहाची परंपरा आहे, सभापती महोदय आपण देखील हतबल आहात हे आम्ही समजू शकतो. अद्याप देखील कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाही. तिसऱ्या वेळी सभागृह स्थगित करण्याची वेळ आपणावर येत आहे. संबंधित मंत्री दिल्ली येथे गेले असे आपण सांगितले आहे, ते आम्हाला मान्य आहे, परंतु इतर कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित रहाणे आवश्यक आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित होत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे व इतर सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, माननीय कॅबिनेट मंत्री दोन मिनिटात सभागृहात उपस्थित होत आहेत, तोपर्यत आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज चालू ठेवण्याची व सत्ताधारी बाकांवर संबंधित कॅबिनेट मंत्री उपस्थित ठेवण्याची जबाबदारी संसदीय कार्यमंत्री महोदयांची असते. अशा प्रकारची अक्षम्य दिरंगाई वारंवार का होते, याचा खुलासा संसदीय कार्यमंत्री सभागृहात येऊन करीत नाहीत तोपर्यंत या प्रस्तावावर आम्ही चर्चा सुरु करणार नाही. याबाबत आम्ही अतिशय संवेदनशील असून या प्रश्नाचा निकाल लागत नाही तोपर्यंत सभागृह आम्ही चालू देणार नाही.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात येत नाहीत म्हणून दोन वेळा सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले आहे. आता राज्यमंत्री महोदय सभागृहात आले आहेत. आमची अशी मागणी आहे की, संसदीय कामकाज मंत्री सभागृहात येऊन या बाबींचा खुलासा करीत नाही तोपर्यंत या प्रस्तावावरील चर्चा सुरु करता येणार नाही. संसदीय कार्य मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा, त्यानंतर या प्रस्तावावर चर्चा सुरु करावी. दुष्काळ व गारपिटीने होरपळत असलेल्या शेतकऱ्यांची शासन चेष्टा करीत आहे. विरोधी पक्षाने या संदर्भातील चर्चा सभागृहात उपस्थित केली असताना ती चर्चा ऐकण्यासाठी मंत्री महोदय उपस्थित राहत नाही. हा सभागृहाचा अवमान आहे, आपणाला सभागृहाची बैठक दोन वेळा स्थगित करावी लागली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे, आपण संसदीय कार्य मंत्री महोदयांना बोलवावे त्यानंतर या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यात येईल.

**तालिका सभापती** : या विषयाबाबत गंभीर दखल घेण्यात आली आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री यांना मी या संदर्भातील निर्देश देत आहे. केवळ मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे वेळ वाया गेली आहे, दोन वेळा सभागृहाचे कामकाम स्थगित करावे लागले आहे. संबंधित मंत्री महोदयांच्या बाबतीत मी सुरुवातीला सांगितले आहे की, निधीच्या संदर्भात दिल्ली येथे बैठकीसाठी गेले आहेत, त्यांनी तसे पत्र दिले आहे. राज्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. माझी माननीय विरोधी पक्ष नेते व सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, जो प्रस्ताव चर्चेला घेतला आहे त्यावर आपण आता चर्चा सुरु करु या. राज्य मंत्री महोदय या संदर्भातील नोटस् घेतील. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी संसदीय कार्यमंत्री महोदयांपर्यंत पोहचवितो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहात संसदीय कार्यमंत्री येत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु करता येणार नाही.

**तालिका सभापती** : संसदीय कार्य मंत्री महोदयांना मी या संदर्भात निवेदन करण्यास सांगतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलतात)

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, मंत्री महोदय येत आहेत, मी मंत्री महोदयांना विनंती केली आहे, विधानसभेत देखील चर्चा सुरु आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, हा प्रश्न अतिशय ज्वलंत आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी सहमत आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.30 वाजता 10.40 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनात मोते)**

**पृ.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे

**मु.शी.:** मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असणे या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, सुनील तटकरे, अशोक ऊर्फ भाई जगताप, हेमंत टकले, प्रा.जर्नादन चांदूरकर, सतिश चव्हाण, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री विक्रम काळे, आनंदराव पाटील, जयंत प्र. पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, अमरनाथ राजूरकर, अब्दुल्ला खान दुर्राणी, प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे या प्रस्तावावर ऑन लेग आहेत. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, 40 मिनिटाच्या काळात मंत्री महोदय सभागृहात अनुपस्थित असल्यामुळे आपल्याला तीन वेळा सभागृहाची बैठक तहकूब करावी लागली.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या संदर्भात सरकारच्या वतीने खुलासा होण्याची आवश्यकता आहे.

**तालिका सभापती :** या संदर्भात मी मघाशी रुलिंग दिले आहे. सभागृहाच्या वेळेचा अपव्यय झाला हे मान्य आहे. माननीय संसदीय कार्यमंत्री यांना मी निरोप पाठविला आहे. ते सभागृहात येऊन निवेदन करतील. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : या सभागृहात कोणीच मंत्री येत नाहीत म्हणून शेवटी माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात यावे लागले.

**तालिका सभापती :** माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे. हा विषय संपला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

31-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.2

SGB/ AKN/ KTG/ 10:40

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी सभागृहाच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. सभागृहामध्ये मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात वारंवार होणारी गारपीट, दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकरी कसा अडचणीत आला आहे त्याचे चित्र मांडून या संदर्भात शासनाने ठोस पावले उचलावीत या दृष्टीने माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला आहे.

सभापती महोदय, आज या तीनही विभागांमध्ये अत्यंत विदारक स्थिती निर्माण झाली आहे. दोन दिवसापूर्वी सुध्दा या भागात गारपीट झाली. उन्हाळयाची तीव्रत वाढत आहे. 29 मार्च रोजी अनेक भागात पाऊस झाला. अशा प्रकारे निसर्गाचे दुष्टचक्र सुरु झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेती पिकाची प्रचंड प्रमाणात हानी होत आहे. मी एक छोटी कविता वाचून दाखवितो.

दुष्काळाच्या झळा लागुनी जळाला शेतमळा
पाण्यासाठी टाहो फोडुनी सुकला ओला गळा
डाळिंबाचे होऊनी हाल द्राक्ष बागा उखडली
गहू होणे दूरच होते मान मोडूनी बाजरी पडली
कोठून आणावे पाणी विहीर तर सुकली
बांधावरची जुनी बाभूळ आता शेवटली
कोठून आणावे पाणी विहीर तर सुकली
कोरडया मातीमध्ये कसे कसावे पाण्यावाचून
पान्हा फुटेना एकनाथा शेतकरी रडतो ओरडून
कसे जगावे कळेना कसे जगावे उमजेना
दुष्काळाचे मन कोरडे पण पाणी येई डोळा.

या कवितेच्या माध्यमातून मी विदारक चित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गाच्या अवकृपेने आमच्या शेतकऱ्यांची अशी अवस्था झालेली आहे. आज मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या तीनही भागांचा साकल्याने विचार केला तर विकासाच्या दृष्टीने पाणी हे महत्वाचे साधन असताना त्याची मोठया प्रमाणात टंचाई निर्माण झालेली आहे. उद्योगधंदे, शेती यासाठी पाणी हेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे....

महत्वाचे साधन आहे. मोसमी पावसावर शेती अवलंबून आहे. पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे.

सभापती महोदय, आज उद्योगधंद्यांचे प्रमाण पाहिले तर मराठवाड्यामध्ये 4.52 टक्के, विदर्भामध्ये 12.75 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये 80.8 टक्के आहे. दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर मराठवाड्यामध्ये दरडोई उत्पन्न 62013 रुपये, विदर्भामध्ये 68503 रुपये आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये 1,29,523 रुपये आहे. महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदे वाढले पाहिजेत या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री प्रयत्नशील आहेत. मध्यंतरी ते अमेरिकेला जाऊन आले, डाव्होस येथे जाऊन आले. त्यांनी चालविलेल्या प्रयत्नांचे मी स्वागत करतो. पण उद्योग क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण पाहिले तर मराठवाड्यामध्ये केवळ 2 टक्के, विदर्भामध्ये 8 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात 80 टक्के आहे. या आकडेवारीवरुन पाण्याअभावी उद्योगधंदे आणि विकासाचा दर कसा खाली जात आहे हे पहावयास मिळते. या सर्व भागामध्ये मागासलेपणा कसा निर्माण होत आहे हे दिसून येते. आज हे तीनही विभाग विकासाच्या दृष्टीने मागे पडलेले आहेत.

सभापती महोदय, मी जरी मराठवाड्याचे प्रतिनिधीत्व करीत असलो तरी माझ्या मतदारसंघात 8 जिल्हे आणि 78 तालुक्यांचा समावेश होत असला तरी महाराष्ट्राचा नागरिक म्हणून महाराष्ट्राचे हे तीनही विभाग माझे आहेत या दृष्टीने मी विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. हा महाराष्ट्र एकसंघ आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या तीनही ठिकाणची परिस्थिती पावसाअभावी कशी निर्माण झाली आहे त्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न मी या चर्चेच्या माध्यमातून करीत आहे. विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासाच्या संदर्भात शासनाच्या वतीने विविध समित्या नेमल्या गेल्या, अभ्यास गट नेमले गेले. त्या माध्यमातून शासनाला अहवाल सादर करण्यात आले. त्या अहवालातील शिफारशींवर शासनाने उचित कार्यवाही करावी, ठोस पावले उचलावीत अशी अपेक्षा या तीनही विभागातील जनतेची आहे. मागील काळात दांडेकर समिती स्थापन केली गेली. त्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला. त्या अहवालामध्ये समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. विदर्भ आणि मराठवाड्याच्या अनुशेषाबाबत केळकर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

समितीने आपल्या अहवालात शिफारशी केलेल्या आहेत, त्याचे आऊटपूट काय आहे? ज्या समित्या नेमल्या गेल्या त्यांच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीचा लेखाजोखा घेतला तर त्यातून

...4...



श्री.विक्रम काळे....

फारसे काही निष्पन्न झाले असे दिसून येत नाही. समित्यांचे कामकाज, सदस्यांचे भत्ते यावर शासनाने मोठया प्रमाणात खर्च केला आहे. परंतु त्याचे निष्कर्ष काय आहेत, या समित्यांमुळे मागासलेल्या भागातील जनतेचा काय फायदा झाला किंवा होणार आहे याचा लेखाजोखा मांडण्याचे काम शासनाने केले पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सातत्याने दुष्काळ पडतो, कमी पाऊस पडतो त्यामुळे वारंवार पाणी टंचाई निर्माण होते. त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी उपाययोजना केलेले आहे. आघाडी सरकारच्या काळात देखील अशी संकटे सातत्याने आली होती. त्या संकटामध्ये शेतकऱ्यांना धीर देण्याचे, महाराष्ट्राच्या जनतेमागे उभे राहण्याचे, त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम या देशाचे माजी कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी केले. कुठेही दुष्काळ पडला, गारपीट झ ाली, द्राक्ष बागा उद्ध्वस्त झाल्या, मोसंबी बागा अडचणीत आल्या त्यावेळी माननीय श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, दारात जाऊन त्यांचे मनोधैर्य वाढवून त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.

नंतर एफ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.विक्रम काळे....

त्याला धीर देण्याचे काम केले आहे. श्री.शरद पवार साहेब तेवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी केंद्र शासनाच्या माध्यमातून रूपये 14000 कोटीची मदत देण्याचे काम देखील केले आहे. मी मागच्या वेळी बोलताना एक सूचना केली होती. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केंद्र सरकारमध्ये आपला कोणी तरी वाली आहे असे वाटत होते. आज केंद्रात भाजपाचे सरकार आले आहे. लोकशाहीमध्ये सत्ता परिवर्तन हे अपेक्षित असते. केंद्रीय कृषी मंत्री महाराष्ट्रात फिरकलेच नाहीत. त्याचा उल्लेख सभागृहात देखील करण्यात आला होता. परवा येणार अशी बातमी आम्ही पेपरमध्ये वाचली. पण ते आले की नाहीत हे समजले नाही. परंतु, नाशिक येथे येऊन गेल्याची एक छोटीशी बातमी काल वाचनात आली. त्यांनी मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या भागात यावयास पाहिजे होते. या भागातील शेतकऱ्यांचे अत्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. आज या भागात दुष्काळाची परिस्थिती भीषण आहे. अशा भागांमध्ये येण्यास केंद्रीय मंत्र्यांना वेळ का मिळाला नाही असा माझा प्रश्न आहे. केंद्रीय मंत्री विदर्भात न आल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना देखील खेद वाटला असेल. अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला मदत मिळाली पाहिजे. ती मदत त्याच्या दारापर्यंत पोहोचली आहे. मागच्या वेळी माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी अनेक घोषणा केल्या होत्या. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील घोषणा केल्या होत्या. आम्ही त्याचे स्वागत करतो. आपण ज्या योजना आखतो त्या शेवटच्या माणसांपर्यंत पोहोचतात की नाही याचा देखील आढावा घेण्याचे काम निश्चितपणाने करावे लागणार आहे. मराठवाड्यासाठी रूपये 240 कोटींची मागणी करण्यात आली होती. जालना जिल्ह्यासाठी 214 कोटी रूपयांची मागणी होती. परभणी जिल्ह्यांसाठी 177 कोटी रूपयांची मागणी होती. हिंगोली जिल्ह्यासाठी 118 कोटी रूपयांची मागणी होती. नांदेड जिल्ह्यासाठी 275 कोटी रूपयांची मागणी होती. बीड आणि लातूर जिल्ह्यांसाठी रूपये 228 आणि रूपये 174 कोटींची मागणी होती. माझ्या उस्मानाबाद जिल्ह्यासाठी 79 कोटी रूपयांची मागणी होती.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे...

असे असताना सरकारकडून औरंगाबाद जिल्ह्यासाठी 240 कोटी रूपयांच्या बदल्यात रूपये 48 कोटी मिळाले आहेत. जालना जिल्ह्यासाठी 214 रूपयांच्या बदल्यात फक्त 82 कोटी रूपये मिळाले आहेत. परभणी जिल्ह्यासाठी 177 कोटी रूपयांच्या बदल्यात फक्त 52 कोटी रूपये मिळाले आहेत. हिंगोली जिल्ह्यासाठी 111 कोटी रूपयांच्या बदल्यात फक्त 22 कोटी रूपये मिळाले आहेत. नांदेड जिल्ह्यासाठी 275 कोटी रूपयाच्या बदल्यात फक्त 44 कोटी रूपये मिळाले आहेत. बीड जिल्ह्यासाठी 228 कोटी रूपयांच्या बदल्यात 117 कोटी रूपये मिळाले आहेत. लातूर जिल्ह्यासाठी 70 कोटी रूपये आणि उस्मानाबाद जिल्ह्यासाठी 98 कोटी रूपये मिळाले आहेत. यात देखील मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. विकासाचा मागचा बॅकलॉग आपण सोडून द्यावा. गारपिटीमुळे, दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यासंबंधात किती निधी देणे होते त्याबाबतची आकडेवारी मी आता सांगितली आहे. आपण निर्णय घेतो पण त्याची अंमलबजावणी अधिकारी करीत असतात. आपण निधी पाठवितो. पण अधिकारी खाली काम करीत नाहीत. त्यामुळे मराठवाड्यातील रूपये 190 कोटी इतका निधी परत गेलेला आहे. आज मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशमधील निधी परत गेलेला आहे. हे केवळ अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे झाले आहे.शेतकऱ्याला हा निधी दिला ज्या अधिकाऱ्याने दिला नाही तो अधिकारी कोण आहे याचा शोध घेऊन त्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे असा माझा प्रश्न आहे. मदतीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. मराठवाड्यातील 10 लाख शेतकरी, विदर्भातील 1 लाख शेतकरी, नाशिक मधील 50 हजार शेतकरी मदतीपासून वंचित राहिलेले आहेत. एवढे बोलून वेळे अभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

.......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा होत आहे. आज ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था पूर्णपणाने बदलत चालली आहे. गारपीट, वादळी पाऊस, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीमुळे महाराष्ट्रावर एक सारखे संकट येत आहे. पहिला पंचनामा संपत नाही तोवर दुसरे संकट उभे राहते. काल परवा 28 तारखेला सुद्धा मागचे पंचनामे पूर्ण होण्याच्या आधीच आमच्या नंदूरबार, धुळे जिल्ह्याच्या परिसरामध्ये फार मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली. जनतेच्या सरकारकडून अपेक्षा असणे हे स्वाभाविक आहे. त्यामुळे आमची विनंती आहे की, शासनाने नुसती घोषणा करून चालणार नाही. मागच्या वेळी आपण मदत जाहीर केली होती. केंद्र शासनाने राज्याला वेळेवर मदत दिली नाही म्हणून महाराष्ट्र शासन थांबले नाही. राज्य शासनाने चार हजार कोटी रुपये स्वतःच्या तिजोरीतून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिले. परंतु, तो निधी वेळेमध्ये बँकेत पोहोचला आहे काय ? सरकारने पैसे वेळेवर पाठविले, परंतु, बँकेचे अधिकारी त्यांच्या चुकीच्या वागणुकीमुळे शेतकऱ्याला पैसे देऊ शकत नाही. असंख्य शेतकऱ्यांसाठी आलेले पैसे त्यांच्या खात्यावर जमा झाले असते. शेतकऱ्यांच्या कर्जाच्या रकमेत पैसे जमा करावयाचे नाही अशा प्रकारचे आदेश आपण दिले होते. तरी सुद्धा ती मदत शेतकऱ्यांवर असलेल्या कर्जाच्या रकमेत जमा करण्यात आली. असे असंख्य किस्से ग्रामीण भागामध्ये आपल्याला ऐकायला मिळतील. तशी यादी देखील देण्यास मी तयार आहे. गेल्या एक वर्षापासून महाराष्ट्रावर सातत्याने संकटे येत आहेत. अवकाळी पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांचे अद्यापि पंचनामे झालेले नाहीत. आताच सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सविस्तर माहिती सदनाला दिली आहे. केंद्र सरकारने आम्हाला 2000 कोटी रुपये दिले आहेत. आमचे कृषी मंत्री तो निधी आणण्यासाठी दिल्लीमध्ये गेले आहेत. महाराष्ट्राला केंद्र शासनाच्या माध्यमातून जास्त फायदा होत असेल तर त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. केंद्राकडून उशिरा मदत येणार असेल तर ती चार हजार कोटीच्या रकमेत जमा न करता तो निधी शेतकऱ्यांना देण्याचे काम आपण करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी ....

लागू आहे. ग्रामीण भागातील माणसाचा विमा काढण्याची देखील घोषणा झाली आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याला विम्याची मदत मिळूच शकत नाही. अशा शेतकऱ्यांना विमा देण्याचे विमा कंपनीच नाकारते. मी माझ्या नंदूरबार शहरातील प्रत्येक नागरिकांचा नगरपालिकेच्या माध्यमातून गेल्या 12-15 वर्षापासून विमा काढत आहे. एखाद्या नागरिकाने आत्महत्या केली तर त्याचे प्रकरण मंजूरच होत नाही. त्यामुळे विमा काढून शेतकऱ्यांना मदत होईल असे नाही. विम्याच्या ज्या अटी आहेत त्याचा गांभीर्याने विचार केला तर विमा कंपन्या देखील सर्वसामान्य माणसांना लवकर मदत करीत नाही हे लक्षात येईल. अशा वेळी विमा काढून आमची जबाबदारी संपली असे म्हणता येणार नाही. आपण शेतकऱ्यांना पीक कर्जाची हमी देतो त्याची मर्यादा वाढविली पाहिजे. आता उत्पादनाचा खर्च वाढला आहे. पूर्वीच्या काळा प्रमाणेच आता देखील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना मदत करीत आहेत. कापसावर, ऊसावर वेगवेगळे स्लॅब आहेत. आज उत्पादन खर्च वाढला आहे. प्रसंगी शेतकऱ्याच्या मालाला उत्पन्न मिळत नाही. आज कापूस उत्पादक शेतकरी रडत आहे. बाजारभाव 3200 रूपये असताना आम्ही 4000 रूपये भाव देत आहोत असे सरकारचे म्हणणे आहे. सीसीआयने 4000 रूपयाने कापूस खरेदी केला आहे. आज सीसीआयच्या केंद्रावर कोणीही कापूस देत नाहीत. कारण बाजारात थोडा जास्त दर मिळत आहे. शेतकऱ्याला एकेकाळी प्रती क्विंटल सहा हजार रूपये भाव मिळत असताना आज तोच भाव रूपये चार हजार प्रती क्विंटलवर आलेला आहे. आज मिरची व कांद्याच्या भाव उतरले आहेत. आज डाळींची काय परिस्थिती आहे हे माहीत आहे. आज आपण शेतकऱ्याला मदत करीत नाही म्हणून तो अत्यंत चिंतेत आहे. माझ्यावर असलेले कर्ज अर्थसंकल्पाच्या माध्यमातून माफ होईल अशी अपेक्षा आज शेतकऱ्यांची होती. आपण जेव्हा विरोधी पक्षात होता त्यावेळी सातत्याने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे अशी मागणी करीत होता. आपण कर्ज माफ कराल या दृष्टीनेच महाराष्ट्रातील शेतकरी आपल्याकडे पाहात होता. पण दुर्दैवाने आपण सत्तेमध्ये बसल्यानंतर शेतकऱ्यांपोटी असलेली आपली बांधिलकी संपली आहे. आपण शेतकऱ्यांकडे पाठ फिरवली.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघवंशी .......

आणि मेसेज असा दिला की, शेतकरी सरकारकडून जेवढी मदत अपेक्षित करतो तेवढी मदत हे सरकार करु शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे, संपूर्ण वीज बिल शासनाने माफ केले पाहिजे. मोठया उद्योगपतींनी वीज बिल बुडवले तर ते चालते परंतु समजा दोन चार शेतकऱ्यांचे वीज बिल थकले तर डीपीवरुन संपूर्ण कनेक्शन कट केले जाते. जो शेतकरी वीज बिल नियमितपणे भरत असतो त्याचेही वीज कनेक्शन कट कले जाते. ज्यावेळेस पूर्ण ट्रान्सफॉर्मर बंद केला जातो त्यावेळेला या ट्रान्सफॉर्मरच्या परिसरातील हातात आलेले संपूर्ण पीक जळतांना आपण पाहिलेले आहे. आता शासनाने शेतकऱ्याला मदत करणे ही काळाची गरज झाली आहे.

सभापती महोदय, अवकाळी पाऊस, गारपीट यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने यासंदर्भात तातडीने पंचनामे करण्याची आवश्यकता आहे. शासन म्हणेल आम्ही गारपिटीमध्ये मदत दिली होती आता कशी काय मदत देणार ? परंतु शेतकऱ्याने दुसरे पीक घेतले असेल व त्या दुसऱ्या पिकाचे नुकसान झाले असेल तर अशा पिकाला शासनाने मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने नवीन पंचनामे करण्याचे आदेश तातडीने देण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्याने आता कांद्याची लागवड केली होती त्या कांद्याचे गारपिटीमध्ये संपूर्ण नुकसान झालेले आहे. तयार झालेल्या गव्हावर गारा पडल्यामुळे गव्हाचे पीक उध्वस्त झाले आहे. आमच्या उत्तर महाराष्ट्रात पपईचे उत्पादन मोठया प्रमाणात घेतले जाते. आज 2 रुपये किलोने सुध्दा कोणी पपई घेण्यास तयार नाही अशी परिस्थिती आहे. पपईची परिस्थिती एवढी बिकट आहे की, शेतकरी शेतात सुध्दा जात पीक बघावयास जात नाही. जागल्याचा पगार देणे सुध्दा आता पपई उत्पादकाला परवडत नाही. त्यामुळे अशा वेळेला संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मदत करणे ही शासनाची जबाबदारी आहे व ही जबाबदारी शासन पार पाडेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. गेल्या वर्षभरापासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर वेगवेगळया पध्दतीने संकटे येत आहेत. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सावरण्यात इश्वर शक्ती देईल असा ठाम विश्वास आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भातील अपेक्षा हे शासन पूर्ण करेल अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. -----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे आणि आम्ही सगळयांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला होता. मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात दुष्काळ आणि तीव्र टंचाईची परिस्थिती या विषयावर यासभागृहामध्ये सखोल चर्चा होऊन त्यावर निश्चितपणे दिशा मिळावी व त्यासाठी जी काही उपायोजना करण्याची आवश्यकता आहे त्या उपाययोजना शासनाने तातडीने हाती घ्याव्यात या उद्देशाने हा प्रस्ताव आम्ही चर्चेसाठी सभागृहात आणलेला आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी या विषयाच्या संदर्भातील तीव्रता कथन केलेली आहे. शेतकऱ्यांवर येत असलेल्या संकटांसदर्भातील चर्चा या ठरावाच्या निमित्ताने करण्यात आलेली आहे. क्लायमेट चेंजेस आणि ग्लोबल वॉर्मिंग या विषयावरील चर्चेची मी मागणी केलेली आहे. क्लायमेट चेंजेस आणि ग्लोबल वॉर्मिंग या दोन विषयामुळे निसर्गाचे ऋतु चक्र संपूर्णपणे वेगळया दिशेने जाते की, काय अशी शक्यता निर्माण झालेली आहे. आपल्याला यासंदर्भात नियोजन करावयाचे असेल तर ते नियोजन करतांना ही जी अनपेक्षित येणारी संकटे आहेत त्या संकटांची चाहूल अगोदर लागण्याची काही तरी व्यवस्था आपल्या राज्यात तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता झाली आहे. वाद-विवाद, पाण्याचे वाटप, पाण्याचा साठा या विषयाच्या संदर्भात गेल्या 3-4 दिवसांपासून वाहिन्यांवर मराठवाडयातील कोणत्या धरणात किती पाणी शिल्लक आहे व त्यातील मृत पाणी किती आहे व वापरात येणारे पाणी किती आहे याबद्दलची सविस्तर माहिती आलेली आहे. आता पिण्याला पाणी शिल्लक नसल्यामुळे शेतीला पाणी देण्याचा प्रश्नच येत नाही. अशा परिस्थितीमध्ये जगणे दुरापास्त झाल्याचे आपल्या नजरेस वारंवार पडते आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेच्या संदर्भात आपले सरकार सत्तेवर आल्यापासून या शासनाने काही निर्णय घेतले आहेत. परंतु एकूणच या प्रश्नाची व्यापकता आणि या प्रश्नाला आवश्यक असणारे अर्थसहाय्य कसे उपलब्ध करावयाचे यासंदर्भात फार मोठा प्रश्न या निमित्ताने तयार झालेला आहे. पूर्वीचे दाखले देऊ नये असे आपण म्हणत असतो. परंतु एक भावना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या संदर्भात निश्चितपणे आहे की, यापूर्वी जेव्हा अशा प्रकारची संकटे येत होती त्यावेळेस केंद्र शासनाकडून, तत्कालीन शासनाकडून राज्याकडे लक्ष पुरवले जात असे व त्यायोगे दुष्काळग्रस्त, टंचाईग्रस्त भागाला मदत दिली जात असे. सद्याच्या घडीला तशा प्रकारचे काम होत आहे असे कोणालाही

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले.........

वाटत नाही. या ठिकाणी सन्माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी शेतकऱ्यांना सावकारीतून मुक्त करण्याचा एक फार मोठा निर्णय घेतला आहे असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना एक प्रकारचा दिलासा मिळेलही.परंतु हा झाला शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचना थांबवण्याचा प्रयत्न. आपण कायम मागच्या गोष्टी बोलत राहिलो तर आताच्या घडीला तुम्ही शेतकऱ्यांना कसा दिलासा देणार आहात, शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी काय प्रयत्न करणार याबद्दल शासनाने ठोस भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या राज्यात आज घडीला शेतकऱ्यांच्या पिकाचे जे नुकसान झाले आहे ते केवळ या वर्षापुरते मर्यादित नाही. एखादे मोठे संकट येऊन गेल्यानंतर त्याचे परिणाम गेले काही वर्ष सातत्याने समोर येत असतात. ज्यावेळेस फळबागायतदारांची बाग संपूर्णपणे नष्ट होते त्यावेळेस अशा शेतकऱ्याची फार मोठी आर्थिक कुचंबना होत असते. नाशिक जिल्हयातील द्राक्ष उत्पादकांची अवस्था अशी झाली आहे की, पुढील वर्षी द्राक्ष नव्याने लावावयाची किंवा नाही असा प्रश्न द्राक्ष बागायतदारांसमोर उभा राहिला आहे. शेतकऱ्यांच्या शेतीला पुरक असे व्यवसाय असणे आता आवश्यक झाले आहे. परंतु या पुरक व्यवसायाकडे आपण ज्या पध्दतीने बघावयास पाहिजे त्या पध्दतीने बघत नाही. महाराष्ट्रातील दुधाचा व्यवसाय आता अतिशय संकटात सापडला आहे त्यामुळे या ठिकाणी सुध्दा शासनाने शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करण्याची आवश्यकता आहे. हतबलता येऊन शेतकरी आत्महत्याच करणार असतील आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची विभागीय किंवा जिल्हा पातळीवरील यंत्रणामार्फत चौकशी करुन आत्महत्या पात्र किंवा अपात्र ठरविण्याचा उपक्रम आहे व त्यामधूनही या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याला मदत मिळणार आहे. त्या मदतीतून ते आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब पुढील वाटचाल करु शकेल काय ? या प्रश्नावर देखील शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. आज शेतमालाला जो भाव दिला जातो त्या भावाबद्दलची अस्थिरता आज इतक्या मोठया प्रमाणावर आहे की, काबाडकष्ट करुन पीक तयार करावयाचे व पीक तयार केल्यानंतर त्या पिकाचा खर्चही निघणार नसेल तर पीक काढण्यापेक्षा, पीक काढण्यासाठी खर्च करण्यापेक्षा जमीन ओसाड ठेवण्याचा विचार आता शेतकरी करु लागले आहेत. त्यामुळे अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी नेमके काय

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले.........

करावयाचे असाही प्रश्न निर्माण होतो. मानवतेच्या दृष्टीने अनेक उपाययोजना करून हा प्रश्न संपणारा नाही. खरे म्हणजे याच्या मुलभूत गोष्टीकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ज्या प्रमाणे आज कृषी विज्ञान पुढे जात आहे, हवामानाची माहिती देणाऱ्या संस्था उभ्या राहात आहेत.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

आपण त्याची व्यवस्था कशापद्धतीने करणार आहोत ? हे सर्व करीत आपण दुसरा पर्याय उपलब्ध करुन देणार नाही तोपर्यंत हे असेच सुरु राहणार आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि विशेष करुन आता ज्या भागावर संकट आलेले आहे त्या भागामध्ये काही प्रयोग केले नाही तर त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

सभापती महोदय, आपण नेहमी म्हणतो की, आता ही संकटाची वेळ आहे, आपणास शेतकऱ्यांना जितकी जास्त मदत करता येईल तितकी केली पाहिजे. माझ्या मते ही मदत फक्त मलमपट्टी आहे. मूळ आजार दूर होण्यासाठी ज्या काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे त्या करणे आवश्यक आहे. उदाहरण सांगायचे झाले तर आज मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे त्यांच्या गरजा पुरविताना कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग नावाचा एक नवा प्रकार उदयाला आलेला आहे. एखाद्या मोठ्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या संस्था उभ्या राहिल्या पाहिजेत. यातून शेतमालाच्या भावाची निश्चिती झाली आणि पिकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याची व्यवस्था झाली तर शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढेल. अशा योजना शेतकऱ्यांसाठी उपयोगी आहेत हे समजावून सांगण्यासाठी एक वेगळा उपक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र काही केल्या कमी होत नाही, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. कुटुंब प्रमुख हताश होऊन आत्महत्या करतो. पण घरातील व्यक्तींना पुढे जगायचे असते. कुटुंब प्रमुखाच्या जाण्याने त्यांचे पुढील जगण्याचे मार्ग बंद झाले तर मुलांच्या शिक्षणाची काय अवस्था होणार आहे, त्यांचे पालनपोषण कोण करणार आहे ?

सभापती महोदय, आपण येथे सिंचनासंबंधी अनेक माध्यमातून वारंवार चर्चा केलेली आहे. आपण सर्वत्र सूक्ष्म सिंचनाचा प्रकल्प राबविणार आहोत. काही ठिकाणी वाजवीपेक्षा जास्त पाणी वापरल्यामुळे ज्याला पाण्याची आवश्यकता आहे तेथील पाणी कमी होण्याची शक्यता निर्माण होते. त्यावर बंधनकारक अशा कोणत्या उपाययोजना आहेत ? मागील काळात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी ठिबक योजना आणली होती. अशा नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी आपणास दीर्घकालीन उपाययोजना, तातडीने करावयाच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्याच्या उपलब्ध असलेल्या स्त्रोतामधून आणि केंद्र शासनाच्या मदतीने अधिक काय करता येईल याचा देखील गांभीर्याने विचार केला पाहिजे.



श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, या विषयावर बोलण्यासारखे खूप काही आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी यावर आपले विचार मांडलेले आहेत. सभागृहात असे विषय चर्चेला येतात तेव्हा त्याचे साहित्यामध्ये काय पडसाद उमटत असतील याचाही मी सातत्याने विचार करीत असतो. हा विषय चर्चेला असताना मी कागदावर काही लिहिले आहे ते मी वाचून दाखवितो.

धाय मोकलून रडलीय ना बये, तुझा घर धनी हरला जगण्याची लढाई,
टांगून घेतले झाडाला, तुझा टाहो आकाशाने ऐकला,
डोळे तुझे कोरडे ठाक, शेतातील विहिरीत टिपूस पण नाय,
तो तर गेला, पण तुला जगायला हवे,
चूल तर पेटवायला हवी, लेकरांना शाळा दाखवायला हवी,
मोलमजुरी शोधायला हवी, डोळ्यातील अवकाळी पाणी जपून ठेव,
गळ्यातील काळा मणी काढू नकोस, कपाळीचे कुंकू पुसू नकोस,
कागदी घोडे नाचविले जातील, पेपरात मदत दिल्याचे फोटो येतील,
पण पदरात काय पडेल ते कळणार नाही,
तुझ्या नावावर आहे ना छोटासा भुईचा तुकडा,
सावकार मागे लागेल नावावर करायला,
हिम्मत नाही हरायची, मान नाही टाकायची,
तुच ना माय लेकरांची, कारडाचा "आधार" तुझ्या जगण्याला,
पण पेन्शनीत नको निघूस,
खोच पदर, सामोरी जा, मोडून जाणे सोपे असते बये,
तुला तर जगायला शिकायचे आहे, धीर नकोस सोडू,
पुस आता डोळे, लेकरे वाट पाहतायेत घराकडे
आता माघार नाही, पुढेच जायचे,
केव्हा तरी आकाशाला पाझर फुटेल,मातीची माय पुन्हा बहरेल,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, शासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी मी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..3..



श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यामध्ये दुष्काळावर चर्चा झाली. या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर दुपारच्या सत्रामध्ये अपेक्षित होते. राज्यामध्ये सरकारने मदत वाटप सुरु केलेले आहे. मदतीसाठी एकूण किती रक्कम लागणार आहे, राज्य शासनाने किती तरतूद केली आणि केंद्र शासनाने किती मदत दिली, या मिळालेल्या मदतीमध्ये शासनाचा खर्च भागत आहे काय किंवा शासनाला आणखी तरतूद उपलब्ध करावी लागेल काय यासंबंधीची माहिती मंत्री महोदयांनी दिली तर उचित होईल असे मला वाटते.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री.धनंजय मुंडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या महत्वाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित केली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, हेमंत टकले यांनी भाग घेतला.

सभापती महोदय, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पाचव्यांदा चर्चा होत आहे. म्हणजे हे सरकार शेतऱ्यांच्या प्रश्नावर किती गंभीर आहे ते दिसून येते. निसर्ग आपला इतका पाठपुरावा करीत आहे की, हे अधिवेशन सुरु झाल्यापासून कुठल्या ना कुठल्या भागात वादळी पाऊस आणि गारपीट सुरु आहे. एका भागात झालेल्या वादळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी करतो तोच दुसऱ्या दिवशी दुसऱ्या भागात गारपिटी झाल्याचे कळते आणि तेथील शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी होते अशी परिस्थिती आहे. राज्यामध्ये यापूर्वी अशी परिस्थिती नव्हती.

सभापती महोदय, मागील दहा-बारा वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून ते आजपर्यंत थांबलेले नाही. या नैसर्गिक आपत्तीला तोंड देत असताना सरकारचे काही धोरणे असतील, काही काही वेळेला सरकार मदत करण्यास अपुरे पडले असेल वा अन्य काही कारणे असतील पण एक गोष्ट खरी आहे की, राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या अजूनपर्यंत थांबलेल्या नाहीत. राज्यामध्ये उद्‌भवलेल्या अभूतपूर्व परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सरकारच्या माध्यमातून होत आहे. मला माहीत आहे की, यामध्ये काही मर्यादा आहेत. आपणास शेतकऱ्यांना मदत करण्याची इच्छा असली तर त्यास मर्यादा आहेत याची तुम्हा आम्हाला जाणीव

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

आहे. परंतु मर्यादा आहेत म्हणून आपणास थांबून चालणार नाही. पण शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने सरकार काम करीत आहे. या ठिकाणी कापूस, सोयाबीन पिकाला भाव देण्याचा प्रश्न, जलसंधारणासंबंधी प्रश्न, केळकर समितीच्या अहवालाच्या संदर्भातील विषय, केळी उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न असे विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले. पाणी वाटपा संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आले.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

त्यांनी सांगितले की, कमांड एरिया मोकळा केला. पण ते करणे सयुक्तिक नाही, असे मी व्यक्तिगतरित्या म्हटले होते. कमांड एरियामध्ये अशा प्रशारे जलसंधारणाची कामे करणे सयुक्तिक नाही, असे मी सांगितले होते. कमांड एरियात अशी कामे केल्यामुळे लक्षात येते की, त्या ठिकाणी आपण पाण्याचे पुरेसे नियोजन करु शकलो नाही. पण ज्या ठिकाणी पाणी मिळत नाही त्या ठिकाणी कमांड एरियामध्ये पाणी देण्याची व्यवस्था करणे ही आपली जबाबदारी आहे. एका बाजूला कमांड एरियामध्ये कामे करीत असताना दुसऱ्या बाजूला कॅचमेंट एरियामध्ये अशी कामे करता कामा नये. कारण धरणाच्या वरच्या क्षेत्रात काम करावयास लागलो तर खालच्या धरणात पाणी येणार नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, नाशिकमध्ये गिरणा धरण आहे. 100 टीएमसी क्षमता असलेले हे धरण 100 टक्के भरणारे होते. परंतु लोकप्रतिधींच्या आग्रहास्तव त्या धरणाच्या वरच्या बाजूला बरीच धरणे करण्यात आली. त्यामुळे गेल्या 15-20 वर्षात गिरणा धरण 50 टक्के सुध्दा भरत नाही. जायकवाडी धरणाची सुध्दा हीच स्थिती झाली आहे. त्यामुळे या परिस्थितीत कॅचमेंट एरियामध्ये कामे न करता कमांड एरियामध्ये जलसंधारणाची कामे करणे ठीक आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न धोरणाचा आहे. या ठिकाणी बोलताना काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या प्रकरणी केवळ मलमपट्टी करण्यापुरत्या उपाययोजना करता कामा नयेत.

महोदय, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना मदत केली पाहिजे या मताचे आपण आहोत. परंतु मुळात आत्महत्याच होता कामा नये, असे मला वाटते. दुष्काळाचा मुकाबला करीत असताना राज्यात दुष्काळ पडणारच आहे. दुष्काळ पडणे न पडणे, हा विषय तुमच्या-माझ्या हातात नाही. परंतु दुष्काळाची तीव्रता कमी कशी करता येईल, आत्महत्या होणार नाहीत यासाठी काही दीर्घकालीन धोरण करता येईल काय, या बाबत आज उपाययोजना केल्यानंतर त्याचे परिणाम पुढील कालखंडात दिसून येतील. महोदय, मागचे सरकार असो की आताचे सरकार असो, या सरकारांनी या संकटांवर मात करण्यासाठी किंवा उपाययोजना करण्यासाठी काही निर्णय घेतलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी टाटा कन्सल्टन्सीच्या अहवालाबाबतचा विषय मांडला. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या संदर्भात विविध अहवाल राज्य सरकारला प्राप्त झालेले आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत 5-6

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

अहवाल प्राप्त झालेले आहेत. त्या अहवालांची छाननी करण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील परिस्थितीची पाहणी केल्यानुसार टाटा कन्सल्टन्सीने राज्य सरकारला अहवाल सादर केला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील परिस्थिती, त्या भागातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणि त्या भागातील भौगोलिक परिस्थितीला अनुरूप असलेली स्थिती या संदर्भातील अहवाल सरकारला प्राप्त झालेले आहेत. याशिवाय केळकर समितीचा अहवाल सुध्दा प्राप्त झाला आहे. या अहवालावर सभागृहात चर्चा करण्याबाबत आपण नियोजन केले आहे. याशिवाय राज्यातील अनुशेष आणि इतरही अनेक मुद्दे आहेत. असो.

सभापती महोदय, या विषयावर वारंवार तेच तेच उत्तर देण्यात अर्थ नाही. कारण दुष्काळाच्या विषयावर दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून तेच तेच मुद्दे जसेच्या तसेच येत असतात. त्यामुळे पाच-आठ दिवसानंतर नवीन मुद्दे येतील अशातील भाग नाही. लोकांचा आणि शेतकऱ्यांचा रेटा असतो, किंबहुना त्यांची अपेक्षा असते की, सभागृहात चर्चा केल्याशिवाय आपल्याला काही मिळणार नाही.

सभापती महोदय, मागच्या कालखंडात खरीप पिकांच्या बाबतीत 50 पैशांच्या आत आणेवारी असलेल्या गावांची अंतिम संख्या 23811 आढळून आली आहे. तसेच रब्बी पिकांच्या बाबतीत 50 पैशांच्या आत आणेवारी असलेल्या गावांची संख्या अंतिम स्थितीपूर्वी 1078 आहे. अजून त्यामध्ये गावे समाविष्ट होतील. परवा निसर्गाच्या लहरीपणामुळे मराठवाडा आणि खान्देश विभागात शेतीचे गारपिटीने नुकसान झाले. अजूनही उद्या-परवा काही ठिकाणी वादळ आणि हवामानातील बदलामुळे नुकसान होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविलेली आहे. दररोज कोणत्याना कोणत्या प्रांतामध्ये नुकसान होणाऱ्या गावांची संख्या वाढत चालली आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, राज्य सरकारला केंद्र सरकारकडून किती रकमेच्या मदतीची गरज होती, प्रत्यक्षात किती मदत मिळाली आणि शेतकऱ्यांना किती रकमेचे वाटप केले, हे सभागृहाला समजले पाहिजे.

सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, खरीप हंगामातील नुकसानीपोटी शेतकऱ्यांना 4803 कोटी रुपये आर्थिक मदत द्यावयाची होती. त्यापैकी 4000 कोटी

श्री.एकनाथराव खडसे....

रुपये राज्य सरकारने तिजोरीतून उपलब्ध करुन दिले आहेत. यातून 64,18,980 बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्यक्षात 3,345 कोटी रुपये जमा केले आहेत. उर्वरित निधी जमा का होऊ शकला नाही याची विविध कारणे आहेत. दोन दिवसांपूर्वी याबाबतचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. त्यावेळी लक्षात आले की, वारसाच्या नोंदी नसल्यामुळे, काही प्रकरणात वडील हयात नसल्यामुळे आणि शेतकऱ्यांच्या नावे बँक खाते नसल्यामुळे संबधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देता आली नाही. त्यामुळे काल दुपारी या विषयी बैठक घेऊन सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहे की, त्यांनी तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांना सोबत घेऊन गावांच्या ठिकाणी जाऊन शेतकऱ्यांना बँक खाते उघडण्यासाठी प्रवृत्त करावे. त्यांना बँकेत घेऊन जाऊन खाते उघडावे. जर बँकेचे अधिकारी बँक खाते उघडून देण्यासाठी गावात येत असतील तर तशी व्यवस्था करावी. महोदय, या शेतकऱ्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम शासनाकडे उपलब्ध आहे. परंतु शेतकऱ्यांच्या नावे बँक खाते नसल्यामुळे त्यांचे चेक वटत नाहीत, ही मुख्य अडचण आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे मागणी केली होती. पण केंद्र सरकारचा पैसा राज्य सरकारला विलंबाने प्राप्त झाला. माझ्याकडे गेल्या पाच-सहा वर्षांत केंद्राकडून मिळालेल्या मदतीची आकडेवारी आहे. परंतु गेल्या पाच-सात वर्षात केंद्र सरकारने 500-700 कोटी रुपयांच्या वर कधीही मदत केली नाही. परंतु या वर्षी केंद्र सरकारने राज्य सरकारला 2 हजार कोटी रुपयांची प्राथमिक स्वरुपात मदत दिली असून, ती रक्कम राज्य सरकारला प्राप्त झाली आहे. महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. पहिल्या टप्प्यातील पैसे देण्याची प्रक्रिया सुरु आहे. दुसऱ्या टप्प्यातील पैसे देणे बाकी आहे. कारण राज्यातील काही भागात फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. फळबागांच्या नुकसानीपोटी पूर्णत: नुकसान भरपाई देऊ शकत नाही म्हणून फळबाग शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाच्या माध्यमातून पैसे दिले जातात. फळबाग उत्पादकांच्या बाबतीत दोन बाबी सरकारच्या विचाराधीन आहेत. रब्बी पिकांना ज्याप्रकारे नुकसान भरपाई दिली आहे त्यानुसार फळबाग

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उत्पादकांना नुकसानीपोटी हेक्टरी 25 हजार रुपयांची मदत करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी

..4..



श्री.एकनाथराव खडसे....

करण्यात आली आहे. आमचे तर म्हणणे आहे की, ही रक्कम तर देता येईलच, परंतु या रकमेत अजून वाढ करता येईल काय, या बाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला आहे. केंद्र सरकारने सांगितले की, 12 हजार रुपयांच्या वर मदत देऊ शकत नाही. जर फळबाग उत्पादकांना 25 हजार रुपयांची मदत करावयाची असेल तर राज्य सरकारने उर्वरित 13 हजार रुपये आपल्या तिजोरीतून द्यावेत. त्यामुळे राज्य सरकारने असे ठरविले आहे की, 12 हजार रुपये केंद्र सरकारच्या एनडीआरएफ मधून आणि उर्वरित 13 हजार रुपये राज्य सरकारच्या तिजोरीतून, अशाप्रकारे एकूण 25 हजार रुपये तात्पुरत्या स्वरुपात फळबागांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना द्यावेत. मुळात 25 हजार रुपयांची मदत सुध्दा तोकडी आहे. कारण आज बागायतदार शेतकऱ्यांच्या बागाच्या बागा उद्‌ध्वस्त झाल्या आहेत. तो शेतकरी उठून उभा राहिला पाहिजे यासाठी ज्या बाबी करणे गरजेचे आहे त्या केल्या पाहिजे. मग त्यामध्ये त्या शेतकऱ्याचे वीज कनेक्शन कापू नये, वीज बिल वसुलीला स्थगिती द्यावी, शेतसारा माफ करावा, त्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, त्यांनी सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचे पुनर्गठन करावे किंवा अन्य काही सवलती देता येतात काय, या उपाययोजना तात्पुरत्या स्वरुपाच्या आहेत. तात्पुरत्या उपाययोजनांमुळे शेतकरी उभा राहणार नाही. त्यामुळे 25 हजार रुपयांच्या आर्थिक मदतीमध्ये अजून वाढ करता येईल काय, यासाठी राज्य सरकारचा प्रयत्न आहे. हे खरे आहे की, अल्पकालीन उपाययोजनांमुळे फळबाग उत्पादक शेतकरी उठून उभा राहू शकणार नाही. आज आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला नियमाप्रमाणे 1 लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात येते. त्या कुटुंबीयांना 50-60 लाख् रुपयांची मदत दिली तरी ती व्यक्ती परत येईल अशी स्थिती नाही. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात एक लाख रुपयांच्या मदतीमध्ये वाढ करुन ती दीड लाख रुपये करणे विचाराधीन आहे. आणखी अशी परिस्थिती निर्माण झाली तर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत करता येईल या बाबतचा प्रस्ताव मागवून तशा प्रकारची मदत करणे सुध्दा विचाराधीन आहे. पुढील कालखंडात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुबीयांना एक-दीड लाख रुपये मदत देण्यापेक्षा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आत्महत्या करणारा शेतकरी असो, नुकसानग्रस्त शेतकरी असो, आपत्तीग्रस्त शेतकरी असो, त्यांचा

..5..



श्री.एकनाथराव खडसे....

गट विमा काढून त्यांना गट विमा कंपनीकडून परस्पर मदत करता येईल काय या बाबतची तपासणी केली आहे. या कामी चार विमा कंपन्या प्राधान्याने पुढे आल्या आहेत. परंतु त्या चारही विमा कंपन्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना विम्याची रक्कम देण्यास नकार दिला आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

आपण त्यांना आणखी वेगळ्या मार्गाने कशी मदत करता येईल अशी विनंती केली. आज दुपारी त्या संदर्भात बैठक आहे. ग्रुप इन्शुरन्सच्या माध्यमातून केंद्र सरकारने विमा घेतला आहे आणि सांगितले आहे की, दर महिन्याला 1 रूपया याप्रमाणे वर्षाचे 12 रूपये भरा. वर्षाचे 12 रूपये भरून अपघाती असो किंवा नैसर्गिक मृत्यू असो 2 लाख रूपयांची मदत देण्याच्या संदर्भातील नवीन योजना केंद्र शासनाने केली आहे. सदर योजनेत विमा कंपनीचे वर्षाचे 12 रूपये हा शेतकऱ्यांचा पैसा त्यांनी न भरता राज्याच्या तिजोरीतून .... (अडथळा) सन्माननीय सदस्यांनी नंतर बोलावे. माझी लिंक तुटली तर मदतीच्या 4 गोष्टी सुटून जातील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी लागणाऱ्या एकूण रकमेच्या संदर्भात व्यवस्थित मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. विषय पुढे जाऊन, प्रश्न मागे सुटून जातील म्हणून मी या विषयाच्या संदर्भात सांगतो. केंद्र सरकारने 2 हजार कोटी रूपये नुकसानभरपाई म्हणून शेतकऱ्यांना मदत केली आहे. सदर मदत दुष्काळी भागाकरिता केली आहे. शासनाने अजून फळबागांच्या, रब्बी पिकांच्या संदर्भात रक्कम वाटप केलेली नाही, ती एकूण रक्कम किती लागणार आहे, त्याचा अंदाज समजला तर बरे होईल. राज्य शासन या संदर्भात एवढी तरतूद करणार आहे असे काही समजले तर बरे होईल. आमचे त्यामधून समाधान होऊ शकेल.

सभापती महोदय, आज आपण मृतांच्या कुटुंबीयांना 1 लाख रूपये देतो. ती रक्कम अधिक वाढवून देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री निधीतून अशी प्रकरणे मंजूर करण्यात येतील. सरसकट आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदतीचा प्रस्ताव राहणार आहे की वैयक्तिक प्रकरणे करण्यात येणार आहेत, याचा खुलासा झाला तर बरे होईल.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई पूर्वी कधीही देण्यात आलेली नाही. सदर भरपाईचे नाव नुकसानभरपाई असे नाही. कारण नुकसानभरपाई देता येऊ शकत नाही. नुकसान कोट्यवधी रूपयांचेही होते. त्यामुळे कोणतेही सरकार एवढी नुकसानभरपाई देऊ शकणार नाही. आपण याला सानुग्रह अनुदान किंवा सानुग्रह



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

मदत असे म्हणू शकतो, असा शब्द वापरतो. आतापर्यंत जशी मदत दिली आहे तशीच पुढील कालखंडातही दिली जाईल. आपण त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने काही प्रस्तावाबाबत म्हटले, केंद्र शासनाने किती दिले असे विचारले.

सभापती महोदय, मघाशी मी संगितले आहे की, आता केंद्र शासनाने 2 हजार कोटी रूपयांची मदत दिली आहे. मी म्हटले आहे की, फळबागायतदार उठून उभा राहिला पाहिजे आणि यासाठी काही उपाययोजना केल्या पाहिजेत. काही मागण्या करण्यात आल्या होत्या की, शेडनेट, पॉलिहाऊस या संदर्भातील सबसिडीमध्ये वाढ झाली पाहिजे, त्यासाठी लागणारी इम्पोर्ट ड्यूटी कमी झाली पाहिजे. आम्ही इम्पोर्ट ड्यूटीच्या संदर्भात बोलणे केले आहे. माननीय केंद्रीय वित्तमंत्री श्री. अरूण जेटली यांनी सांगितले आहे की, बजेट सेशनचा पुढील टप्पा येणार आहे, तोपर्यंत या संदर्भातील टिप्पणी मागवून करता येईल. सदर बाबतीत नक्कीच सकारात्मक निर्णय घेतला जाईल. परंतु अद्यापपावेतो या संदर्भातील निर्णय झालेला नाही. आम्ही पाठपुरावा करणार आहोत. उद्ध्वस्त झालेल्या फळबागा उभ्या राहिल्या पाहिजेत. उद्ध्वस्त फळबागांना पूर्ण अनुदान देता येणार नाही. परंतु त्यांना सबसिडीच्या रूपाने मदत मिळाली पाहिजे. राज्य शासन फळबागांसाठी शेडनेट किंवा पॉलिहाऊस अशी वेगळी योजना आणत आहे. मघाशी मी सांगितले होते की, शेतकऱ्यांसाठी पॅकेज आहे. पॅकेज म्हणजे जे आहे तेच, त्यात नव्याने अशा काही तुम्ही अपेक्षा आता करू नका. काही प्रमाणात वाढ, काही नवीन गोष्टी, जलसंधारणाच्या संदर्भात कायमस्वरूपी व्यवस्था, जलयुक्त शिवाराच्या संदर्भात नव्याने काही घेतलले निर्णय राहू शकतात. आतापर्यंत घेतलेल्या निर्णयामध्ये थोडी फार वाढ करून तेच तुमच्यासमोर आणू. राज्यामध्ये आणखी काही नवीन करता येईल अशी स्थिती नाही. त्यामुळे अगदी पॅकेज म्हटले तरी आता काही तरी नव्याने मिळणार आहे, फार काही होणार आहे अशी स्थिती नाही. नव्याने प्रारूप देऊन पुढील कालखंडात शेतकरी कसा उभा राहील त्या दृष्टीने प्रयत्न करायचा आहे. नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून फळबागांसाठी काही योजना आहेत. आपणाला फळबागायतदारांसाठी अनुदान, शेतकऱ्यांचे काही कर्ज आणि राज्य सरकाचा काही पैसा अशा तीनही प्रकारे मिळून



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

एकरी, हेक्टरी पैसा देता येईल. बऱ्याच ठिकाणी तार तुटलेल्या आहेत, झाडे मोडली आहेत, नवीन रोपे आणायची आहेत, जुनी रोपे तोडून करायचे आहे अशा संदर्भात काही प्रमाणातील मदत नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनच्या माध्यमातून आम्ही देणार आहोत.

सभापती महोदय, मला अंदाज आहे की, एवढ्या फळबागांसाठी 100-125 कोटी रूपयांच्या आसपास केंद्र शासनाकडून मदत मिळेल. 143 कोटी रूपयांचा प्रस्ताव आहे. काही पैसा मिळू शकतो. आपण तो पैसा या संदर्भात देणार आहोत. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये गारपीट झाली. मी त्या संदर्भात मागच्या वेळी सांगितले. आता गारपीट झाल्याने रब्बी पिकांचे नुकसान झाले आहे, गहु, हरभरा वगैरे पिके त्यामध्ये आहेत. मागच्या कालखंडात कापूस, सोयाबीन वगैरे पिकांचे नुकसान झाले. आता अलीकडे जे नुकसान झाले आहे त्याची रक्कम मोठी नाही. केळीचे पीक मुख्य होते. केळी, कापूस त्याच्या भावाच्या तुलनेत अधिक नुकसान भरपाई होती. परंतु या ठिकाणी गहू, हरभरा, कांदा, भाजीपाला यामधील पिके आहेत. द्राक्षे, डाळींब, केळी ही पिके हॉर्टिकल्चरमध्ये येतात. फळबागांचे नुकसान यामध्ये येतात, त्यांचे नुकसान जास्त आहे, याची नुकसानभरपाई कमी आहे.

सभापती महोदयय, दिनांक 28 फेब्रुवारी ते दिनांक 3 मार्च या काळात अवेळी पावसामुळे 30 जिल्ह्यात 7 लाख 90 हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. आता ते क्षेत्र बाधित झाले आहे आणि आता सुध्दा होत आहे. 50 टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्र बाधित झाले आहे ते 2 लाख 53 हजार हेक्टर आहे आणि 50 टक्क्यांपेक्षा कमी बाधित झाले आहे ते 5 लाख 37 हजार हेक्टर आहे. शेती पिकांमध्ये आणखी आंबा, काजू, द्राक्षे, डाळींब, संत्रा या फळ पिकांचाही समावेश आह. सांगली जिल्ह्यातील 4100 मेट्रिक टन बेदाना पावसाळ्यात भिजल्यामुळे वाया गेला आहे, त्याचाही यामध्ये समावेश आहे राज्यात या संदर्भात एकत्र किती नुकसान झाले आहे याचा अंदाज काढणे सुरूआहे. दररोज नव्याने पंचनामे येत आहेत. आजही त्यामध्ये वाढ होत आहे. शासनाकडे अंतिम आकडेवारी या क्षणाला नाही. वादळ, गारपीट थांबल्यानंतर अंतिम आकडेवारी मिळेल. आपल्याला आता आकडेवारी हवी जर असेल तर तात्पुरती आकडवारी देता

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

येईल. 19 जिल्ह्यांतील 1 लाख 78 हजार हेक्टर क्षेत्रात शेती व फळबागांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मघाशी मी सांगितले की, सन 2014 ते फेब्रुवारी, 2015 या काळात मराठवाड्यातील 382 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असून त्यापैकी 295 प्रकरणे पात्र आहेत, 70 प्रकरणे अपात्र आहेत, 18 प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत आणि 293 प्रकरणांना मदत देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त 6 जिल्ह्योत विशेष पॅकेज यापूर्वी दिलेले होते. माननीय पंतप्रधानांनी विदर्भ सिंचनाच्या संदर्भात विदर्भ सधन सिंचन कार्यक्रमामधून पॅकेज दिले होते. मागच्या माननीय पंतप्रधानांनी त्याची सुरूवात केली. सदर बाबीच्या अनुषंगाने ड्रिप इरिगेशनसाठी 90 टक्के सबसिडी देणे, जलसंधारणासाठी, विहिरीच्या खोदकामासाठी धडक कार्यक्रम करणे, इलेक्ट्रिफिकेशनसाठी विशेष कार्यक्रम करून नवीन कनेक्शन देणे, गावागावांत जलसंधारणासाठी विशेष पैसे उपलब्ध करून देणे, नाला बांधबंदिस्ती करणे, सिमेंट तलाव बांधणे, पाझर तलाव बांधणे या संदर्भात फक्त विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी कार्यक्रम आहे, त्यानुसार त्यामध्ये रकमेची अधिक वाढ करून नव्याने जुनाच कार्यक्रम नव्याने केलेला आहे. आपण ठिबक सिंचनाला 80 टक्के अनुदान देत होतो. मी केंद्र शासनाचा कार्यक्रम सांगत आहे. आपण त्यामध्ये नाही. केंद्र सरकारच्या माध्यमातून फक्त 6 जिल्ह्यांसाठी एक कार्यक्रम सुरू आहे. मंजुरी येईल. 6 जिल्ह्यांत 8391 गावांपैकी प्रथम 1619 गावांमध्ये 20 गावांचा एक गट स्थापन करणे आणि या गावांमध्ये मूळ जलसंधारणाच्या बाबतचा आराखडा तयार करणे, प्रत्येक गावासाठी 3600 शेततळ्यांची निर्मिती करणे, 3600 कृषी पंप पुरवठा करणे, 20 गावांसाठी क्षेत्रीय कृषी अधिकारी नेमणे, 4800 शेतकरी गटांना प्रशिक्षण देणे, 4800 शेतकी शाळा उभारणे, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांना चालना देणे अशा स्वरूपाचा एक कार्यक्रम तयार करून त्याला मंजूरी देण्यात आली आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

विदर्भासाठी कायम स्वरुपी ज्या योजना आहेत, त्याबाबतची माहिती मी आता दिली आहे. त्याचप्रमाणे विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या जास्त आत्महत्या होत आहेत, अशा विभागामध्ये केंद्र शासनाच्या नवीन प्रस्तावित शेतकरी जनता विमा योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी विशेष विमा योजना प्रस्तावित करण्यात येत असून विमा कंपनीबरोबर विचारविनिमय सुरु आहे. या विमा योजनेमध्ये जीवन विमा, अपघात विमा यांचा समावेश असून त्या व्यतिरिक्त आरोग्य विमा, आजारपण आणि आत्महत्या यांचाही समावेश करण्यात येऊन एकत्रित विमा योजना प्रस्तावित करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, कर्जाचे पुनर्गठण करावे, अशी मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. सहकारी कर्जाचे पुनर्गठण करण्याच्या सूचना दिलेल्याच आहेत. पूर्वीपासून या सूचना आहेत. हे पुनर्गठण तीन टप्प्यांमध्ये करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मध्यम मुदतीच्या कर्जाचे पुनर्गठण होणार नाही. शेतीच्या सर्व कर्जांचे पुनर्गठण करता येणार नाही. पीक कर्जाचा विषय आहे. पीक कर्जाचे पुनर्गठण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत व ते पुनर्गठण तीन टप्प्यात करण्यात येईल. शेतक-याचे कर्ज मध्यम मुदतीचे असू शकते, दीर्घ मुदतीचे असू शकते, ट्रॅक्टरसाठी, पाईप लाईनसाठी काढलेले असू शकते. हे कर्ज मोठ्या स्वरुपाचे असते. या संदर्भात कर्जमाफी देणे शक्य होणार नाही.

सभापती महोदय, मनरेगाचे मजुरीचे दर वाढविण्याबाबतची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. निश्चितपणे आपण याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली पाहिजे, अशी मागणी केली आहे. कर्ज माफी हा विषय सध्या तरी होणे अवघड आहे किंवा ते करताच येणार नाही. या वर्षी तरी ते शक्य नाही. केंद्र सरकारने जर काही मदतीचा हात दिला तर विचार करता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी व हेमंत टकले यांनी केलेल्या सूचनांचा शासन नक्की विचार करील.

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

सभापती महोदय, या चर्चेमध्ये अनेक विषय उपस्थित करण्यात आले होते व त्यांची उत्तरे यापूर्वी विविध चर्चेमध्ये शासनाने दिलेली आहेत. त्यामुळे मी त्याची पुनरुक्ती करणार नाही. तेच तेच सांगितले तर सन्माननीय सदस्यांना कंटाळा येईल.

सभापती महोदय, हे शासन शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचा नक्की प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांना कशा प्रकारे मदत करावी, या संदर्भात शासन गंभीरपणे विचार करीत आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या प्रस्तावावर सभागृहात दोन दिवस चर्चा झाली असून सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. परंतु, अनेक प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी दिलेली नाहीत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, नवीन मुद्दे आले असते तर त्यांची उत्तरे निश्चितपणे देता आली असती. परंतु, तेच तेच मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत व त्यांची उत्तरे मी दिली आहेत. त्यामुळे 10 तास, 20 तास कितीही चर्चा केली असली तरी नवीन मुद्दे उपस्थित करण्यात आलेले नाहीत.

**उप सभापती :** आता मी राईट ऑफ रिप्लायच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना संधी देतो.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात अनेक मुद्यांना स्पर्श केला आहे. मी जाणीवपूर्वक काही मुद्दे उपस्थित केले होते व त्याबाबत मंत्री महोदयांकडून उत्तराची अपेक्षा केली होती. परंतु, त्याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी केलेला नाही.

सभापती महोदय, कमांड एरियामध्ये जलसंधारणाची कामे करण्यासंबंधी मंत्री महोदयांनी उल्लेख केला व त्यांनी गिरणा नदीचे उदाहरण दिले. परंतु, हे उदाहरण खालच्या भागाला लागू होत नाही. जायकवाडीच्या डाऊनस्ट्रिमला आपण हे करणे गरजेचे आहे.

**उप सभापती :** विशेष बैठकीची वेळ सकाळी 11.55 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, जायकवाडीमध्ये गेल्या 5 वर्षात पाणी नाही. त्यामुळे कमांड एरियाची अट उठविण्याविषयी मी आग्रह धरला होता. कमांड एरियामध्ये जमिनीचे काही व्यवहार करावयाचे असतील तर इतर ठिकाणापेक्षा रेडी रेकनरच्या दीड पट रक्कम द्यावी लागते. त्या ठिकाणी गेल्या 5 वर्षांपासून पाणी मिळत नाही, तेथे प्रकल्पबाधित शेतकरी आहे आणि गेल्या 5 वर्षांपासून त्या प्रकल्पातून आमच्या शेतात पाणी पोहोचलेले नाही, त्या लोकांना कमांड एरियाचे नियम कसे लागू होतील ? त्यामुळे सामान्य नागरिकांप्रमाणे तेथील रेडी रेकनरच्या दराप्रमाणे जमिनीचे व्यवहार व्हावेत, अशी आग्रही मागणी मी केली होती.

सभापती महोदय, 18 टी.एम.सी.पाण्याबाबतचा साधा उल्लेख मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात केलेला नाही. जायकवाडीच्या तुटीच्या खोऱ्यातील 22 टी.एम.सी. पैकी 18 टी.एम.सी.चे हे प्रकल्प आहेत. सातत्याने आम्ही याचा पाठपुरावा करीत आहोत. पण त्याचा साधा उल्लेख मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात केलेला नाही. या प्रकल्पांना दीड ते दोन कोटी रुपये सुध्दा लागणार नाहीत, भूसंपादन करण्याचीही आवश्यकता नाही. त्यामुळे या प्रकल्पांबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय सातत्याने सांगत होते की, राज्यात गारपीट, वादळ, अवेळी पाऊस आहे. मराठवाड्यात गेल्या 5 वर्षांपासून 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आहे. ही परिस्थिती काही याच वर्षी निर्माण झालेली नाही. सातत्याने 4-5 वर्षात हीच परिस्थिती आहे. गारपीटीचा विषय सोडून द्या. त्या ठिकाणी काही पिकले नाही म्हणून विकले नाही, विकले नाही म्हणून

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

पदरात काही पडले नाही तर आमचा संसार कसा चालायचा, अशी परिस्थिती आहे. मराठवाड्यात सातत्याने गारपीट, वादळ आहे, हे आपणच सांगितले आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या बाबतीत शासनाने स्वतंत्रपणे विचार करणे गरजेचे आहे. विदर्भाला केंद्र शासनाने 3 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. त्याच धर्तीवर मराठवाड्याच्या संदर्भात स्वतंत्र विचार हे शासन करणार आहे का ?

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी ड्रिप इरिगेशनबाबतचा उल्लेख त्यांच्या भाषणात केला आहे. मुळात मराठवाड्याची सन 2013-2014 या वर्षाची 20 कोटी रुपयांची थकबाकी आहे. आज आमच्याकडे ठिबक सिंचन करावयाचे म्हटले तर ते शक्य होत नाही. केंद्र सरकारला पाठविलेल्या प्रस्तावातून 20 कोटी रुपयांची भरपाई करण्यासंबंधी आजच्या तारांकित प्रश्नाच्या यादीत 5 क्रमांकावर प्रश्न आहे. त्यामध्ये याबाबतचा उल्लेख करण्यात आला आहे. तो निधी कधी मिळणार आहे आणि मराठवाड्याची उधारी कधी फेडणार आहात, याबाबतचा खुलासाही मंत्री महोदयांनी करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्यात करण्यात आलेल्या मदतीपैकी सर्वात जास्त निधी मराठवाड्याचा परत आलेला आहे. या संदर्भातील वृत्त एका वर्तमानपत्रात आले आहे. त्याचे कारण आपण लक्षात घेतले पाहिजे. जनधन योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर खाती उघडण्यात आली आहेत, असा प्रचार केला जात आहे. जर या योजनेतून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांची खाती उघडण्यात आली असतील तर मदतीचा निधी परत कसा येतो, असा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे. शेतीचा विषय सोडून द्या. परंतु, एन.एच.एम.मधून मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात एकही शेततळे मंजूर केलेले नाही व त्याचा साधा उल्लेख मंत्री महोदयांनी केलेला नाही. त्याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा, अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मी शासनाला विनंती करणार आहे की, बीड जिल्हा हा सर्वात जास्त क्षतीग्रस्त आहे. त्यामुळे गरजेनुसार छावण्या उभारण्याचा निर्णय शासनाने घेणे आवश्यक आहे. गरज लागेल तेव्हा त्या त्या जिल्ह्यांमध्ये छावण्या काढण्या संबंधी आलेल्या प्रस्तावावर शासन विचार करणार आहे का ?

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात 1 लक्ष रुपयांची मदत आपण सर्वांना देत होतो. आता एक निर्णय झाला आहे. गारपीटग्रस्तांना अडीच लाख रुपये मदत आपण देणार आहोत. गारपीटग्रस्तांना अडीच लाख रुपये मदत देत असताना शेतकरी आत्महत्याग्रस्तांना तेवढीच मदत लागू करण्यासंबंधी शासनाने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, शासनाने यवतमाळ जिल्ह्यासाठी कै.मोतीराम लहाने योजना लागू केली आहे. त्या जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या झालेल्या आहेत. मराठवाड्यात सर्वाधिक आत्महत्या होणाऱ्या बीड जिल्ह्यासाठीही तीच योजना लागू करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अशी माहिती दिली आहे की, राज्य शासनाने केंद्र सरकारकडे मदतीची मागणी केली होती व सर्वाधिक 2 हजार कोटी रुपये आपल्या राज्याला मिळाले आहेत. मी या संदर्भातील काही आकडेवारी तुमच्या समोर ठेवतो.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

मे 2012 मध्ये केंद्र सरकारकडे 1073 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी 574 कोटी रुपये म्हणजे 53 टक्के पैसे केंद्र शासनाकडून मिळाले होते. त्यानंतर फेब्रुवारी 2013 मध्ये 1801 कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली होती, त्यापैकी 1260 कोटी रुपये म्हणजे 67 टक्के पैसे मिळाले होते. जानेवारी 2015 मध्ये 6000 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती, त्यापैकी फक्त 2000 कोटी रुपये म्हणजे 33 टक्के पैसे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला मिळाले आहेत.

सभापती महोदय, व्होडाफोन कंपनीला शासनाकडून 3200 कोटी रुपयांची कर्ज माफी दिली जाते. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तसा नियम का लागू करण्यात येत नाही. व्होडाफोन सारख्या अनेक कंपन्यांना कर्ज माफी दिली जाते. परंतु मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शासन मदत करण्यास पुढाकार घेत नाही, हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र पॅकेज देऊन त्यांना दिलासा देण्यात येईल काय ? त्याचप्रमाणे 18 टीएमसी पाणी देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, त्यांना मदत करण्याची गरज आहे. कमांड एरियाच्या संदर्भातील योग्य निर्णय घेऊन मराठवाड्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाने घ्यावी, अशी माझी विनंती आहे. याबाबत मंत्री महोदय सकारात्मक दृष्टीने विचार करतील काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, प्रस्तावावर राईट ऑफ रिप्लायची पध्दत आहे इतरांनी प्रश्न विचारले तर मी त्यावर उत्तर देणार नाही. काही सन्माननीय सदस्य बोलले तर मला काही अडचण नाही, मी माझे उत्तर अत्यंत कमी शब्दात देईन.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा एकच प्रश्न आहे, राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांपैकी कर्जमाफी हा सर्वात महत्वाची मागणी आहे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची गरज आहे. याबाबत मंत्री महोदयांनी ठोस उत्तर द्यावे, मला अपेक्षा आहे की, मंत्री महोदय याबाबत सूतोवाच करतील.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज एका मिनिटात संपवायचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचा शासनाकडून सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. जयहिंद, जय महाराष्ट्र.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

**उप सभापती** : प्रस्तावावर सभागृहाने विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.53 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

खामगांव (जि.बुलढाणा) येथील बस स्थानकाचे आधुनिकीकरण करणेबाबत

**(१)** * ४०५५ **श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील बस स्थानकावर नागरीकांना बसण्याकरिता बांधण्यात आलेली शेड बरेच वर्ष जुनी असल्यामुळे ती मोडकळीस आली असून त्याठिकाणी प्रवाशांना बसण्याची सु वधा नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवसेंदिवस बस स्थानकावर वाढती प्रवाशांची संख्या पाहता पण्याचे पाणी, सुलभ शौचालय, वाहनतळ, उपहारगृह व इतर मुलभूत सु वधा अपुऱ्या पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या सोयी-सु वधा, महिलांसाठी वेगळे स्वच्छतागृह बांधणे व इतर मुलभूत सोयी-सु वधा पुर वण्यासाठी खामगांव बस स्थानकाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खामगांव बस स्थानकाच्या आधुनिकीकरण करण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, वलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय देशमुख श्री. दिवाकर रावते यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बुलढाणा वभागातील खामगांव येथील बसस्थानकाची इमारत सुस्थितीत आहे. बसस्थानक ०९ फलाटांचे असून प्रवाशांना बसण्यासाठी बेंचेस (आसने) सुस्थितीत आहेत. बांधीव पाणपोईद्वारे पण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची व्यवस्था आहे. बसस्थानकात प्रवाशांसाठी येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र व्दार असून वाहनतळाचे छ्डांबरीकरण सन २०११ मध्ये करण्यात आले आहे व ते सुस्थितीत आहे.

बसस्थानकावर वाहतूक नियंत्रक कक्ष अद्ययावत स्वरुपाचे बांधण्यात आले असून बसस्थानकावर पंखे, पुरेशी वजेची व्यवस्था करण्यात आली आहे. हिरकणी कक्ष, पो लस चौकी, उपहारगृह, पुस्तकांचे दुकान, सामान्य दुकान, दुरध्वनीकक्ष, दुध व दुग्धजन्य पदार्थांचे दुकान, दुचाकी वाहनतळ, रसवंतीगृह, केश कर्तनालय इ. मूलभूत सु वधा पुर वण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे वचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4055........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रनाला जे लेखी उत्तर दिलेले आहे ते निगेटिव्ह आहे. मी स्वत: तेथील रहिवाशी आहे. मला कामानिमित्त अनेक वेळा त्या बस स्थानकावर जागे लागते. या प्रश्नाला जे लेखी उत्तर दिलेले आहे त्या प्रमाणे जर हे बस स्थानक अत्याधुनिक आणि सर्व सोयी सुविधांनी युक्त असेल तर मला हा प्रश्न उपस्थित करण्याची काही गरज नव्हती. मागील 30 वर्षापासून त्या बस स्थानकाच्या इमारतीवर टिनपत्रे टाकलेली आहेत. बस स्थानकाच्या इमारतीवर टाकण्यात आलेली टिनपत्रे तुटलेली आहेत. त्यामुळे पावसाळयात पाण्याची गळती होते. तसेच, बस स्थानकामध्ये प्रवाशांना बसण्यासाठी जे बेंचेस आहेत ते देखील सुस्थितीत नाहीत. खामगाव बस स्थानकाजवळ बरीच मोकळी जागा आहे. मागील 30 वर्षापासून या बस स्थानकावर टिनपत्रे टाकलेली आहेत. या बस स्थानकामध्ये बाहेरच्या लोकांनी प्रवाशांकरिता पाणपोई सुरु केलेली आहे. शासनाने तेथील प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली नाही. या तारांकित प्रश्नाला जे लेखी उत्तर दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, तेथे केश कर्तनालय, दुरध्वनी कक्ष, दुग्धजन्य पदार्थाचे दुकान आहे. तेथे दूध व दुग्धजन्य पदार्थाचे दुकान असण्याचे काही कारणच नाही. कारण, तेथे हातगाडीवरील छोट्या-छोट्या चहाच्या टपऱ्या आहेत. परंतु, या तारांकित प्रश्नाला जणू काही हे एकविसाव्या शतकातील बस स्थानक आहे, अशा प्रकारे लेखी उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. शासन 30 वर्षातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन तेथे पक्के बस स्थानक बांधणार आहे काय ? खामगाव हे बुलढाणा जिल्ह्यातील मोठे शहर आहे आणि या शहरातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या बस स्थानकातून प्रती दिन जवळपास 200 बसेसच्या फेऱ्या होतात. अशा स्थितीत तेथे पक्के, आधुनिक बस स्थानक बांधण्यासंबंधी शासन फेरविचार करणार आहे काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, खामगाव येथे सन 1992 मध्ये 9 फलाटांचे बस स्थानक बांधण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत या बस स्थानकाची इमारत सुस्थितीत आहे आणि तेथे प्रवाशांना बसण्यासाठी आरसीसीचे बेंचेस आहेत. तसेच, फ्लोरिंग देखील सुस्थितीत आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4055........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदय याची चौकशी करणार आहेत काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, होय.

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती बरोबर आहे असे आपल्याला गृहीत धरावे लागते. आपल्याला या संदर्भात अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली आहे. आपण उत्तरामध्ये असे सांगावे की, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जी माहिती दिलेली आहे त्याचा आम्ही अभ्यास करुन योग्य ती कार्यवाही करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांचा जो आग्रह आहे तो वेगळा आहे. या प्रश्नाला दिलेले लेखी उत्तर चुकीचे आहे असे नाही. सन 1992 मध्ये या बस स्थानकाचे बांधकाम करण्यात आलेले आहे आणि ते सुस्थितीत आहे. आता या बस स्थानकामध्ये 565 बसेसच्या फेऱ्या वाढलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांचे असे म्हणणे आहे की, तेथील वाढता व्याप लक्षात घेऊन त्या प्रमाणे बस स्थानकाची वाढ करावी आणि तसे नियोजन व्हावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय,.....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब मी आपल्याला नंतर प्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे सभागृहाची दिशाभूल होऊ नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कोणीही बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे प्रत्येक 5 मिनिटांनी बोलण्यासाठी उभे राहतात. तुम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. सभापती महोदय, सन 1992 मध्ये या बस स्थानकाचे बांधकाम करण्यात आलेले आहे आणि हे बस स्थानक सुस्थितीत आहे. हे बस स्थानक अपुरे पडत असल्यामुळे बस स्थानकाचा विस्तार करुन मोठे बस स्थानक बांधावे काय, असा त्यांचा प्रश्न आहे. सन 2011 मध्ये म्हणजे 3 वर्षापूर्वी तेथे नवीन फ्लोरिंग बसविण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4055....

श्री.दिवाकर रावते......

तेथील डांबरीकरण चांगल्या स्थितीत आहे. पाण्याचा पुरवठा व्यवस्थित आहे. महामंडळाच्या वतीने पाणी दिले जात नाही. चिरंजीवी जांगडीया खाजगी ट्रस्टच्या वतीने पाणपोईद्वारे पाणी दिले जाते. नवीन पाणीपुरवठा द्यायचा का? सध्याची व्यवस्था बिघडली तर महामंडळाच्या वतीने नक्की विचार करण्यात येईल. माननीय सदस्यांनी विनंती केल्याप्रमाणे मुद्दाम या बस स्थानकाची पाहणी करु त्या संदर्भात नवीन काही वाढीव प्रस्ताव करावयाचा असेल तर महामंडळाच्या वतीने नक्क विचार करण्यात येईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी बस स्थानकाच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. मी कोकणाचे प्रतिनिधीत्व करतो. केवळ खामगाव नव्हे तर राज्यातील अनेक एस.टी.बस स्थानकांची दुर्दशा झालेली आहे. अलिबाग, पेण, रामवाडी, कणकवली, वेंगुर्ला, मालवण बस स्थानकांची अवस्था दयनीय झालेली आहे. खामगावची स्थिती काय आहे मला माहिती नाही. परंतु राज्यातील 100 बस स्थानकांच्या पुनर्बांधणीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविले आहेत त्यात कोणत्या बस स्थानकांचा समावेश आहे? पेण गावातील बस स्थानक, रामवाडी, अलिबाग, महाड या बस स्थानकांची प्रचंड दुरवस्था झाली असून त्या ठिकाणी जातीने लक्ष देऊन तातडीने दुरुस्ती करण्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी विचारलेला प्रश्न वेगळा असला तरी भावनांचा विचार करुन या संदर्भात ज्यावेळी विचार करण्यात येईल त्यावेळी त्यांनी केलेली सूचना नक्की स्वीकारण्यात येईल.

--------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील दुधाचे दर कमी झाल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याबाबत**

**(२) * २६५२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे, श्री.हेमंत टकले:** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधाचे दर कोसळल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुधाचे दर घसरल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.विजय देशमुख, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) दि.२९.१०.२०१४ रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून दूधाच्या दरात कपातततत तसेच दुधाचा भाव घटल्याने शेतकरी अस्वस्थ अशा प्रकाराच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) ऑक्टोबर ते मार्च हा दुधासाठी पुष्टकाळ समजला जातो. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भूकटीच्या दरामध्ये मोठया प्रमाणात घसरण झाल्यामुळे देशातील दूध भुकटीच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राने दूध खरेदी दर कमी केले असल्याने शेतक-यांकडून उत्पादीत होणा-या दुधाच्या खरेदीवर परिणाम होतो, हे खरे आहे.

राज्यात दुधाचा व्यवसाय शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत केला जातो. त्यापैकी ६०% खाजगी क्षेत्र, ३९.५ % सहकार क्षेत्र व ०.५ % शासन असे दूध संकलनाचे प्रमाण आहे. केंद्र शासनाने दि.२६.३.२००२ रोजी एमएमपीओ १९९२ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार राज्यातील खाजगी/सहकारी दूध संघ व दूध उत्पादक त्यांच्या व्यवसायाला पुरक असे खरेदी विक्री दर तसेच कमिशन दर निश्चित करुन दुधाचे संकलन व वितरण त्यांच्या स्तरावरुन नियोजित करीत असतात. यामध्ये शासनास हस्तक्षेप करण्यास वाव नाही.

असे असले तरी दूध उत्पादक शेतक-यांच्या हिताकरीता शासकीय दूध योजनेमधून होणारे वितरण १ लाख लिटरने प्रतिदिन वाढविणे, उदगीर येथील प्रकल्प कार्यान्वीत करुन सुमारे १ लाख लिटर प्रतिदीन दुधाचा विनियोग करणे, सहकारी संघाकडील अतिरिक्त दूध शासनाने खरेदी करुन शासकीय दराने स्वीकारणे तसेच दूध भुकटी निर्यातीवर १० % प्रोत्साहनपर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणे इ. उपाययोजना केल्या आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सभागृहात हजर असणे आवश्यक आहे. राज्यमंत्री महोदय या विषयावर उत्तर देण्यास तयार असतील तर आमची हरकत नाही. परंतु अत्यंत संवेदनशील विषय आहे. केवळ प्रश्नोत्तरापुरते या विषयाचे महत्व मर्यादित नाही. राज्यातील विशेषत: दूध उत्पादक शेतकरी पूरक व्यवसाय म्हणून या धंद्याकडे वळला आहे. आज हा शेतकरी अडचणीत आलेला असताना या विषयावर गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तरे सुरु करु. मंत्री महोदयांना सभागृहात येण्याबाबत विनंती करु.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यातील दूध उत्पादक शेतक-यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. शासनाने जे उत्तर दिले आहे त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे समाधान होणार नाही. मागील सहा महिन्याच्या काळात राज्यातील दुधाचे दर प्रती लीटर 24

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

31-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N.3

SGB/ AKN/ KTG/ 12:20

ता.प्र.क्र.2652....

श्री.धनंजय मुंडे.....

रुपयावरुन 16 रुपयावर आले आहेत. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दूध व्यवसायात दर कोसळल्यामुळे आणि दुष्काळात जनावरांना चारा नसल्यामुळे दुहेरी संकटाला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी आघाडी सरकारच्या काळात 2 रुपये प्रती किलो दूध भुकटीकरिता अनुदान देऊन दुधाचे भाव स्थिर राखून शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी प्रयत्न झाला होता. दुभत्या जनावरांना चारा मिळावा यासाठी निर्णय घेण्यात आला होता. ते निर्णय स्थगित करण्यात आले आहेत. आघाडी सरकारने घेतलेले निर्णय पुन्हा लागू केले जातील काय?

सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी मी या संदर्भात प्रश्न मांडला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात बैठक घेतली होती. त्या बैठकीचे मिनिट्स अंतिम झाले. त्या बैठकीमध्ये जे निर्णय घेतले त्याचे मिनिट्स अंतिम होऊन ती नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर करयात आली. परंतु ती नस्ती दोन महिने पडून राहिल्यामुळे निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही हे खरे आहे काय? आज दुष्काळामुळे दुभत्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारमार्फत चारा उपलब्ध करुन देऊन शेतकऱ्यांना न्याय दिला जाईल काय?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, केंद्र सरकारने दूध पावडर निर्यातीवर निर्बंध घातले असून 5 टक्के प्रोत्साहन अनुदान 2014 पासून बंद केले आहे हे खरे आहे. केंद्र सरकारने बंद केलेले 5 टक्के प्रोत्साहन अनुदान पुन्हा सुरु करण्यासाठी व ते 10 टक्के करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी विधीमंडळ सदस्यांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांची उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीनुसार राज्यातील सहकारी दूध संघाकडे अतिरिक्त दूध शासन दराने स्वीकारावे आणि त्यासाठी येणारा खर्च/तोटा शासनाने स्वीकारावा असा निर्णय घेण्यात आला.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. 2014 च्या हिवाळी अधिवेशन काळात बैठक झाली हे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बैठकीमध्ये जे निर्णय झाले त्या संदर्भातील नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे सहीकरिता पाठविली गेली, त्यावर सही होण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागला. दोन महिने दिरंगाई का झाली?

...4...



ता.प्र.क्र.2652....

श्री.धनंजय मुंडे.....

सरकारला कल्पना आहे की, आता उन्हाळा सुरु झालेला आहे. स्वाभाविकपणे दूध उत्पादन कमी होणार आहे, बाजारात मागणी वाढल्यामुळे दुधाचे दर वाढणार आहेत. याचा फटका दूध उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. दुधाची भुकटी करण्याबाबत 2 रुपये प्रती किलो अनुदान देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला तो प्रस्ताव नाकारण्यात आला आहे हे मी जबाबदारीने सांगतो. 10 टक्के अनुदान देण्याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आला, त्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे? राज्यातील कापूस, ऊस, दूध उत्पादक शेतक-यांची परवड सुरु आहे. दूध उत्पादन शेतकऱ्यांना दर मॅच करण्यासाठी प्रती लीटर 5 ते 10 रुपये दर वाढवून दिला जाईल काय, सरकारमार्फत पूर्वीप्रमाणे प्रती लीटर 24 रुपयांनुसार दूध खरेदी केली जाईल काय?

श्री.विजय देशमुख : 10 टक्के प्रोत्साहन अनुदान मिळावे म्हणून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्याचे अद्याप उत्तर आलेले नाही. तो प्रस्ताव नाकारण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, 2014 च्या हिवाळी अधिवेशन काळात माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक झाली त्यानुसार शासनाकडे संकलित होणाऱ्या अतिरिक्त दुधाच्या नियोजनाकरिता उदगीर प्रकल्प आणि इंदापूर येथील दूध प्रकल्प भाडे तत्वावर घेऊन अतिरिक्त दूध खरेदी सुरु केली आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने सरकार कशा पध्दतीने वागते याचे उदाहरण या ठिकाणी पहावयास मिळते. राज्यात कोसळलेले दुधाचे दर ही बाब माहे डिसेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय, या प्रश्नाला उत्तर देताना असे नमूद केले आहे की, दिनांक 29.10.2014 रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे. दूध व्यवसायाची नेमकी स्थिती काय आहे याची सरकारला नक्की माहिती आहे का? डिसेंबर, 2014 पूर्वी दुधाचे दर काय होते आणि आता काय आहे? दुधाचे संकलन प्रमाण 60 टक्के खाजगी क्षेत्र, 39.5 टक्के सहकार क्षेत्र आणि 0.5 टक्के शासन असे असल्याचे उत्तरात नमूद केले आहे. ही आकडेवारी चुकीची आहे. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संदर्भात शासनाची भूमिका काय आहे? हे उत्तर पूर्णपणे चुकीचे आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकार किती असंवेदनशील आहे याचा हा नमुना आहे.

नंतर ओ.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2652...

श्री.सुनील तटकरे...

केवळ वर्तमानपत्रात बातमी आली म्हणून त्या आधारे उत्तर देण्यात आले आहे. माझे तर असे मत आहे की, वर्तमानपत्राच्या बातमीच्या आधारे उत्तर देता येत नाही. दूध उत्पादक शेतकरी आज अडचणीत असताना तत्संबंधातील माहिती राज्य शासनाकडे नाही. तेव्हा यासंबंधातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने वृत्तपत्र बातमीच्या आधारे उत्तर देणे बरोबर आहे काय ? राज्य सरकार वृत्तपत्र बातमीच्या आधारावरून उत्तर देणार असेल तर ते चुकीचे आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दिनांक 29.10.2014 रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून दुधाच्या दरात कापात तसेच दुधाचा भाव घटल्याने शेतकरी अस्वस्थ अशा प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, दुधाच्या दरवाढीबद्दल सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. दुधाची दरवाढ करावयाची असेल तर कॅबिनेटसमोर जावे लागते. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन योग्य तो विचार करून निर्णय घेण्यात येईल.

**सभापती :** मंत्री महोदय दूध निर्यातीचे सगळे प्रश्न बाजूला राहिलेले आहेत. वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे आपण उत्तर तयार केले असेल तर मला हा प्रश्न राखून ठेवण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय दिसत नाही. हा प्रश्न मी राखून ठेवतो.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पुण्यात बनावट मुद्रांक पेपर विकल्याबाबत**

**(३) * ३४१० ¤श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेगग:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात बनावट मुद्रांक पेपर विकले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार बनावट मुद्रांक पेपर विकणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड ,श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही. तथापि, कोषागार कार्यालय, पुणे यांचे माहितीवरुन दोन मुद्रांक संशयास्पद असल्याची बाब निदर्शनास आली होती.
(२) होय.
(३) विषयाधीन प्रकरणातील दोन संशयास्पद मुद्रांक नाशिक येथील इंडिया सिक्युरिटी प्रेस, यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले असता त्यांच्याकडून प्राप्त अहवालात सदरचे मुद्रांक बनावट नसल्याचे नमूद आहे परंतू, दोन्ही मुद्रांकामध्ये रसायनांचा वापर करुन फेरफार करण्यात आल्याचे नमूद केले आहे. सबब, मुद्रांक पेपर विकणा-यांवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, मुद्रांकामध्ये रसायनाचा वापर करून फेरफार करण्यात आल्याचे लेखी उत्तरात नमूद करण्यात आले. तसेच, दोन मुद्रांक संशयास्पद असल्याची बाब निदर्शनास आली होती असे देखील उत्तरामध्ये नमूद केले आहे. सन 2002 मध्ये तेलगी प्रकरण घडले. कर्नाटक राज्यामध्ये पेपरलेस स्टॅम्प सुविधा आहे. तशी पद्धत आपल्या राज्यात शासन लागू करणार आहे काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. आपल्या राज्यामध्ये मधल्या काळामध्ये तेलगी स्टॅम्प घोटाळा झाला होता. त्याची पुनरावृत्ती राज्यामध्ये होऊ नये यासाठी राज्य सरकारने मुद्रांक पेपरच्या ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3410...

श्री.संजय राठोड...

सुरक्षिततेसाठी वॉटर मार्क, छपाई वर्ष नमूद केले आहे. सन 2000 पासून फ्रँकिंग मशीनला उत्तेजन देऊन परवान्याची संख्या राज्य सरकारने वाढविली आहे. ई स्टम्पिंग, ई मुद्रांक शुल्क प्रणाली सन 2008 पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या ग्रास प्रणालीद्वारे विभागाने मुद्रांक शुल्क व इतर फी, रक्कम ऑनलाईन भरण्याची पद्धतसुद्धा सन 2010-11 पासून सुरूकेली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. तेलगी प्रकरणात आपल्या राज्याचे धिंडवडे कसे निघाले हे सर्व देशाने पाहिले आहे. लेखी उत्तरामध्ये उल्लेख करण्यात आला आला आहे की, दोन्ही मुद्रांकामध्ये रसायनांचा वापर करून फेरफार करण्यात आल्याचे नमूद केले आहे. याचा अर्थ अजूनही यात कुठे तरी गडबड आहे. दोन संशयास्पद मुद्रांक नाशिक येथील इंडिया सिक्युरिटी प्रेस, यांच्याकडे तपासणीसाठी पाठविले आहेत असे देखील नमूद केले आहे. ते तपासणीसाठी पाठविल्यानंतर निष्कर्ष निघालेला आहे. म्हणजे यात काही तरी गडबड आहे. त्यातूनच तेलगी तयार होतात. ही बाब गंभीर असल्यामुळे शासन यासंबंधात कोणती कारवाई करणार आहे ? यातील लूप होल्स बंद करण्याच्या दृष्टीने सन 2008 पासून ऑनलाईन संबंधातील वेगवगळ्या पद्धती आपण अवलंबिल्या आहेत. त्या अधिक सक्षम करण्यासाठी शासन अजून काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारलेला आहे. पुण्यातील मुद्रांक विक्रेता श्री.कीरण लडकत हे विक्री व्यवसाय करीत असताना दुपारी 12.30 वाजता श्री.रमेश नारायण सोमाजी या नावाने विकलेल्या 500 आणि 100 रूपयाच्या मुद्रांकात दुरूस्ती करण्यासाठी एक अज्ञात माणूस आला होता. श्री.कीरण लडकत या मुद्रांक विक्रेत्याने हे मुद्रांक पाहिल्यानंतर मुद्रांकावरील शिक्का आणि सही यासंबंधात त्याला संशय आला. त्यामुळे त्याने मुद्रांक साठा व विक्री स्वतःहून तपासून पाहिली. त्याला संशय आल्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3410...

श्री.संजय राठोड...

त्याने यासंबंधातील रितसर तक्रार जिल्हाधिकारी व पोलीस ठाण्याला दिली. त्याअनुसार बंड गार्डन पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. ज्यांनी दोन मुद्रांक आणले होते तो माणूस तेथून पळून गेला. त्यानंतर ते मुद्रांक त्याची सत्यता पडताळण्यासाठी इंडिया सिक्युरिटी प्रेस, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आले. सदर प्रकरणी इंडिया सिक्युरिटी प्रेस, नाशिक यांचा अहवाल प्राप्त झाला असून सदरचे मुद्रांक हे खरे असल्याचा अहवाल दिलेला आहे. पोलीस ठाण्यामध्ये जी तक्रार देण्यात आली आहे त्यासंबंधीचा तपास सुरू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हाच विषय मी नियम 93 च्या माध्यमातून याच अधिवेशनात उपस्थित केला होता. त्यावेळी संबंधित व्यक्ती फरार झाल्याचे उत्तर मला देण्यात आले होते. हे मुद्रांक खरे होते तर मग ती व्यक्ती फरार होण्याचे कारण काय आहे, फरार झालेल्या व्यक्तीचा तपास अजून पर्यंत का लागला नाही, तो कधी लागणार आहे ? माझ्या 93 च्या सूचनेवर माननीय गृहमंत्र्यांनी निवेदन केले असून त्याची प्रत माझ्याकडे आहे. या प्रश्नासंबंधी महसूल विभागाचे वेगळे उत्तर आहे, तर 93 च्या सूचनेवरील गृह विभागाचे उत्तर वेगळे आहे.

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, हे मुद्रांक खरे आहेत. परंतु, रसायनांचा वापर करून शिक्के मिटविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सभापती :** मंत्री महोदय, रसायनांचा वापर करून त्याने नेमके बेकायदेशीर काय केले आहे हा विषय आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ते मुद्रांक खोटे आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यातून पुन्हा दुसरा तेलगी तयार होऊ नये असा आपणा सर्वांचा प्रयत्न असला पाहिजे. खरी गोम लेखी उत्तरामध्ये आहे. रसायनाचा वापर केल्यामुळे फरक निदर्शनास आला असेल तर त्याच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.जुननरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : 3410....

श्री.भाई जगताप......

त्यामुळे त्यामध्ये जो काही फरक होतो तो नेमका काय होता तो या सभागृहाला कळाला पाहिजे. मुद्रांक शुल्कामध्ये पुन्हा एकदा लूप होल ठेवून दुसरा एखादा तेलगी तयार होईपर्यंत आपण वाट पाहणार आहोत काय ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी हे मुद्रांक शुल्क खोटे असल्याचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. मुद्रांक शुल्क खोटा असेल व तो खरा असल्याचा प्रयत्न होत असेल तर पुन्हा एकदा दुसरा तेलगी तयार होतो असाच त्याचा अर्थ होतो. त्यामुळे याबाबतीत सरकार नेमकी कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, मुद्रांक विक्रेत्याच्या स्टँप पेपरमध्ये खाडोखोड करण्याचा प्रयत्न झालेला आहे. कागदावरील रबरी शिक्का व नोंदी तसेच वरिष्ठ कोषागार अधिकाऱ्याचा शिक्का यामध्ये रसायनाचा वापर करुन फेरफार करण्याचा प्रयत्न या स्टँप पेपरमध्ये करण्यात आला होता. मुद्रांक विक्रेत्याच्या स्टँप पेपरमध्ये अशा प्रकारची खाडाखोड झालेलीच आहे. तसेच मुद्रांक शुल्क पेपरची सुरक्षितता वाढवण्याच्या दृष्टीने शासनाकडून योग्य ते प्रयत्न सुरु आहेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देतांना सांगितले आहे की, जी व्यक्ती मुद्रांक शुल्काचा पेपर घेऊन आली होती ती व्यक्ती फरार झालेली आहे. मुद्रांक पेपर छापण्याच्या एकंदरित व्यवस्थेमध्ये कोणत्या बॅचमधून कोणत्या वेळेला मुद्रांक पेपर छापले गेले याची माहिती घेणारी यंत्रणा आपल्या सिक्युरीटी प्रेसमध्ये आहे काय ? या प्रेसमधून ज्या पध्दतीने स्टँप पेपरचे वितरण होते त्या वितरणानंतर या अज्ञात इसमापर्यंत पेपर होते ते खरे असल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील संपूर्ण लिंकचा शोध लावण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाणार आहे काय ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, मुद्रांकाची विक्री झाल्यानंतरच ही सर्व बाब उघड झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे दोन्ही स्टँपचा मुद्रांक क्रमांक तपासण्यात आला आहे. मुद्रांक पेपर विकल्यानंतर त्यामध्ये खाडाखोड करुन सही शिक्का बदलवण्याचा प्रयत्न झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात ज्या सूचना केल्या आहेत त्या प्रमाणे सजेशन फॉर ॲक्शन.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : 3410....

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, कर्नाटक सरकारने मुद्रांक शुल्क छपाई बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कर्नाटक सरकार प्रमाणे आपले शासन निर्णय घेणार आहे काय, हा निर्णय कधी घेतला जाणार आहे ? कर्नाटक सरकारप्रमाणे निर्णय आपल्या शासनाने घेतल्यानंतर आपल्या ट्रेझरीमध्ये कोटयावधी रुपयांचा जो मुद्रांक शुल्क पेपरचा साठा राहील त्याची विल्हेवाट कशा प्रमाणे लावली जाणार आहे ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, स्टँप पेपरच्या घोटाळयाच्या नंतर आपल्या शासनाने अनेक निर्णय घेतले आहेत. ऑन लाईन पध्दतीने मुद्रांक फी भरण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणात सुरु केलेला आहे. सन 2010-2011 पासून सदर पध्दत अधिक सुरक्षित आणि अधिक पारदर्शक असल्याचे आढळून आली असून ही पध्दत शासनाच्या मालकीची आहे. फ्रॅन्कींग सिस्टीमच्या संदर्भात फ्रॅन्कींग नियमावलीत बदल करुन फ्रॅन्कींगद्वारे मुद्रांक शुल्क 5000 रुपयांपर्यंत भरण्याची कमाल मर्यादा विहित करण्यात आलेली आहे. ई-स्टँपींगच्या माध्यमातून मुद्रांक शुल्क भरण्याची प्रणालीसाठी खर्च जास्त होत होता त्यामुळे यामध्ये थोडी सुधारणा करण्यात आलेली आहे. जुन्या स्टँपच्या संदर्भात शासन भविष्यात योग्य तो निर्णय घेईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**डहाणू येथील आदिवासींना वाटप झालेल्या भूखंडाची भूमाफियांनी**

**कागदोपत्री अदलाबदल करून बांधकाम केल्याबाबत**

(4) * **३७८१ श्री.विजय गिरकरर:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) डहाणू येथील तलासरी तालुक्यातील वडवली येथील आदिवासींना वाटप झालेल्या सर्व्हे नंबर १९१ या भूखंडापैकी मोक्याचा भूखंडाची कागदोपत्री अदलाबदल करून त्या ठिकाणी भूमाफियांनी बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, आदिवासींना वाटप झालेल्या भूखंडाची संपूर्ण चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,
(4) असल्यास, सदर भूमाफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. संजय राठोड,श्री. एकनाथराव खडसे यांच्या करिता :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(2), (3) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई गिरकर :सदस्य एक महिन्यापूर्वी प्रश्न देत असतात. मी डहाणू येथील तलासरी तालुक्यातील आदिवासींना वाटप झालेला सर्व्हे नंबर 191 या भुखंडापैकी मोक्याच्या भुखंडावर कागदोपत्री अदलाबदल करुन त्या ठिकाणी भूमाफियांनी बांधकाम केल्याचे निदशर्नास आले आहे काय ? अशा प्रकारचा स्पेसिफिक प्रश्न विचारला असतांना या प्रश्नाच्या संदर्भात मला उडवाउडवीचे उत्तर देण्यात आले आहे. मी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात "असे निदर्शनास आले नाही" असे उत्तर दिले असून पुढील प्रश्नांच्या संदर्भात प्रश्न उद्‌भवत नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे मी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर चौकशी करुन देण्यात आले आहे की, चौकशी न करता उत्तर देण्यात आलेले आहे ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांच्या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने पूर्ण चौकशी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार मौजे वडवली, ता.तलासरी येथील आकारबंधा प्रमाणे सर्व्हे नंबर 191 चे एकूण क्षेत्र 1486 आर एवढे होते. या क्षेत्राच्या जमिनीचे मालक श्री.सखाराम लक्ष्मण कारुळकर होते. मुळ मालकाकडून सदर क्षेत्रापैकी कुळ कायद्याद्वारे कलम 32(ग) नुसार आदिवासी कुळांना 2 हेक्टर 71 आरचे वाटप झाले असून त्यासंदर्भात फेरफार क्रमांक, क्षेत्रफळ व 32 (ग) प्रमाणे वाटप झालेले आदिवासींचे कुळ आदिवासींजवळ आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आदिवासी व्यक्तीने स्वतःची जमीन स्वतः विकसित करुन विकसित झालेली प्रॉपर्टी सदर आदिवासी दुसऱ्याला विकू शकतो काय ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यानी विचारलेला संबंधित प्रश्नाशी निगडीत नसला तरी सुध्दा या प्रश्नाची माहिती घेऊन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेअंतर्गत अनुदान मिळण्याबाबत**

**(5) * ४१५३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यात सलग चार वर्षापासून पडलेल्या दुष्काळामुळे शेतीतील पिकांना पाटाने पाणी मिळणे अशक्य झाल्यामुळे जिल्ह्यातील १२०० शेतकऱ्यांनी शासनाच्या ठिबक सिंचन योजनेत सहभाग नोंदविला परंतु, अद्यापपर्यंत या शेतकऱ्यांना उक्त योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त झालेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त शेतकऱ्यांना त्यांचे प्रलंबित अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे,श्री. एकनाथराव खडसे यांच्या करिता :** (१) बीड जिल्ह्यात ठिबक सिंचन योजनेंतर्गत, सन २०१२-१३ या वर्षातील रु. २०.१६ कोटी एवढया रकमेचे ७४०९ प्रस्ताव प्रलंबित होते.
तसेच सन २०१३-१४ या वर्षात निधी अभावी प्रस्ताव स्विकारण्यात आले नव्हते. तथापि, या वर्षात ठिबक सिंचन संच बसविलेल्या शेतक-यांचे प्रस्ताव स्विकारुन त्यांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्याकडून सन २०१३-१४ साठी ५८७३ प्रस्तावासाठी रु. १८.७९ कोटी एवढया रकमेची मागणी करण्यात आली आहे. तालुका स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची कार्यवाही सुरु आहे.
सन २०१४-१५ या वर्षात या जिल्ह्यातील ६१४८ प्रस्तावांसाठी रु. २०.६७ कोटी एवढया रकमेचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे.
(2) बीड जिल्ह्यासाठी सन २०१२-१३ या वर्षातील प्रलंबित प्रस्तावांसाठी रु. १३.९६ कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
सन २०१३-१४ मधील प्रलंबीत प्रस्तावांसाठी नाबार्डकडून उपलब्ध होणा-या कर्जाच्या रकमेतून रु. ३२६.७३ कोटी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
सन २०१४-१५ या वर्षासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पहिल्या हप्त्याच्या निधीतून रु. १२.८६ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून दुस-या हप्त्याचा निधी प्राप्त झाल्यानंतर बीड जिल्ह्यास उर्वरीत निधी वितरीत करण्यात येईल.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, बीड जिल्हयातील शेतकरी दुष्काळाने त्रस्त आहेत. दुष्काळामुळे पीकांना पाटाने पाणी देणे अशक्य झाल्यामुळे या ठिकाणच्या 1200 शेतकऱ्यांनी शासनाच्या ठिबक सिंचन योजनेमध्ये नावे नोंदवली होती. परंतु जानेवारी, 2015 मध्ये असे निदर्शनास आले की, उपरोक्त योजनेतून अनुदान प्राप्त झाले नसल्यामुळे या जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेच्या अंतर्गत जो लाभ मिळावयास पाहिजे होता तो मिळाला नाही हे खरे आहे काय ? या शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा लाभ द्यावयाचा असेल तर त्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.:4153....

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे साहेबांनी सन 2012-2013, 2013-2014 व 2014-2015 या वर्षात ठिबक सिंचन योजनेत बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना लाभ मिळाला नसल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. या शेतकऱ्यांना अनुदान देण्यामध्ये उशीर झालेला आहे ही बाब सत्य आहे. सन 2012-2013 मध्ये जे अनुदान देणे अपेक्षित होते त्यामध्ये सन 2015 मधील फेब्रुवारी व मार्च महिन्यात 11.85 कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सन 2013-2014 या वर्षात ठिबक सिंचन योजनेच्या संदर्भात केंद्र सरकारकडून अनुदान प्राप्त झाले नव्हते. सन 2014-2015 मध्ये एकूण 6048 प्रस्ताव आले होते व त्यासाठी 20.57 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला होता. ठिबक सिंचनाचे अनुदान वाटण्याचे काम शासन स्तरावर केले जात आहे. परंतु सद्या मार्च एंड असल्यामुळे अनुदान वाटण्यामध्ये विलंब होत आहे. त्यामुळे ठिबक सिंचन प्रस्ताव धारकांना कॉन्ट्रॅक्ट सिस्टीमने जास्तीचे ऑपरेटर घेऊन शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान तात्काळ वितरीत होईल यासंदर्भात निश्चितपणे सूचना देण्यात येतील.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन 2012-2013, 2013-2014 व 2014-2015 या तीन वर्षात संबंध राज्यासाठी ठिबक सिंचनासाठी एकंदर किती नियतव्यय होता ? बीड जिल्हयासाठी सन 2012-2013, 2013-2014 व 2014-2015 या वर्षासाठी किती नियतव्यय मंजूर करण्यात आला होता ?

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4153....

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन 2012-2013 मध्ये राज्य शासनाकडून 120 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला होता..(अडथळा)..

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, बीड जिल्ह्यात ठिबक सिंचन योजनेंतर्गत सन 2012-2013 या वर्षातील रुपये 20.16 कोटी एवढ्या रकमेचे 7409 प्रस्ताव प्रलंबित होते. माझा प्रश्न आहे की, 120 कोटी रुपये बीड जिल्ह्यासाठी आहेत की राज्यासाठी आहेत, राज्यासाठी किती नियतव्यय होता,बीड जिल्ह्यासाठी किती नियतव्यय होता आणि प्रत्येकवर्षी किती नियतव्यय वितरित करण्यात आला ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन 2012-2013 या वर्षासाठी रु. 212.43 कोटी आणि रु.120 कोटी नियतव्यय होता. यामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासनाचा 80:20 टक्के हिस्सा आहे. सन 2012-13, 2013-14 आणि सन 2014-15 या वर्षाचा हा विषय होता. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदान मिळावे म्हणून दोन महिन्यात हा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. यामध्ये मागील बॅकलॉग आहे. रु.11.85 कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. दिनांक 20.2.2015, 28.2.2015, 21.3.2015 आणि 21.3.2015 या तारखांना हा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, निधी अभावी प्रस्ताव स्वीकारण्यात आले नव्हते. पुढे असे नमूद केलेले आहे की, बीड जिल्ह्याकडून सन 2013-2014 साठी 5873 प्रस्तावासाठी रु. 18.79 कोटी एवढ्या रकमेची मागणी करण्यात आली आहे. उत्तरामध्ये विसंगती आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, दोन महिन्यांमध्ये 20 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, सन 2013-2014 ची मागणी पूर्ण करण्यासाठी शत प्रतिशत रक्कम उपलब्ध करुन देणार आहोत. परंतु प्रत्यक्षात तसे झालेले नाही. आता मंत्री महोदय सांगत आहेत की, आम्ही तो निधी उपलब्ध करुन देतो. मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाला हरताळ लावत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4153....

अमरसिंह पंडित....

अर्धवट रक्कम उपलब्ध करुन दिलेली आहे. बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज असताना आणि त्या भागातून अधिकची मागणी असताना सर्वाधिक प्रलंबित प्रकरणे बीड जिल्ह्यातील आहेत. माझा प्रश्न आहे की, जी काही प्रलंबित प्रकरणे आहेत ती हेअधिवेशन संपण्यापूर्वी निकाली काढण्यात येतील काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितल्याप्रमाणे नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न चर्चेला आला होता आणि त्या अनुषंगाने आश्वासन देण्यात आले होते. परंतु हा सन 2013-14 चा प्रश्न आहे. त्या प्रश्नाच्या अगोदर डिसेंबर 2014 मध्ये शासनाने विशेष मंजुरी दिली. आता सन 2013-14 साठी प्रस्ताव मागविण्यात येत असून 5620 शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. राज्य शासनाने नाबार्डकडून 320 कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार शेतकऱ्यांना सन 2012-13 चे अनुदान दिले. सन 2014-15 चे अनुदान देत आहोत तसेच सन 2013-2014 चे प्रलंबित राहिलेले अनुदान देण्याची कार्यवाही देखील होईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मागील वेळी मी हा विषय मांडला होता की, शेतकऱ्यांनी सोने गहाण ठेवल्यानंतरसुद्धा सबसिडीची रक्कम भरुन निघत नाही. शेतकऱ्यांना सबसिडी देण्यास उशीर केल्यामुळे त्याचा सबसिडीवर परिणाम होत आहे. राज्य शासन मॅचिंग ग्रांट देणार आहे. माझा प्रश्न आहे की, बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागांतील प्रस्ताव 31 मे पूर्वी निकालात काढणार काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी या प्रश्नाच्या संदर्भात सविस्तर उत्तर दिलेले आहे. डिसेंबर, 2014 पासून सन 2013-2014 चे प्रस्ताव स्वीकारण्यास सुरुवात केलेली आहे. शेतकऱ्यांकडून प्रस्ताव प्राप्त होत आहेत. आपण नाबार्डकडून 326 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. लाभार्थ्यांनी लवकरात लवकर प्रस्ताव दिले पाहिजेत. 30 जून पूर्वी जेवढे प्रस्ताव प्राप्त होतील त्यांना अनुदान वितरित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मौजे येळंब (ता.हदगांव,जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांसाठी एसपीए स्कीम अंतर्गत १०० केव्हीए (ट्रान्सफॉर्मर) ची उभारणी करण्याबाबत**

**(६) * ३९३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदी प बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडितः** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येळंब (ता.हदगांव,जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांसाठी एसपीए स्कीम अंतर्गत १०० केव्हीए (ट्रान्सफॉर्मर) विद्युत कंपनीने माहे जुलै, २०१३ मध्ये मंजूर केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे दीड वर्षाच्या कालावधी होऊनही सदर ट्रान्सफॉर्मरची उभारणी करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून शासनाने तातडीने ट्रान्सफॉर्मर उभारणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) होय.
(३) संबंधीत चार शेतक-यांना कोटेशन भरणा करण्यासंबंधीत कळविले आहे तथापि, चारही शेतक-यांनी आजतागायत कोटेशनची रक्कम भरणा केली नसल्याने काम हाती घेण्यात आले नाही. कोटेशन भरणा केल्यानंतर तातडीने काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी सुधारणा करु इच्छितो. या पुस्तकाचे प्रिंट होईपर्यंत कोटेशनचा भरणा शेतकऱ्याने केला नव्हता, परंतु दिनांक 24.3.2015 रोजी शेतकऱ्याने कोटेशनचा भरणा केलेला आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन 2013 मध्ये कोटेशनचा भरणा केल्याचे प्रश्नात नमूद केलेले आहे. दिनांक 20.8.2013 रोजी कोटेशन मंजूर झाले. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी संबंधित विभागाला दिनांक 18.8.2013 रोजी एक पत्र लिहिले होते. दिनांक 20.8.2013 रोजी ते कोटेशन मंजूर करण्यात आले. परंतु ते कोटेशन शेतकऱ्याला दिनांक 16.3.2015 रोजी देण्यात आले. तेथील सहाय्य अभियंत्याने शेतकऱ्याकडे काही पैसे मागितले होते



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3939...

श्री.अमरसिंह पंडित....

आणि ते पैसे न दिल्यामुळे दिनांक 20.8.2013 ते 16.3.2015 पर्यंत कोटेशन तसेच ठेवण्यात आले. आम्ही प्रश्न विचारल्यानंतर शेतकऱ्याच्या हातामध्ये ते कोटेशन दिलेले आहे. दिनांक 20.8.2013 रोजी मंजूर झालेले कोटेशन दिनांक 16.3.2015 रोजी देण्यात येते यावरुन त्याचे मालाफाईड इन्टेन्शन स्पष्ट होते. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, असा प्रकार करणाऱ्या सहाय्य अभियंत्याला तातडीने बडतर्फ करण्यात येईल काय ? शेतकऱ्याकडे पैसे भरल्याची पावती असल्यामुळे त्या ठिकाणी तातडीने ट्रान्सफॉर्मरची उभारणी करण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, शेतकऱ्यांनी दिनांक 9.5.2013 रोजी अर्ज केला होता. दिनांक 24.7.2013 रोजी त्यास मंजुरी देण्यात आली. दिनांक 20.8.2013 रोजी कोटेशन देण्यात आले. दिनांक 24.3.2015 रोजी त्यांनी निधीचा भरणा केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना मार्च महिन्यात कोटेशन दिलेले आहे. मला जी माहिती मिळालेली आहे त्यानुसार दिनांक 20.8.2013 रोजी शेतकऱ्याला कोटेशन दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासण्यात येईल जर ती माहिती बरोबर असेल तर संबंधितांना सस्पेंड करण्यात येईल तसेच तीन महिन्याच्या आत कनेक्शन लावण्यात येईल.

---------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**वडार समाजाला त्याच्या पारंपरीक व्यवसायासाठी वार्षिक २०० ब्रासपर्यंतच्या दगडावर रॉयल्टीत सूट देण्याबाबत**

प(७) * **२८६३ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पिढयानपिढयापासून दगडफोडीचा व्यवसाय करणाऱ्या वडार समाजाला त्याच्या पारंपरीक व्यवसायासाठी वार्षिक २०० ब्रासपर्यंतच्या दगडावर रॉयल्टीत (स्वामित्वधन) सूट देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१), (२) व (३) वडार समाजातील हाताने दगडफोडीचा पिढीजात व्यवसाय करीत असलेल्या कुटुंबास त्यांच्या व्यवसाय प्रयोजनासाठी वर्षाला २०० ब्रास पर्यंतच्या मर्यादेत दगडावरील स्वामित्वधनाच्या आकारणीतून सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक ५ जानेवारी २०१५ रोजी घेतला आहे. त्यानुसार यासंबंधीची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेतील तरतुदीनुसार वडार समाजातील हाताने दगडफोडीचा पिढीजात व्यवसाय करणा-या कुटुंबांना त्यांच्या व्यवसाय प्रयोजनासाठी याचा लाभ घेता येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, समाजामध्ये सर्वात दुर्लक्षित असलेल्या वडार समाजाबाबतचा हा प्रश्न आहे. या समाजाने सरकारकडे दोन मागण्या केल्या होत्या त्यापैकी एक मागणी मान्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार हाताने दगडफोडीचा पिढीजात व्यवसाय करणाऱ्या वडार समाजाला स्वामित्वधनाच्या आकारणीतून सूट देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे आणि त्या बाबतची अधिसूचना सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, सदरहू अधिसूचनेची माहिती वडार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने काय पावले उचलली आहेत ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, वडार समाजाचा समावेश अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीमध्ये करण्यासाठी त्या समाजाने राज्यभर आंदोलन केले होते. त्यामुळे त्यांच्या मागणीबाबत शासनाने काय विचार केला आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2863....

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, युती सरकार सत्तेवर आल्यानंतर या सरकारने वडार समाजाच्या संदर्भात क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. वडार समाजातील हाताने दगडफोडीचा पिढीजात व्यवसाय करीत असलेल्या कुटुंबास त्यांच्या व्यवसाय प्रयोजनासाठी वर्षाला 200 ब्रास पर्यंतच्या मर्यादेत दगडावरील स्वामित्वधनाच्या आकारणीतून सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असून, त्या बाबतची अंतिम अधिसूचना दिनांक 7 मार्च, 2015 रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, सदरहू अधिसूचनेची माहिती या समाजापर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय महत्त्वाची आहे. तातडीने सर्व जिल्हाधिकारी आणि महसूल विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांकडून सदरहू अधिसूचनेची माहिती वडार समाजाला करुन देण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

**सभापती** : मला वाटते, वडार समाजाची राज्यव्यापी संघटना आहे. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांना या निर्णयाबाबतची माहिती द्यावी. कारण हा समाज अतिशय कष्ट करणारा आहे. या समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे सरकारने या समाजाच्या दृष्टीने चांगला निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे त्या समाजाला चांगला न्याय मिळेल.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्याला ठिंबक सिंचन पाणलोट विकासाकरीता मिळालेला निधी शासनाने खर्च न केल्याबाबत**

u

**(८) * ३७०० अॅड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिंबक सिंचनापासून पाणलोट विकासापर्यंत जवळपास १८ योजनांसाठी केंद्र शासनाकडून राज्याला ७ वर्षात तब्बल ४ हजार ९४० कोटी रुपये मिळाले असताना राज्य शासनाने त्यापैकी केवळ ३ हजार ५६७ कोटी रुपये खर्च केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने पूर्ण क्षमतेने निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच केंद्र शासनाकडून मिळालेला निधी पूर्ण क्षमतेने खर्च न करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) नाही.

ठिबक सिंचन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत गेल्या सात वर्षात केंद्र शासनाकडून एकूण रु. ३४३१.७१ कोटी निधी प्राप्त झाला असुन त्यापैकी रु. ३२६७.७९ कोटी निधी खर्च झालेला आहे.

(२), (३) व (४) एकूण प्राप्त निधीच्या ९७ % निधी खर्च झालेला आहे. उर्वरित निधी मार्च २०१५ अखेरपर्यंत खर्च करण्यात येणार आहे. प्राप्त निधी पैकी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च झाल्याने कोणावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अॅड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, राज्यातील पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत राज्यासाठी जो निधी निर्धारित केला होता त्या तुलनेत कमी निधीचा वापर करण्यात आला आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, राज्यात पाणलोट क्षेत्र किती आहे, त्यापैकी उपसा आणि अतिउपसा पाणलोट क्षेत्र किती आहेत ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निधीच्या बाबतीत लेखी प्रश्न विचारला आहे आणि उपप्रश्न मात्र वेगळा विचारत आहेत. सन्माननीय सदस्यांनी राज्यात किती पाणालेट आहे आणि किती एक्स्प्लॉयटेड आहे या बाबत निश्चितपणे विचारणा केली तर त्या बाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

सभापती : मला वाटते सन्माननीय सदस्यांना न्याय देण्यासाठी माननीय मंत्र्यांनी या बाबतची माहिती घेऊन ती पटलावर ठेवावी.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3700....

प्रा.राम शिंदे : होय.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गेल्या सात वर्षात ठिबक सिंचन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा आणि पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांसाठी केंद्र सरकारकडून 3431.71 कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी 3267.79 कोटी रुपये खर्च झाले आहेत. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, ठिबक सिंचन योजनेसाठी केंद्र सरकारकडून किती निधी आला, त्यापैकी किती खर्च झाला आणि त्यातून किती क्षेत्र विकसित झाले, तसेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यक्रमासाठी केंद्र सरकारकडून किती निधी आला, किती निधी खर्च झाला आणि त्यातून किती क्षेत्र विकसित झाले तसेच पाणलोट क्षेत्र विकास योजनेंतर्गत किती निधी आला, त्यापैकी किती खर्च झाला आणि किती क्षेत्र विकसित झाले ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन 2007-08 ते 2013-14 या कालावधीत केंद्र सरकारकडून 3431.71 कोटी रुपये निधी प्राप्त झाला होता. ठिबक सिंचन व पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत विविध योजनांसाठी गेल्या 7 वर्षांच्या कालावधीत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, झालेला खर्च आणि शिल्लक खालीलप्रमाणे आहे....(अडथळा) परंतु सन्माननीय सदस्यांनी जे सांगितलेले आहे ते सर्व अनुदान केंद्र सरकारचे आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर आलेले नाही. मी पुन्हा विचारतो की, ठिबक सिंचन, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा आणि पाणलोट क्षेत्र विकास, या तिन्ही कार्यक्रमासाठी गेल्या 7 वर्षात 3431 कोटी रुपयांचा निधी मिळाला होता. मी विचारु इच्छितो की, उक्त तिन्ही कार्यक्रमांसाठी प्रत्येकी किती निधी प्राप्त झाला, किती खर्च झाला आणि त्यातून नेमके किती क्षेत्र विकसित झाले ?

प्रा.राम शिंदे : महोदय, हा सर्व निधी केंद्र सरकारकडून आलेला आहे. ठिबक सिंचन योजनेसाठी 1156.58 कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. त्यापैकी 1117.41 कोटी रुपये खर्च झाले. अखर्चित रक्कम 39.17 कोटी रुपये आहे. पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत एकूण 9 कार्यक्रम घेतले जातात. यामध्ये नदी खोरे प्रकल्प योजना, मृद संधारण व पाणालेट क्षेत्र विकास, व्यवस्थापनाचे पायाभूत प्रशिक्षण, एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पश्चिम घाट विकास

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3700....

प्रा.राम शिंदे....

कार्यक्रम, महात्मा फुले जलभूमी अभियान, राष्ट्रीय पाणलोट विकास अभियान, विदर्भ सधन सिंचन योजना, साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांधकाम, तिवळ खोदणी, मृद व जलसंधारण उपचार राबविणे अशी कामे घेतली जातात. या सर्व योजनांसाठी 3431.71 कोटी रुपये प्राप्त झाला होता आणि 3267.79 कोटी रुपये खर्च झाला. 163.92 कोटी रुपये अखर्चित राहिला आहे, हा आकडा मागचा आहे. फेब्रुवारी अखेरीस 116.24 कोटी रुपये अखर्चित निधी आहे. यातून नेमके किती क्षेत्र विकसित झाले हे माझ्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना चांगले माहीत आहे. कारण यापूवीच्या आर्थिक पाहणी अहवालात हे वळोवेळी निष्पन्न झाले आहे. त्यामुळे....

**सभापती** : मला वाटते माननीय राज्यमंत्र्यांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे. आपणास जर या विषयाची माहिती नसेल तर आपण ती पटलावर ठेवावी.

श्री.धनंजय मुंडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. त्यावर माननीय राज्यमंत्र्यांकडून उत्तर अपेक्षित आहे. परंतु ते सांगतात की, प्रश्न विचारणाऱ्या सन्माननीय सदस्यांनाच त्याचे उत्तर माहीत आहे. मला वाटते हे माननीय राज्यमंत्र्यांना शोभनीय नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला की, सदरहू योजनांसाठी केंद्र सरकारकडून किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी किती खर्च झाला आणि प्रत्यक्षात किती क्षेत्र विकसित झाले ?

प्रा.राम शिंदे : महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी या कार्यक्रमासाठी केंद सरकारकडून किती निधी आला, किती वितरित झाला आणि किती निधी अखर्चित राहिला या बाबतचा प्रश्न विचारला होता. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीच्या आधारे सांगू इच्छितो की, या कार्यक्रमांतर्गत किती क्षेत्र सिंचित झाले या बाबतची सविस्तर माहिती तपशीलवार सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आजची तारीख 31 मार्च आहे. या प्रश्नाच्या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी सकाळी ब्रिफींग घेतले असेल. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले असेल की, यातील अमुक इतकी रक्कम अजूनपर्यंत अखर्चित राहिलेली आहे. महोदय, मी विचारु इच्छितो की,

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SJB/ AKN/ KTG/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.3700....

श्री.विक्रम काळे....

शेतकऱ्यांच्या योजनेचे पैसे अखर्चित का राहिले आहेत ? अधिकाऱ्यांनी कामामध्ये कुचराई केली म्हणून हा निधी शिल्लक राहिला आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, अशाप्रकारे कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? तसेच सूक्ष्म सिंचन, जल सिंचन आणि ठिबक सिंचनाला प्रोत्साहन देण्यासाठी जे अनुदान देण्यात येते ते वाढविण्यासाठी शासन काही पावले उचलत आहे काय ?

प्रा.राम शिंदे : महोदय, अखर्चित निधीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, 2007 ते 2014 या कालावधीतील हा निधी आहे. या अनुषंगाने सांगू इच्छितो की, अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थी मिळाले नाहीत म्हणून दुसऱ्या प्रवर्गातील लाभार्थी निवडण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठविला होता. परंतु केंद्र सरकारने त्यास नकार दिल्यामुळे तो निधी खर्च होऊ शकला नाही. अशा विविध कारणांमुळे हा निधी खर्च होऊ शकला नाही. फेब्रुवारी अखेर 163 कोटी रुपयांचा निधी अखर्चित होता. परंतु आज त्यातील 116 कोटी रुपये निधी अखर्चित आहे. परंतु आज 31 मार्च तारीख असली तरी एक महिन्याच्या आत हा सर्व पैसा वितरित करण्याबाबत विभागाला सूचना देण्यात येतील. अखर्चित निधी परत जाणार नाही याबाबत सर्वस्वी काळजी घेण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3700....

प्रा. राम शिंदे ....

सन्माननीय सदस्यांनी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने विषय उपस्थित केला आहे. सदर बाबतीत निश्चितपणे सकारात्मक विचार करण्यात येईल.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अकोला जिल्ह्यातील आकोट रोड वर असलेल्या पुलाच्या मध्यभागी भेगा
पडून पुल जीर्ण अवस्थेत **झाल्याबाबत**

**(९)** * २९१५ **श्री.**गो प कशन बाजोरीया : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील आकोट रोड वर असलेला आकोट आ ण बैतुल मार्गे जाणाऱ्या पुलाच्या मध्यभागी प्रचंड भेगा पडून पुल अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलास ५० वर्ष पूर्ण झाली असून या पुलावरुन हजारो वाहने ये-जा करित असून हा पुल अकोला रेल्वे लाईनवरुन बन वण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या पुलावरील पथदीपदेखील बंद अवस्थेत असल्यामुळे वाहनचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुल कोसळून कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन हानी होण्याची भती असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने व वध मार्गाने शासनाच्या निदर्शनास आणून पुलाच्या नुतनीकरणासाठी निधी उपलब्ध करण्याबाबतची मागणी करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व उक्त पुलाचे तात्काळ नुतनीकरण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विजयकुमार देशमुख,** **श्री.** दिवाकर रावते **यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) होय, तथा प सदर पुलावरील बरेच पथदीवे सुरु करण्यात आले असून, उर्वरित पथदिवे सुरु करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) हे खरे ना ही. रेल्वे वभागातर्फे दि. ०३.०१.२०१५ रोजी सदर पुलाचे निरीक्षण केले असून, सदर पूल वाहतूकीसाठी योग्य आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2915....

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सदर प्रश्नामध्ये प्रिंटिंग मिस्टेक झाली असावी. कारण माननीय परिवहन मंत्र्याऐवजी माननीय बांधकाम मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे होते. सदर प्रश्न अकोला जिल्ह्यातील अकोट रस्त्यावर असलेल्या पुलाचा आहे. सदर प्रश्न हा आरओबीचा म्हणजे रेल्वे पूलाचा आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट रस्त्यावरील तो पूल जीर्ण अवस्थेत आहे. साधी गाडी त्या पुलावरून गेली तरी तो थरथरतो. मागच्या वर्षी माननीय बांधकाम मंत्र्यांकडून उत्तर देण्यात आले होते की, आरओबीच्या संदर्भात संबंधित रेल्वे अधिकारी आणि माननीय बांधकाम मंत्री यांची संयुक्त बैठक घेऊन पुलाचे निरीक्षण करून त्या संदर्भात योग्य कार्यवाही करण्यात येईल. माझ्या माननीय मंत्र्यांना प्रश्न आहे की, मागच्या वेळी दिलेल्या उत्तराप्रमाणे यावर्षी तरी आरओबीच्या संदर्भात संबंधित रेल्वे अधिकारी व माननीय बांधकाम मंत्री यांची बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावणार का ?

श्री. विजयकुमार देशमुख : सभापती महोदय, हा पूल रेल्वेने बांधलेला आहे. रेल्वेच्या नियमाप्रमाणे दरवर्षी पुलाचे निरीक्षण होत असते. अहवालाप्रमाणे दिनांक 13.12.2013 व दिनांक 03.01.2015 या तारखांना 2 निरीक्षणे झाली आहेत. सदर पुलाचे निरीक्षण करण्यात आले असून सदर पूल वाहतुकीसाठी सक्षम असल्याचे रेल्वे प्रशासनाने शासनाला कळविले आहे. सन्माननीय सदस्यांची खात्री नसेल तर जरूर बैठक बोलावून पुलाचे निरीक्षण करण्यात येईल.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यवतमाळ जिल्हयातील परिसरात उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या परिसरात तसेच अंबोडा परिसरात होत असलेली अवैध वृक्षतोड

**(१०) * ३४४० श्री.संदिप बाजोरिया, श्री. करण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड तालुक्यातील (जि.यवतमाळ) उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या इसापूर धरणालगत लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान वृक्षतोड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच यवतमाळ जिल्हयातील अंबोडा आ ण परिसरात टाकळी वन, तसेच हिवरी येथे अवैधपणे वृक्षांची तोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वृक्षतोड करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, वलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड, श्री.** एकनाथराव खडसे **यांच्याकरिता :** (१) यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यात अशी बाब निदर्शनास आली नाही. तथा प, उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या हिंगोली जिल्हयातील कळमनूरी तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील इसापूर धरणाखाली नैस र्गकरित्या उगवलेली व आयुष्य पूर्ण झालेली बाभुळीची झाडे ४९९, निलगीरीची झाडे ६२ व सुबाभुळीची झाडे ५४९ अशी एकुण १११० झाडे कार्यकारी अ भयंता उर्ध्व पैनगंगा प्रकल्प वभाग क्र. १ यांनी नि वदा काढुन कंत्राटदारास तोडण्यास दिली आहेत.
(२) यवतमाळ जिल्हयातील अंबोडा हा गांव यवतमाळ वन वभागातील, उत्तर आर्णी वनपरिक्षेत्रात येते, परंतु तेथे अवैध वृक्षतोडीचे प्रकरण घडलेले नाही. तसेच यवतमाळ वन वभागातील हिवरी येथे अवैधपणे वृक्षांची तोड होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले नाही.

मात्र टाकळी (वन) हे गांव पैनगंगा अभयारण्य क्षेत्रात असुन या वनक्षेत्रामध्ये माहे जानेवारी-२०१५ मध्ये अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.
(३) व (४) पैनगंगा अभयारण्यात टाकळी वन कक्ष ५९५ मध्ये सागवान प्रजातीचे ८ वृक्षांची तोड झाली असुन त्याची नुकसान कंमत रु. ६१, २००/- एवढी आहे. त्याबाबत दिनांक ५/१/२०१५ रोजी गुन्हा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3440....

श्री. संजय राठोड ....

**दाखल करण्यात आला आहे. यापैकी साग इमारती नग १५ (घन मटर ०.९५९ माल, कंमत रुपये १५, ६२८/-) इतका माल जप्त करण्यात आलेला आहे. उर्वरीत चोरीस गेलेला माल व आरोपीचा तपास चालू आहे.**

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येईल का, दोषींवर कारवाई करण्यात येईल का ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, होय.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बीड जिल्ह्यात २६५६ कोटी रुपयांचा भुसंपादन मावेजा प्रलंबित असल्याबाबत

**(११)** * ३६६५ श्री.अमर संह पं डत, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. वक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शंदे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात भुसंपादनाच्या एकूण ५८९ प्रकरणांत रु. ६३,८८,२०,९७३/- एवढा मावेजा प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप जिल्हा धकारी (समन्वय), बीड यांनी दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी वा त्या दरम्यान आयुक्त, औरंगाबाद यांच्या बैठकी दरम्यान दिलेल्या टिप्पणीमध्ये जिल्ह्यात १२४७ प्रकरणांत २६५६ कोटी रुपयांचा मावेजा थकीत असल्याचे निर्दे शत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढून शेतकऱ्यांना मावेजा वाटपासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) याबाबत मावेजा वाटपास झालेल्या वलंबाची कारणे कोणती ?

**श्री. संजय राठोड,** श्री. एकनाथराव खडसे **यांच्याकरिता :** (१) होय,
कलम- ११ खाली रु.१७, ४२, ६१, १५६/- व कलम २८ अ खाली रु.३,३३,६५,३२२/- व तसेच कलम १८ खाली (रोजगार हमी योजनेचे रु.१२,९८,४८,७५०/- व इतर संपादक संस्थेचे रु.३०,१३,४५,७४५/-) रु.४३,११,९४,४९५/- असा एकूण रु.६३,८८,२०,९७३/- इतका मावेजा प्रलंबित आहे. कलम १८ खालील निधी मागणी प्रस्तावामध्ये रोजगार हमी योजनेशी संबं धत निधीचाही समावेश आहे.
(२) होय.
परंतु प्रलंबित प्रकरणांची संख्या १२४७ आ ण प्रलंबित निधी ४५.६३ कोटी दर्श वणे आवश्यक होते. तथा प जिल्हा धकारी कार्यालय स्तरावर सर्व भूसंपादन अ धका-यांकडून माहिती सादर करताना टंकलेखन प्रमाद (Clerical Mistake) झाल्यामुळे २६५६ कोटी रुपयाचा मावेजा थकीत असल्याबाबत उल्लेख करण्यात आला होता, सदरची चूक दुरूस्त करुन प्रलंबित नि धबाबतची अचूक माहिती जिल्हा धकारी, बीड यांचे कार्यालयाकडून वभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयास सादर केली आहे, त्यानुसार रु.४६.६७कोटी निधी प्रलंबित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(३) जिल्हा धकारी कार्यालयाकडून शासनाकडे प्राप्त झालेल्या परिपूर्ण प्रस्तावांमध्ये वरिष्ठ न्यायालयाचे (मा.उच्च न्यायालयाचे) अपीलामध्ये आदेश असल्यास, शासन निर्णय, वत्त वभाग, दिनांक २९.७२००६ व दिनांक १२.८.२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे पात्र प्रकरणामध्ये वत्त वभागाच्या मान्यतेने "लेखाशीर्ष-८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी" या लेखाशीर्षाखाली मा.न्यायालयात जमा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3665....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील भूसंपादनाचा मावेजा शेतकऱ्यांना द्यायचा आहे. मावेजा वेळेवर दिला जात नाही. अनेक शेतकरी त्या संदर्भात सातत्याने येऊन भेटतात. शेतकऱ्यांना या संदर्भात न्यायालयात सुध्दा धाव घ्यावी लागते. शेतकऱ्यांना मावेजा देणे गरजेचे आहे, तो देण्याच्या संदर्भातील कार्यवाही कधी पूर्ण करण्यात येईल ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील भूसपांदनाच्या संदर्भातील मावेजाची रक्कम 66 कोटी रूपये द्यायची आहे. कलम 11 अन्वये एकूण 77 प्रकरणे आहेत, त्या संदर्भात 17 कोटी 42 लाख रूपये एवढा निधी मंजूर करणे प्रलंबित आहे. रोजगार हमी योजनेतील 13 प्रकरणे आहेत. संपादित संघाची 64 प्रकरणे आहेत. भूसंपादन संस्थेकडून अहवाल मागवून शासनाकडून तातडीने या संदर्भातील निर्णय घेतला जाईल.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील भूसंपादनाच्या प्रलंबित प्रकरणांतील मावेजाची रक्कम फार मोठी आहे. माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणांतील ॲवॉर्डला स्थगिती दिली आहे. परंतु त्या संदर्भातील अपिल अजून झालेले नाही. अपिल न करण्याचे कारण काय तेही समजले नाही. प्रोटेस्टमध्ये रक्कम घेत आहे. माननीय उच्च न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांचे अपिल झालेले नाही. सदर प्रकरणी माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर एक समिती गठीत करून हे प्रकरण निकाली काढण्यासाठी शासन निर्णय घेईल का ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, बीड जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण 265 प्रकरणे आहेत. सदर प्रकरणी तपासून समिती करता येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.** : तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 10 मार्च, 2015 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**सभापती** : दिनांक 10 मार्च, 2015 ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----

..9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली व दुसरी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली व दुसरी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली व दुसरी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----

..10

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## जात वैधता प्रमाणपत्राच्या संदर्भातील पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. राज्यात मनपा, ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. मी 24 तारखेला सभागृहाचे लक्ष वेधून सांगितले होते की, पश्चिम महाराष्ट्रात सातारा, सांगली येथील लोकांना कोल्हापूर येथे जाऊन संबंधित खात्यातून जात वैधता प्रमाणपत्र घ्यावे लागते आणि तरच त्यांना निवडणुकीमध्ये भाग घेता येणार आहे. सभापतीम महोदय, त्याच वेळी काही अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. सभापती महोदय, आपण सूचना केल्यानंतर माननीय मंत्र्यांनी या संदर्भात सांगितले की, निवडणुकीच्या नंतर 6 महिन्यांत जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे. सदर बाबतीतील विधेयक 25 तारखेला सभागृहात सादर झाले. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी ते विधेयक मांडले होते.

सभापती महोदय, कालच नवी मुंबई मनपाच्या आयुक्तांनी, पदाधिकाऱ्यांनी एक पत्रकार परिषद घेतली आणि स्पष्ट सांगितले की, सरकारकडून अजून आमच्याकडे कोणत्याही प्रकारचा शासन निर्णय आलेला नाही. त्यामुळे जे उमेदवार 6 तारखेच्या आत जात प्रमाणपत्राच्या संदर्भातील जात वैधता प्रमाणपत्र जोडतील त्यांनाच आम्ही ग्राह्य धरू नाही तर आम्ही ग्राह्य धरणार नाही. माझी विनंती आहे की, सरकारच्या माध्यमातून नवी मुंबई, औरंगाबाद अशा सर्वच मनपाच्या आयुक्तांना आजच्या आज ताबडतोब या संदर्भात कळवावे.

**सभापती** : शासनाने विधेयक आणले आहे. आपण शासनातील ज्येष्ठ माननीय मंत्री आहात. निवडणुकीच्या संदर्भात अडचणी राहणार नाहीत अशा प्रकारचा शासन निर्णय प्रसिध्द करून पोच करण्यात यावेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, होय.

----

..11

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यामध्ये होणाऱ्या ग्रामपचांयतीच्या निवडणुका गेल्या आठवड्यात स्थगित करण्यात आल्या होता. आम्ही आपल्या बरोबर आपल्या दालनात चर्चा केली होती. काल रात्री अचानक राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून सोमवारपर्यंत सर्व कार्यालये सार्वजनिक सुट्ट्यांळे बंद राहणार आहेत. त्यामुळे आवश्यक दाखले मिळणार नाहीत. निवडणुका 6 महिने अगोदर का घेतल्या जातात याबद्दल आम्ही नाराजी व्यक्त केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाला विनंती केल्यानंतर निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या होत्या.

सभापती महोदय, आणखी एक चूक आहे. तालुक्याच्या ठिकाणी नगरपरिषद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. काही ठिकाणी नगरपंचायती तर काही ठिकाणी नगरपालिका आहेत, ज्या मोठ्या आहेत. ग्रामपंचायतीच्या निवडणुका लावलेल्या आहेत. राज्य शासनाने राज्य निवडणूक आयोगाला तशी विनंती करावी. पाऊस असतो म्हणून ऑगस्ट महिना म्हणता. परंतु अगोदर सुध्दा 3-4 वेळा निवडणुका ऑगस्ट महिन्यातच झालेल्या आहेत. सप्टेंबर महिन्यात लोकसभा, विधानसभा निवडणुका झालेल्या आहेत. पावसाचे कारण सांगून राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक लावण्याचा प्रयत्न सुरूआहे. राज्य शासनाने याला विरोध करावा.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील......

मी स्वत: आज राज्य निवडणूक आयुक्तांना भेटलो आहे. परंतु, त्यांनी या बाबतीत असमर्थता व्यक्त केली. सर्व निवडणूक यंत्रणा राज्य शासनाच्या कार्यालयांमार्फत राबविली जात असते. माझ ी आपल्याला विनंती आहे की, आपण राज्य शासनाला तसे निदेश द्यावेत.

**सभापती :** शासनाने निवडणूक आयोगाला पत्र पाठविले होते व त्याप्रमाणे यापूर्वी निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या होत्या. त्याच पध्दतीने मार्ग काढण्याचा प्रयत्न शासनाने करावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मागील सरकारने एक निर्णय घेतला होता व त्याबाबत या सरकारने अंमलबजावणी केली आहे. दिनांक 1 एप्रिल, 2015 पासून तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या ग्राम पंचायतींवर प्रशासक नेमून त्या बरखास्त करण्यात येणार आहेत. उद्यापासूनच याची अंमलबजावणी होणार आहे. प्रशासक म्हणून तहसीलदार किंवा तत्सम अधिकारी यांच्याकडे कार्यभार देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने नगरपंचायतींचे रुपांतर नगरपालिकांमध्ये करण्याचीही घोषणा केली आहे. या संदर्भातील कालावधी जाहीर करण्यात आला, कार्यक्रम जाहीर केला गेला आणि तो राजपत्रात प्रसिध्दही झाला आहे. आता निवडणूक आयोगाने ज्या निवडणुका जाहीर केल्या आहेत, त्यामध्ये मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या ग्राम पंचायतींचाही समावेश आहे. त्या निवडणुका दिनांक 22 एप्रिल, 2015 रोजी आहेत. राज्य शासनाने या संदर्भातील राजपत्र प्रसिध्द केले, प्रशासकांना उद्यापासून कार्यभार देण्यात येणार आहे. त्यामुळे अशा ग्राम पंचायतींच्या निवडणुका थांबविण्याबाबत राज्य शासनाने उचित कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना व आपले आदेश मी मुख्यमंत्री महोदयांना कळवितो आणि तशा प्रकारचा निर्णय घेण्यासंबंधी त्यांना विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या बाबतीत आजच्या आज निर्णय होणे गरजेचे आहे.

**सभापती :** आपण आपल्या पध्दतीने प्रयत्न करु, शासन त्यांच्या पध्दतीने प्रयत्न करील.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण निवडणूक आयोगाला फक्त विनंती करु शकतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य शासनाने राजपत्र प्रसिध्द केले आहे. नगरपंचायतींचे रुपांतर नगरपालिकांमध्ये होणार आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सभागृहाच्या भावनांशी पूर्णपणे सहमत आहे. माझेही तसेच मत आहे. परंतु, हा निर्णय निवडणूक आयोगाने घ्यायचा आहे. तशा प्रकारचे निवेदन राज्य शासनामार्फत निवडणूक आयोगाला आजच्या आज देण्याबाबत मी मुख्यमंत्री महोदयांना विनंती करीन.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, नियमितपणे होणाऱ्या निवडणुकांचा प्रश्न वेगळा आहे. राज्य सरकारने अधिसूचना प्रसिध्द करुन नगरपंचायतींचे रुपांतर नगरपालिकांमध्ये केले आहे आणि त्या ठिकाणी प्रशासकांची नेमणूक उद्यापासून होणार आहे या संदर्भातील विधेयक विधिमंडळाने मंजूर केल्यानंतर राज्य शासनाने अधिसूचना काढली आहे. अशा प्रकारे हा निर्णय झाला आहे. निवडणूक आयोगाने राज्य शासनाच्या फॉर्मेशनप्रमाणे निवडणुका घ्यायच्या आहेत. राज्य शासनाने नगरपालिका निर्माण केल्या आहेत व त्या कायद्याप्रमाणे निर्माण केल्या आहेत. प्रशासकाच्या हातामध्ये कारभार दिलेला आहे. आज त्या ठिकाणी नगरपालिका म्हणून निवडणुका लागलेल्या नाहीत तर ग्राम पंचायती म्हणून लागलेल्या आहेत. यामुळे या संदर्भात हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये निवडणुका घोषित झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने नाशिक जिल्ह्यातील एक आणि कोकणातील 4 जिल्ह्यांच्या निवडणुका घोषित केल्या आहेत. कोकणासाठी वेगळया, विदर्भासाठी वेगळ्या, मराठवाड्यासाठी वेगळ्या, अशा प्रकारे निवडणुका लावू शकतो का ? विधिमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यानुसार निवडणूक आयोगाने निवडणुका घ्यायच्या आहेत. अन्यथा, त्यामधून वेगळा प्रश्न निर्माण होईल.

**सभापती :** या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी अनेक अडचणी मांडलेल्या आहेत. एवढ्या अडचणी असतील तर असे करावे की, मंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन सन्माननीय

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती.........**

सदस्यांची मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा घडवून आणावी. मुख्यमंत्री महोदयांना याबाबतची चांगली जाण आहे. यापूर्वी त्यांनी याच संदर्भात निवडणूक आयोगाला विनंती केली होती. त्यामुळे आजच्या आज यामधून मार्ग कसा निघेल, हे मंत्री महोदयांनी बघावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय.

**सभापती :** आणखी एक गोष्ट मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, आज दुपारी 2.00 वाजता मुख्यमंत्री महोदय अन्य कामकाजासाठी माझ्या दालनात येणार आहेत. त्यावेळी सन्माननीय सदस्य माझ्या दालनात आले तर आपण यामधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु

------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाबाबत**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, बीड येथील मार्केट कमिटीच्या संदर्भात मी एक लक्षवेधी सूचना दिली होती. त्यावर चर्चा होऊन 5-6 दिवस होऊन गेले आहेत. आजच्या आज संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, अशा प्रकारचे आश्वासन त्यावेळी राज्यमंत्री महोदयांनी दिले होते. परंतु, 5-6 दिवस उलटून गेल्यानंतरही अद्याप या आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या विषयावर चर्चा करीत आहेत, कोणत्या आयुधाच्या माध्यमातून चर्चा करीत आहेत, हे आम्हाला समजले पाहिजे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला प्रश्न विचारण्याचा जरूर अधिकार आहे. परंतु, आपण तो कोणत्या आयुधाच्या माध्यमातून विचारता आहात, हा प्रश्न आहे. औचित्याच्या मुद्याव्दारे मी आपल्याला या प्रश्नावर बोलण्याची संधी नंतर देईन.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना**</u>

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे व इतर वि.प.स.यांनी "दिनांक 30 मार्च, 2015 रोजी मुंबईच्या महापौर यांनी नगरसेवकांकडून टक्केवारी घेऊन निधी वाटप केल्याच्या गंभीर घटनेबाबत" नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. त्यांनी हा विषय 289 चा कसा होतो, या बाबत आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. या मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांनी महापालिकेच्या कामांसबंधी कंत्राटदारांना हाताशी धरुन कमिशन मागितले असल्याबाबतची ध्वनीफीत आपण काल अनेक वाहिन्यांवर पाहिली आहे. एकदा नाही तर दोन वेळा मुंबई महानगरपालिकेच्या कामांच्या टक्केवारीबाबत माननीय महापौर दुसऱ्या पक्षाच्या एका गटनेत्याबरोबर 'दोन पाहिजे', 'चार पाहिजे' की 'सहा पाहिजे', अशा पध्दतीने स्पष्टपणे बोलत होत्या. मुंबई महानगरपालिकेच्या सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात स्थायी समितीसाठी आणि सभागृहासाठी जो निधी राखून ठेवला आहे त्या 100 कोटी रुपयांचे वाटप महापौरांच्या अधिपत्याखाली होणार आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहात मुंबईच्या महापौर नाहीत, त्यांना सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नोटीसही दिलेली नाही. त्यांच्यावर करण्यात येणाऱ्या आरोपांचा खुलासा करण्याची संधी त्यांना मिळणार नाही.

**सभापती :** महापौरांवर हेत्त्वारोप करण्यात आले आहेत, असे आतापर्यंतच्या सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या भाष्यावरुन वाटत नाही. हा विषय नियम 289 चा कसा होतो, यावर चर्चा सुरु आहे. तथापि, त्यांच्या बोलण्यातून हेत्त्वारोप झाला तर मी निश्चितपणे आपल्याला संधी देईन.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 100 कोटी रुपयांचे वाटप कुणाला, कशासाठी आणि किती टक्केवारीने करायचे आणि तेही कंत्राटदारांना हाताशी धरुन, हे सर्व आपण काल वाहिन्यांवर पाहिले आहे.

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अशा प्रकारे हेत्त्वारोप करण्यात येत आहेत. माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

**सभापती :** मी एकदा निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्यावर मंत्री महोदय हरकतीचा मुद्दा उपस्थित करु शकतात का ? सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हेत्त्वारोप केला आहे किंवा नाही, हे मला ठरवू द्या. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनीही हेत्त्वारोपापेक्षा हा विषय नियम 289 चा कसा होतो, एवढ्या मर्यादित स्वरुपात बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. एवढी गंभीर बाब आपण काल वाहिन्यांवर बघितली आहे. वाहिन्यांवर ही चित्रफीत दोन वेळा दाखविण्यात आली आहे. सबंध महाराष्ट्राने आणि देशाने ही चित्रफीत बघितली आहे. या मुंबईची एक वेगळी अस्मिता आहे आणि जगभरात मुंबईचे आगळेवेगळे स्थान आहे. मुंबईच्या महापौरांनी नेमके काय वक्तव्य केले आहे, त्या ठिकाणी नेमके काय घडले आहे, हे देशाला समजले पाहिजे. त्या नेमक्या कोणत्या पैशांबाबत बोलत होत्या, कोणत्या कंत्राटदारांबाबत बोलत होत्या आणि कोणत्या इतर लोकांची नावे त्यांनी घेतली आहेत, त्यांचा या कामाशी काय संबंध आहे, कोणाला कामे द्यायची होती, कोणत्या वॉर्डमध्ये द्यायची होती, किती कामे द्यायची होती, किती टक्केवारीने द्यायची होती, अशा प्रकारचे संभाषण त्यामध्ये झाले आहे. त्यामुळे याबाबत महाराष्ट्राच्या जनतेला कळले पाहिजे. ही अतिशय गंभीर बाब आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आजचे सर्व कामकाज आपण स्थगित करावे.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

मुंबई महानगरपालिकेचे महापौर यांच्या संभाषणाच्या ध्वनीफितीबाबत म.वि.स.नियम 289 अन्वये चौकशी करण्यासाठी प्रस्तावाची सूचना दिलेला आहे. त्यासंदर्भात सभागृहात चर्चा घडवून आणावी, त्या चर्चेला शासनाने उत्तर द्यावे. तसेच याबाबत सीआयडी किंवा ॲन्टीकरप्शन ब्युरो यांच्यामार्फत चौकशी करावी, अशी मागणी मी या सूचनेच्या माध्यमातून करीत आहे. त्याचप्रमाणे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन या प्रस्तावाच्या सूचनेवर सभागृहात चर्चा करण्यात यावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज थांबवून नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर सभागृहात चर्चा व्हावी अशी मागणी विरोधी पक्ष नेत्यांनी केली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय गंभीर बाब सभागृहात उपस्थित केली आहे. यासंदर्भातील व्हीडीओ क्लिप संपूर्ण महाराष्ट्राने पाहिली आहे. कंत्राटरांच्या माध्यमातून नगरसेवकांकडून नियमित पैसा संगनमत करुन घेण्यात येत आहे असे चित्र राज्यासमोर आले आहे. याबाबत लोकांच्या मनात संशय निर्माण झाला आहे. 100 कोटीचा प्रश्न कंत्राटदाराच्या माध्यमातून उघडकीस आला आहे. काही दिवसांपूर्वी 450 कोटी रुपयांचे कंत्राट देण्यासंदर्भात आरोप महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या सदनात केले होते. त्यासंदर्भातील माहिती नंतर बाहेर आली नाही. याबाबत कोणीही बोलत नसल्यामुळे संशय अधिक बळावत चालला आहे. अशा प्रकारची घटना घडल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला मान खाली घालावी लागत आहे. या विषयापेक्षा दुसरा कोणताही विषय महत्वाचा असू शकत नाही. विरोधी पक्ष नेत्यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबवून या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देऊन अतिशय गंभीर प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला आहे. प्रथम नागरीकाला सर्व ठिकाणी मान दिला जातो. प्रथम नागरिकाच्या संदर्भातील ध्वनीमुद्रित सीडी काल दाखविण्यात आली आहे. याबाबत स्पष्टीकरण करण्याची गरज आहे. या सीडीत एकच भाग आहे असे नाही, यामध्ये टक्केवारीचा एक भाग आहे, 100 कोटी रुपयांच्या वर असलेल्या निधीचे वाटप करायचे आहे. हा निधी कंत्राटदाराच्या मार्फत वाटप करायचा आहे. हा पैसा एका पक्षाचा किंवा प्रथम नागरीक

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

महापौर यांचा नाही, हा पैसा जनतेचा आहे. या पैशांचे वाटप पक्षांतर्गत कसे केले जाते हे सीडीच्या माध्यमातून दाखविण्यात आले आहे. या पक्षाला इतके टक्के, त्या पक्षाता तीन टक्के, दोन टक्के हा अतिशय गंभीर प्रकार आहे. या सदनात आपण बोलत असताना सरकारी कर्मचाऱ्यांनी 500,1000, 2000 रुपये लाच घेतली तर त्याला निलंबित करण्याची मागणी आपण करतो. 100 कोटी रुपये टक्केवारीने घेतले जात आहेत. यासंदर्भात आपण मला परवानगी देत असाल तर मी आपणाला या संदर्भातील सर्व डिटेल माहिती देतो. आम्हाला पैसा वरपण नेऊन द्यावा लागतो असे सांगितले जाते. वर हे पैसे कोणाकडे घेऊन जातात, हा पैसा कोणत्या पक्ष प्रमुखाकडे जातो. मुंबई महानगरपालिकेचे बजेट 32 हजार कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. याबाबत मी सदनात वारंवार बोललो आहे. विरोधी पक्ष नेते म्हणाले की, मुंबई ही आर्थिक राजधानी आहे. या आर्थिक राजधानीची वाट कशा पध्दतीने लावली जाते, याचे पुरावे आपण दिले आहेत. कंत्राटदारांची यादी दिलेली आहे. मागील चार वर्षातील यादी मी अनेकवेळा सभागृहात सांगितली आहे. ज्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले, त्याच कंत्राटदारांना पुन्हा कंत्राट दिले जातात. कंपनी तीच आहे, मालक तेच आहेत, फक्त मालकाचे नांव बदलून पुन्हा त्याच 'शहा' यांना कामे दिली जातात. वारंवार सदनात हा विषय मांडला आहे. आता पैसे देणाऱ्यांचे संभाषण आपल्या हातात आले आहे. यापेक्षा आणखी कोणते पुरावे हवे आहेत. आता अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू आहे, अर्थसंकल्पावर आपण चर्चा करीत असतो. मुंबईचा नागरिक व प्रतिनिधी म्हणून मी असे सांगतो की, 100 कोटी ही रक्कम कमी नाही. त्यामुळे सभागृहातील सर्व कामकाज बाजूला ठेऊन यावर चर्चा करण्याची गरज आहे असे माझे मत आहे.

**सभापती** : आता मी यासंदर्भातील निर्णय देत आहे. कृपया आता कोणीही बोलण्याची आवश्यकता नाही. या विषयाबाबत सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, ॲड.राहूल नार्वेकर, डॉ.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती विद्या चव्हाण व श्री. माणिकराव ठाकरे, यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली होती, त्याच विषयावर नियम 93 सूचना देखील दिलेली आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सन्माननीय सदस्यांना मी बोलण्यासाठी वेळ दिलेला आहे. त्या

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती....**

अनुषंगाने म.वि.प.नियम 93 अन्वये शासनाने उद्या निवेदन करावे, असे मी निदेश देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे, यावर चर्चा होणे अपेक्षित आहे.

**सभापती** : ठीक आहे, या विषयाबाबत शासनाने आजच्या आज निवेदन करावे, असे मी आता निदेश देत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण निर्णय दिलेला आहे, त्यावर आता विरोधी पक्ष नेते कसे काय बोलू शकतील.

**सभापती** : विरोधी पक्ष नेते मी निर्णय दिल्यावर आपण आता बोलणे उचित होणार नाही. म.वि.स. नियम 93 च्या सूचनेवर निवेदन करण्याचे मी सरकारला सांगितले आहे, याबाबत आपले समाधान झाले नाही, तर उद्या कोणत्याही आयुधामार्फत या विषयाबाबत आपणाला सूचना देता येईल.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त व श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यात एका महिलेवर सामुहिक व अमानुषपणे बलात्कार करण्यात आला आहे. राजेगांव ता.नेवासे,जि.अहमदनगर येथे हरिनाम सप्ताहासाठी जमलेल्या वर्गणीचा हिशोब मागण्यात आल्यामुळे संतप्त सरपंचाने साथीदारांसह त्या महिलेच्या घरावर हल्ला करून मारहान केली, घरातील सामानाची तोडफोड करण्यात आली. याबाबत त्या महिलेच्या मुलाचा जबाब घेण्यात आलेला आहे. दूरचित्रवाहिनीवर आपण पाहिले असेल की, तो मुलगा असे सांगत होता की, माझ्या आईवर अमानुषपणे अत्याचार करण्यात आले आहेत. त्यावेळी माझे हातपाय बांधून मला वरच्या मजल्यावर नेऊन ठेवण्यात आले होते. मारहान करून हातपाय तोडण्यात आले, अशा प्रकारची भयंकर घटना अहमदनगर जिल्हयातील नेवासा येथील पोलीस स्टेशनच्या अंतर्गत घडली आहे. नागपूर येथे देखील काल परवा अशा प्रकारची घटना घडली आहे. राज्यात अशा प्रकारे मोठ्या घटना घडत असून महिलांवर अत्याचार होण्याचे

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

प्रकार वाढीस लागले आहेत, ही बाब अत्यंत गंभीर ब्आहे, अलिकडील काळात अशा अनेक घटना घडत आहेत, त्यामुळे या सदनाचे काम थांबवून या विषयावर चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे. सर्व कामकाज थांबवून या विषयावर सभागृहात चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, माणिकराव ठाकरे यांनी म.वि.प. नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी सन्माननीय सदस्यांना या विषयावर आपले म्हणणे मांडण्यासाठी दोन मिनिटे वेळ दिलेला आहे आणि त्या अनुषंगाने म.वि.प. नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर शासनाने निवेदन करावे, असे मी निर्देश देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये "राज्याचे जलसंपदा मंत्री यांनी दिनांक 29 मार्च, 2015 रोजी जळगाव येथील मूक बधिर विद्यार्थ्यांच्या जाहिर कार्यक्रमात कमरेला पिस्तुल खोचून जाहिर भाषण करण्यात येणे" या विषयावर सूचना दिलेली आहे.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेब पुन्हा दुसरी सूचना मांडत आहेत. मी सांगू इच्छितो की, एका सन्माननीय सदस्याला एका दिवशी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची एकच सूचना देता येते. मी अनेक वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधी जनतेतून निवडून येतात. मंत्री महोदय मंत्री पदाची शपथ घेतात. त्यांनी कमरेला शस्त्र खोचून फिरणे......

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, उद्या आपल्याला हा विषय मांडावयाचा असेल तर आपण इतर आयुधांच्या माध्यमातून तो मांडावा.

----------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका अत्यंत महत्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. अंरनाथ शहरामध्ये गोखले रहाळकर नावाची माध्यमिक शाळा आहे, प्राथमिक शाळा देखील आहे. ही शंभर टक्के शासन मान्य खाजगी अनुदानित शाळा आहे. ही शाळा अत्यंत जुनी आहे. शाळेची इमारत मोडकळीस आल्यामुळे या संस्थेने ओरिएंटल कमर्शिअल बँकेकडून 7 लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. परंतु, बँकेने मागील 12-13 वर्षात या संस्थेकडून 7 लाख रुपये कर्जावरील व्याजापोटी 33 लाख रुपये वसूल केलेले आहेत. आता पर्यंत संबंधित शाळेतील शिक्षकांनी इकडून तिकडून कर्ज काढून हे 33 लाख रुपये भरले. तरी देखील अजून काही रक्कम देणे बाकी आहे, असे म्हणून संबंधित बँकेने संस्थेला न सांगता शाळेच्या इमारतीचा लिलाव केला. त्या शाळेची इमारत एका खाजगी बिल्डरला विकण्यात आलेली आहे आणि त्या खाजगी बिल्डरने त्या शाळेचा ताबा घेऊन जून महिन्यापासून ही शाळा बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या शाळेमध्ये अत्यंत गरीब कुटुंबातील 750 मुले शिक्षण घेत आहेत. या शाळेत 23 ते 25 शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत. त्या बिल्डरने शाळेच्या जागेवर टॉवर बांधण्याचा निर्णय घेतला असून आता ही शाळा बंद पडण्याचा मार्गावर आहे.

सभापती महोदय, कोणत्याही परिस्थितीत ही मराठी माध्यमाची शाळा बंद होणार नाही या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावेत, अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे. माननीय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ही शाळा बंद होणार नाही, अशी हमी शिक्षण मंत्र्यांनी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय सहकार विभागाशी संबंधित आहे. फार तर त्या विद्यार्थ्यांना आजुबाजूच्या शाळेत.....

**सभापती** : मंत्री महोदय, आपण सर्वज्ञ आहात, आपण उत्तर द्यावे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी उत्तर दिले तर विनोद तावडे सर्व विषयावर बोलतात, अशी सन्माननीय सदस्य हरकत घेतात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो विषय मांडलेला आहे त्याबाबत मी स्वतः माहिती घेतो. माझे असे म्हणणे आहे की, बँकेने जर त्या शाळेवर अन्याय केला असेल तर आम्ही शासनामार्फत योग्य ती कार्यवाही करू. परंतु, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही जबाबदारी शिक्षण मंत्री म्हणून माझी आहे, ती जबाबदारी मी घेईन.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 25 मार्च, 2015 रोजी बीड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 2002 साली बहिरवाडी, ता.बीड येथील 50 एकर जागेत समितीचे स्थलांतर होणे, तसा प्लॅन, ले-आऊट ग्रामपंचायतीने लिजवर घेण्याचा ठराव केलेला असताना आता पर्यंत लीज न होणे, या बाजार समितीने एकूण 146 प्लॉट वाटप केलेले असणे, परंतु अद्यापही सदरहू प्लॉट धारकांचे भाडेकरार बाजार समितीने नोंदणीकृत केलेले नसणे, या संदर्भात सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्या चर्चेच्या दरम्यान सन्माननीय सदस्यांनी उडीद घोटाळ्याचा प्रश्न देखील उपस्थित केला होता. उडीद खरेदी केला आणि त्याची 4,300/- रुपये प्रती क्विंटल दराने विक्री करण्यात आली. त्या ठिकाणी प्रती क्विंटल 2 हजार रुपयांचा गफला झालेला आहे, असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मंत्री महोदयांनी सन 2011-12 मध्ये एमएसपी 4,300/- रुपये असताना कृषी विभागाचा आणि महसूल विभागाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या भागामध्ये उडीद पिकाचा पेरा झाला नव्हता, अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर दुसरीकडून खरेदी केल्याचे निष्पन्न झालेले आहे. हा व्यवहार खरेदी विक्री संघाने केला होता व तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले होते. या संदर्भात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे आदेश शासनाने सन 2013 मध्ये दिले होते. परंतु, त्याबाबत फेरविचार करण्यासाठी हे प्रकरण कोकण विभागीय आयुक्तांकडे सोपविण्यात आले, असे उत्तरात नमूद केले. माननीय मंत्र्यांनी असेही सांगितले की, मी दोषींविरुद्ध आजच्या आज गुन्हे नोंदविण्याचे आदेश देत आहे. या प्रकरणी कोकण विभागीय आयुक्तांकडे चौकशी सुरु असताना गुन्हे नोंदविण्याच्या बाबतीत आदेश देणे संयुक्तिक नव्हते. म्हणून मंत्री महोदयांनी या संदर्भात दिलेल्या उत्तराच्या बाबतीत बदल करावा, अशी माझी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अतिशय सविस्तरपणे हा विषय मांडलेला आहे. मला याच विषयाच्या संदर्भात बोलावयाचे होते. फक्त माझा मुद्दा वेगळा होता. (...अडथळा...) सभापती महोदय, माझा वेगळा औचित्याचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात अधिकची माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माहिती दिली आणि त्यांनी शासनामार्फत अधिकृतपणे सांगितले की, यामध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झालेला आहे. ते सिद्ध झालेले आहे. परंतु, तत्कालीन सरकारच्या काळात काही लोकांना वाचविण्यासाठी पुन्हा फेर अर्ज केला गेला आणि तो कोकण विभागाकडे चौकशीसाठी पाठविण्यात आला. ती सोय म्हणून होती. त्या संदर्भात मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांची जी विनंती होती ती बाजूला ठेऊन, जो सुरुवातीचा निर्णय होता तो गृहीत धरुन आम्ही आजच्या आज तसे गुन्हे दाखल करु. आता त्याला सहा दिवस झालेले आहेत. सहा दिवसात गुन्हे दाखल झाले नाहीत. दुर्दैवाने शासनावर काही दबाव येत आहे काय आणि दबावाखाली शासन काम करणार आहे काय ? माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्या दिवशी नाही तर किमान आजच्या आज तरी हे गुन्हे दाखल करुन जे जे कोणी लोक इकडे तिकडे फिरत आहेत त्यांना शासन सजा देणार आहे काय ?

**सभापती** : हे दोन्ही औचित्याचे मुद्दे मी अतिशय गांभीर्याने ऐकून घेतलेले आहेत. ज्यावेळी या संदर्भातील लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती, त्यावेळी मी चेअरवर नव्हतो. आज माझ्या समोर तीन प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यातील एक प्रश्न तांत्रिक आहे.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती.....**

कोणत्याही कारणाने का होईना, 2013 मध्ये आयुक्तांची चौकशी पेंडिंग असताना लक्षवेधी सूचनेवर उत्तर देत असताना त्याच विषयावर जर जिल्हाधिकाऱ्यांची चौकशी होणार असेल, असा एक मुद्दा मांडला गेला. त्याच्या उलट विचार माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मांडला आहे. पहिली चौकशी झाली. त्याचा फेरविचार करण्यासाठी मागणी केली आहे. त्यावर शासनाने लक्षवेधी सूचनेला उत्तर दिले त्यानुसार माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, आजच संबंधिताना अटक व्हावयास पाहिजे. हे तीन प्रश्न माझ्यासमोर आहेत. मी सन्माननीय मंत्री व विधानमंडळाच्या अधिका-यांना सोबत घेऊन कार्यवृत्त तपासून घेतो. जी काही वस्तुस्थिती असेल ती पाहून आजच्या आज निर्णय घेण्यात येईल.

माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी त्यांचा दुसरा औचित्याचा मुद्दा मांडावा.

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आज सकाळी 7.00 ते 8.00 वाजण्याच्या सुमारास नागपूर कारागृहामधून मोक्का कायद्यांतर्गत अटकेत असलेले 5 कैदी पळून गेले आहेत. या आरोपींवर कमीत कमी 20 ते 25 गुन्हे दाखल आहेत. जे 5 कैदी पळून गेले त्यापैकी 3 कैद्यांवर राज्य सरकारने मोक्का कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याच नागपूरच्या कारागृहामध्ये 1993 च्या बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपी याकूब मेमन, हिमायत बेग, कुख्यात अरुण गवळी आदी कडेकोट बंदोबस्तात अटकेत असताना हे 5 आरोपी गज तोडून पळून गेले. नागपूरसारख्या मुख्यमंत्र्यांच्या गावातील कारागृहातून आरोपींनी पलायन करणे यामुळे कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अनेक कुविख्यात कैदी या कारागृहात बंदिस्त आहेत. त्यातील 5 कैदी पळून जातात ही गंभीर बाब आहे. मी औचित्याच्या माध्यमातून ही बाब उपस्थित करीत आहे. कालच नागपूरमध्ये एक घटना घडली. एका तडीपार गुंडाने एका मुलीला नग्न करुन मारहाण केली ही अतिशय गंभीर बाब कायदा व सुव्यवस्थेशी निगडित आहे. या संदर्भात सरकारकडून निवेदन करण्यात येईल अशी अपेक्षा आहे.

**सभापती** : शासनाने या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, नोंद घेतली आहे.

-------

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी आपले आभार मानते. राज्य सरकारने वन हक्क संरक्षण कायद्यांतर्गत आदिवासी भागातील ग्रामपंचायतींना हक्क द्यावेत याबद्दल मी विनंती केली आहे. शासनाकडून त्याबद्दलची अधिसूचना आणि जीआर काढण्यात आला आहे. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभाग, वन विभाग व आदिवासी विकास विभागाची एकत्रित बैठक होण्याची गरज आहे. बजेटमध्ये त्रिस्तरीय सहकारी संस्था तयार करुन त्याची रचना कशी असावी याबद्दल निर्णय घेणे आवश्यक आहे. मी आपले मन:पूर्वक आभार मानते. आपण आपल्या दालनामध्ये संबंधितांची बैठक बोलावली. परंतु विदर्भ विकास मंच आणि आदिवासींच्या प्रश्नावर राज्यभर काम करणा-या संघटनांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी. आदिवासींबाबत त्यांचे अनुभव काय आहेत, त्यांना येणाऱ्या अडचणीबाबत सरकारने स्वत: बैठक घेऊन पाठपुरावा करावा. महसूल विभागाकडून काही अडचणी येतात. या संदर्भात सरकारने लक्ष घालावे. आपल्या दालनातील बैठकीमध्ये जो निर्णय होईल त्याबाबत संबंधित मंत्री सहकार्य देतील. त्याबाबत पाठपुरावा आणि अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा आहे. माझी विनंती आहे की, आपण महिलांच्या संदर्भात सातत्याने वेगवेगळे निर्देश दिलेले आहेत.

सभापती महोदय, आज नगर जिल्हयामध्ये एक घटना घडली आहे. त्यावर शासनाकडून निवेदन केले जाईल. मी संबंधित महिलेशी बोलले असून तिने सांगितले की, सोनई पोलीस ठाण्यामध्ये तक्रार करुनही दुर्लक्ष केले गेले. मी स्वत: एस.पी.ना विनंती केली की, समुपदेशन सेवा तिला उपलब्ध करुन द्यावी. नगरच्या घटनेमध्ये आरोपी पकडले जातील असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले असून आमची अपेक्षा आहे की, त्या महिलेचे समुपदेशन होणे आणि सोनई पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी मूळ तक्रारीकडे दुर्लक्ष केले त्याबद्दल सरकारने त्यांच्याव कारवाई करावी.

**सभापती** : शासनाने नोंद घ्यावी.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचा सन 2011-2013 या कालावधीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

श्री.प्रवीण पोटे-पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : खर्चाचा तपश्‍ील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

---------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज दिनांक 31 मार्च, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या, त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "मुरबाड तालुक्यातील मौजे वैशाखरे, जि.ठाणे येथील जय भवानी स्टोन क्रशरवर दिनांक 26 मार्च, 2015 रोजी तहसीलदार मुरबाड यांनी टाकलेल्या धाडीत जिलेटीनच्या कांडया जप्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "राज्यातील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहातील सोलर वॉटर हिटर व बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी करावयाची उपाययोजना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री प्रकाश बिनसाळे, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री हेमंत टकले, किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर "दिनांक 30 मार्च, 2015 रोजी मुंबई महापालिकेच्या महापौर यांनी नगरसेवकांकडून टक्केवारी घेऊन निधी वाटप केल्याची घटना स्टींग ऑपरेशनद्वारे दूरदर्शनच्या सर्व मराठी वाहिन्यांवर प्रसारित करण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दीपक साळुंखे यांनी "रमाई आवास योजनेसाठी सोलापूर महानगरपालिकेने मंजूर केलेला 48 कोटी रुपयांचा निधी किरकोळ त्रुटीमुळे पात्र लाभार्थ्यांना मंजूर करण्यास दिरंगाई केल्यामुळे अखर्चित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "गेवराई (जि.बीड) येथे सन 2008 मध्ये मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात अनेक गैरसोयीमुळे विद्यार्थीनींच्या शिक्षणाचा निर्माण झालेला प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव........

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "मराठवाड्यातील सुखना नदीपात्रातील वीटभट्टया हटविण्याचे आदेश न्यायालयाने देऊनही वीटभट्टया हटविण्यात न येणे तसेच नदीपात्रात शेतकऱ्यांनी शेतीच्या माध्यमातून अतिक्रमण केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "राज्यातील शासकीय तंत्रशिक्षण महाविद्यालयामध्ये इंग्रजी अधिव्याख्याता पदासाठी लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या 87 अधिव्याख्यात्यांना अद्याप शासकीय नोकरीत सामावून न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "राजेगाव, ता.नेवासे, जि.अहमदनगर येथे हरिनाम सप्ताहासाठी जमलेल्या वर्गणीचा हिशोब मागण्यात आल्याने सरपंच व त्याच्या साथीदारांनी दिनांक 30 मार्च, 2105 रोजी संबंधित ग्रामस्थाला मारहाण करुन त्याच्या पत्नीवर सामुहिक बलात्कार केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "मौजे खंडाळा, ता.नरखेड, जि.नागपूर येथील सर्व्हे नं.55/1 व 130 मध्ये उपविभागीय अधिकारी, काटोल यांनी स्वतःच्या अधिकारात नियमापेक्षा हजारो ब्रास जादा उत्खनन करुन त्याची रॉयल्टी न भरणाऱ्या मे.मिडलँड स्टोन कंपनीचे श्री.संतोषकुमार यादुका यांच्याशी केलेली हातमिळवणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव.......

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी "मुंबईसह राज्यातील एमबीए आणि एमएमएसच्या प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने दिनांक 28 व 29 मार्च, 2015 रोजी घेतलेल्या ऑनलाईन सीईटी परीक्षेदरम्यान निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "अन्न सुरक्षा कायद्यान्वये फूड सेफ्टी ॲण्ड रेग्युलेशन्स अंतर्गत कार्बाईड गॅसने पिकवलेली फळे विकण्यास प्रतिबंध असतानाही सदर विक्रेते फळांच्या वाढीसाठी रासायनिक पदार्थांचा वापर करीत असून नागरिकांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी "मंडणगड तालुक्यात (जि.रत्नागिरी) प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाळू माफिया अवैध रेतीचा उपसा करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : पालघर जिल्हयातील डहाणू व जव्हार तालुक्यात
रॉकेल व धान्याचा होत असलेला काळाबाजार
याबाबत श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गिरीष बापट (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर एक्स.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, मी आदिवासी भागातील प्रश्न उपस्थित केला आहे.हजारो आदिवासी वीट भट्टीवर काम करण्यासाठी आपले गाव सोडून जातात त्यामुळे अनेक गावे रिकामी झालेली असतात. तरी देखील तेथे जेवढा रॉकेलचा कोटा असतो तेवढा तो उचलला जातो व नसलेल्या लोकांच्या नावाने खर्च केला जातो. त्याची चौकशी करण्यात येणार आहे काय ? अनेक रेशनिंग दुकानदारांना त्यांच्या कोट्या पेक्षा जास्त शिधा दिला जातो, तर काही ठिकाणी कमी दिला जातो. ही जी तफावत आहे ती आपण दूर करावी. अनेक ठिकाणी नसलेल्या व्यक्तींच्या नावाने रेशन कार्ड तयार करून ती दुकानात नोंदविली जातात. त्यांच्या नावाने दुकानदार बीपीएल, अंत्योदय योजनेचा कोटा घेतात व ते धान्य काळ्या बाजारात बिकले जाते. मला एखादीच अशी केस सापडली आहे. खरे म्हणजे हा व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असतो. तेव्हा अशा प्रकरणांची शासनामार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांनी रेशनिंग दुकानासंबंधी प्रश्न विचारलेला आहे. रेशनिंग दुकानांची वारंवार तपासणी करण्यात येते. आदिवासी हे वेगवेगळ्या भागात कामाला जातात असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. आम्ही दुकानांची तपासणी केली असून ज्या दुकानात जास्त माल सापडला आहे त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम सुरूआहे. केरोसिनच्या संदर्भात एक अडचण आहे. केंद्र शासनाकडून केरोसिनचा येणारा कोटा खूप कमी येत आहे. यासंबंधात मी स्वत: दिल्लीला जाऊन केंद्रीय मंत्र्यांशी बोललो आहे. तो कोटा आता तरी वाढविण्याची शक्यता कमी वाटते. तरी देखील प्रयत्न सुरू आहे. काही आदिवासींकडे रेशन कार्ड नसल्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे. रेशनकार्डसाठी ज्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते ती न झाल्यामुळे त्यांना रेशनकार्ड मिळालेले नाही. आता आम्ही 15 एप्रिल रोजी, सुटीच्या दिवशी आदिवासी विभागांमध्ये खात्याच्यावतीने कॅम्प आयोजित करून आदिवासींना रेशनकार्ड देण्याचा प्रयत्न करणार आहोत. ज्यांनी जादा रेशकार्ड ठेवली आहेत, त्यांचे लायसेन्स रद्द करण्यात येईल.

..........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 43 बाबत.**

**तालिका सभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 43 मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित आहे. आता सभागृहात माननीय मंत्री नसल्यामुळे सदर निवेदन नंतर घेण्यात येईल.

श्री.जगन्नाथ शिंदे : ठीक आहे.

.......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता पर्यंत 125 पर्यंत नियम 93 च्या सूचना झालेल्या असून 100 निवेदने येणे बाकी आहे. पुढील एक आठवडाच आपले कामकाज आहे. तेव्हा सोमवार पर्यंत सगळी निवेदने येण्यासंबंधी आपण आदेश द्यावेत.

**तालिका सभापती :** यासंबंधात संसदीय कार्यमंत्र्यांशी आपली चर्चा देखील झालेली आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, अधिवेशन संपण्याच्या आधी नियम 93 च्या सूचनेवरील सर्व निवेदने येतील. काही माहिती ही जुनी आहे आणि सूचनांची संख्या देखील जास्त आहे. पुढच्या आठवड्यामध्ये निवेदने वितरित करण्यात येतील.

**तालिका सभापती :** ठीक आहे.

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पी.एच.डी.धारक अधिव्याख्यात्यांना नेटसूट मधून सूट न मिळणे तसेच सुधारित वेतनश्रेणी लागू न करणे

**मु.शी.** : पी.एच.डी.धारक अधिव्याख्यात्यांना नेटसूट मधून सूट न मिळणे तसेच सुधारित वेतनश्रेणी लागू न करणे यासंबंधी सर्वश्री श्रीकांत देशपांडे,दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.श्रीकांत देशपांडे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यामध्ये सन 2000 पर्यंत पी.एच.डी. धारकांचा प्रबंध तत्सम विद्यापीठामध्ये समाविष्ट असणे, यु.जी.सी.कडून नेटसेटमधून सवलत देण्याविषयी धोरण असणे, तशाच स्वरुपाचा शासन निर्णय दिनांक 31 जुलै, 2012 रोजी होणे, डिसेंबर, 2002 पूर्वी पी.एच.डी.प्रबंध सादर केलेल्या अधिव्याख्यात्यांना नेटसेटमधून सूट / सवलत देण्याचे धोरण असणे, अशाप्रकारचे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागास दिनांक 3 एप्रिल, 2003 रोजी प्राप्त होणे, त्यावर अद्यापपर्यंत राज्य शासनाने कार्यवाही न करणे, राज्यामध्ये व अमरावती विभागातील अधिव्याख्यात्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनास निवेदने देवून सुध्दा नेटसेटमधून सूट व मूळ वेतनात सुधारणा न करता अद्यापपर्यंत त्यांना त्यांच्या सुधारित वेतन श्रेणीचा लाभ न मिळणे, त्यामुळे अमरावती विभागातील अधिव्याख्यात्यांमध्ये शासनाविषयी पसरलेला प्रचंड असंतोष, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.विनोद तावडे (शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.श्रीकांत देशपांडे : सभापती महोदय, अमरावती विद्यापीठात हा प्रश्न फार भेडसावत आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याते यांनी आपला प्रबंध 2000 पूर्वी डॉक्टरेटकरिता सादर केला. त्यांना अजूनही नेटसेट मधून सूट मिळालेली नाही. तसे माझे लेखी उत्तराने समाधान झालेले आहे. 2000 पूर्वी ज्यांनी प्रबंध दिले आहेत त्यांना नेटसेट मधून सूट दिली असल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. तरी देखील अमरावती विद्यापीठात 950 असे प्राध्यापक आहेत की, ज्यांना नेटसेट मधून सूट मिळालेली नाही. त्यामुळे माझा थेट प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री त्यांच्या दालनात 30 एप्रिल पूर्वी बैठक आयोजित करून अमरावती विद्यापीठातील अधिव्याख्यात्यांचा हा प्रश्न सोडविणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दिलेली माहिती खरी मानून कार्यवाही केली जाईल. माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे लगेचच बैठकीचे आयोजन करण्यात येईल. दिनांक 30 एप्रिलच्या आत बैठक आयोजित करून हा विषय मार्गी काढला जाईल.

......

....7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई येथील मजासवाडी मधील सर्वोदयनगर मधील सोसायट्यांनी महासंघ स्थापन करून अधिकार नसतानाही पुनर्विकासासाठी सुरू केलेला प्रयत्न

**मु.शी.** : मुंबई येथील मजासवाडी मधील सर्वोदयनगर मधील सोसायट्यांनी महासंघ स्थापन करून अधिकार नसतानाही पुनर्विकासासाठी सुरू केलेला प्रयत्न यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई येथील मजासवाडीमधील सर्वोदयनगर सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये 579 रहिवासी सभासद असणे, सन 2002-2003 मध्ये गणेश उत्सव साजरा करणाऱ्या लोकांनी या 22 सोसायटींचा महासंघ तयार करणे, या महासंघाच्या माध्यमातून त्यांना काही अधिकार नसताना पुनर्विकास करणे, पुरेशी उपस्थिती नसतानाही ठराव मंजूर करुन घेणे, सन 2002-2003 पासून आजपर्यंत वारंवार पत्रे देवूनही पदाधिकारी निवडून देण्याबाबतची कार्यवाही न करणे, मजासवाडी सर्वोदय नगर बचाव समितीमध्ये असणाऱ्या 74 रहिवाशांना PIL तर्फे नोटीस बजावणे व आवश्यक 70% संख्याबल करण्याबाबत PIL वापर करण्याची नोटीस देवून पोलीस बंदोबस्तात घरे खाली करुन घेणे, परंतु प्रकल्पग्रस्तांना तात्पूरते निवासस्थान व त्यांना देय असलेल्या रक्कमा न देणे, काहींना एसआरए / एमएमआरडीएचे गाळे न देणे, सदर प्रकरणी चौकशी करुन गृहनिर्माण सोसायटीतील सर्व सदस्यांना घरे मिळण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रवींद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...9

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना मजासवाडीमधील सर्वोदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थासंबंधात आहेत. येथे एकूण 579 रहिवासी सभासद असून 22 सोसायट्या आहेत. 1980 साली 88 चाळी इकॉनॉमिकल विकर सेक्शन, एल.आय.जी., एम.आय.जी.साठी बांधण्यात आल्या होत्या. म्हाड्याने या चाळी जवळ जवळ 13 एकरजमिनीवर बांधल्या होत्या. ही सर्व बैठी घरे होती. येथील लोकांनी म्हाडाकडे रितसर पैसे भरलेले आहेत. या सोसायटीमधील सभासद हे कायदेशीर नाहीत. शिवजयंती उत्सव, गणेश जयंतीच्या माध्यमातून पुढे आलेल्या लोकांना सोसायटीचे सभासद म्हणून दाखविण्यात आलेले आहे व त्यांची पुनर्विकासासाठी संमती घेण्यात आली आहे. येथे जे मूळ रहिवासी होते त्यांना बेघर करण्यात आले आहे. ज्यांना पुनर्वसनाची घरे द्यायला पाहिजे होती ती त्यांना दिलेली नाहीत. 95 अ ची नोटीस देऊन 73 जणांची जबरदस्तीने घरे तोडण्यात आली आहेत. या लोकांनी डेव्हलपमेंटला विरोध केला होता. त्यांनी म्हाडाला दिनांक 20.4.2012 रोजी पत्र दिले होते की, आम्हाला अशी जबदरस्तीची डेव्हलपमेंट नको. ती आपण ताबडतोब रद्द करावी. परंतु, ती रद्द केली नाही. जे.पी.इन्फ्रा या डेव्हलपरने 930 चौ.फू.इतकी जागा देण्याचे कबूल केले होते. परंतु, त्याने कुठल्याही फरकाचे ॲग्रीमेंट न करता त्यावर व्हाईट इंक लावून 730 चौ.फू.इतकी जागा देण्याचे मान्य केले आहे. यात गडबड घोटाळा आहे. यात लोकांची फसवूणक झालेली आहे. त्यामुळे जबरदस्तीने जी डेव्हलपमेंट केली जात आहे ती तातडीने रद्द करण्यात यावी अशी मागणी तेथील लोकांनी केली आहे. श्री.देऊळकर नावाचे म्हाडातील कुप्रसिद्ध दलाल आहेत. ते यात सर्वेसर्वा आहेत असे भासवतात. 95 अ ची नोटीस देऊन लोकांना बेघर करण्यात आले आहेत. यातील अनेक लोकांवर रस्त्यावर राहण्याची पाळी आलेली आहे. त्यांना भाडेही दिले जात नाही. त्यांना एसआरएचे घर दिलेले आहे. तेव्हा ही कारवाई आपण बेकायदेशीर ठरविणार आहात काय ?

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रविंद्र वायकर :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे 1980 साली म्हाडाच्या माध्यमातून अल्प उत्पन्न गटातील लोकांना त्या ठिकाणी घरे उपलब्ध करुन देण्यात आली होती. या ठिकाणी एकंदर 22 सोसायटया आहेत. या 22 सोसायटयाच्या माध्यमातून त्यांनी महासंघ स्थापन केला होता व त्या ठिकाणी बाकीच्या सोसायटयामध्ये होतात त्याप्रमाणे उत्सही साजरे होत होते. सन 2009 मध्ये झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून या ठिकाणी विकास करावयाचा होता. एकंदरीत 22 सोसायटयांपैकी 3 सोसायटया वगळता 19 सोसायटया एकत्र आल्या. 19 सोसायटीतील 579 कुटुंब या योजनेत सामील झाली होती व त्यामध्ये एकंदर 90 लोकांनी या योजनेसाठी सहमती दिली होती. 90 टक्के लोकांनी संमती दिल्यामुळे विकासक त्या ठिकाणी आला. परंतु 579 लोकांपैकी 103 लोकांनी सदर विकासक नको म्हणून असहमती दर्शवली. यातील एकंदर 534 लोकांनी म्हणजे 92.22 टक्के लोकांनी संमती दिल्यामुळे प्रस्ताव दाखल केला गेला.

**तालिका सभापती** (श्री. प्रकाश बिनसाळे ) : सन्माननीय मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेचे उत्तर देतांना एसआरएचा उल्लेख केला आहे. त्यामुळे एसआरएच्या ऐवजी "म्हाडाच्या माध्यमातून" असा उल्लेख करावा.

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, म्हाडाच्या माध्यमातून म्हाडाच्या जागेवर 33/5 अंतर्गत सदर योजना सुरु असून प्रत्यक्षात जागेवर 155 लोक आहेत. त्यामुळे कायदेशीर रित्या बाबींचा अवलंब करुन या ठिकाणी योजना राबवली जात आहे.या ठिकाणी आतापर्यंत चार माळयाचे बांधकाम देखील झालेले आहे. राहिलेल्या 72 लोकांनी पैसे भरले असून यामध्ये 3 सोसायटयांनी सहभाग घेतलेला नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघातीलच हा प्रश्न आहे. येथील नागरिकांशी माझा आणि माननीय मंत्री महोदयांचाही संबंध आहे. सुरुवातीला त्या ठिकाणी 92 टक्के लोकांची संमती होती परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आताच्या घडीला त्या ठिकाणी 3 सोसायटया वगळून त्या ठिकाणी सर्वोदय नगर बचाव समिती गठीत केलेली आहे. 92 टक्के लोकांचा यामध्ये सहभाग असता तर सर्वोदय बचाव समितीचा प्रश्नच आला नसता.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ......

यामध्ये एसआरएचा काही एक संबंध नाही. एसआरएमध्ये फायदा जास्त होता म्हणून सुरुवातीला ही योजना एसआरएमध्ये ढकलण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळेला अत्यल्प, अल्प आणि मध्यम या घटकांसाठी 13 एकरावर या ठिकाणी घरे बांधण्यात आली होती. हा भुखंड मोठा असल्यामुळे काही लोकांनी यामध्ये आपल्या स्वार्थासाठी दबावतंत्राचा वापर सुध्दा केला होता. परंतु या दबावतंत्राला झुगारुन सर्वोदय बचास समिती गठीत करण्यात आली. या समितीने म्हाडाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. यासंदर्भात म्हाडाने केवळ सुनावणी करण्याचे नाटक केले होते. सर्वोदय बचाव समितीने आम्हाला हा विकासक मंजूर नसल्याचे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. मंत्री महोदयांकडे योगायोगाने गृहनिर्माण विभागाचे राज्यमंत्री पद आले आहे. या ठिकाणी सर्वोदय बचाव समिती आपल्या अस्तित्वासाठी आणि हक्कासाठी भांडत आहे. या समितीच्या विरोधात निर्णय गेल्यामुळे ही समिती कोर्टात गेली. माझा यासंदर्भात स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या सर्व प्रकरणात मंत्री महोदयोंनी स्वत: जातीने लक्ष घालून सर्वोदय बचाव समितीच्या प्रमुखांना तसेच माझ्या सारखया, श्रीमती विद्याताई चव्हाणांसारख्यांना बोलावून या प्रकरणाची शहानिशा केली जाईल काय ? उत्तरात सांगितल्या प्रमाणे कलम 146 प्रमाणे गुन्हा नोंदविण्याकामी परवानगी प्रस्ताव सादर करुन परवानगी घेणे आवश्यक असल्याचे कळवले आहे. 146 प्रमाणे गुन्हा नोंदविण्याची परवानगी म्हाडाकडून मिळावयास पाहिजे ती परवानगी आपण द्यावयास लावणार आहात काय ?

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, या वस्तीची मला जेवढी माहिती आहे तेवढीच माहिती सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनाही आहे. या ठिकाणच्या लोकांना घरकुल मिळाले पाहिजे यासंदर्भातील हा प्रश्न आहे. यासंदर्भात लोकांचे जे काही वाद असतील ते दूर करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या प्रमाणे सर्वोदय बचाव समितीचे म्हणणे ऐकले जाईल तसेच या बैठकीमध्ये आपल्याला देखील बोलावले जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सर्वोदय बचाव समितीला बोलावले जाणार असून ही समिती कोर्टात गेली आहे. 146 अन्वये परवानगी घेण्याची बाब म्हाडाने या लोकांना कळवलेली आहे. त्यामुळे यासंदर्भातील बैठक अधिवेशन संपण्याच्या आत घेतली जाईल काय ?

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, सदर केस ही सहकार कोर्टात असून मंत्रालय किंवा विधान मंडळाच्या दालनात अधिवेशन संपण्याच्या आत बैठक घेण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी विचारणा केली होती की, विकासकाने करार करताना विकासकाने रहिवाश्यांना किती चौरस फुटाचे घर देणे बंधनकारक होते, यामध्ये काही फेरफार झाल्याबाबत शासनाने काही चौकशी केली आहे काय ? या ठिकाणच्या रहिवाश्यांना एकंदर किती चौरस फुटाचे घर मिळणार आहे ?

श्री. रविंद्र वायकर : सभापती महोदय, सुरवातीला घराच्या संदर्भात प्रिमियम भरावयाचा होता. प्रिमियमच्या संदर्भात विकासकाबरोबर जो करार करण्यात आला होता तो 650 चौ.फूट कारपेट प्लस फन्जीबल एरियातील 100 चौ.फूट असा मिळून 750 चौ.फूटाचा करार व 4 लाख् रुपये इन्स्टेन्टीव्ह अशा पध्दतीचा करार त्यावेळी झाला होता.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण येथे उत्तर देताना स्वेअरफुटाचा उल्लेख करीत आहात तो कायद्याच्या बाहेर आहे. आपणास स्वेअर मीटरमध्ये उल्लेख करावा लागेल. कारण आपण कायद्यामध्ये स्वेअरफीट मानत नाही. आपणच कायदे करतो आणि आपणच त्याचे पालन करणार नाही तर ते योग्य नाही याची आपण दक्षता घ्यावी.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जे.पी. इन्फ्राने 930 स्वे.फू.जागा देतो असे सांगितल्यावर 90 टक्के रहिवाशांनी त्यास परवानगी दिली होती हे खरे आहे काय, त्यानंतर त्यांना 750 स्वे.फूट जागा देण्याचे सांगितल्यावर त्यांनी त्यास नकार देऊन बचाव समिती नेमली, हे खरे आहे काय, या ठिकाण्ी सांगण्यात आले की, एकूण 73 सभासदांपैकी 71 सभासदांनी भाडे स्वीकारलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे तसे झालेले नाही. जर त्यांनी ते भाडे स्वीकारले नसेल तर ती जबाबदारी शासन म्हणून आपण घेणार काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, तेथील रहिवाशांचा 930 स्वे.मी.चा करार होता की 750 स्वे.मी.चा करार होता, त्यांनी शाई लावली होती का हे कोणी पहावयास गेले नव्हते. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे या संदर्भात बैठक घेण्यात येईल. त्यावेळी ती सर्व कागदपत्रे मागविण्यात येतील, त्यावरुन आपणास माहिती मिळू शकेल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी दिलेली माहिती सभागृहाची दिशाभूल करणारी आहे. तेथील रहिवाशांना जे ॲग्रीमेंट दिले होते त्याचे अजूनपर्यंत रजिस्ट्रेशन झालेले नाही. तेथील लोकांचा डेव्हलपमेंटला विरोध नाही. पहिली गोष्ट म्हणजे ही एसआरएची योजना नाही. ही म्हाडाची ओनरशीप असलेली बिल्डींग आहे आणि त्यांना झोपडपट्टीतील रहिवाशांप्रमाणे ट्रीटमेंट देण्यात येत आहे. त्या रहिवाशांना 13 एकरामध्ये घरे बांधून दिली असतील तर ट्रान्झीट कॅम्पचा प्रश्न सुटला असता. परंतु अमृतसरहून एक माणसू येऊन तो उच्च न्यायालयात पीआयएल दाखल करतो. विकासकाची मिलीभगत कशी असते याचे हे ढळढळीत उदाहरण आहे. त्या व्यक्तीने पीआयएल दाखल करुन या लोकांनी कशाप्रकारे अनधिकृत बांधकाम

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण.....

केलेले आहे त्याचे फोटो दाखविले. तेथील लोकांना म्हाडाने जागा दिलेली आहे. त्या ठिकाणी काही लोकांनी गॅलरी वाढविली आहे किंवा मजला वाढविला आहे आणि हे झोपडपट्टीधारक अगदी सहज करतात. त्या व्यक्तीने उच्च न्यायालयात असे फोटो दाखवून ते बांधकाम पाडण्याबाबत सांगत आहे. आपण पुनर्वसनामध्ये सामील झाला नाही तर तुमची घरे पाडून टाकण्यात येतील अशी भीती तेथील लोकांना दाखविण्यात येत आहे. असे प्रकार करुन तेथील लोकांची संमती मिळवली आहे. आताचे माननीय राज्यमंत्री हे त्यावेळी आमदार होते. त्यांच्या लेटरहेटवर 95 (अ) प्रमाणे तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. तेथील लोकांचे दुर्भाग्य असे की, आता ते राज्यमंत्री आहेत. त्यामुळे तेथील लोकांची वाचा बंद होणार आहे. श्री.रवींद्र वायकर हे आमदार असताना त्यांनी लेटरहेडवर तेथील लोकांचे निष्कासन करावे असे आदेश दिलेले होते. त्यामुळे आता मंत्री महोदयाकडून न्याय मिळणार नाही असे तेथील लोकांना वाटत आहे. तेव्हा हे प्रकरण गृह निर्माण मंत्री महोदयांकडे द्यावे. सुरुवातीला या रहिवाशांना 950 स्वे.फूट घर देण्यात येईल असे सांगण्यात आले होते. आता त्या ॲग्रीमेंटवर व्हाईट इंक लावून खाडाखोड करण्यात आलेली आहे. ही सर्व मराठी माणसे आहेत. त्यांची म्हाडाची ओनरशीपचे घरे आहेत. त्यांच्यावर फार मोठा अन्याय झालेला आहे. माझा प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय गृह निर्माण मंत्र्यांकडे हे प्रकरण सोपविण्यात येईल काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, ज्यावेळी हे ॲग्रीमेंट झाले त्यावेळी आघाडी सरकार सत्तेवर होते. त्यावेळी आपलेच मंत्री होते. आपण देखील त्यांच्याकडे तक्रार केली होती. मी त्या भागातून चार वेळा नगरसेवक आणि दोन वेळा आमदार असा सहा वेळा निवडून आलो आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे मी बैठक लावण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. त्या बैठकीत आपणास आपली मते मांडता येतील. त्या बैठकीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. कोणावरही अन्याय केला जाणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला या प्रश्नाला राजकीय स्वरुप द्यायचे नव्हते म्हणून मी सुरुवातीलाच सांगितले होते की, हा प्रश्न निकालात निघणे गरजेचे आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांच्या मतदारसंघातील हा प्रश्न आहे आणि त्यांच्याशी संबंधित असल्यामुळे जी बैठक होणार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

आहे ती माननीय मुख्यमंत्री यांचे सोबत किंवा गृह निर्माण मंत्र्यांसोबत व्हावी कारण सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी व्यक्त केलेली भीती खरी आहे. मला त्यास राजकीय स्वरुप द्यायचे नव्हते. परंतु माननीय मंत्री महोदयांनी तुमच्या मंत्र्यांकडे मिटींग झाली असे जे सांगितले ते त्यांच्याकडून अपेक्षित नव्हते. आज ते स्वत: मंत्री आहेत आणि त्यांचा सन्मान राखून बोलण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. तेव्हा माननीय मुख्यमंत्री किंवा गृह निर्माण मंत्री यांचे सोबत बैठक घ्यावी जेणेकरुन तेथील लोकांना आपली बाजू मांडता येईल. तेव्हा त्याप्रमाणे मंत्री महोदय निर्णय घेतील काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये कोणत्याही मंत्री महोदयांवर अशाप्रकारे संशय किंवा अविश्वास दाखविता येणार नाही. माननीय राज्यमंत्री अतिशय सकारात्मक उत्तरे देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी जे जे प्रश्न विचारले त्या प्रश्नांची उत्तरे राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आहेत. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी यामध्ये थोडेसे राजकारण आणले. तेव्हा त्यांनी राजकीय उत्तर देण्याचा प्रयत्न केला. परंतु कॅबिनेट मंत्र्यांनी मिटींग घेतली पाहिजे अशी त्यांची मागणी मान्य होणार नाही.

**तालिका सभापती** : यामध्ये एक गोष्ट स्पष्ट आहे की, मंत्री महोदयांच्या विभागातील हा प्रश्न आहे. त्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घातलेले आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून अशा पद्धतीचा संशय येतो याचा अर्थ त्यांच्यावर संशय आहे असा नाही. न्यायाच्या दृष्टीने ही बैठक कॅबिनेट मंत्री महोदयांकडे झाली तर ती जास्त योग्य होईल. त्या बैठकीमध्ये राज्यमंत्री देखील उपस्थित राहू शकतील कारण ते त्या विभागाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत. तेव्हा मला वाटते की, कॅबिनेट मंत्री महोदयांच्या दालनात बैठक घेऊन त्या बैठकीस राज्यमंत्र्यांनी उपस्थित रहावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा राज्यमंत्री महोदयांवर अन्याय होईल. ही वेगळी प्रथा पडेल.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : मी सुरुवातीलाच सांगितले की, राज्यमंत्री महोदयांवर कोणत्याही प्रकारचे अविश्वासाचे वातावरण नाही. हा प्रश्न त्यांच्या मतदारसंघातील आहे. त्यांच्यावर कोणीही बोट दाखवू नये आणि त्यांना प्रोटेक्ट करण्यासाठी मी हे सांगत आहे. आपण ही बैठक कॅबिनेट मंत्री महोदयांबरोबर घेतल्यास ते ही प्रोटेक्ट राहतील आणि त्यांच्यावर कोणी आरोप करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपल्या भागातील लोकांना न्याय मिळवून देण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

**तालिका सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, राज्यमंत्री महोदयांवर कोणताही आक्षेप येऊ नये म्हणून मी हे निर्देश दिलेले आहेत. ते त्या विभागाचे प्रतिनिधीत्व करीत असल्यामुळे त्यांच्यावर कोणी बोट दाखवू नये म्हणून हे निर्देश दिलेले आहेत. ही बैठक कॅबिनेट मंत्री महोदयांकडे घेण्यास राज्यमंत्री महोदयांची काही हरकत असेल असे मला वाटत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांवर अविश्वास हा नंतरचा भाग आला. या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री महोदयांनी काही वक्तव्ये केली. तो त्यांचा अधिकार आहे. आम्ही त्यांच्या अधिकारामध्ये ढवळाढवळ करणार नाही. परंतु आपण वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. तेथील लोकांच्या विरोधामध्ये याच आमदारांचे पत्र आहे म्हणून आम्हाला शंका आहे. मला त्याचा उल्लेख करायचा नव्हता आणि आजही तो उद्देश नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

या ठिकाणी कॅबिनेट मंत्री आलेले आहेत. या ठिकाणी त्यांनी जो दावा केला आहे त्यातून फुटून ती समिती निर्माण झालेली आहे. हा भाग माननीय गृह निर्माण राज्यमंत्र्यांचा मतदारसंघ आहे. त्यांना न्याय मिळण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. या बैठकीला माननीय राज्यमंत्र्यांनी यावे. माननीय मंत्री या ठिकाणी आलेले आहेत. त्यामुळे या संदर्भातील बैठक माननीय मंत्र्यांनी त्यांच्या दालनात लावली तर या विषयी न्याय मिळेल अशी आमची विनंती आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मजासवाडीच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व श्रीमती विद्या चव्हाण यांना सांगू इच्छितो की, माननीय श्री.रवींद्र वायकर हे शासनाचे राज्यमंत्री या नात्याने जबाबदारीने बोलत आहेत. त्यांनी या विषयी बैठक घेण्यास सांगितले आहे. त्या बैठकीत जर त्यांनी अन्यायाची भूमिका घेतली तर आपण मंडळी त्या बाबत राजकीयरित्या मत मांडू शकता. परंतु सभागृह सुरु असताना राज्याचे माननीय राज्यमंत्री या विषयी सर्वांना विश्वासात घेऊन पुढे जात आहेत. माननीय राज्यमंत्री या विषयी पारदर्शकपणे पुढे जात असतील तर त्यांच्यावर किंवा राज्य व्यवस्थेवर संशय घेणे योग्य होणार नाही. वास्तविक पाहता आपण अशाप्रकारे मंत्र्यांवरील उल्लेख टाळत असतो. सन्माननीय सदस्यांची वक्तव्ये घटनेच्या दृष्टीने सभागृहाच्या रेकॉर्डवर राहणे बरोबर नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी वारंवार सांगितले की, या संदर्भात रहिवाशांसह सन्माननीय सदस्यांची संयुक्त बैठक घेण्यात येईल. या बैठकीबाबत संयुक्त पत्रक काढण्यात येईल. या विषयी संयुक्त मत तयार झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्यानंतर सुध्दा दुसऱ्या प्रकारची मागणी करणे योग्य होणार नाही. त्या बैठकीला माननीय राज्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण आणि तालिका सभापती महोदय, आपली इच्छा असेल तर आपणही त्या बैठकीला यावे. त्या बैठकीत सर्वसंमतीने जे काही ठरविण्यात येईल त्यामागे राज्य सरकार ठामपणे उभे राहील किंवा या विषयाला न्याय देण्यात येईल.

श्री.भाई जगताप : महोदय, काही गोष्टी रेकॉर्डवर चुकीच्या राहता कामा नयेत. मी माननीय राज्यमंत्र्यांवर हेत्वारोप केलेले नाहीत किंवा या विषयामध्ये राजकारण सुध्दा अजिबात आणलेले नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी या विषयी बैठक घेण्याबाबत सांगितल्यानंतर आम्ही ते मान्य केले. पण त्याच दरम्यान माननीय राज्यमंत्र्यांनी आम्हाला उद्देशून 'तुमच्याच काळात असे झाले'

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

अशा प्रकारचे वक्तव्य केले. या विषयी राजकीय वक्तव्ये कोणी केली याच्या खोलात जाण्याची गरज नाही. कारण हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. आपण सुध्दा पाच-सहा वेळा निवडून आलेला आहात आणि मी सुध्दा विधानसभेतून येथपर्यंत आलो आहे. आमचा घटनेवर विश्वास आहे. त्यामुळे आमच्याकडून असे काही घडेल अशी आपण अपेक्षा करुच नये. या विषयाला न्याय मिळावा एवढीच आमची भूमिका आहे. या विषयी राज्यमंत्र्यांनी बैठक घेण्याचे सांगितल्यानंतर, त्यावर मी सहमती दर्शविली. परंतु माननीय राज्यमंत्र्यांनी काही वक्तव्ये केल्यामुळे हा विषय निघाला. मला वाटते या विषयी बैठक घ्यावी आणि त्यामध्ये या संदर्भातील निर्णय घ्यावा.

श्री.प्रकाश महेता : महोदय, माझी विनंती आहे की, ती वक्तव्ये रेकॉर्डवरुन काढून टाकावीत. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना या बैठकीला यायचे असेल त्यांनी यावे. त्या बैठकीत माननीय राज्यमंत्र्यांच्या नेतृत्वात आपण सर्वजण जो काही निर्णय घ्याल त्यावर राज्य सरकार ठाम राहील.

----------

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 पुढे ढकलण्यात आल्याबाबत**

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 माननीय मंत्र्यांच्या विनंतीवरुन पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

..3..

**पृ.शी.** : कराड नगरपालिका व मलकापूर नगर परिषद (जि.सातारा) या क्षेत्रातील नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होणे

**मु.शी.** : कराड नगरपालिका व मलकापूर नगर परिषद (जि.सातारा) या क्षेत्रातील नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होणे, यासंबंधी श्री.आनंदराव पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.आनंदराव पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कराड नगरपालिका व मलकापूर नगरपरिषद, ता.कराड, जि.सातारा या क्षेत्रांमधील नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या कृष्णा कोयना संगमानंतर कृष्णा नदीच्या पात्रात असलेल्या टेंभू धरणाची उंची वाढविल्यामुळे पाणी वाहून न जाता साचून राहिल्याने त्यामध्ये सांडपाणी मिसळून पाणी दूषित होणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, 2015 मध्ये केलेल्या तक्रारीद्वारे ही बाब निदर्शनास आणून देऊनही प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अद्यापही कोणतीही उपाययोजना न होणे, परिणामी काविळीची साथ पसरून रुग्णांमध्ये होत असलेली वाढ, काविळ सदृश मलेरिया, स्वाईन फ्लू, डेंग्यू असे साथीच्या आजाराचे प्रमाण वाढल्याने नागरिकांमध्ये पसरलेली भीतीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने त्वरित करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंदराव पाटील : सभापती महोदय, कराड नगरपालिका व मलकापूर नगर परिषद, ता,.कराड, जि.सातारा आणि अनेक गावांतील नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या योजना कृष्णा-कोयनेच्या पात्रात पूर्वीपासून सुरु आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने टेंभू प्रकल्प योजना सुरु केल्यापासून कराड, मलकापूर आणि अन्य परिसरातील गावांतील नळ पाणी पुरवठा योजनांतून होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत धोका निर्माण झाला आहे. कारण या प्रकल्पातील पाणी वाहून न जाता ते साचून राहिल्यामुळे त्यात सांडपाणी मिसळून ते पाणी मोठ्या प्रमाणावर दूषित होत आहे. नागरिकांचे आरोग्य हे आपल्या सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे या प्रकारावर आळा घालण्यासाठी सरकारकडून योग्य त्या उपाययोजना होणे गरजेचे आहे. महोदय, कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमावर तीर्थक्षेत्र असून हजारो लोक या पवित्र प्रीतिसंगमाला भेट देण्यासाठी येत असतात. तसेच महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांचे पवित्र समाधी स्थळ तेथे असून अनेक लोक दर्शनासाठी तेथे येतात. कराड तालुका आणि परिसरातील अनेक नागरिकांनी आणि विविध संघटनांनी या गोष्टीसाठी वारंवार मागणी व निदर्शने केली आहेत. त्या भागातील लोकांचे आरोग्य किती धोक्यात आले आहे याची जाणीव करुन दिली आहे. मी स्वतः त्या परिसरातील प्रतिनिधी असल्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात वेळोवेळी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ही बाब किती गंभीर आहे याची जाणीव सुध्दा करुन दिली आहे. तरी देखील प्रशासनाकडून योग्य निर्णय होत नाही. त्यामुळे जनतेच्या आरोग्याचा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे.

महोदय, टेंभू योजनेचे पाणी अडविले जाते. परंतु टेंभू योजनेचे काम पूर्ण न झाल्यामुळे त्या पाण्याचा उपसा होत नाही. ते पाणी साचल्यामुळे नळ पाणी पुरवठा योजनांतून त्या भागात दूषित पाणी पुरवठा होत आहे. पूर्वी वाळूंजी जवळ केटी वेअर बंधारा बांधला होता. बंधाऱ्याच्या वरच्या बाजूला कराड व मलकापूर येथील दोन्ही योजनांचा उगम आहे. वाळूंजीजवळ केटी वेअर बंधारा झाला तर भविष्यात प्रश्न निर्माण होणार नाहीत. मी विचारु इच्छितो की, हे करणे शक्य आहे काय ? नसल्यास, हे पाणी साचू न देता तेथून पाण्याचा प्रवाह सुरु झाला पाहिजे. पाणी साचून राहिल्यामुळे नळ पाणी पुरवठा योजनेतून दूषित पाणी पुरवठा होतो हे खरे आहे काय, असल्यास, याला आळा घालण्यासाठी शासनाकडून उपाययोजना करण्यात येतील काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे. टेंभू धरणाचे पाणी, त्याची वाढविलेली उंची, तेथे साठलेले पाणी, प्रवाह बंद होणे इत्यादी सर्व बाबी खऱ्या आहेत. वाई, सातारा, कराड वा मलकापूर नगरपरिषद असो, या सर्व नगरपालिकांतील सांडपाणी हे कृष्णा नदीत जाते, ही वस्तुस्थिती आहे.

महोदय, सबंध महाराष्ट्रात जवळजवळ 26 महानगरपालिका आणि 227 नगरपरिषदा आहेत. त्यांच्या माध्यमातून पाण्याचे 60 टक्के प्रदूषण होते. या नगरपरिषदांची जबाबदारी आहे की, त्यांनी स्वतःच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन शेतीला स्वच्छ पाणी पुरवावयास पाहिजे. परंतु दुर्दैवाने गेल्या 40-45 वर्षात हे घडलेले नाही. आता मी माझ्या पध्दतीने कामाला सुरुवात केली आहे. मागच्या सरकारने काही कामे चांगली केली आहेत. कराडमध्ये सांडपाणी प्रक्रियेचे जवळजवळ 50 टक्के काम झाले आहे. या कामासाठी 63 कोटी रुपये दिले असून, त्यापैकी 17 कोटी रुपये खर्च झाले आहेत. येत्या दोन महिन्यात हे काम पूर्ण होणार आहे. त्या नगरपालिकेतील रहिवाशांना येत्या दोन महिन्यात स्वच्छ पाणी मिळेल. तसेच मलकापूर नगर पंचायतीला केंद्र सरकारच्या माध्यमातून 41 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्या अंतर्गत सांडपाणी प्रक्रिया आणि सीईटीपी चे काम सुरु आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ....

परंतु त्याला अजून 8 महिने लागणार आहेत. वाई, सातारा नगरपालिकांचे सर्व पाणी कृष्णा नदीत जात आहे. 1 महिन्यात दोन्ही नगरपालिकांनी 25 टक्के निधी तातडीने राखून ठेवावा असे सांगण्यात आले आहे. मी त्यांचा प्रस्ताव स्वत: केंद्र शासनाकडे पाठवेन आणि तेथून जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल यासाठी प्रयत्न करेन. दोन्ही नगरपालिकांना केंद्र शासनाच्या माध्यमातून पैसे मिळाले आणि योजना झाली तर कृष्णा नदीत जे प्रदुषित पाणी जात आहे ते जाणार नाही. सभापती महोदय, या गोष्टी तातडीने होणार नाहीत. वाई व सातारा या 2 नगरपालिकांच्या संदर्भात 2 महिन्यात प्रोसेस झाली तर किमान आणखी एखादे वर्ष लागणार आहे. बाकीच्या 2 नगरपालिकांचे होत राहील. उद्याच्या आठवड्यामध्ये वाई, सातारा या दोन्ही नगरपालिकांचे सीओ आणि नगराध्यक्ष यांना नोटीस देऊन 1 महिन्याच्या आत 25 टक्के निधी घनकचरा व सांडपाण्यासाठी राखून ठेवला नाही तर दोघांनाही जबाबदार धरून दोघांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, दोघांना जेलमध्ये टाकण्याची व्यवस्था केली जाईल. सभापती महोदय, मी सर्व नगरपालिका, मनपाच्या सर्व सीओ व सीईओंना पत्र पाठविले आहे. 50 टक्के नगरपालिकांनी पैशाची व्यवस्था केली आहे. 50 टक्के नगरपालिकांनी काही अवधी मागितला आहे. कृष्णा नदीच्या संदर्भातच नाही तर राज्यातील संबंध बाबींच्या संदर्भात आम्ही निश्चितपणे कामाला लागलो आहोत, प्रयत्न करीत आहोत. आपल्या आशीर्वादाने व सहकार्याने यश मिळेल. मी आपल्याला सांगतो की, मी आपल्यालाही बैठकीला बोलावेन, सीईओंना बोलावून घेईन, नगराध्यक्षांना बोलावेन. आपण त्यांना 8-15 दिवसांची मुदत देऊ. कोणत्याही परिस्थिती हे प्रदूषण थांबले पाहिजे अशा पध्दतीने शासन प्रयत्न करेल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, कृष्णा नदीच्या प्रदुषणाच्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने लक्ष देण्याच्या बाबत आश्वासित केले आहे. माननीय मंत्र्यांनी उत्तरात म्हटले आहे की, उपरोक्त कृष्णा नदीच्या प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्या सर्व घटकांचे वेळोवेळी पाहणी करण्यात येते. जल प्रदूषण कायद्यान्वये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारणेबाबत वेळोवेळी स्वायत्त संस्थांना व कारखान्यांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. ज्याअर्थी या नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत त्याअर्थी आपल्या अधिकाऱ्यांना यामध्ये प्रदूषण झाले आहे असे

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले ....

निदर्शनास आल्यामुळे त्या नोटीसा दिल्या असतील. उत्तरात पुढे असेही म्हटले आहे की, तपासणी नंतर केली. दीर्घ कालावधीमध्ये नैसर्गिकरित्या पाणी शुध्द होण्याची प्रक्रिया मंदाविलेली आहे. त्यामध्ये कोणतेही रासायनिक घटक सापडलेले नाहीत असे आपण म्हटले आहे. ज्याअर्थी आपण आगोदर नोटीसा दिल्या आहेत त्याअर्थी त्यामध्ये रासायनिक घटक निश्चित सापडले असणार. रासायनिक पध्दतीतून झालेले प्रदूषण आरोग्याला अतिशय घातक होऊ शकते. त्यामुळे या कारखान्यांच्या व्यवस्थांमध्ये अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कारण त्यातून होणारे प्रदूषण हा एकूण प्रदुषणातील मोठा हिस्सा असण्याची शक्यता आहे. नगरपालिका आणि बाकीच्या स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत त्या संदर्भात उपाययोजना होईल. परंतु कारखान्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. आपण त्यासाठी कोणत्या उपाययोजना करणार आहात ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, तेथील कारखाने रासायनिक नसून इंजिनिअरिंग आहेत. त्यामुळे त्यांचा आणि दूषित पाण्याचा काहीही संबंध नाही. कृष्णा नदीपासून ते कारखाने 2 कि.मी. अंतरावर आहेत आपण सर्व गोष्टी तपासून पाहिल्या आहेत. मी स्वतः त्याचा अहवाल घेतला आहे. काहीही संबंध नाही. 4 नगरपालिकांनी त्यांच्या पाण्यावर चांगली प्रोसेस केली तर कृष्णा नदीचे पाणी निश्चितपणे स्वच्छ मिळू शकेल.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, आपण मान्य केले आहे की, नद्यांमध्ये प्रदूषण होत आहे. हा केवळ कराडचाच प्रश्न नाही. पुणे व इतर शहरांमध्ये देखील हा प्रश्न गंभीर होत चालला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ या संदर्भातील नियंत्रण, देखरेख करते. आमचा अनुभव असा आहे की, प्रदूषण नियंत्रण मंडळ जेवढे सक्रीय असले पाहिजे तेवढे सक्रीय नाही. पर्यावरणामध्ये बिघाड झाल्यामुळे साथीचे रोग निर्माण होत आहेत. मलेरिया, फ्लू, डेंग्यूसारख्या आजारांमुळे नागरीक त्रस्त झाले आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकाऱ्यांनी कामामध्ये हलगर्जीपणा केला आहे असे लक्षात आणून दिले तर त्यांच्यावर कारवाई करणार का, मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू या संदर्भात कोणती कारवाई केली आहे ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, प्रदूषण नियंत्रण मंडळाने अतिशय चांगले काम केले आहे. कोणत्याही अडचणी नाहीत. नगरपालिकांना नोटीसा दिलेल्या आहेत. 2 नगरपालिकांचे

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ....

काम कसे चालते या संदर्भात त्यांची पाहणी सुध्दा सुरूआहे. प्रदूषण मंडळाचे कोणतीही अडचण नाही. आपण म्हणता ते खरे आहे. नागरिकांचे आरोग्य सांभाळणे शासनाचे काम आहे. त्या दृष्टीने तेथील दवाखाने, शासकीय आरोग्य संस्था यांना सूचना देण्यात येतील. नागरिकांना पाणी गरम करून प्यावे अशाही सूचना देण्यात येतील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भूमिकेतून उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय मंत्र्यांनी अतिशय पोटतिडकीने उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. आनंदराव पाटील यांचा कन्सर्न जनतेच्या आरोग्याशी आहे. आपण त्या दृष्टीने कार्यवाही करणारच आहात ही अत्यंत चांगली बाब आहे. मलनिःस्सारण, सांडपाणी नगरपालिकेच्या, कारखान्यांच्या माध्यमातून कृष्णा सारख्या नदीत जाते. कराड शहर आहे आणि त्याच्या बाजूला मलकापूर नगरपालिका आहे. मलकापूर ऐतिहासिक गाव आहे. तेथे बौध्द लेण्या आहेत. ते उत्कृष्ट गाव आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ ही अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने पिरिऑडिकली पाण्याची तपासणी केली पाहिजे. परंतु असे होताना दिसत नाही. काही ठिकाणी अनुभव आहेत की, प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी पाणी, हवा, आवाज यांच्या प्रदुषणाबाबत संबंधित कारखान्यांसोबत मांडवली करतात, हातमिळवणी करतात आणि अहवाल देऊन टाकतात. माझा प्रश्न असा आहे की, पाण्याचे प्रदूषण थांबविण्यासाठी पिरिऑडिकल तपासणीची व्यवस्था ऑब्लिगेटरी करूशकाल का ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, स्पेसिफिक अकिाऱ्यांच्या बाबतीत चौकशी होईल. कारखान्यांचा संबंध येत नाही. येथील कारखाने इंजिनिअरिंग आहेत, रासायनिक नाहीत. त्यामुळे प्रदुषणाचा प्रश्न येत नाही. अन्य ठिकाणीअ असे काही होत असल्याची माहिती दिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित कारवाई केली जाईल. कृष्णा नदीत प्रदूषण होत आहे हे मी मान्य केले आहे. माझ्या माहितीप्रमाणे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. जवळपास 30 दश लक्ष लिटर प्रदूषण होत आहे आपण 2 नगरपालिकांची तपासणी लवकर करणार आहोत. एका नगरपालिकेची

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामदास कदम ....

2 महिन्यांमध्ये व एका नगरपालिकेचे 8 महिन्यामध्ये कार्यवाही करण्यात येईल. मी 2 नगरपालिकांच्या संदर्भात बैठक बोलावित आहे. मी सदर बैठकीस आपल्यालाही बोलावितो आणि त्यामध्ये लवकर कशी उपाययोजना करता येईल ते पाहतो.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, राज्यात पर्यावरणाचा प्रश्न गंभ्ीर रूप धारण करीत आहे. माननीय पर्यावरण मंत्री कोकणातील आहेत. उद्योग खातेही कोकणातील माननीय श्री. सुभाष देसाई साहेबांकडे आहे. एमआयडीसीतील कारखान्यांच्या माध्यमातून होणारे प्रदुषणाचे प्रमाण इतर कारखान्यांच्या तुलनेने जास्त आहे. रोहा व महाड एमआयडीसीतील कारखान्यांच्या माध्यमातून होणारे प्रदूषण फार मो्ठ्या प्रमाणात वाढत गेले आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे......

त्या ठिकाणी एक कोरस इंडिया लिमिटेड ही कंपनी आहे. या कंपनीमधून एवढे भयानक प्रदूषण होत आहे की, त्या कारखान्यातील 90 टक्के कामगारांची मुत्रपिंड निकामी झाली आहेत. धाटाव एमआयडीसीमध्ये पास्को कंपनीचा एक प्लँट आहे. त्या माध्यमातून देखील इंदापूर, माणगांव परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. धाटाव एमआयडीसीमधून नदीखालून दूषित पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. हे दूषित पाणी या पाईप लाईनव्दारे समुद्रात सोडण्यात येणार आहे. काम सुरु असतानाच पाईप लाईन फुटली व त्यामुळे सर्व नदी प्रदूषित झाली. या घटनेची माहिती मंत्री महोदयांना आहे किंवा नाही, याची मला माहिती नाही. परंतु, त्यांनी याबाबतची माहिती घ्यावी. यामुळे शेतकरी आणि कोळी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबाबत मंत्री महोदयांनी सहानुभूतिपूर्वक विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांना मी सांगू इच्छितो की, कृष्णा नदीत होत असलेल्या प्रदूषणाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. सन्माननीय सदस्यांनी वेगळा विषय उपस्थित केला आहे. त्यांनी त्यांच्या मुद्याबाबत मंत्री महोदयांना पत्राव्दारे माहिती द्यावी आणि मंत्री महोदयांनी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी.

-------------

...2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : नागपूर व चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होणारे प्रदूषण

**मु.शी.** : नागपूर व चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होणारे प्रदूषण यासंबंधी सर्वश्री मितेश भांगडिया, अनिल सोले, नागो गाणार, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील औष्णिक विद्युत केंद्राद्वारे होणारे प्रदुषण सुरुच असणे, प्रदुषण रोखण्याकरिता आवश्यक ती प्रभावी यंत्रणा अंमलात आणण्याकरीता सक्ती करण्याबाबत मा.पर्यावरण मंत्री महोदयांनी निर्णय देणे, परंतू अद्याप याची पुर्तता न होणे, चंद्रपूरमधील सर्जनद्वारा आरोग्य विषयाचा खोटा दिशाभूल करणारा अहवाल सादर करण्यात येणे, मात्र स्थानिकांना या वायु प्रदुषणामुळे श्वसनाचे व इतर आरोग्य विषयक त्रास सुरुच असणे, कोराडी येथील 660 मे.वॅ.चे तीन केंद्र सुरु करताना सल्फर डायऑक्साईडवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा (F G D) लावण्याबाबतच्या अटीच्या अधीन राहून केंद्रीय पर्यावरण मंडळाकडून परवानगी देण्यात येणे, परंतू अटींची पूर्तता न करताच काम सुरु असणे, एकाच कंपनीकडे औष्णिक विद्युत केंद्र व राज्यातील प्रदुषण महामंडळाचे प्रदुषण तपासण्याचे काम असल्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत सतत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, प्रदुषणावरील एकच कंपनी असत्य अहवाल देत असल्यामुळे अहवाल मॅनेज केला गेल्याची सर्वत्र चर्चा असणे, या सर्व प्रकारामुळे सामान्यांच्या आरोग्याला धोका संभवणाऱ्या गोष्टींबाबत शासन उदासीन असल्याने सामान्य नागरिकांच्या मनात शासनाविरुध्द रोष निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...4....

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर निवेदन दिलेले आहे. यापूर्वीच्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेतही प्रदूषणासंबंधीची चर्चा झाली असून मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेतील विषय मुख्यत: पर्यावरण आणि ऊर्जा विभागाशी संबंधित आहे. मागील अधिवेशनात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी हाच प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी दोन्ही मंत्री महोदयांनी एफ.जी.डी.यंत्रणा बसविण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

सभापती महोदय, कोराडी येथील 660 मे.वॅ.चे तीन केंद्र सुरु करताना सल्फर डायऑक्साईडवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा एफ.जी.डी.बसविण्याच्या अटीवर केंद्र शासनाने मान्यता दिली आहे, हे निवेदनातही मान्य केलेले आहे. आता मात्र ही यंत्रणा बसविण्यासाठी खूप पैसे लागतात, त्यामुळे या अटीमधून सुट मिळावी, अशा प्रकारचे पत्र महाजनकोने केंद्र सरकारला पाठविलेले आहे. केंद्र सरकारने अटीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या अटीची पूर्तता करुन नागपूर व विदर्भाच्या जनतेचे आरोग्य अबाधित ठेवावे, अशी आमची मागणी आहे. मागील अधिवेशनात मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे. त्या आश्वासनाची पूर्तता करण्याबाबतचे आश्वासन आता मंत्री महोदय देतील का ?

सभापती महोदय, प्रदूषण मोजण्याचे कंत्राट महाजनकोने एकाच एजन्सीकडे दिले आहे. ज्या कंपनीकडून ही यंत्रसामुग्री घेतली जाते, त्या यंत्रसामुग्रीचे कॅलिब्रेशन सुध्दा त्याच कंपनीची सबसिडरी कंपनी करीत आहे आणि महाजनकोने त्याच कंपनीला प्रदूषण मोजण्याचे काम दिलेले आहे. हे वर्षानुवर्षे सुरु आहे. याबाबत योग्य ती चौकशी सचिव स्तरावरुन करावी आणि योग्य ती कारवाई सबंधितांवर करावी, अशी आमची अपेक्षा आहे. याबाबत मंत्री महोदय आदेश देतील का ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनीच प्रश्न विचारला आहे आणि त्यांनीच उत्तर दिले आहे. महाजनकोने केंद्र सरकारला अटीमधून सुट मिळावी, याबाबतचे पत्र

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम.......

पाठविले आहे. ही यंत्रणा बसविण्यासाठी 500 कोटी रुपये खर्च येणार आहे. प्रदूषण होणार नाही, याची दक्षता आम्ही घेणार आहोत. अद्याप कामाची सुरुवात देखील झालेली नाही. तीन टप्प्यांमध्ये हे काम होणार आहे. अद्याप कामास सुरुवात झालेली नाही. ऑईलवर वीज उत्पादित करण्याची ट्रायल घेण्यात आली आहे. अद्याप त्या ठिकाणी कोळशाचा वापरही केलेला नाही. ट्रायल सुरु असताना लक्षवेधी सूचनेव्दारे हा विषय उपस्थित करुन यंत्रणा उभारण्याबाबतचे बंधन महाजनकोवर घालावे, अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, ही अट मी घातलेली नाही तर केंद्र सरकारने घातली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, केंद्र सरकारने ही अट घातली आहे, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, त्यामधून सुट मिळावी, अशी विनंती महाजनकोने केली आहे आणि ही विनंती कशी योग्य आहे, हे पटवून देण्याचे काम ती कंपनी करीत आहे. ही गोष्ट खरी आहे की, या प्रकल्पाला परवानगी देत असताना केंद्र सरकारने यंत्रणा बसविण्याची अट घातली होती की, कंपनीने कोणत्याही परिस्थितीत एफ.जी.डी.यंत्रणा उभारली पाहिजे. हा प्रकल्प 660 मे.वॅ.चा आहे. आता पहिल्या टप्प्याचे काम सुरु आहे. एकूण 3 टप्प्यात हा प्रकल्प होणार आहे. महाजनकोचे म्हणणे असे आहे की, 500 कोटी रुपये आता खर्च केला, ज्याची आवश्यकता नाही, तर 2 टक्के भार जनतेच्या डोक्यावर बसेल, त्यांच्या देयकामध्ये वाढ होईल. लोकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून हा खर्च आता करु नये, असे महाजनकोचे म्हणणे आहे आणि कोणत्याही परिस्थितीत तेथे प्रदूषण होणार नाही, याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे. या कंपनीने 1500 कोटी रुपये खर्च तीन टप्प्यांसाठी केला तर त्याचा 3 ते 4 टक्के भार जनतेच्या माथी बसणार आहे. त्यामुळे या बाबीचाही विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी प्रदूषण होता कामा नये, अशी माझी आणि आपल्या सर्वांची भूमिका आहे. त्याबाबत कुणाचेही दुमत नाही. सन्माननीय सदस्य श्री.मितेश भांगडिया यांच्या मताशी मी सहमत आहे. परंतु, कंपनीने तिसरा टप्पा पूर्ण केल्यानंतर जर गरज निर्माण झाली तर कंपनी यंत्रणा बसवेल, असे कंपनीचे म्हणणे आहे. तो पर्यंत आपण थांबणे अत्यंत आवश्यक आहे, अत्यंत गरजेचे आहे.

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रदूषण तपासण्याचे काम एकाच एजन्सीला देण्यात आल्याची बाब येथे मांडली आहे. त्यांच्याशी मी सहमत आहे. परंतु, हे कॉंट्रॅक्ट वर्षानुवर्षापासून दिलेले आहे, असे ते म्हणाले. वस्तुस्थिती ही आहे की, गेल्या दोन वर्षापासून हे काम एजन्सीला देण्यात आले आहे. आमच्या विभागात फिल्ड ऑफिसर आहेत. यापूर्वी हवेचे आणि पाण्याचे सॅम्पल्स घेण्याचे काम त्यांच्याकडून करुन घेण्यात येत होते. परंतु, दोन वर्षांपूर्वी त्यांच्याकडून हे काम काढून घेण्यात आले. त्यावेळी युनियननेही विरोध केला होता. मी या सर्व बाबींचा अभ्यास केला आहे. मी सुध्दा अवाक झालो आहे. ज्या कंपनीने सॅम्पल घ्यायचे त्यांचे आणि या कंपनीचे साटेलोटे आहे. त्याच कंपनीला आमच्या लोकांनी काम दिले आहे, असे माझ्या लक्षात येत आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. जे कॉंट्रॅक्ट देण्यात आले आहे, त्याबाबतची चौकशी सचिव स्तरावरुन केली जाईल, पूर्ण तपासणी करुन घेण्यात येईल. विभागामध्ये फिल्ड ऑफिसर असताना, अधिकारी असताना 3.50 कोटी रुपयांचे कॉंट्रॅक्ट देण्यात आले आहे. मी माहिती घेतली तेव्हा असे लक्षात आले की, यामध्ये 2 कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी सचिव स्तरावरुन करण्यात येईल, जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांना निलंबित करण्यात येईल, असे मी आजच घोषित करीत आहे. कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रयत्न होणार नाही. पारदर्शक कारभार करण्याची या सरकारची भूमिका आहे.

श्री.मितेश भांगडिया : सभापती महोदय, ऊर्जा मंत्री महोदय येथे आलेले आहेत. 660 x 3 असे तीन प्रकल्प तयार आहेत. अट अशी आहे की, पहिल्या प्रकल्पाच्या वेळी ही यंत्रणा बसवावी आणि गरज नसेल तर दुसऱ्या दोन प्रकल्पांना यंत्रणा बसवू नये.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडिया...

केंद्रीय पर्यावरण आयोगाने प्रकल्पासाठी एफजीडी यंत्रणा लावणे बंधनकारक केली आहे. हा अधिकार केंद्रीय पर्यावरण आयोगाचा आहे, त्यांनी वारंवार सूचना देऊन देखील महाजनको सरकारी कंपनी एफजीडी यंत्रणा लावण्याची कार्यवाही करीत नाही. सरकारी कंपन्या अशा प्रकारे एफजीडी यंत्रणा लावत नसल्यामुळे खाजगी कंपन्या याबाबत दुर्लक्ष करतात. कोराडी हा प्रकल्प नागपूर पासून अतिशय जवळ आहे, एफजीडी यंत्रणा लावण्याची अट जनतेच्या फायद्याची आहे. याबाबत ग्रीन ट्रीब्युनलमध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. ग्रीन ट्रीब्युनलने निर्णय दिला आहे की, एफजीडी यंत्रणा लावण्याची कार्यवाही करण्यात यावी. तीन प्रकल्पापैकी एका प्रकल्पासाठी एफजीडी यंत्रणा लावण्यात यावी. एफजीडी यंत्रणा बसवून प्रदूषण आढळले नाही किंवा सल्फरडॉय ऑक्साईडचे प्रमाण कमी मिळाले किंवा ही यंत्रणा न बसविता प्रदूषणाचे प्रमाण मिळाले नाही तर काही हरकत नाही. परंतु पहिल्या प्रकल्पाला एफजीडी यंत्रणा बसविण्याची अट बंधनकारक केली आहे. यासंदर्भातील माहिती माझ्याकडे आहे. तिन्ही प्रकल्पांना एफजीडी यंत्रणा लावून प्रकल्प सुरु करावे व गरज नसली तर काढून टाकावे अशी उलटी प्रक्रिया करणे योग्य होणार आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, तेथील सर्जनकडून रोगाचे प्रमाण वाढले किंवा नाही याबाबत माहिती घेण्यात यावी. सर्वसाधारण आजारासाठी डॉक्टरकडे कोणी जात नाही. टी.बी. झाल्यावर तो कशामुळे झाला याची तपासणी करण्याची कोणतीच यंत्रणा तेथे उपलब्ध नाही. टी.बी.होण्याची कारणे अनेक आहेत. मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, त्यांनी उन्हाळ्यात चंद्रपूर येथे चार दिवस यावे. मी तुमच्या सोबत राहणार मी तेथेच राहतो. डोक्यावर छत्री न घेता अर्धा तास आपण फिरुन दाखवावे व तेथील मोकळ्या हवेत श्वास घेऊन दाखवा. अशा प्रकारे नागपूरची परिस्थिती होणार आहे. एका सयंत्रासाठी ही अट लावण्यात आली आहे. केंद्रीय पर्यावर आयोगाच्या तशा सूचना आहेत. यासाठी 300 ते 400 कोटी रुपये लागतील. त्या प्रकल्पाची किंमत प्रोजेक्ट अहवालात किती होती व आता किती झाली आहे. माझा प्रश्न असा आहे की, जी अट टाकण्यात आली आहे, त्यानुसार पहिल्या प्रकल्पाला एफजीडी यंत्रणा बसविण्यात येणार आहे काय ? येथे ऊर्जा मंत्री महोदय उपस्थित आहेत, ऊर्जा मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर मला जास्त आवडेल.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : हा प्रश्न पर्यावरण विभागाचा असल्यामुळे पर्यावरण मंत्रीच उत्तर देतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सभागृहाला विनंती करतो की, अतिशय प्रदूषित म्हणून चंद्रपूर जिल्हा केंद्र शासनाने जाहीर केला आहे. सभागृहात परवाच्या दिवशी मी चार कंपन्या बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या विरोधात तेथे एक तारखेला बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तेथील लोकांना प्रदूषण नको आहे, प्रदूषण करणाऱ्या कारखान्यावर शासनाने कारवाई केली तर सरकारच्या विरोधात बंद पुकारला जातो. हा प्रकार कशात बसतो हे मला कळत नाही. माझी आपणाला विनंती आहे की, त्या प्रकल्पाला अद्याप कोळसा टाकण्यात आला नाही. ऑईलवर तेथील कामे सुरु आहेत. आणखी तीन महिने ऑईलवर तो प्रकल्प चालणार आहे. त्यामुळे तेथे प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होत नाही. दोन्ही प्रकल्प जेव्हा सुरु होतील तेव्हा प्रदूषण महामंडळाकडून तपासणी करण्यात येईल. जेवढी काळजी सन्माननीय सदस्यांना आहे तेवढीच काळजी शासनाला देखील आहे. याबाबत गरज भासली तर हा प्रश्न सरकारतर्फे दिल्ली येथे मांडला जाईल.

-----------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**विशेष उल्लेखाच्या सूचना**</u>

**पृ.शी./मु. शी.** : पुणे महापालिकेतील 34 गावांचा समावेश करण्याचा निर्णय प्रलंबित असताना तेथील ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया सुरु करणे याबाबत ॲड.जयदेव गायकवाड,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

***सभापती महोदय, "पुणे महापालिकेत ३४ गावांचा समावेश करण्याचा निर्णय शासनाने प्रलंबित ठेवण्यात येणे, त्यातच निवडणूक विभागाने नुकताच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येणे, परिणामी सदर गावे महापालिकेत समाविष्ट आहेत की स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत याबाबत निर्माण झालेली संभ्रमाची अवस्था, याबाबत शासनाने पुणे महापालिकेत समाविष्ट करावयाच्या गावांबाबतचा निर्णय तातडीने घ्यावा, अशा शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."***

---------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : 6 व्या वेतन आयोगानुसार कालबध्द पदोन्नतीऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुदानित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करणे, याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ***"शासनमान्य अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू आहे. त्यांना १२ वर्षांनंतर वरिष्ठ श्रेणी व २४ वर्षांनंतर निवडश्रेणी मिळते.***

***शिक्षकांप्रमाणे वरिष्ठ किंवा निवडश्रेणीचा लाभ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी असल्यामुळे मिळत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पदोन्नतीची पदे उपलब्ध होत नसल्याने त्यांना कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी देय होती. ६ व्या वेतन आयोगानुसार कालबध्द पदोन्नती ऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू झाली आहे. या योजनेचा लाभ शासकीय कर्मचाऱ्यांना मिळत आहे. तथापि अनुदानित संस्थामधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अद्यापही सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली नाही. या योजनेचा लाभ त्यांना मिळत नाही. वारंवार विनंती करून शासनाने याबाबत दखल घेतली नाही. जवळपास ८ वर्षे झाली असून शासनाने याबाबत निर्णय घेतला नाही. शासनाने सदर योजना विचाराधीन असल्याचे वेळोवेळी सांगितले आहे. गेली ६ वर्षे हा विषय प्रलंबित असून शासनाने तातडीने कार्यवाही करावी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा व त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करावी अशी विनंती आहे."***

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : बीड जिल्हा सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहार याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

***सभापती महोदय, "बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासकीय मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षाने बँकेत कोट्यावधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणे, शासनाने या भ्रष्ट अधिकाऱ्यास निलंबित करणे, निलंबनास न्यायालयाने स्थगिती देणे, निलंबित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यास कोणतीही स्थगिती नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट करणे, तरीही प्रशासकीय स्तरावरुन दोषी अधिकाऱ्यांची चौकशी न होणे, लाचलुचपत विभागाने याच अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करणे, या दोन्ही विभागीय चौकश्या अद्याप सुरु न होणे, प्रशासकीय मंडळाच्या काळातील बँकेचे फेर लेखा परिक्षण करण्याची मागणी करण्यात येणे, याकडे सहकार विभागाने केलेले अक्ष्यम्य दुर्लक्ष, भ्रष्ट अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करुन त्यांच्या काळातील बँकेचे लेखा परिक्षण करण्यात यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."***

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : ज्ञानपीठ सन्मानाचे मानकरी ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे हे दिल्ली येथे एका कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र सदनात राहिले परंतु त्यांचे कोणी स्वागत केले नाही तसेच तेथील निवासी आयुक्तांनी ओळखही दाखविली नाही, याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, देशाची राजधानी दिल्लीत प्रत्येक राज्याचे एक सदन तयार केलेले असते. या सदनात केवळ सरकारी कामकाज चालते असे नाही. आपल्या संस्कृतीचा परिचय व आपल्या राज्यातून तेथे स्थायिक असलेल्या मराठी माणसांसाठी काही कार्यक्रम होण्याची आवश्यकता असते.तेथे कधी सांस्कृतिक कार्यक्रम होतील, संगीताचे कार्यक्रम होतील. अशा प्रकारची व्यवस्था तेथे ऑडिटोरियम असताना देखील आजपर्यंत होऊ शकत नाही. "यं***दाच्या ज्ञानपीठ सन्मानाचे मानकरी ज्येष्ठ साहित्यिक श्री. भालचंद्र नेमाडे नुकतेच दिल्ली येथे एका कार्यक्रमात हिंदीतील अभिजनांसाठी भारतीयता एवंम हिंदुत्व या विषयावर भाषण देण्यासाठी गेले होते ते दिल्लीत आले आणि स्वखर्चाने राहून गेले. राजधानीत मराठी ग्रथोत्सवाला सुध्दा परवानगी मुंबईहून मंत्र्यांचा फोन आल्यावर देण्यात आली. अशा घटना आपल्या दिल्लीस्थित प्रशासनाचे आणि संबंधित अधिकाऱ्यांचे केवळ अज्ञान दाखवत नाही तर प्रशासकीय बेफिकीरीचाच प्रत्यय देतात. त्यांचा मुक्काम दिल्लीतल्या भव्य महाराष्ट्र सदनातच होता. येथे दोन्ही सदनात त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. त्यांचे स्वागत करणे तर दूरच त्यांना निवासी आयुक्तांनी ओळखही दाखविली नाही. ज्ञानपीठाने सन्मानित झालेल्या लेखकाला आपण विशेष दर्जा देऊ शकत नाही हा निव्वळ करंटेपणा आहे. महाराष्ट्र सदनातील भल्या मोठ्या हॉलमध्ये एकाही सांस्कृतिक कार्यक्रमास परवानगी दिली जात नाही. उद्‌घाटनानंतर आजतागायत तेथे एकही कार्यक्रम झालेला नाही. येथे असलेल्या शासकीय अधिकाऱ्यांना महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख करुन देण्याची नितांत गरज आहे. शासनाने विचार करावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."***

---------

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात येऊन देखील पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात अद्याप शिष्यवृत्ती जमा न होणे याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

सभापती महोदय, "***राज्यात शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यभर ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात येणे, परंतु सन २०१४-१५ वर्षे संपण्याची वेळ येऊनही ९ लाख ६० हजार ८८ शिष्यवृत्ती धारकांचे अर्ज जिल्हास्तरच प्रलंबित असणे, त्यामुळे शिष्यवृत्तीपात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अद्यापही शिष्यवृत्ती जमा न होणे, त्यामुळे शासनाने यावर करावयाची कार्यवाही. त्याकरीता मी विशेष उल्लेखाद्वारे सदर विषय मुद्दा उपस्थित करीत आहे.***"

---------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या माध्यमिक विभागातील किमान कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण शाखेतील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यात न येणे याबाबत श्री.अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, ***"राज्यात शालेय शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली असणे, सदर वेतनश्रेणी, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या माध्यमिक विभागातील किमान कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण शाखेतील शिक्षकांना लागू करण्यात आलेली नसणे, ही वेतनश्रेणी लागू करावी या करिता अनेक वेळा आंदोलने, धरणे इत्यादि मार्गाने व पत्रव्यवहार करण्यात आलेला असूनही या शिक्षकांना पाचवी वेतनश्रेणी अद्याप लागू करण्यात आली नसणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने किमान कौशल्य व्यवसाय प्रशिक्षण विभागातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा चुकीचा अहवाल पाठविला गेल्याने मा.वित्त मंत्र्यांनी सुधारित प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाला केला असणे, या चुकीच्या प्रस्तावामुळे जवळपास २८४० शिक्षकांवर अन्याय झालेला असणे म्हणून विशेष उल्लेखाद्वारे ही बाब मी शासनाच्या निदर्शनास आणत आहे."***

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : सातारा जिल्हा रुग्णालय येथे डॉक्टर व विविध मशिनरी उपलबध नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असणे याबाबत श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, "सातारा जिल्हा रुग्णालयात ना फिजीशिन... ना सर्जन... ना सिटी स्कॅन यंत्रणा, तज्ञ डॉक्टर व आधुनिक यंत्रणांशिवाय जिल्हा रुग्णालयाचा कारभार सध्या सुरु आहे. सर्व स्तरावर अनेकदा पाठपुरावा करुनही वैद्यकीय अधिकारी मिळत नसल्याने जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. सातारा जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे रुग्णालय असताना येथे मोठ्या प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता आहे. सदर रुग्णालयाला 250 कॉटची मंजूरी आहे. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे सध्या आंतररुग्ण विभागात दाखल असणाऱ्या रुग्णांची सरासरी संख्या 375 इतकी असणे. खाजगी वैद्यकीय सेवेचा लाभ घेण्याची पात्रता सर्वसामान्यांत नाही हेच यातून स्पष्ट होते. त्यातही जिल्ह्यातून सुमारे 90 किलोमीटरचा महामार्ग जातो तसेच इतर रस्त्यांवर अपघातातील जखमीला उपचारासाठी येथेच आणले जाते. सर्पदंश, विषबाधा, हार्टअटॅक अशा आजारांचा खाजगीतील उपचाराचा खर्च लाखोमध्ये असतो. त्यामुळे सर्वसामान्य रुग्ण जिल्हा रुग्णालयांचीच वाट धरतो. त्यासाठी जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागही आधुनिक यंत्रणांनी सज्ज आहे. परंतु फिजीशियन नसल्याने डॉक्टरांकडून दुसरीकडे रुग्ण दाखल करण्याचा सल्ला दिला जातो नाईलाजास्तव त्यांना खाजगीचा रस्ता धरावा लागतो त्यात त्यांना लाखो रुपये खर्च येत असून तेथील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. तेव्हा शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन तेथील रुग्णालयास तातडीने डॉक्टर व विविध मशनरी उपलब्ध करुन द्यावेत अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------

..4...

**पृ.शी./मु. शी.** : मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाची कामे प्रलंबित असणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, "मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासादरम्यान इमारतींसह रहिवाशांचे संक्रमण शिबीरात स्थलांतर करण्याकरिता मुंबईत विविध ठिकाणी 20 हजार गाळे उपलब्ध असणे, मात्र सदर गाळ्यांमध्ये 8500 घुसखोर राहत असून म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या व एजंटांच्या संगनमतामुळे संक्रमण शिबीरातील घुसखोरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, दिवसेंदिवस घुसखोरांच्या वाढत्या संख्येमुळे मूळ रहिवाश्यांना जागा उपलब्ध नसणे, परिणामी घुसखोरांची संख्या जास्त असल्याने सदर समस्येवर तोडगा काढण्याकरिता म्हाडाच्या दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला असणे, परंतु सदर प्रस्तावावर सहा महिने उलटूनही अद्याप निर्णय न होणे, घुसखोरांना बाहेर काढून त्यामध्ये उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाश्यांचे स्थलांतर करण्याची बाब प्रलंबित असल्याने उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाची कामे प्रलंबित राहणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर गंभीर बाबींकडे शासनाचे लक्ष वेधून याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : कल्याण (पूर्व) परिसरातील खडेगोळवली, कैलासनगर येथे मनपाच्या नाल्याच्या संरक्षक भिंतीचे काम सुरु असताना बाजूची जमीन खचल्याने लगतची काही घरे जमीनदोस्त होणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, ***"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण (पूर्व) परिसरातील खडेगोलवली, कैलास नगर येथे ३ दिवसांपूर्वी मनपाच्या नाल्याच्या संरक्षक भिंतीचे काम सुरु असताना, बाजुची जमीन खचल्याने लगतची काही घरे जमीनदोस्त झाली आहेत तर काही घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असल्याने व त्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आलेले असतानाही अद्याप या घटनेला तीन दिवस उलटून गेल्यानंतरही शासनाच्या कोणत्याही विभागाने या घटनेची दखल घेतलेली नसणे ही अत्यंत गंभीर बाब मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो व या बाधित कुटुंबांना विनाविलंब योग्य ती मदत करण्याची शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."***

---------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी मत्स्य व्यवसाय विकास मंडळ स्थापन करण्याची आवश्यकता याबाबत श्री.मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, ***"राज्यातील गोड्या पाण्यावर होणारा मत्स्य व्यवसाय हा विदर्भात फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. मत्स्य व्यवसाय विकास कार्यक्रमांतर्गत दोन प्रकारचे व्यवसाय अस्तित्वात आहेत. ज्यामध्ये खाऱ्या पाण्यातील समुद्री मत्स्य व्यवसाय व गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाचा अंतर्भाव आहे. शासन स्तरावर येणारा बहुतांश निधी हा खाऱ्या पाण्यावर असलेल्या मत्स्य व्यवसायावर वापरण्यात येतो. यामुळे गोड्या पाण्यावर मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांचे जीवनमान अजूनही पाहिजे त्या प्रमाणात उंचावलेले नाहीत. गोड्या पाण्यावरील मत्स्य व्यवसाय हा संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय असून अतिवृष्टी वा अवकर्षणग्रस्त परिस्थितीत हा व्यवसाय संकटात येतो अशा परिस्थितीत शासन स्तरावरुन कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्या जात असल्यामुळे हा व्यवसाय दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. मत्स्य व्यवसाय करणाऱ्या सदस्यांना मासेमारीची मंजूरी विभागाकडून मार्च ते जून या काळापर्यंतच दिल्या जाते ज्या कारणे या काळात सर्वच विक्रीदार असल्यामुळे भाव स्वाभाविकत: कमीच असतात. म्हणून मत्स्य विक्री संस्थांमार्फत बाराही महिने होण्याकरिता मत्स्यविक्री केंद्र तयार करण्याची गरज आहे. या गोड्या पाण्यातील मत्स्य व्यवसायाच्या विकासाकरिता मत्स्य व्यवसाय विकास मंडळ स्थापण्याची नितांत गरज आहे. याकडे झालेले शासनाचे अक्ष्यम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."***

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई विद्यापीठातील अनेक प्रोफेसर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार केल्याची अनेक दिवसापासूनची प्रकरणे प्रलंबित असणे याबाबत डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.निलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठातील अनेक प्रोफेसर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार केल्याची अनेक दिवसापासूनची प्रकरणे प्रलंबित आहेत. सन 2009 ते 2013 या काळात मुंबई विद्यापीठात अशा प्रकारचा अत्याचार केल्याची 24 प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. सदर 24 प्रकरणांपैकी 15 प्रकरणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांविरुद्ध आणि 6 प्रकरणे शिक्षकांविरुद्ध आहेत. मुंबई विद्यापीठाकडे अशी प्रकरणे हाताळण्यासाठी वुमन्स डेव्हलपमेंट सेल (डब्ल्यूडीसी) स्थापन केलेला आहे. परंतु, अशी तक्रार करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनाच ती तक्रार सिद्ध करण्याबाबत तक्रार निवारण कक्षातर्फे सांगितले जाते. स्वत: तक्रार निवारण कक्ष कोणतीही पडताळणी करीत नाही, चौकशी करीत नाही. ज्याच्या विरुद्ध तक्रार करण्यात आलेली आहे त्याने आपले निर्दोषत्व सिद्ध करणे गरजेचे आहे आणि ज्याच्या विरुद्ध तक्रार आहे त्याच्याच अधिकाराखाली ती महिला काम करीत असेल तर निश्चितपणे त्या महिलेवर दडपशाही करण्यात येते. अशा तक्रारींवर सहा-सहा महिने कार्यवाही केली जात नाही, अशा प्रकारच्या तक्रारी सिनेटच्या महिला सभासदांनी केलेल्या आहेत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणी लक्ष घालून मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुंना या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्याबाबत सूचना द्याव्यात, अशी माझी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

---------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** :बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये पॉवर ट्रान्समिशन कंपनीकडून टॉवरची उभारणी करुनही मोबदला न मिळाल्याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"बुलढाणा जिल्ह्यातील नागझरी, निरोड, ता.खामगांव व वैरागड, ता.चिखली येथील शेतकऱ्यांच्या शिवारामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण व ट्रान्समिशन (महावितरण) कंपनीकरिता टॉवर उभारणीचे काम महाराष्ट्र ईर्स्टन ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीमार्फत शेतजमिनीमध्ये करीत आहेत. सदर टॉवर उभारणीचे काम जवळ जवळ पूर्णत्वास आले आहे. शेतकऱ्यांना तोंडी ठरविल्याप्रमाणे सदर जमिनीचा मोबदला त्यांना देण्यात आलेला नाही. महाराष्ट्र ईर्स्टन ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीचे अभियंता श्री.अंकित, श्री.एन.एन. सिंग व सुपरवायझर श्री.पुरुषोत्तम कड यांना या शेतकऱ्यांनी सदर टॉवरचे काम थांबविण्याची विनंती केली असता आम्ही पोलीस संरक्षण घेऊन काम पूर्ण करुन घेवू अशी उध्दट उत्तरे त्यांना देण्यात आली. तसेच तुम्ही दोन कवडीचे शेतकरी आहात तुमचेकडून जे होत असेल ते करुन पहा आम्ही आमचे काम पूर्ण करुन घेवू असे अर्वाच्छ भाषेत शेतकऱ्यांना हिणवून शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींना ओळखत नाही त्यांचे येणारे फोन जुमानत नसल्याचे सांगतात. सदर कंपनीने शेतकऱ्यांना ठरविल्याप्रमाणे मोबदला न देता स्थानिक पोलिसांच्या दबावाखाली काम पूर्ण करण्याच्या विचारात असल्याने शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबविण्यासाठी व त्यांना योग्य तो मोबदला देण्यासाठी सदर बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करत आहे."

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) :** शासनाने या विषयामध्ये लक्ष देऊन कार्यवाही करावी.

डॉ.रणजित पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, चौकशी केली जाईल आणि माहिती घेऊन कारवाई केली जाईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाट मार्गाची सुधारणा करण्याबाबत ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.हुस्नबानू खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाट मार्गावर 10 वर्षात महामार्ग बांधकाम विभागाकडून, वेळोवेळी रस्त्यांचे रुंदीकरण, मोऱ्यांचे बांधकाम, साईडपट्टया, संरक्षक कठडे, सिमेंट कॉंक्रीट गटारे, आधी कामे करण्यात आली. मात्र ही कामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याची माहे दिनांक 29 मार्च 2015 रोजी व त्यासुमारास उघडकीस येणे, या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींकडून होणे, ठेकेदाराकडून अरुंद वळणाच्या रुंदीकरणाचे अंदाजे 10 कोटी रुपये अंदाजपत्रक असलेले काम करत असणे, अरूंद व वळणांच्या रुंदीकरणासाठी डोंगराचे मोठ्या प्रमाणात उत्खन्नन करण्यात आले, त्यामुळे वळणांवर उपलब्ध असलेल्या वाढीव जागेवर काही ठिकाणी डांबरीकरणाऐवजी खडी ग्रीट अंथरणे, यामुळे येथे डांबरीकरण न झाल्याने वाहतुकीत अडथळा निर्माण होऊन वाहनांचे टायर पंक्चर होणे, फुटणे असे प्रकार होत असणे, दरीच्या बाजूच्या पट्टया नामशेष झाल्या असल्यामुळे वाहने दरीत कोसळण्याचा धोका वाढला आहे. आधीच निकृष्ट दर्जाच्या कामाची दुरुस्तीही बोगस होत असल्याचेही स्पष्ट होत आहे. हे दुरुस्तीचे काम वारंवार होत असणे, या रस्त्यांचे काम आधुनिक तंत्रज्ञान वापरुन करण्याची गरज असताना कामचलाऊ व तकलादूपणे काम केले जात आहे. त्यामुळे यंदाही अपघाताचा धोका कायम आहे. यामुळे प्रवाशांमध्ये, वाहनचालकांमध्ये व जनतेमध्ये वाढलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने कशेडी घाट मार्गाची सुधारणा करण्याबाबत करावयाची उपाययोजना व कार्यवाही या करिता मी सभागृहात विशेष उल्लेख सूचना उपस्थित करीत आहे."

------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : शाळांच्या परिसरात 100 मीटरपर्यंत तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीस बंदी असतानाही सर्रास विक्री सुरु असल्याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"शाळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थाच्या विक्रीस बंदी असतांना अनेक शाळा व कॉलेजांच्या परिसरात या गोष्टींची सर्रास विक्री सुरु असल्याचे माहे मार्च, 2015 च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, अविचारी वय, जाहिरात माध्यमाचा प्रभाव, संगतीचा परिणाम व एकदा चव घेण्याचा मोह यामुळे 10 ते 16 वयोगटातील शाळकरी मुलांमध्ये तंबाखू, गुटखा व पानमसाला व सिगरेटच्या व्यसनाचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येणे, कोवळ्या वयात अशा व्यसनाच्या आहारी गेलेले विद्यार्थी तिशी व पस्तीशीत गेल्यानंतर कर्करोगाच्या विळख्यात सापडणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व संतापाचे वातावरण, धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांची शाळांच्या अथवा महाविद्यालयांच्या आवारात बंदीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची आवश्यकता व या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

----

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : पुणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यास होत असलेला विलंब याबाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"जलद गतीने औद्योगिक क्षेत्र वाढवणाऱ्या पुण्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा राज्य सरकारने 2008 मध्ये निर्णय घेण्यात येणे, भारतीय विमान पत्तन प्राधिकरणाने (एएआय) मंजूरी देवूनही प्रकल्पग्रस्तांचा विरोध व विमानतळासाठीच्या जागेच्या उणीवेमुळे विमानतळ उभारण्यात अडचणी येणे, विमानतळासाठीच्या सर्वेक्षणाअंती खेड (राजगुरुनगर) येथील एमआयडीसीने स्पेशल इकॉनॉमिक झोनसाठी (एसईझेड) संपादित केलेली जमीन विमानतळास सुयोग्य असल्याचा अभिप्राय (एएआयने) दिलेला असणे, परंतु तांत्रिक, कायदेशीर आणि वाढीव खर्चामुळे विमानतळास जमीन मिळू न शकणे, परिणामी झपाट्याने औद्योगिक क्षेत्र वाढणाऱ्या पुण्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याच्या प्रस्तावित कामास सुरुवात न होणे, यामुळे पुण्यातील नागरिकांमध्ये व व्यापाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण होत असलेले असंतोषाचे वातावरण, चिडीची भावना, पुण्यात प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम तातडीने मार्गी लावण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : धोबीतलाव, मुंबई येथे मराठी भाषा भवन उभारण्यास होत असलेला विलंब याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी मागील शासनाने मुंबई येथे मराठी भाषा भवन व मराठीच्या संदर्भात संशोधन, विकास करण्यासाठी 80 कोटी रुपये खर्च करुन मुंबईतील धोबीतलाव येथील रंगभवन परिसरात मराठी भाषा भवन बांधण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने सन 2013 मध्ये घेतला होता. रंगभवनाच्या जागेसंदर्भात हेरिटेज कमिटीने काही प्रश्न उपस्थित केले होते त्यावर महापालिका व नगरविकास विभागाने एकत्रित बैठक घेऊन तोडगा काढणे आवश्यक होते. सन 2014-15 या आर्थिक वर्षासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद केली असताही अद्याप बांधकाम सुरु न झाल्याने या आर्थिक वर्षातील निधी परत करण्याची वेळ मराठी भाषा विभागावर येण्याची शक्यता निर्माण झाली असून मराठी भाषा भवनाची फाईल 7/12 साठीही जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक महिने पडून होती. रंगभवनच्या 7/12 च्या उताऱ्यावर मराठी भाषा विभागाचे नाव लागले असूनही मराठी भाषा भवन बांधण्याची प्रक्रिया मात्र कासवगतीने सुरु आहे. तरी याप्रकरणी शासनाने मराठी भाषा भवन इमारत बांधकामाच्या संबंधातील सर्व स्तरावरील प्रक्रियांची पूर्तता करुन इमारतीचे बांधकाम विनाविलंब हाती घेण्याच्यादृष्टीने त्वरित कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

------

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(दुपारी 3.28 ते 4.00 वाजेपर्यंत मध्यंतर)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**मु.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे

**पृ.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनील तटकरे, नरेंद्र पाटील, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, जयवंतराव जाधव, प्रकाश गजभिये, आनंद ठाकूर, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, निरंजन डावखरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री राजेंद्र मुळक, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील उद्योगधंद्यांना चालना देण्यासाठी कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्यशासनाने तयार केलेला असणे, परंतू प्रस्तावित बदलावर विविध कामगार संघटना आणि उद्योगपतींची परस्पर विरोधी मते असणे, तसेच पूर्वी 100 कामगार असलेला कारखाना बंद करण्यासाठी शासनाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक असताना त्याची मर्यादा आता 300 कामगार अशी करण्यात येणे व 10 पेक्षा अधिक कामगारांसह विजेचा वापर करुन उत्पन्न घेणाऱ्या कारखान्यांना नोंदणीची आवश्यकता असताना त्याची मर्यादा 20 कामगारांपर्यंत करण्यात येणे, 50 पेक्षा कमी कामगार असलेल्या उद्योगांमधील कामगारांना पी.एफ.,ई.एस.आय., किमान वेतन कायदा लागू न करणे, यामुळे छोट्या उद्योगांमधील कामगारांवर अन्याय होऊन बेरोजगारीचे संकट ओढवणार असल्याने राज्यातील कामगारांमध्ये पसरलेला असंतोष तसेच राज्यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर व इतर जिल्ह्यातील उद्योजकांकडून, कंपन्यांकडून तेथील कामगारांच्या तसेच विविध क्षेत्रातील माथाडी कामगारांच्या मागण्यांबाबत कोणतीही कार्यवाही होत नसून तेथील कामगारांनी, विविध संघटनांनी अनेकवेळा शासनाकडे निवेदन देणे, आंदोलन करणे, यावरही शासनाने कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच राज्यातील उद्योग व्यवसायात शासनाने केलेली वीज दरवाढ, सदरची दरवाढ ही इतर राज्यातील वीजदरापेक्षा अधिक असल्याने राज्यातील उद्योग व्यवसाय इतर राज्यात नेऊ असा उद्योजकांनी इशारा देणे, सदर उद्योजकांनी आपले व्यवसाय बाहेरील राज्यात नेल्यास राज्यातील हजारो कामगारांवर तसेच माथाडी कामगारांवर बेकारीचे संकट निर्माण होणे, शासनाच्या या धोरणामुळे राज्यातील विविध क्षेत्रातील कामगारांमध्ये निर्माण झालेली चिडीची व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील.....

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात विविध कामगार कायदे आहेत. आज कामगार कायद्यांसंबंधी महत्त्वाची चर्चा सभागृहात होत आहे. महाराष्ट्रा राज्याच्या निर्मितीच्या वेळी शेतकरी आणि कामगार हे दोनच घटक लढवय्ये होते. त्यांच्यामुळे या राज्यात मोठ्या प्रमाणावर यशस्वीरित्या परिवर्तन झाले.

मी सुरूवातीला मागील काळातील आढावा घेणार आहे. मुंबापुरीची निर्मिती ईस्ट इंडिया कंपनीमुळे झाली. त्यावेळी मुंबईत ईस्ट इंडिया कंपनीची जहाजे येत होती. जहाजावरील मालाची चढ, उतार करण्यासाठी कामगार लागत होता. तो कामगार हमाल होता. त्यानंतर मुंबापुरीमध्ये हळूहळू कापड गिरण्या आल्या. तसेच वेगवेगळे उद्योगधंदे निर्माण होत गेले. ब्रिटीश कालीन सरकारमध्ये श्री.नारायण मेघाजी लोखंडे यांनी पहिल्यांदा कामगारांच्या लढा दिला. त्यावेळी त्यांनी सर्व गिरणी कामगारांना एकत्रित केले व सर्व कामगारांना रविवारची हक्काची सुट्टी मिळवून दिली. ही सुट्टी या बहाद्दूर कामगाराच्या माध्यमातून मिळालेली आहे.

इंग्रजांनी तयार केलेला कपडा वापरायचा यासाठी म.गांधीनी आंदोलन सुरू केले होते. गोदीमध्ये सर्वात पहिले आंदोलन श्री.बाबू गेनू यांनी केले. श्री.बाबू गेनू हा कामगार ट्रकच्या समोर आडवा झाला व त्यानंतर लढाईला सुरूवात झाली.

अनेक कामगार नेत्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी योगदान दिले आहे. या कामगार नेत्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपले योगदान दिले आहे. कॉ.डांगे यांनी देखील योगदान दिले आहे. श्री.दत्ता सामंत हे लढवय्ये कामगार नेते होते. बऱ्याच लोकांनी त्यांना जवळून पाहिले आहे. श्री.मनोहरजी कोतवाल हे डॉक वर्कर्स युनियनचे नेतृत्त्व करीत होते. या राज्याचे कामगार मंत्री म्हणून राहिलेले श्री.अरूण मेहता हे देखील कामगार नेते होते. श्री. एस.आर.कुलकर्णी यांचे देखील कामगार नेते म्हणून फार योगदान आहे. पी.डीमेलो देखील कामगार नेते होते. गोदीला समांतर असणाऱ्या रस्त्याला त्यांचे नाव देण्यात आले आहे. ज्यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदा हमालांसाठी कायदा केला त्या श्री.अण्णासाहेब पाटील यांना देखील विसरून चालणार नाही. श्री.गुलाबजी जोशी यांनी देखील

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

कामगारांसाठी आपले योगदान दिले आहे. या सर्व कामगार नेत्यांनी कामगारांच्या फायद्यासाठी विविध चळवळी उभारल्या होत्या. येथे मला कामगार नेते श्री.शरद राव तसेच माथाडी कामगाराचे नेते श्री.बाबा आढाव यांचा देखील उल्लेख करावासा वाटतो. आता येथे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप बसलेले आहेत. ते देखील लढवय्ये कामगार नेते आहेत. विधानसभेचे सदस्य श्री.शशिकांतजी शिंदे हे देखील कामगार नेते आहेत. त्यांनी कामगार नेते म्हणून देखील काम केले आहे. तसेच श्री.सचिनभाऊ अहिर यांना गिरणी कामगार क्षेत्रात काम केले आहे. विमानतळावर काम करणाऱ्या कामगारांचे नेते श्री.किरण पावसकर हे तर या सदनाचे सन्माननीय सदस्य आहेत. येथे श्री.सूर्यकांत महाडिक यांचे नाव घेणे आवश्यक आहे. त्यांची देखील बलाढ्य कामगार संघटना आज मुंबईत आणि महाराष्ट्रात कार्यरत आहे.

या राज्यात दोन कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते. या राज्यातील कामगारांना केंद्रीय कामगार कायदा लागू आहे. तसा राज्याचा कामगार कायदा देखील लागू आहे. दोन्ही पातळीवर कामगार संघटना चालविणारे बलाढ्य कामगार नेते देखील राज्यात आहेत. आपल्या राज्यात इंटक, आयटक, बीएचएमएस, सिटू, अशा मोठमोठ्या बलाढ्य संघटना काम करीत आहेत.

नवीन सरकार आल्यामुळे आता एक गांभीर्याचा विषय निर्माण झाला आहे. जगामध्ये बिझिनेस कसा करायचा आणि त्यासाठी परवानगी कशी मिळवायची यासंबंधात आंतरराष्ट्रीय पातळीवर एक सर्व्हे करण्यात आला होता. इज ऑफ डुईंग बिझिनेस रिपोर्ट नुसार 189 देशांमध्ये आपल्या देशाचा 142 वा क्रमांक लागतो. आपल्या येथे उशिरा परवानग्या का मिळतात, त्यात कोणकोणत्या अडचणी आहेत हे त्यात नमूद केले आहे.

महाराष्ट्र घडवित असताना ज्यांनी कामगार चळवळीला फार मोठे जीवनदान दिले आहे त्यात श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतदादा पाटील, श्री.नरेंद्र तिडके यांचे नाव घेतले पाहिजे. माथाडींच्या प्रश्नासाठी श्री.नरेंद्र तिडके हे कामगार मंत्री या नात्याने उभे राहिले होते. माझ्या सारख्या कार्यकर्त्याने श्री.विलासराव देशमुख यांचे नाव घेणे आज तरी क्रमप्राप्त आहे. कारण

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.नरेंद्र पाटील....

त्यांच्या सान्निध्यात आम्ही काम केलेले आहे. तसेच श्री.गोपीनाथ मुंडे यांनी माथाडी कामगारांना खूप मोठी ताकद दिली आहे. ऊस तोड कामगार, माथाडी कामगार, गिरणी कामगार यांच्या समवेत चर्चा करून मध्यस्थीचा मार्ग स्वीकारून कारखान्यांना आणि कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न ज्यांनी केला आहे त्या आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचा उल्लेख करणे फार महत्त्वाचे आहे. श्री.मनोहर जोशी साहेबांना आम्ही विसरू शकणार नाही. कारण त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीमध्ये माथाडी कामगारांना खूप मोठी ताकद मिळाली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील .......

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री. नारायण राणे साहेबांचा या ठिकाणी वेगळया पध्दतीने उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या काळात 100 किलोच्या गोण्या येत होत्या. माथाडी कामगार 100,120 किंवा 130 किलोच्या गोण्या उचलण्याचे काम करीत होते. परंतु माननीय राणे साहेबांच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळात इंडियन लेबर ऑर्गनायझेशनने एक फतवा काढला व त्या फतव्याच्या माध्यमातून माननीय श्री.राणे साहेबांनी 100 किलोची गोण 50 किलोवर आणली.

सभापती महोदय, या राज्यात एकंदर 22 कामगार कायदे आहेत. माथाडी कामगार कायदा, सुरक्षा रक्षक कामगार कायदा, औद्योगिक दुकान व आस्थापना कायदा, औद्योगिक विवाद अधिनियम कायदा, कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट, मोटार ट्रान्सपोर्ट ॲक्ट, एम्पलॉईज प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रॅच्यूईटी ॲक्ट, कारखाना अधिनियम कायदा, मिनिमम वेजेस ॲक्ट, बांधकाम कायदा असे कायदे आहेत. घरेलू महिला कामगार कायदा हा कायदा मागच्या आघाडी सरकारने सुरु केला होता. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कामगार कल्याण कायद्याची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये किमान घरभाडे अधिनियम कायदा तयार करण्यात आला. बालकामगार कायद्याचे श्रेय द्यावयाचे झाले तर ते कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेसला द्यावे लागेल.

सभापती महोदय, या ठिकाणी मी केवळ कामगार कायद्याच्या संदर्भातच विचार मांडणार आहे. विधानसभेत 27 डिसेंबर,1946 मध्ये श्री. श्रीपादजी डांगे यांनी विविध कामगार कायद्यासंदर्भात 6.5 तास चर्चा केली होती. आज जसा महाराष्ट्र आहे तसा महाराष्ट्र अगोदर नव्हता. कामगारांचे प्रश्न निर्माण झाले की, लगेच कामगार मंत्र्यांना चिंता वाटत होती. एखादा उद्योग बंद झाला तर कामगार बेरोजगार होईल अशी कामगार मंत्र्यांना चिंता वाटत होती. हा कामगार तालुक्यातून, खेडेगावातून, कोकणातून, देशातून, विदर्भ, मराठवाडयातून आला असून तो बरोगार होऊ नये यासाठी कामगार मंत्री काळजी करीत असत. कामगार आणि उद्योग एकत्र चालले पाहिजेत जसे बैलगाडीचे दोन्ही चाके चालली पाहिजेत तसेच एखाद्या उद्योगामध्ये उद्योगपतींचे, कारखानदारांचे जेवढे महत्व आहे तेवढेच महत्व त्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे सुध्दा असते.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील .......

सभापती महोदय, माथाडी कामगारांच्या संदर्भात फार मोठी चळवळ झाली होती. माथाडी कामगारांचा कायदा सभागृहात आला आणि मंजूर झाला असे काही झाले नाही. या सभागृहाचे सदस्य स्व.अण्णासाहेब पाटील यांनी स्वतः गोदीमध्ये हमालांचे काम केले होते. पहिला माथाडी कामगार कायदा कोठे लागू झाला असेल तर तो गोदीमध्ये लागू झाला. स्व.पी.डिमेलो, एस.आर.कुलकर्णी, मनोहर कोतवाल या सर्वाच्या सानिध्यामध्ये स्वतः अण्णासाहेब पाटील यांनी काम केले होते. माथाडी कामगार कायद्यासारखा कायदा गोदीच्या बाहेरही असावा अशी इच्छा त्यांनी प्रकट केली तेव्हा लोकनेते श्री. बाळासाहेब देसाई यांनी त्यांची पाठराखण करुन त्यासंदर्भातील प्रस्ताव स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांकडे पाठविला. दोन ते तीन वर्षे या प्रस्तावावर चर्चा झाली. अशा प्रकारचा कायदा असंघटीत कामगारांसाठी लागू केला तर त्याचा काय फायदा होईल, कोणावर कसा बोजा पडणार नाही, या कामगारांना कायद्याचे संरक्षण कसे मिळेल यासाठीच ही चर्चा दोन ते तीन वर्षे झाली. या सभागृहाचे उदाहरण द्यावयाचे झाले तर या सभागृहातील पदरधिकारी सोडले तर या सभागृहातील सर्वच लोक कामगार चळवळीशी निगडीत आहेत. आयएएस अधिकारी हे सुध्दा कामगार चळवळीशी निगडीत आहेत, सरकारी अधिकारी कामगार चळवळीशी निगडीत आहेत, समोर बसलेले पत्रकार असो हे सर्व कामगारच आहेत. या सभागृहात आज फार महत्वाची चर्चा होत आहे. आऊट सोर्सींगचा एक नवीन कायदा मध्यंतरी पारित झाला आहे. आपण केवळ कॉन्ट्रॅक्ट लेबरबद्दल बोलत होतो आता कॉन्ट्रॅक्ट लेबर शब्द नाहीसा झाला आणि आऊट सोर्सींग असा शब्द रुळू लागला. आऊट सोर्सींग कामगारांकडून लिहून घेतले जाते की, तुम्हाला प्राव्हीडंट फंड, ग्रॅच्यूईटी, बोनस मिळणार नाही असे लिहून घेतले जाते. आऊट सोर्सींग कामगारांना केवळ एक पॅकेज दिले जाते. वाहिन्यांवर काम करणारे रिपोर्टर्स,कॅमेरामन हे पॅकेजच्या माध्यमातून काम करतात. हे राज्य घडवत असताना ज्या लोकांनी आपल्या जीवाचे बलिदान केल्यामुळेच कामगार कायदे निर्माण होऊ शकले. परंतु आता हेच कामगार या राज्यात पायाखाली तुडवण्याचे काम काही लोकांनी सुरु केले आहे याचे मला वाईट वाटते.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील .......

सभापती महोदय, माथाडी कामगारांचा कायदा कोणाला लागू होतो ? ज्या ठिकाणी एक कामगार सुध्दा काम करीत असेल तर त्या ठिकाणी हा कायदा लागू होतो व त्याला प्रॉव्हीडंट फंड, ग्रॅच्यूईटी, बोनस, भविष्यनिर्वाह निधी, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, रजेचा पगार, भर पगारी रजा, अपघात नुकसान भरपाई, वैद्यकीय सेवा, कामगार कल्याण निधी अशा सुविधा मिळत असतात. ज्या क्षेत्रात कामगार कायद्याच्या अंतर्गत प्रत्येक कायद्याची संख्या ठरवली गेली आहे. परंतु माथाडी कामगारांचा कायदा असा आहे की, त्यामध्ये एक कामगारापासून नंतर कितीही कामगार असले तरी त्या कामगाराला वरील सर्व कामगार कायदे लागू होत असतात. नवीन आलेल्या सरकारकडून आमची एवढीच अपेक्षा होती की, कामगार कायदा अजून शक्तीशाली कसा होईल, माथाडी कामगारांना कायद्याच्या चौकटीत राहून अधिक ताकद कशी मिळेल हे पाहिले जाईल असे आम्हाला वाटले होते परंतु तसे झालेले नाही.

सभापती महोदय, माथाडी मंडळाचा उल्लेख करणे महत्वाचे आहे. आपल्या राज्यात साधारणत: 35 ते 40 माथाडी मंडळ कार्यरत आहेत. माथाडी मंडळ जिल्हयामध्ये तसेच शहरातही काम करीत असतात. प्रत्येक माथाडी बोर्डाची रचना वेगवेगळया कामापुरती मर्यादित आहे. मुंबईमध्ये 10 माथाडी मंडळ काम करतात, तर 25 माथाडी मंडळ बोर्ड जिल्हयांमध्ये काम करतात. महाराष्ट्रामध्ये एकंदर 3 लाख माथाडी कामगारांची नोंदणी झाली असून 90 हजार मालकांची विविध माथाडी मंडळांमध्ये नोंदणी झालेली आहे. माथाडी कामगारांची प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. माथाडी कामगार ज्या मालकाकडे काम करतो तो मालक लेव्हीच्या माध्यमातून मजुरी बोर्डामध्ये जमा करतो. बोर्डामध्ये मजुरीची विगतवारी केली जाते. आज माथाडी मंडळातील कर्मचाऱ्यांची संख्या फार कमी झालेली आहे. विविध माथाडी मंडळामध्ये 17 अध्यक्षांची आवश्यकता आहे. विदाऊट चेअरमनेचे बोर्ड चालविणे हे सोपे काम नाही. एका बोर्डाच्या चेअरमनकडे 2/3 कामगार बोर्डाची कामे बघतो आहे. 22 गव्हर्मेंट लेबर ऑफिसर माथाडी बोर्डवर सचिव म्हणून काम करीत असतात त्यांची 22 पदे रिक्त आहेत. माथाडी बोर्डाच्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. नवीन कर्मचारी भरण्यासाठी राज्य सरकार परवानगी देत नाही. आऊट सोर्सीगने कर्मचारी भरा असे राज्य शासनाचे म्हणणे आहे. माथाडी बोर्डासाठी राज्य सरकारचा एक रुपया

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील .......

सुध्दा खर्ची पडत नाही. राज्य सरकार अनुदान देत नाही, राज्य सरकार माथाडी बोर्डला पैसे देत नाही परंतु त्याच माथाडी बोर्डावर जर कर्मचारी भरावयाचा असेल तर त्याला राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते. राज्य सरकारची परवानगी कशासाठी घ्यावयाची असते हे मला सुध्दा कळत नाही. घटनेप्रमाणे कर्मचारी भरावयाचे असतील त्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत व तरतुदीच्या नावाखाली राज्य शासन आम्हाला माणसे वाढवून देत नाही, ना आऊट सोर्सींगची माणसे आमच्याकडे कामाला येत नाही. आम्हाला कायद्याची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी आम्हाला स्टाफही दिला जात नाही. आज माथाडी कामगारावर मोठया प्रमाणात ताण पडलेला आहे. यदाकदाचित जास्त कामामुळे माथाडी कामगाराचा कामाच्या ठिकाणी जीव गेला तर त्याची जबाबदारी सरकारवर येईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

ग्रोसरी बोर्डामध्ये मंजूर पदे 73 असून त्यापैकी 30 पदे रिक्त आहेत. ही 30 पदे भरण्यात आलेली नाहीत.एकूण 15 हजार ग्रोसरी बोर्डस आहेत त्यांची कामे इतर कर्मचारी करीत आहेत. तेथील कर्मचारी कशा प्रकारे काम करीत आहेत हे आपण जाणून घ्या. हे सर्व कर्मचारी टप्प्याटप्प्याने निवृत्त झाले आहेत. तेथील पदे वाढवून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. आज ही चर्चा संपल्यानंतर लगेच परिपत्रक काढावे की, माथाडी कामगारांच्या मुलांना त्या त्या माथाडी मंडळामध्ये भरती करण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात माथाडी कामगार कायदा आणला. स्व.गोपीनाथजी मुंडे यांच्या नावावर माथाडी कामगार मंडळ स्थापन करण्यात येणार असल्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये वाचला. बजेटमध्ये देखील त्याचा उल्ल्ेख करण्यात आलेला आहे. पण या मंडळावर काम करण्यासाठी कर्मचारी वर्ग कोण देणार याचा कुठेच उल्लेख करण्यात आलेला नाही. अस्तित्वात असलेली माथाडी मंडळे चांगली चालली पाहिजेत. त्यांना ताकद कशी देता येईल, त्यांना कर्मचारी वर्ग कसे देता येईल याचा विचार न करता काही लोकांना खूष करण्यासाठी माथाडी मंडळे जाहीर करीत असाल तर ती लोकांची दिशाभूल करण्यासारखे आहे.

श्री.प्रकाश मेहता : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून सांगतो की, स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार माथाडी मंडळ काढण्यात आलेले आहे ते काही लोकांना खूष करण्यासाठी काढलेले आहे असा हेत्वारोप सन्माननीय सदस्यांनी केला. मागील 10-15 वर्षापासून ऊसतोड कामगारांसाठी हा प्रयत्न सुरु होता आणि यावेळी ते बोर्ड बनविले. विषय एवढाच आहे की, स्व.गोपीनाथजी मुंडे हे त्या क्षेत्रातील नेते होते म्हणून त्यांचे नाव दिलेले आहे. हा निर्णय काही लोकांना खूष करण्यासाठी घेण्यात आलेला आहे असे जे वक्तव्य सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते )**: सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य तपासून घेण्यात येईल. त्यात काही आक्षेपार्ह आढळल्यास ते कामकाजातून वगळण्यात येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, आपण घरेलु कामगारांसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. आपण घरेलु कामगार कायदा केला, पण् या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्टाफ दिलेला आहे काय ? कन्स्ट्रक्शन वर्कर्सचे माथाडी मंडळ स्थापन झाले. त्यांना सुद्धा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. स्व.गोपीनाथजी मुंडे ऊसतोड कामगार माथाडी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला असला तरी त्यासाठी स्टाफ दिलेला आहे काय ? ऊसतोड कामगारांचा प्रश्न अनेक वर्षापासून होता. आपणास संधी मिळाली, आपण त्याचे सोने केले त्याबद्दल आपले स्वागत आहे. आपण स्व.गोपीनाथजी मुंडे ऊसतोड कामगार माथाडी मंडळ स्थापन केले पण त्यासाठी आपणास स्टाफ द्यावा लागेल. आपण मंडळाची घोषणा केली, परंतु या मंडळाचे कार्यालय कुठे असेल, तेथे किती कर्मचारी असतील, कोणत्या अधिकाऱ्याकडून ते बोर्ड चालविण्यात येईल याचा काही उल्लेख करण्यात आलेला नाही. माझे असे म्हणणे आहे की, आपण इतर माथाडी मंडळांकडे दुर्लक्ष करीत आहात त्याप्रमाणे या नवीन मंडळाकडे दुर्लक्ष करु नका. स्व.गोपीनाथजी मुंडे ऊसतोड कामगार माथाडी मंडळास निधीच्या माध्यमातून इतर सोयी उपलब्ध करुन देत आहात त्यामध्ये कर्मचारीवर्ग द्यावा अन्यथा आम्हाला याच बाकावरुन बोलावे लागेल की, एक वर्ष झाले तरी या मंडळाला कर्मचारी वर्ग दिलेला नाही. आपण ऊसतोड कामगारांची का फसवणूक करीत आहात ?

सभापती महोदय, माथाडी कामगारांसाठी माथाडी ॲडव्हायझरी कमिटीचे गठन झाले. या ठिकाणी माथाडी ॲडव्हायझरी कमिटीचा उल्लेख करणे फार गरजेचे आहे. दिनांक 6 फेब्रुवारी, 2006 रोजी माथाडी ॲडव्हायझरी कमिटीचे गठन करण्यात आले. सन 1995 ते 1999 या कालावधीत युतीचे सरकार होते. त्यावेळी स्व.साबीर शेख हे कामगार मंत्री होते आणि श्री.प्रकाश मेहता हे राज्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी माथाडी चळवळीमध्ये काम करणाऱ्या लोकांना नजरअंदाज केले नाही. या ॲडव्हाझरी कमिटीची जबाबदारी एवढीच आहे की, एखाद्या उद्योगाला किंवा उद्योगपतीला वाटले की, ते माथाडी कामगारांपेक्षा जास्त सवलती देऊ शकतात तर त्या उद्योगपतींनी त्या कलमाखाली एक्झम्प्शन करण्यासाठी अर्ज करायचा असतो. या ठिकाणी नवीन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

सरकारने एवढेच केले की, माथाडी चळवळीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीची सदस्य म्हणून नियुक्ती न करता ज्यांचा माथाडी चळवळीशी काही संबंध नाही त्यांना ॲडव्हायझरी कमिटीवर सदस्य म्हणून घेतले. ते कामगार नेते असू शकतील त्याबद्दल माझा वाद नाही. ॲडव्हाझरी कमिटीमध्ये कोणाला घ्यायचे हा त्यांचा विषय असला तरी या कायद्यामध्ये बराचशा लोकांना सूट मिळण्याची शक्यता आहे असे आम्हाला वाटते. तेव्हा माझी मागणी आहे की, या सल्लागार समितीमध्ये माथाडी चळवळीतील व्यक्तीला सदस्य म्हणून घेतले पाहिजे.

सभापती महोदय, या पूर्वी आघाडीचे सरकार होते. दोन्ही पक्षातील मंडळी सदस्य म्हणून काम करीत होती. त्यामध्ये दोघांना न्याय मिळत होता. ॲडव्हायझरी कमिटीमध्ये उद्योगपतींचे जे काही प्रश्न येत होते, ते प्रश्न सोडविण्याचे काम ही कमिटी करीत होती.

सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा उल्लेख करतो. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारा कामगार, ज्याला कोणत्याही कामगार कायद्याचे संरक्षण मिळत नसेल किंवा काही लोकांना माथाडी कामगारांचा कायदा लागू करायचा नसेल अशा लोकांनी उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली. त्या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावर उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, ज्या कामगारांना कोणतेही कायदे कंपनी मालक व ठेकेदार लागू करीत नसेल तर ते कामगार माथाडी कामगार कायद्यामध्ये नोंदीत झाले पाहिजेत. परंतु ते माथाडी स्वरुपाचे काम असणे गरजेचे आहे. "माथाडी कामगार" म्हणजे माथ्यावर, पाठीवर ओझे वाहणारा कामगार अशी त्याची व्याख्या आहे. असे काम कोणी करीत असेल तर त्या ठिकाणी माथाडी कामगार कायदा लागू करण्यात यावा. या संदर्भात उच्च न्यायालयाचा निर्णय दिल्यावर उद्योगपती सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने देखील तोच निर्णय कायम ठेवला. ज्या उद्योगधंद्यांमध्ये, कारखान्यामध्ये माथाडी स्वरुपाचे काम चालत असेल त्यांना माथाडी कामगार कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील...

सभापती महोदय, मध्यंतरी माननीय मुख्यमंत्री पिंपरी-चिंचवड येथे गेले होते. माननीय उद्योगमंत्री देखील गेले होते. त्यांनी त्या ठिकाणी भाष्य केले की, "औद्योगिक क्षेत्रामध्ये माथाडी कामगार कायद्याच्या संदर्भात काही बदल सूचवू इच्छितो" माझे असे म्हणणे आहे की, कारखान्यामध्ये माथाडी कामगार कायद्याची काय गरज आहे ? त्या ठिकाणी फॅक्टरी ॲक्ट लागू होत असेल तर तो ॲक्ट लागू करावा. आम्ही बाकीचे कामगार कायदे लागू करतो पण आम्हाला माथाडी कामगार कायद्यापासून सवलत द्यावी असा प्रस्ताव काही उद्योगपतींनी त्यांच्याकड दिला असेल किंवा काही उद्योगपती त्यांना भेटले सुद्धा असतील. राज्याच्या प्रमुखांनी असे केलेले वक्तव्य मला पटलेले नाही. माझ्याकडे पेपर्सचे कटींग्ज आहेत. आम्हाला काही बोर्डाकडून माहिती मिळाली. राज्याच्या प्रमुखांकडून अशा प्रकारचे भाष्य होणे बरोबर नाही. मी या संदर्भात काही शोध घेण्याचा प्रयत्न केला.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील....

महोदय, कामगारांच्या विषयासंदर्भात अधिकाऱ्यांच्या समितीचे गठण करण्यात आले. त्या बाबतचा उल्लेख करणे फार गरजेचे आहे. उद्योग सचिव श्री.सुरेंद्रकुमार बागडे यांच्या....

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह अडीच तासात पूर्ण करावयाची आहे. आपण गेल्या अर्ध्या तासापासून या प्रस्तावावर बोलत आहात. मला वाटते आता आपण आपले भाषण आटोपते घ्यावे, एवढीच विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, नियमानुसार 260 अन्वयेच्या प्रस्तावावर अडीच तास चर्चा केली जाते. महोदय, मुळात या सभागृहामध्ये कामगारांच्या संदर्भातील विषयांवर फार कमी चर्चा होते. हा प्रस्ताव नियम 260 अन्वये स्वीकृत केलेला आहे. राज्यातील कामगारांवर जे संकट येऊ घातले आहे त्या विषयीचा हा प्रस्ताव आहे. आतापर्यंत म.वि.प. नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या सर्वच प्रस्तावावरील चर्चेसाठी अधिकची वेळ देण्यात आलेली आहे. माझी विनंती आहे की, या प्रस्तावावरील चर्चेला सुध्दा कमी-अधिक वेळ वाढवून द्यावा.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीची काही कागदपत्रे माझ्याकडे आहेत. उद्योग विभागाच्या सचिवांचा आणि कामगार कायद्यांचा संबंध कसा येतो हा मला प्रश्न पडला आहे. उद्योग विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या बैठकीमध्ये विविध कामगार कायदे रद्द करण्याची चर्चा होते आणि त्या दृष्टीने अंमलबजावणी सुरु होते, हे बघून अतिशय वाईट वाटते. कामगाचे विभागाचे सह सचिव श्री.बाळासाहेबजी कोळसे, कामगार आयुक्त श्री.जावळे, इंडस्ट्री सेफ्टी आणि हेल्थचे श्री.मोरया आणि स्टीम बॉयलरचे श्री.बढे हे त्या बैठकीला गेले होते. महोदय, नवीन सरकार आल्यानंतर नवीन उद्योग धोरण तयार करणे स्वाभाविक आहे, किंबहुना महत्त्वाचे आहे. नवीन सरकार आल्यानंतर राज्यातील उद्योग कसे असावेत, कायदे कसे असावेत या बाबत चर्चा करणे स्वाभाविक आहे. परंतु या संदर्भातील चर्चा करीत असताना उद्योगपतींना कामगार कायद्यातून वगळण्याबाबतचा विचार का केला जातो हा माझ्यासारख्या कामगार नेत्याला प्रश्न पडला आहे. महोदय, माथाडीच नव्हे तर सुरक्षा रक्षकांमधून सवलती देऊ पाहत आहेत. इंडस्ट्रीयल डिस्पुट ॲक्ट, कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट, प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट अशा प्रकारे या राज्यात चांगल्या पध्दतीने

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील....

राबविलेल्या कामगार कायद्यांना बगल देण्याचे काम या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून होत आहे. या विषयी मी माननीय मंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांना विनंती केली होती की, आपण या प्रकरणात लक्ष घालावे. मी त्यांना सांगितले की, मागच्या काळात आपण राज्यमंत्री असताना माथाडी कामगारांना चांगली ताकद दिली होती. त्यावर माननीय मंत्री म्हणाले की, मला अशा प्रकारच्या बैठकीची माहितीच नाही. महोदय, या राज्याच्या जबाबदार असलेल्या माननीय कामगार मंत्र्यांना कामगारांशी निगडित असलेल्या प्रश्नांची कल्पना नसेल तर या भविष्यात या कामगार विभागाचे काय होईल, याबाबत मला प्रश्न पडला आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कामगारांच्या विषयाबाबत त्यांनी जेव्हा माझ्याशी चर्चा केली तेव्हा मला या विषयी माहिती नव्हती. मला वाटते सन्माननीय सदस्य भाषणाच्या ओघात हे बोलले असतील. या 260 अन्वये प्रस्तावाचा गाभा "कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केलेला असणे," असा आहे. मी पुन्हा सांगतो की, उद्योग विभागाने काही प्रस्ताव तयार केला असेल आणि कामगार विभागाला दिला असेल तर त्या बाबत सकृतदर्शनी कामगार विभागाची चर्चा झालेली नाही असे मी त्यांना सांगितले होते. नाही तर असा समज होईल की, कामगार मंत्री म्हणून या संदर्भातील जबाबदारी आमची असताना सुध्दा त्यातील मुद्यांबाबत आम्हाला माहिती नाही. सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून आम्हाला माहिती मिळाली. मी पुनश्च एकदा सांगतो की, कामगार विभागाकडे असा कोणताही प्रस्ताव आलाच नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय जबाबदारीने बोलत आहेत. कामगार मंत्री हे पद देखील जबाबदारीचे आहे. कामगार आयुक्त ज्यावेळी या विषयासंदर्भातील बैठकीला जातात त्यावेळी त्यांना या विषयाची कल्पना नसेल काय, उद्योग विभागाचे सह सचिव या बैठकीला जातात त्यावेळी त्यांना या विषयाची कल्पना नसेल काय ? तरी सुध्दा मंत्री महोदय, माझ्याकडून चुकून एखादा शब्द गेला असेल तर मी क्षमा मागतो.

श्री.प्रकाश महेता : महोदय, या प्रस्तावावरील चर्चा अधिक चांगली व्हावी, किंबहुना राज्यातील कामगारांच्या हिताच्या दृष्टीने चालावी अशी सर्वांची अपेक्षा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना क्षमा मागण्याचे कारण नाही. मला वाटते त्या बैठकीमध्ये आयुक्त, उपायुक्त, सह सचिव



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

हे त्या संदर्भातील माहिती जाणून घेण्यासाठी गेले असतील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी उद्योग विभागाने सांगितले तेच करण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे अशी समजून करुन बोलता कामा नये. मी सन्माननीय सदस्यांच्या प्रत्येक मुद्याशी सहमत आहे. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत त्यानुसार झाले तर, या विषयी त्यांचे जे मत असेल त्याला जोडूनच माझे मत राहील, हेच या निमित्ताने सांगतो. या प्रस्तावाच्या मूळ गाभ्यामध्ये तीन-चार मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. कारखाना बंद करण्यासाठी 100 कामगारांची मर्यादा 300 करण्यात आल्याबाबतचा उल्लेख या प्रस्तावाच्या विषयात आहे. मला वाटते, अशा मुद्यांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सकारात्मक विचार मांडले तर बरे होईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील हे अतिशय पोटतिडकीने बोलत आहेत. माननीय तालिका सभापती महोदय, आपण आणि सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील एकाच मतदासंघातील आहात. सन्माननीय सदस्य सातत्याने आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून कामगारांच्या बाबतीत प्रश्न मांडत असतात. मी बोलतो ते काही चुकीचे नाही. हा नियम-260 चा प्रस्ताव असून या प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांना बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी प्रत्येक वेळी व्यत्यय आणण्यापेक्षा त्यांनी सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे व उत्तराच्या वेळी त्या बाबतचा खुलासा करावा.

**तालिका सभापती** : रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये एवढेच मंत्री महोदयांचे म्हणणे होते.

श्री.नरेंद्र पाटील :महोदय, उद्योग विभागाच्या सह सचिवांनी जे नोटीफिकेशन काढलेले आहे त्यातील काही भाग मी वाचून दाखवितो. फॅक्टरी ॲक्टच्या बाबतीत उद्योग विभागाच्या सचिवांनी जो बदल सुचविला आहे त्या संदर्भात सह सचिव श्री.कोळसे यांनी दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 रोजी नोटीफिकेशन काढले आहे. त्यात त्यांनी ड्राफ्ट असा उल्लेख केला आहे. त्यात नमूद केले आहे की, लवकरात लवकर हरकती आल्या नाही तर ही बाब आम्ही शासनासमोर ठेवू. परंतु या ठिकाणी माननीय मंत्री सांगत आहेत की, मला याची काहीच कल्पना नाही. अशा वेळी आमच्यासारख्या सामान्य माणसाला वाटेल की, माननीय मंत्री दिशाभूल करीत आहेत की काय ? महोदय, तीन नोटीफिकेशन काढण्यात आले. फॅक्टरी ॲक्ट, कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट तसेच शॉप आणि एस्टॅब्लीशमेंट ॲक्टमध्ये मोठा बदल करण्यासाठी हे नोटीफिकेशन काढले आहेत.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील....

महोदय, दोन-तीन दिवसांपूर्वी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कामगार कायद्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या बदलांबाबतचा तारांकित प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी चांगले उत्तर दिले. त्यांनी दिलेल्या उत्तराची प्रत माझ्याकडे आहे. परंतु या संदर्भात ज्या पध्दतीने हालचाली सुरु आहेत त्या पाहता आम्हाला भीती वाटते. महोदय, आमच्या पक्षाचे सरकार असताना अशा प्रकारचे थोडी काही घडले तर आम्ही माननीय श्री.अजितदादा पवार आणि माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे जात होतो.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

आम्ही त्यांना सांगत होतो की, हे कामगार विरोधी धोरण असू शकते, तुम्ही हे थांबवा. त्यावेळी ते थांबविले जात होते. दुर्भाग्याने आज आम्ही येथे बसलो आहोत. हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात विषय मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे आणि ते काम आम्ही या ठिकाणी करीत आहोत. (अडथळा) माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात व अर्थसंकल्पीय भाषणात मेक इन महाराष्ट्र आणि डिजिटल इंडिया असे 2 उल्लेख झाले. भविष्यात महाराष्ट्र कसा घडवावा, उद्योगधंदा कसा वाढवावा असे त्यांचे विचार असतील तर ते नक्कीच मांडावेत. परंतु कामगार आयुक्तांनी 30 जानेवारीला एक नोटिफिकेशन काढले. तुम्हाला महाराष्ट्र घडवायचा आहे ही चांगली गोष्ट आहे. 20 विविध कामगार कायद्यांच्या अंतर्गत तुम्हाला काही सुचवायचे आहे का हा प्रश्न ते आमच्या विविध कामगार संघटनांना विचारीत आहेत. तुम्हाला विकास घडवायचा असेल, उद्योगधंदे वाढवायचे असतील, परदेशातील कंपन्यांना येथे आणून काम करायचे असेल तर तुम्हाला कामगार कायदा बदलण्याची काय गरज आहे ? शेतकऱ्यांचा, उद्योगपतींचा, महाराष्ट्रात राहणाऱ्या कष्ट करणाऱ्या माणसांचा, काबाडकष्ट करणाऱ्या कामगारांचा, गिरणी कामगारांचा विचार करण्याचा सरकारचा अधिकार आहे. परंतु जर अशाप्रकारचे परिपत्रक येत असेल तर आम्हाला एवढेच वाटेल की, आम्हाला हद्दपार करण्याचा निर्णय नवीन आलेले सरकार करीत आहे.

सभापती महोदय, सिक्युरिटी माथाडी बोर्डाचा उल्लेख झाला आहे. राज्यात सुरक्षा रक्षक कायदा फार महत्त्वाचा आहे. तो कायदा राज्यापुरता मर्यादित आहे. केंद्र शासनामध्ये तो नाही. तेथे त्याचे नाव वेगळे असू शकते. स्व. माधवराव भोसले यांच्या कष्टाने हा कायदा निर्माण झाला आहे. आस्थापनांमध्ये वॉचमन, सिक्युरिटी गार्ड काम करीत होते, ते ठेकेदारांच्या माध्यमातून काम करीत होते, ते विविध लोकांच्या माध्यमातून काम करीत होते, अशा लोकांना नोंदित करण्याचे काम झाले. राज्यात मुंबईत 35 हजार सुरक्षा रक्षक मुंबईच्या माथाडी बोर्डात नोंदित आहेत तर 3600 मालक म्हणून नोंदित आहेत. समितीच्या माध्यमातून सुरक्षा रक्षक कायदा कारखान्यांतून वगळण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. आम्ही कामगार कायदा, माथाडी कामगार कायदा या दोन्ही कायद्यांना जोपासण्यासाठी कायद्याच्या चौकटीत आणण्यासाठी किती परिकाष्ट केलेली आहे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

याची साहेबांना कल्पना नसेल. सुरक्षा रक्षक कामगारांच्या संदर्भात व्यापारी वर्ग उच्च न्यायालयात गेला. उच्च न्यायालयात गेल्यानंतर कलम 23 अंतर्गत सूट देता येण्ार नाही हा मुद्दा त्यांनी पटवून दिला आणि नंतर ते सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयातून आल्यानंतर परत उच्च न्यायालयाचा निर्णय आम्हाला लागू करा, तोच निर्णय योग्य आहे, सुरक्षा रक्षकांना हा कायदा लागू झाला पाहिजे असे सांगितले गेले. दिनांक 14 एप्रिल, 2008 ला विधानसभेत या संदर्भात जवळपास 1 तास 15 मिनिटे चर्चा झाली.

सभापती महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे त्यावेळी विरोधी पक्षात होते. सुरक्षा रक्षक कायद्याच्या संदर्भात आताचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, राज्याचे नेते माननीय श्री. अजित पवार, माननीय मंत्री श्री. रामदास कदम, माजी सन्माननीय सदस्य सर्वश्री नरसय्या आडम, नरसिंगराव पाटील, सचिन अहिर, ॲड. वामनराव चटप, सन्माननीय सदस्य सर्वश्री शिवाजीराव नाईक, शशिकांत शिंदे, भाई जगताप यांनी भाषणे केली होती. हा कायदा कसा सक्षम व्हावा, या कायद्यानुसार कामगारांना अजून कसा न्याय मिळेल या संदर्भात चर्चा झाली होती. मी ती सर्व चर्चा पटलावर ठेवतो. आपण विधानसभेत बसता त्यावेळी आपली भूमिका वेगळी असते आणि सत्तेवर आल्यावर भूमिका वेगळी असते. मग आम्ही हे कसे मान्य करायचे ? कामगार खात्याची भूमिका आम्ही कशी मान्य करायची ? सभापती महोदय, कॉँट्रॅक्ट लेबर ॲक्टचा विषय आहे, मिनिमम वेजेस ॲक्टचा विषय आहे. कारखान्यात काम करणारे 100 पेक्षा कमी कामगार आता 300 वर नेऊन ठेवायचे, तुम्ही किती लोक देशोधडीला लावणार आहात ? सभापती महोदय, या संदर्भात सभागृहात विचार होणे गरजेचे आहे. आपण हा विषय गांभीर्याने घेत नसला तरी आता घ्यावा. कारण याचा परिणाम होणार आहे. काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद झाल्या, त्यावेळी याचा परिणाम आपण पाहिला आहे. माथाडी कामगारांचा संप झाला त्यावेळी सरकारला समजले की, माथाडी कामगारांना वगळण्याचा प्रयत्न केला तर किती वाईट परिणाम होऊ शकतो. माननीय मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य आले की, माथाडींमध्ील काही गुंडगिरी आम्ही संपवून टाकू. खरे शब्द काय असतील ते असतील. आता ते मी सांगत नाही. माथाडींची गुंडगिरी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

कोठून आली ? पुण्याच्या पिंपरी-चिंचवड येथील उद्योगपतींकडे खंडणी मागणारी मंडळी कशी पोहचतात तेच मला कळत नाही. मी विचारतो की, ज्यांनी तक्रार केली त्यांनी माथाडी कामगारांच्या कायद्याची अंमलबजावणी केली का ? आपण हे देखील पाहिले पाहिजे. उद्योगपती कामगार कायद्याची अंमलबजावणी करीत नाहीत. बोर्डाचा अधिकारी येऊन तपासणी करतो, त्यावेळी एखादा कामगार नेता म्हणतो की, कामगार कायदा लागू करा, त्यावेळी उद्योगपती खंडणी बहाद्दर गुंडांना हाताशी धरतात आणि कामगार कायदे लागू करीत नाहीत. मग तुम्ही कोणाला हद्दपार करणार आहात, कारखान्यात काम करणाऱ्या कष्टकरी कामगारांना, माथाडी कामगार कायद्याला की त्या गुंडांना हद्दपार करणार आहात ?

सभापती महोदय, मला वाटते की, कारखानदारांनी कामगार कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी केली तर माथाडींमध्ये आयुष्यात कधीही गुंडगिरी येऊ शकत नाही. गुंडगिरीची भाषा करणाऱ्यांना मी सांगू शकतो की, अशा गुंडगिरीला मी सुध्दा एकदा सामोरा गेलो आहे. माझ्या जीवावर बेतले आहे. परंतु त्यावेळी आम्ही डगमगलो नाही. आम्ही गुंडांच्या नावाखाली पैसे घेत होते, त्या लोकांना उच्च न्यायालयात जाऊन त्यांच्या विरोधात केस लढवून त्यांना हद्दपार करण्याचे काम केले आहे. आंतरराष्ट्रीय गुंडांचे कॉल येतात, तेव्हा प्रत्येकाला काय होत असेल हे ज्याचे त्याला माहीत असते. खुर्चीवर बसल्यानंतर खाली रस्सी बॉंब ठेवला तर आपली काय परिस्थिती होईल, तो रस्सी बॉंब फुटला तर आपले काय होईल ? फोन येतो त्यावेळी परिस्थिती समजते.

सभापती महोदय, कामगारांच्या चळवळीत गुंडगिरीचा सहभाग वाढू लागला आहे. आपण कामगार कायदा करताना गुंडासाठी बंदोबस्त का करू शकत नाही ? साबिर शेख कामगार मंत्री असताना निर्णय झाला होता की, एखाद्या माथाडी कामगाराला नवीन नोंदणी करायची असेल तर पोलीस स्टेशनची एनओसी घ्यावी लागते. आजही त्याची अंमलबजावणी होत आहे. मी विचारतो की, मग तुम्ही कामगार नेत्यांना एनओसी घेण्यासाठी कायदा का लावू शकत नाही ? जे कामगार नेते कामगार चळवळीच्या चौकटीत काम करतात अशांना पोलीस एनओसी घेण्यास काहीच अडचण येणार नाही. खंडणी बहाद्दर, गुंड प्रवृत्तीची माणसे जी नावापुरता माथाडींचा वापर करतात आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील ....

खंडणी वसूल करतात अशांवर निर्बंध येणे गरजेचे आहे आणि असे आले तर आम्ही स्वागत करू. परंतु तुम्ही कारखान्यामधून माथाडी कामगार कायदा काढण्याचा विचार करू नका. गुंडगिरीला फेस करीत भाजीपाला मार्केटमध्ये मोहिते नवाच्या कामगाराच बळी गेला. परंतु ते काहीही करू शकले नाहीत. पिंपरी चिंचवड भोसरी मधील गुंडगिरी मला भोगावी लागली आहे. माझ्या संघटनेचे 800-900 कामगार आहेत. माझे मोठे बंधू स्व. शिवाजीराव पाटील साहेबांनी सुरू केलेली पतपेढी नकळत आम्हाला सोडावी लागली. मी काहीच करू शकलो नाही. श्री. सत्यपाल सिंग त्यावेळचे पोलीस आयुक्त होते आणि आजचे खासदार आहेत, त्यांना तंतोतंत माहिती होती. परंतु दुर्भाग्याने आम्ही काहीही करू शकलो नाही. आपण गुंडाच्या उपद्रवाचा बंदोबस्त करावा. कारखान्यात काम करणाऱ्या माथाडी कामगारांसाठी कायद्याची अंमलबजावर्णी न करता तेथून वगळण्याचा निर्णय आपण करू नये. कामगारा्ंरची संख्या फार महत्त्वाची आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील..........

सभापती महोदय, कामगार कायद्यातील कामगारांच्या संख्येबाबतची तरतुदही अतिशय महत्त्वाची आहे. त्यामुळे त्या बाबत देखील विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आपण कामगारांसाठी कायदे करीत असतो. परंतु, या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कामगार विभागामध्ये पुरेसे मनुष्यबळ नसेल तर कामगारांना त्याचा लाभ कसा मिळेल ? कामगारांचा भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, कामगारांसबंधीचे अन्य प्रश्न सोडविण्यासाठी कामगार विभागात पुरेसे अधिकारी आणि कर्मचारी असणे आवश्यक आहे. माझी या निमित्ताने कामगार मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी कामगार विभागामध्ये रिक्त असलेली अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरावीत. जेणेकरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

सभापती महोदय, या शासनाने काही चांगले निर्णयही घेतले आहेत आणि त्याचाही उल्लेख करणे गरजेचे आहे. पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. या पूर्वी एलएफओएन म्हणून 45 दिवसांच्या वेतनाएवढी नुकसान भरपाई मिळत होती. आता नवीन सरकारने असे सुचविले आहे की, किमान 60 दिवसांच्या वेतनाएवढी नुकसान भरपाई कामगाराला मिळाली पाहिजे. ही गोष्ट कामगारांच्या खूप हिताची आहे.

सभापती महोदय, बोनसच्या तरतुदीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांपासून बोनससाठी 8.33 ची मर्यादा घालण्यात आली आहे. ही मर्यादा 20 टक्क्यांपर्यंत वाढविली पाहिजे. ते शक्य नसेल तर किमान 10 टक्क्यांपर्यंत तरी शासनाने ती वाढवावी, अशी माझी मागणी आहे. त्याचप्रमाणे बोनससाठी रकमेची मर्यादा 10 हजार रुपये आहे. ती देखील 30 हजार रुपयांपर्यंत वाढविली पाहिजे, अशा प्रकारची मी मागणी करतो.

सभापती महोदय, कामगारांच्या हिताच्या तरतुदी कायद्यात केल्या तर निश्चितपणे आम्ही कामगार मंत्री महोदयांचे स्वागत करु.

सभापती महोदय, मला बोलण्याची अपुरी संधी मिळाली. कारण, कामगार नेते म्हणून आम्हाला कितीही बोलण्याची संधी दिली तरी ती आम्हाला कमी पडणार आहे. हा आमच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. मी आपले आभार मानतो आणि थांबतो.

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी अतिशय चांगले व पोटतिडीकीने भाषण केले आहे. आम्हालाही पोट आहे आणि आम्हालाही तिडीक आहे. आमचे सरकार येऊन 120 दिवस झाले आहेत. त्यांनी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत, त्या किती वर्षांच्या आहेत ? यापूर्वी 15 वर्षे कामगार विभागाचा कार्यभार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्री महोदयांकडे होता. या नंतर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे बोलणार आहेत. ते राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य आहेत. त्यामुळे त्यांनी या प्रस्तावावरील अर्धे उत्तर द्यावे, उर्वरित अर्धे उत्तर मी देईन.

प्रस्ताव प्रस्तूत झाला.

---------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, मी स्वत: आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये 'कामगार कायद्यातील कामगारविरोधी प्रस्तावित बदल व वीज दरवाढीमुळे उद्योगांचे परराज्यात होणारे स्थलांतर', या विषयावर जो चर्चेचा प्रस्ताव दिला आहे, त्यामध्ये भाग घेण्यासाठी व माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सुरुवातीलाच एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की, गेली 15 वर्षे, त्या पूर्वीची साडेचार वर्षे आणि त्या अगोदरची जेवढी वर्षे असतील तेवढी वर्षे, विशेषत: सन 1995 नंतर आजपर्यंत, कामगारांसंबंधी या सभागृहामध्ये अनावधानानेच चर्चा होत आली आहे. आज जी काही परिस्थिती देशभर तयार झाली आहे, मी त्याला 'भीती' म्हणेन, कारण मंत्री महोदयांनीच उभे राहून 'भीती' हा शब्द वापरला आहे, त्या भीतीच्या पार्श्वभूमीतून एवढ्या वर्षातून आज ही चर्चा होत असेल तर आपण आम्हाला न्याय द्यावा आणि अधिकचा वेळ द्यावा, अशी आमची स्वाभाविक विनंती आहे.

सभापती महोदय, कै.नारायण सुर्वे हे कामगार कवी होते. आम्ही दोघांनी एकत्र काम केले आहे. आज राज्यात कामगार साहित्य संमेलन भरविले जाते. त्याची सुरुवात कवी कै.सुर्वे आणि मी केली आहे. ती संकल्पना आमची होती. कै.नारायण सुर्वे यांनी एक कविता केली आहे. ती फार चांगली आहे. ती कविता मी एखाद-दुसरा शब्द बदलून येथे म्हणणार आहे.

कामगार आहे मी
तळपती तलवार आहे मी
'प्रकाश मेहताजी', माफ करा
थोडासा गुन्हा करणार आहे मी.

सभापती महोदय, 'सारस्वतांनो' या शब्दा ऐवजी मी 'प्रकाश मेहताजीं'चे नाव त्यामध्ये घातले आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीचे मी जरूर स्वागत करीन. कामगार मंत्री महोदय वारंवार उठून हे सांगत आहेत की, अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव नाही. परंतु, मी आपल्या माध्यमातून

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.......

त्यांच्या हे निदर्शनास आणू इच्छितो की, अशा प्रकारचा प्रस्ताव नसताना सुध्दा आपले सरकार ज्यावेळी बहुमत सिध्द न करता या राज्यात बहुमतात आले, कारण बहुमत नंतर सिध्द झाले, पण सर्वात पहिले काम या सरकारने किंबहुना माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी कोणते केले असेल तर एकही अधिवेशन झाले नसताना कामगार कायदा, कंत्राटी कामगार कायदा, दुकाने व आस्थापना कायदा यामध्ये बदल करण्यासाठी राज्यपालांच्या स्वाक्षरीने अध्यादेश काढला. या अध्यादेशाचे नंतर काय होईल ते काळच ठरवील. परंतु, अध्यादेशाने सरकार चालत नाही तर त्याचे रुपांतर कायद्यात करावे लागते. हे रुपांतर आपण कधी करणार आहात ? एखादे सरकार जेव्हा अध्यादेश काढते त्यावेळी त्या सरकारचा मनसुबा निश्चित झालेला असतो. असे असताना कामगार मंत्री महोदय मात्र असे म्हणत आहेत की, आम्ही कामगार कायद्यात बदल करणार नाही. ते कशाच्या आधारावर असे म्हणत आहेत ? कंत्राटी कामगार आणि गुमास्ता लायसन्स बाबत बदल करण्यासाठी तुम्ही अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशाचे आज ना उद्या तुम्ही कायद्यात रुपांतर करणार आहात. परंतु, मी खात्रीपूर्वक सांगतो की, या महाराष्ट्रातील कष्टकरी तुम्हाला हे करु देणार नाही. मग अध्यादेश तुम्ही कशासाठी काढला होता ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, सर्वांची मते मागविण्यासाठी अध्यादेश काढला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एक बरे झाले या सरकारकडून आम्हाला नवीन गोष्ट शिकायला मिळाली आहे. शासनामध्ये, प्रशासनामध्ये कशा पध्दतीने कारभार चालतो, हे आम्हाला बघायला मिळाले आहे. परंतु, मी एक सांगू इच्छितो की, हा प्रश्न वैयक्तिकरित्या श्री.प्रकाश महेता यांच्याशी संबंधित नाही. सरकार म्हणून, सरकारची भूमिका म्हणून आम्ही याकडे बघत आहोत. श्री.प्रकाश महेता कामगार मंत्री म्हणून कार्यरत आहेत आणि म्हणून आमच्या त्यांच्याकडून जास्त अपेक्षा आहेत. सन्माननीय श्री.प्रकाश महेता यांच्या वडिलांनी गोदी कामगारांचे नेतृत्त्व केले आहे, याचीही मला माहिती आहे. म्हणून त्यांनी हा अध्यादेश एवढा लाईटली घेऊ नये.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

अध्यादेश काढणे म्हणजे कायदा करण्याच्या प्रक्रियेतील दोन पावले पुढे जाणे असे होते. मला या ठिकाणी काही महत्वाच्या गोष्टी सांगायच्या आहेत, त्या अशा आहेत की, अध्यादेश काढून देखील सरकार म्हणत असेल की, तसा कायदा आम्ही करणार नाही, याबाबत मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले तर त्याबाबत आमचे व राज्यातील कष्टकरी जनतेचे समाधान होईल. या देशात केंद्र सरकारचे 44 कायदे आहेत, राज्य सरकारचे 106 ते 107 कायदे आहेत, या 44 कायद्यांची अंमलबजावणी कशी करावी या बाबी राज्य शासनाच्या अखत्यारित आहेत. याबाबत अंमलबजावणी करण्याची प्रोसेस राज्य सरकारला करावी लागते, केंद्र सरकारला ती प्रोसेस करता येत नाही. कंत्राटी कायद्याचा अध्यादेश राज्य सरकारने काढला आहे, तो कायदा केंद्र सरकारचा आहे. गुमास्ता लायसन्स असेल, दुकाने व इतर लायसन्स असतील, या संदर्भातील हा अध्यादेश काढण्यात आला आहे. तो कायदा राज्य शासनाचा आहे. मंत्री महोदय सांगत आहेत, यामध्ये आमचा तसा मनसुबा नाही. त्यामुळे मंत्री महोदयांचा मनसुबा काय आहे, तो त्यांनी त्यांच्या उत्तरात सांगावे.

सभापती महोदय, काही महत्वाच्या गोष्टी मी मुद्दाम सांगत आहे, या देशातील कामगार चळवळ 136 वर्षे जुनी आहे, 44 कायद्यासाठी कष्टकरी जनतेने घाम गाळता आहे, रक्त सांडले आहे, आपल्याकडे ट्रेडिनल ॲक्टची सुरुवात 1926 मध्ये झाली आहे, त्या अगोदर किती अन्याय झाला असेल, याचा विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी काही कायद्यांचा उल्लेख केला आहे. सर्व कायद्यांसाठी देशातील कष्टकरी जनतेने रक्त सांडले आहे, देशात गुंतवणूक आलीच पाहिजे, 130 कोटी लोसंख्येचा हा देश आहे, तरूण लोकसंख्येचा देश आहे, येथे कोट्यवधी हात आहेत, त्यांना काम मिळालेच पाहिजे. काम मिळत असताना त्यांनी मुलभूत अधिकारासाठी जे लढे दिले, प्राणाची आहुती दिली, वेळप्रसंगी त्यांनी रक्त वाहिले, अशा प्रकारे त्यांचे अधिकार काढून घेण्यासाठी कायद्यात बदल होत असतील तर ते कोणालाही मान्य होणार नाही असे मला वाटते. इतर राज्यात काय झाले त्याबाबत मी नंतर सांगतो. परंतु महाराष्ट्रात असा प्रकार मुळीच होऊ दिला जाणार नाही. नारायण लोखंडे यांचे नाव घेण्यात आले आहे, देशातील कामगार चळवळ मुंबईतून सुरु झाली आहे. तिचा विसर कोणाला पडला आहे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

काय ? संयुक्त महाराष्ट्राचा लढा जेव्हा झाला तेव्हा 106 हुतात्मे झाले. त्यापैकी 104 हुतात्मे कामगार होते. जगात देशात व राज्यात जेवढ्या क्रांत्या झाल्या, त्या सर्व क्रांत्या कामगार, कष्टकरी व तरुणांनी केल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. फ्रान्स, रशिया चायना येथे क्रांती झाली आहे, हे सर्व बदल कष्टकरी लोकांनी केले आहेत. कष्टकरी माणसाच्या हाताला काम मिळेल या आशेने ते पाहत असताना त्याचे हात कापून टाकले जाणार असतील तर महाराष्ट्रातील कामगार ही बाब अजिबात सहन करणार नाही. याबाबत सरकार व मंत्री महोदयांकडून आम्हाला ठोस असे आश्वासन पाहिजे की, महाराष्ट्रात या बाबी आम्ही करणार नाही. हे शब्द मी फार जपून वापरीत आहे. महाराष्ट्रात शासन काय करणार नाही, इतर राज्यात काय केले आहे, आम्ही प्रस्तावात जे बदल सांगितले आहेत ते बदल आमच्या मनातील नाहीत. देशात कामगारांच्या संघटना आहेत, तशाच मालकांच्या संघटना आहेत, यामध्ये फिक्की, सीसीआय, एआयओई, एम्लॉयर यांच्या संघटना आहे,त या सर्व संस्थांनी पंतप्रधान व कामगार विभागाला चार्टड ऑफ डिमांड दिले आहे. चार्टड ऑफ डिमांड ही कामगारांची भाषा आहे, त्यांच्या भाषेत त्यांनी रिफॉर्म हा गोंडस शब्द वापरला आहे. त्यांना तो कॉरपोरेट शब्द वाटला पाहिजे चार्टड ऑफ डिमांड हा कामगारांचा शब्द आहे, तो उद्योजकांना कसा आवडेल.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले की, असा प्रस्ताव नाही, या रिफॉर्ममध्ये आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे तो प्रस्ताव व त्या व्यतिरिक्त 20 प्रस्ताव त्यांनी दिले आहेत. केंद्र शासनाचे 44 कायदे, राज्यातील 106 कायदे व इतर कायदे एकत्रित करुन त्यांची सरमिसळ कशी करता येईल असा प्रयत्न करण्यात आलेला आहे. देशाच्या व राज्याच्या कामगार विभागाला यासंदर्भातील उत्तर मी माझ्या सारख्या कामगार नेत्यांनी पाठविले आहे. मंत्री महोदयांना मला नम्रपणे सांगावेसे वाटते की, ही आमची नुसती भिती नसून या प्रस्तावात आम्ही ज्यांचा उल्लेख केला आहे ते सर्व बदल 14 जुलै, 2014 रोजी देशातील राजस्थान, मध्यप्रदेश व गुजरात सरकारने केले आहेत. त्याचप्रमाणे पंजाब सरकारचे आता अधिवेशन सुरु आहे हे सर्व बदल करण्याचा त्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे याबाबत भिती वाटणे स्वाभाविक आहे, मंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षा आहेत, उद्योगाला चांगले वातावरण असायला पाहिजे, याबाबत कोणाच्याही मनात

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

शंका असण्याचे कारण नाही. 1991 मध्ये ग्लोबलायजेशनची स्वीकृती केल्यानंतर जीडीपी दोन अंकी होण्याचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न साकार होईल ही बाब मला मान्य आहे. यामध्ये उद्योगाचा व शेतीचा फार मोठा भाग आहे, उद्योग व शेतीशिवाय जीडीपी वाढणार नाही. मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्रासाठी जे सूचविण्यात आले ते विघातक व घातक आहे, यामध्ये कामगार राहणार किंवा नाही अशी शंका आमच्या मनात निर्माण होते. आज कामगारांची जी व्याख्या अस्तित्वात आहे त्याबाबत मंत्री महोदयांना माहिती आहे, आपण कामगार मंत्री होता. इतके कायदे अस्तित्वात असताना देखील आज कामगारांची काय परिस्थिती आहे. कामगार कायद्याची अंमलबजावणी 10 ते 15 टक्के देखील होत नाही. इतकी बंधने असताना कायद्याची अंमलबजावणी होत नाही. अशा प्रकारे राजमार्ग मोकळा करुन दिला तर अधिकारी एकही कायदा मानणार नाही. एकही कायदा कामगारांच्या बाजूने राहणार नाही. मेक इन इंडियाचा मी सिम्बॉल पाहिला आहे. तेथे सिंह दाखविण्यात आला आहे, त्याचे दात काढून तो सिंह लोकांसमोर व कामगार क्षेत्रात आणत असाल तर त्याची भिती मुजोर मालकांना राहणार नाही, असे मी खात्रीपूर्वक सांगतो. कामगारांची व्याख्या बदलण्याचा घाट घातला जात आहे. कामगार कसा असावा, कामगार का असावा त्याची व्याख्या काय असावी, याचा अध्यादेश या सरकारने काढला आहे. त्याचे एक उदाहरण मी देतो. आज आपणाकडे कंत्राटी कामगारांच्या बाबतीत बोलले जाते. तीन दिवसात लायसन्स दिले पाहिजे. त्याबाबत आमचे काही ऑब्जेक्शन नाही. तीन तासात त्यांना परवानगी द्यावी. ऑन लाईन त्यांना परवानग्या द्या. यासाठी जी चौकशी करावी लागते, ती चौकशी विभाग तीन तासात करणार आहे काय ? तीन महिने ते तीन वर्षे चौकशी होत नाही. प्रमाणपत्र मिळत नाही. तीन दिवसात याबाबत चौकशी होणार नाही काय ? यामध्ये सिक्युरिटी विभाग असेल.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

माथाडी कामगार असतील किंवा अन ऑर्गनाईज सेक्टरमधील कामगार असतील. जो नाक्या-नाक्यावर काम करतो किंवा जो इतर ठिकाणी काम करतो, आज देशाच्या सिक्युरिटीला त्यातून सर्वात मोठा धोका निर्माण झालेला आहे. कॉन्ट्रॅक्टर आपल्याकडे ॲप्लिकेशन करणार आहेत. त्यांना कायद्यात कोणती सुधारणा सांगितलेली आहे ? जर संबंधित अधिकाऱ्याने तुम्हाला तीन दिवसात परवानगी दिली नाही तर तुमचे ॲप्लिकेशन मान्य झालेले आहे, असे तुम्ही गृहीत धरावयाचे आणि तुम्हाला तुमचा व्यवसाय चालविण्यास काही हरकत नाही. आपल्याला असे कसे करता येईल ? असे करता येणार नाही ? एअरपोर्टवर सिक्युरिटीच्या बाबतीत पोलिसांची एनओसी लागते. परवा जैन नावाचा प्रवाशी तेथून पळून गेला. आज कायद्याची भीती असून देखील ही परिस्थिती आहे तर आपण जर हे काढले तर काय होईल, याचा आपण एक नागरिक म्हणून विचार करावा. आम्ही कामगार नेते म्हणून या संदर्भात पोटतिडकीने बोलत आहोत. तुमची देखील तेवढीच पोटतिडीक असेल, याची आम्हाला खात्री आहे. तुमचे स्वत:चे याबाबतीत मत आहे, याची आम्हाला माहिती आहे. कारण, आपण या संदर्भात चर्चा केलेली आहे. मी दोषारोप करणार नाही. परंतु, आपल्या समोर येणारे जे संकट आहे ते खूप मोठे आहे. कदाचित, गुजरात राज्यात कोणता फरक पडेल, राजस्थान राज्यात कोणता फरक पडेल, हे मला माहीत नाही. अर्थात, माझा या संदर्भात अभ्यास आहे आणि मला त्याची माहिती देखील आहे. परंतु, डोळ्याला झापडे लावल्याप्रमाणे कोठून तरी आदेश आले म्हणून आम्हाला कोणाला तरी खुश करावयाचे आहे, असे जर माझ्या राज्यात होत असेल तर ते चालणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याने शेकडो पथदर्शी कायदे केलेले आहेत. आज आपल्या राज्यातील कायद्यांचे इतर राज्यांमध्ये अनुकरण केले जाते. आपल्या राज्यातील अनेक पथदर्शी कायदे केंद्र शासनाने देखील स्वीकृत केलेले आहेत. आज देशाच्या अनेक कायद्यांमध्ये आपल्या राज्याने केलेल्या कायद्यांचा समावेश आहे. आपल्या राज्यात जर अशा पद्धतीने हे संकट येऊ घातले आहे तर त्याबाबतीत तुमच्याकडून आम्हाला काही अपेक्षा आहेत. तुम्ही स्पष्टपणे सांगावयास पाहिजे की, जगामध्ये काय होईल ते होईल, देशामध्ये काय होईल ते होईल, इतर राज्यात काय

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

होईल ते होईल. परंतु, माझ्या महाराष्ट्र राज्यात मी हे होऊ देणार नाही, अशा प्रकारची ठाम भूमिका आम्हाला कामगार मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी जो उल्लेख केला तो बरोबर आहे. आपल्या संसदीय कार्य प्रणालीमध्ये सन्माननीय सदस्यांनी सभागृहात केलेल्या भाषणांचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. कामगार या विषयावर श्रीपाद अमृत डांगे यांनी जवळपास 7 तास 30 मिनिटे आणि माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेबांनी 8 तास भाषण केले होते आणि ते आपल्या रेकॉर्डवर आहे. मी 6 ते 6.30 तास असे म्हणणार नाही. परंतु, एवढे मात्र नक्की की, आपण नेमके काय करायला निघालो आहोत ? एकीकडे तुम्ही मेक इन इंडियाची घोषणा करता, ही चांगली गोष्ट आहे. देशाला पुढे घेऊन जाणारी गोष्ट असेल तर आम्ही त्याचे स्वागतच करु त्याच्या पार्श्वभूमिवर तुम्ही मेक इन महाराष्ट्राची घोषणा करता, एक अध्यादेश काढता आणि नेमका अशा गोष्टीला हात घालता ? आज देशात सर्वात जास्त चिंता जर कोणती असेल तर ती कॉन्ट्रॅक्ट कायद्याच्या संदर्भातील आहे. कॉन्ट्रॅक्ट कायदा आजचा नाही. तो खूप जुना कायदा आहे. सन 1970 मध्ये कॉन्ट्रॅक्ट कायदा अस्तित्वात आला आणि सन 1971 मध्ये या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. त्यावेळी कॉन्ट्रॅक्ट कायद्याबरोबर कॉन्ट्रॅक्ट ॲबोलेशन ॲक्ट देखील आला. तो ॲक्ट का आला ? कारण, त्याचे दुष्परिणाम त्याच वेळी लक्षात आले होते. आपण आज त्यामध्येच आमुलाग्र बदल सुचविले आहेत. मंत्री महोदय, आपण लक्षात घ्यावे की, साध्या साध्या गोष्टी देखील खूप परिणामकारक ठरतील. ज्यांचे कॉन्ट्रॅक्ट आहे त्यांच्यावर जर आपण काही बंधने टाकली नाहीत, ती साधी साधी बंधने आहेत. त्यांनी त्यांचे हजेरी पट मेन्टेन करावयास पाहिजे. पीएफ किंवा आपले जे कायदे आहेत त्या कायद्यांचे फायदे कामगारांना मिळाले पाहिजेत. आता दोन्ही गोष्टी बघा कशा केलेल्या आहेत ? म्हणून मी म्हटले की, हे त्यांचे कॉर्पोरेट रिफॉर्म्स आहे. एकीकडे ते कामगारांच्या संज्ञेत बदल सूचवित आहेत. म्हणजे कामगारांची व्याख्याच बदलावी, असे सांगतात आणि दुसरीकडे ते असे सांगतात की, 10 पेक्षा अधिक कामगार

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

असतील तर अशा कारखान्यांना नोंदणीची आवश्यकता असताना त्याची मर्यादा 20 कामगारांपर्यंत करावी आणि कॉन्ट्रॅक्टमध्ये ती 20 ऐवजी 50 करावी. (...अडथळा...) आपण आपल्या उत्तरामध्ये सांगावे. मी त्याचे स्वागतच करीन. मी यातील काही महत्वाच्या गोष्टी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामध्ये काही अयोग्य असेल तर त्या संदर्भात आपण आम्हाला मार्गदर्शन करावे. आम्ही त्यातून नक्कीच काही तरी शिकण्याचा प्रयत्न करु. आम्ही देखील कामगारांसाठी आमचे आयुष्य वेचलेले आहे. आज एका बाजूला आपण हे सांगायचे की, तुम्ही कामगारांच्या व्याख्येत बदल करावा. एका बाजूला असे सांगावयाचे की, आहे त्या कायद्यात आणखी तरतूद करावी. म्हणजे तेवढ्या कामगारांना कामगार या संज्ञेपासून वेगळे करावे. मग त्या कामगारांना पीएफ कसा मिळेल, फायदे कसे मिळतील ? त्यांना फायदे मिळणार नाहीत. जो पर्यंत तो कामगार या व्याख्येमध्ये मोडत नाही तो पर्यंत देशातील, राज्यातील कोणत्याही कायद्याचा फायदा त्यांना मिळणार नाही. मग तो कशासाठी पाहिजे ? आता आपण उलट्या दिशेने प्रवास करीत आहोत. मी आपल्या सांगू इच्छितो की, सन 1996 मध्ये आपण प्रिमियरच्या गेट मिटींगसाठी गेला होता. त्यावेळी डॉ.दत्ता सामंत हयात होते. त्यावेळी प्रिमियर कंपनीमध्ये 11,725 कामगार कार्यरत होते. आज त्या कंपनीत किती कामगार आहेत ? आज त्या कंपनीत 237 कामगार कार्यरत आहेत. म्हणजे आपण कोठे चाललो आहेत ? गाड्या बंद झालेल्या आहेत काय, तर नाही. आता बाजारात पुंटो वगैरे गाड्या आलेल्या आहेत. याचा अर्थ, ऑटोमायझेशन झाले, मॉर्डनायझेशन झाले. आपण ते स्वीकारले आणि ते करणे गरजेचे आहे. म्हणजे आवश्यक असणारे कामगार सर्व ठिकाणी कमी कमी होत गेले. शासकीय कार्यालयांमध्ये देखील कामगारांची संख्या कमी झालेली आहे. शासकीय कार्यालयांमध्ये संगणकीकरण झालेले आहे. मग अशा वेळी हे कामगारांचे कव्हर वाढवायला पाहिजे की कमी करावयास पाहिजे ? आपल्याला उलट दिशेने प्रवास कसा करता येईल ? सरकार उलट दिशेने प्रवास करीत आहे. असे चालणार नाही. उलट माझे असे म्हणणे आहे की, ज्या ठिकाणी 5 कामगार आहेत त्या ठिकाणी हे सर्व लागू करावयास पाहिजे. कारण, आजच्या आधुनिक जगात

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

सर्व्हिस इंडस्ट्री असेल, मॉल इंडस्ट्री असेल किंवा छोटे दुकान असेल. कारण, छोटे दुकान असेल तर त्या दुकानात जास्त कामगार नसतात. तेथे 4-5 कामगारच असतात. आज ते कामगार वंचित आहेत. आज त्या कामगारांना सांगण्यात येते की, तुमने गुड मॉर्निंग नही बोला, इस लिए तुम कल से दुकान पर मत आयो. मग अशा वेळी त्या कामगाराने काय करावयाचे ? फिकीने रिफॉर्म्समध्ये जे प्रपोज्ड केलेले आहे ते इतर राज्यात जसेच्या तसे मान्य झालेले आहे. म्हणून आम्हाला चिंता वाटत आहे. इंटक, आयटक, बीएमएस, सी-2 या देशातील मोठ्या फेडरेशन्स आहेत. या कायद्यात कोणते बदल करावयास पाहिजेत या संदर्भात त्यांच्या बरोबर चर्चा झाली असती तर चांगले झाले असते. राज्यात व्यवसाय आले पाहिजेत, उद्योग आले पाहिजेत आणि देशातील कष्टकऱ्यांचे भले झाले पाहिजे. असे झाले असते तर आम्ही समजू शकलो असतो. मी राजकीय अभिनिवेशातून बोलत नाही.

सभापती महोदय, लोकसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात माननीय पंतप्रधानांनी भाषण केले. त्यावेळी त्यांनी त्यांच्या भाषणात जाणीवपूर्वक असा उल्लेख केला की, आम्ही मेक इन इंडियाच्या बाबतीत आग्रही आहोत आणि देशातील वातावरण उद्योगाला पोषक होण्यासाठी आम्ही कायद्यामध्ये बदल करणार आहोत. त्यांनी काही राज्यांच नावे देखील घेतली आणि याचा रिस्पॉन्स म्हणून राजस्थान सरकारने यामध्ये बदल केलेले आहेत. मध्य प्रदेश सरकारने बदल केलेले आहेत. हम उम्मीद करते हैं की, बाकी सारे राज्यो में यह होना चाहिए. असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून आम्हाला जास्त भीती वाटते. मी शिवसेनेच्या कामगार विभागाचे मनापासून कौतुक करतो. ते सत्तेत असून देखील रस्त्यावर उतरले. (...अडथळा....) आमच्या शासनाने ज्यावेळी हा प्रस्ताव चर्चेला आणला होता त्यावेळी आम्ही सर्व तेथे गेलो होतो. आम्ही सांगितले की, आपल्याला असे करता येणार नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली की, ही तरतूद आम्ही स्वीकारणार नाही. स्वीकारायची झाली तर विशेष अधिवेशन फक्त आणि फक्त कामगार या विषयावर बोलावले जाईल, त्यामध्ये याच विषयावर चर्चा होईल. आम्ही पाऊल उचलले नाही आणि उचलायला दिले नाही.

सभापती महोदय, मी एक गोष्ट नम्रपणे सांगू इच्छितो की, आम्ही वारंवार रिफॉर्म्सबद्दल बोलतो. कष्टकऱ्यांबाबत, शिक्षकांबाबत, विनाअनुदानित शाळांच्या प्रश्नाबाबत आपण नेहमी पोटतिडकीने बोलता. आज आमच्या मनामध्ये फक्त भाषण नाही. केवळ प्रस्ताव आला म्हणून त्यावर बोलत आहोत असे नाही. भविष्यामध्ये जे घडण्याची दाट शक्यता आहे ती भीती आम्ही व्यक्त करीत आहोत. ते उद्या घडले तर भारत कुठे जाईल माहिती नाही, परंतु महाराष्ट्र कुठे नेऊन ठेवणार आहात हे मात्र तुम्हाला सांगावेच लागेल. तसे घडले तर या राज्यातील कष्टकरी गप्प बसणार नाहीत. 106 हुतात्मे देऊन संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती केली. आणखी 100-200 हुतात्मे देण्याची वेळ आली तर आम्ही सर्वात पुढे आहोत. परंतु राज्याच्या कायद्याला अजिबात हात लावू देणार नाही. अशा प्रकारच्या बदलाला आम्ही भीक घालणार नाही. वारंवार हे बोलले जाते की, मागील 15 वर्षाच्या काळात काय झाले? तुमच्या सरकारने तिजोरीत काही ठेवले नाही, खडखडाट केला आहे.

सभापती महोदय, 1994 पासून साडेचार वर्षे या राज्यात युती सरकार सत्तेवर होते. सत्तेवरुन पायउतार होत असताना त्यांनी राज्याच्या डोक्यावर 48 हजार कोटी रुपयांचे कर्ज करुन ठेवले होते. आम्ही सत्तेवर आलो तेव्हा असे कधी म्हटले नव्हते की, तुम्ही तिजोरीत खडखडाट केली आहे. उत्पन्नाचे वेगवेगळे स्त्रोत शोधणे हे सरकारचे काम आहे. आम्ही राज्य चालविले. तुम्ही फक्त म्हणत रहा. वारंवार सांगितले जाते की, युपीए सरकारने केलेले आम्ही पुढे नेत आहोत. सभापती महोदय, फिक्कीने जो रिफॉर्म्सचा प्रबंध दिला तो पूर्णत: फिका पाडायचा आहे. हे चळवळकर्त्यांचे काम आहे. पूर्वी हा ग्रंथ नव्हता, मेक इन इंडियाची घोषणा झाल्यानंतर दिला आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)**

सभापती महोदय, या राज्यातील विविध कायद्यांबद्दल बोलत असताना कंत्राटी कायद्यामध्ये इतर राज्यांमध्ये बदल झाला. म्हणून फॅक्टरी ॲक्टमध्ये बदल सुचविला आहे. तो बदल काय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

31-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) OO.2

SGB/ 17:20

श्री.भाई जगताप....

आहे? एखाद्या फॅक्टरीमध्ये दुर्दैवी घटना घडली, त्यात कामगाराचा मृत्यू झाला तर तुम्ही आम्ही त्याबद्दल सभागृहात आवाज उठवितो. आता प्रस्तावित केलेल्या बदलानंतर फॅक्टरीमध्ये एखादा अपघात होऊन कामगाराचा मृत्यू झाला तर दंडात्मक द्रव्याच्या शिक्षेची तरतूद असावी. परंतु फक्त दंड भरुन मालकाची मुक्तता व्हावी अशा प्रकारची तरतूद आहे. आज आपण भोपाळ वायू दुर्घटना विसरलात का? त्या कंपनीचा मालक अँडरसन याला भारतात आणण्यात आले कारण या देशात कायदा अस्तित्वात होता. अन्यथा ते शक्य झाले नसते. फॅक्टरी ॲक्ट, कॉन्ट्रॅक्ट ॲबोलिशन ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट याबद्दल मी बोलणार नाही.

सभापती महोदय, इंडस्ट्रियल डिस्प्यूट ॲक्ट हा कामगार विभागाचा आणि कामगार चळवळीचा आत्मा आहे. फॅक्टरी ॲक्ट, 1948 मध्ये तुम्ही कामगाराला कामगार म्हणून मानत नाही. त्याने दाद कोणाकडे मागायची, तो सरकारकडे दाद मागणार नाही तर कोणाकडे मागणार? आज राज्याच्या कामगार विभागाच्या यंत्रणेवर कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. आज जर कामगार कायद्याची अंमलबजावणी होत नसेल तर ते अत्यंत वाईट आहे. कामगार कायद्याची अंमलबजावणी होत नाही, निदान आम्हाला दाद तरी मागू द्या. लेबर कमिशनरकडे आम्ही दाद मागू शकतो. तुम्ही फॅक्टरी ॲक्टमध्ये बदल केल्यानंतर तुमचा एकही अधिकारी त्या फॅक्टरीमध्ये जाऊ शकत नाही, अशा प्रकारचे बदल मागितले आहेत. ते बदल स्वीकारण्याचा आपला मानस असेल तर त्याचे समर्थन कधीही होऊ शकणार नाही. या राज्यामध्ये ज्या पध्दतीने बदल करण्याची कारणमिमांसा सांगण्यात आली त्याचे आम्ही स्वागत केले. माननीय मंत्री श्री.प्रकाश मेहता यांनी सांगितले की, असा प्रस्ताव आम्ही दिलेला नाही. आम्हाला मान्य आहे. आम्हाला याची माहिती असूनही आम्ही हा प्रस्ताव चर्चेला आणला आहे. याच्या मागे काही कारण आहे. आम्हाला सरकारकडून ठोस आश्वासन पाहिजे. महाराष्ट्र सरकार कोणत्याही प्रस्तावाचा विचार करणार नाही अशा प्रकारचे ठोस आश्वासन मंत्री महोदयांकडून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, ज्या कायद्याबाबत अनेकदा प्रश्नचिन्ह निर्माण होतो असे काही कायदे आहेत. त्यात सपोर्टिंग म्हणून उप कायदा तयार केला आहे. त्यात 25(एफ) चा उल्लेख आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तो आता अस्तित्वात आहे. आजही त्या आधारे एखादे व्यवस्थापन बंद करावयाचे असेल तर त्यांना त्यांची बाजू सरकारकडे मांडण्यासाठी तरतूद आहे. ती तरतूद दाखवून त्यांना व्यवस्थापन बंद

.3..



श्री.भाई जगताप....

करता येते. एक कायदा असा आहे, ज्याचा उल्लेख आपण केला, आम्ही करु इच्छित नाही. इतर राज्यामध्ये बदल झाला म्हणून भीती वाटते. ज्या कायद्यानुसार या देशामध्ये 100 पेक्षा जास्त कामगार असतील त्या फॅक्टरीच्या मालकांना ले-आऊट असेल, क्लोजर असेल तर सरकारकडे अनुमती घेण्यासाठी जावे लागते. मी अभिमानाने सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये असे कधीही घडलेले नाही. कोणालाही आजपर्यंत अशी परवानगी दिलेली नाही. मागील वर्षी एक दोन युनिट बंद करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा आम्ही आमच्याच सरकारविरुध्द आवाज उठविला होता. दुर्दैवाने ती युनिट बंद झाली. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अशा प्रकारची एकही परवानगी दिलेली नाही. आज कामगारांची संख्या 10 वरुन 20, 20 वरुन 50 अशी वाढविण्यात आली आहे. या देशात अनेक उदाहरणे आहेत. आज जगभर आणि आपल्या देशातही सेवा क्षेत्रातील उद्योग मोठया प्रमाणात वाढत आहे. नवीन उद्योग येतात ते सेवा क्षेत्राशी निगडित आहेत.

नंतर 2पी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

आज ऑटोमायझेशनमुळे पाहिजे तेवढा रोजगार उपलब्ध होत नाही. ऑटोमायझेशनमुळे मनुष्यबळ अर्ध्यावर आले आहे. पूर्वी 100 कामगार असलेला कारखाना बंद करण्यासाठी शासनाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक असताना त्याची मर्यादा 300 कामगार अशी करण्यात येत आहे. असे जर झाले तर राज्यात फार वाईट परिस्थिती निर्माण होईल. खरे म्हणजे ही मर्यादा 100 वरून 50 पर्यंत यायला पाहिजे. आज आधुनिकीकरणामुळे नोकरीचे प्रमाण कमी होत चालले आहे. आज आपल्याकडे 100 ते 300 कामगार असलेल्या एकूण 39422 कंपन्या आहेत. त्या कंपन्या शासनाच्या सो-कॉल्ड रिफॉर्ममुळे कधीही बंद पडू शकतील. हे कारखाने नवीन नियमांमुळे बंद झालेत तर काय परिस्थिती निर्माण होईल ? आजही मुंबईमध्ये देशभरातील नागरिक रोजीरोटीसाठी येत आहेत. तेव्हा या कायद्याचा दुष्परिणाम काय होईल याचा कोणीच विचार केलेला दिसत नाही. आपल्या राज्यात उद्योग येण्यासाठी पायघड्या घातल्या पाहिजेत. आपण येथे नेहमी चीनच्या जीडीपीचे उदाहरण देतो. ते कितपत योग्य आहे, अयोग्य आहे हे मला माहीत नाही. तेथे कायदे आहेत. पण तेथे लोकशाही आहे किंवा नाही इथून सुरूवात आहे. त्या देशात लोकशाहीची पायमल्ली होत आहे. आज तेथे कामगारांसाठी कायदा नाही. देशातील दहा हजार तरूण सरकारला जाब विचारण्यासाठी येतात म्हणून त्यांच्यावर रणगाडे चालविले जातात. त्या देशाचे उदाहरण आपण आपल्या वाढीसाठी घेणार आहोत ? उद्योग आणण्यासाठी पायघड्या जरूर घालाव्यात. पण ते करीत असताना माझा कष्टकरी कामगार उद्‌ध्वस्त होता कामा नये.

सभापती महोदय, आपण पारतंत्र्यात का गेलो ? आशिया हा मोठा खंड आहे. इंग्रज सुरूवातीला कलकत्त्याला व्यापारी बनून आले होते. तेव्हा त्यांना पायघड्या घालण्याची आवश्यकताच नव्हती. कारण त्यांनी जिकडे म्हणून पाय घातले होते तो भागच सर केला होता. असे करत करत त्यांनी संपूर्ण देशच पादाक्रांत केला. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून सर्वांना रोजगार देतो असे सांगून आपल्याच लोकांना गुलाम करून दुसरीकडे पाठविण्यास सुरूवात केली. हे उदाहरण आपल्या समोर आहे. पायघड्या घालत असताना या देशातील नागरिक परत तेथे चालला आहे की काय अशा प्रकारची भीती माझ्या सारख्याच्या मनात निर्माण झाली आहे. ही भीती

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

माझी नसून देशातील कोट्यवधी कष्टकऱ्यांची आहे. त्यामुळे कायद्यातील बदल हे आपल्याला करता येणार नाहीत असे मी ठामपणे सांगत आहे. जे विद्यमान कायदे आहेत त्यात अधिक चांगल्या तरतुदी कशा करता येतील याकडे लक्ष द्यावे. या चर्चेसाठी आम्ही देखील तयार आहोत. एक गोष्ट खरी आहे. ती आपण मान्य करणार नाही. कामगार विभागाने एक समिती तयार केली आहे. हा विचार कामगार विभागामध्ये फार पूर्वीपासून सुरू होता. परंतु, त्यास आम्ही मान्यता दिली नाही. आपण जो काही कायद्यामध्ये बदल करू पाहात आहात. त्याबाबत कामगार नेते किंवा एनजीओ यांच्याशी चर्चा केली पाहिजे. मी 60 टक्के संघटित क्षेत्रासंबंधी बोलत आहे. असंघटित क्षेत्रासंबंधी तर भोंगळ कारभार आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळावा म्हणून आम्ही सर्व भांडलो होतो. तेव्हा असंघटित क्षेत्रासाठी सर्वात पहिला कायदा महाराष्ट्रात झाला व त्याचा आम्हाला अभिमान आहे. जो रस्त्यावरील कामगार आहे त्याच्यासाठी आम्ही कायदा केला व त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. जो कायद्याच्या चौकटीत आहे त्याचे संरक्षण काढून घेऊन दुसरे काही तरी करण्याचये कुटिल कारस्थान केंद्र सरकारचे चालले आहे. असा बदल आज अनेक राज्यात होऊ घातलेला आहे व त्यांनी तो स्वीकारलेला आहे. त्यांनी कितीही नाकारले तरी त्यास त्यांना नाही म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, या राज्यामध्ये एमआरपी ॲक्ट आहे. यावर खूप विचारविनिमय झालेला आहे. फिक्कीने देखील या कायद्यास विरोध केला आहे. फार्मास्युटिकल इंडिस्ट्रीचे देखील OPPI आहे. तत्कालीन कामगार मंत्री श्री.गणेश नाईक यांच्याकडे देशात कुठेही एमआरपी ॲक्ट नाही नसल्यामुळे तो रद्द करावा अशा आशयाचा एक प्रस्ताव OPPI ने दिला होता. हा कायदा इतर राज्यांनी का काढला ते त्यांना विचारावे. कदाचित ते झोपून राहिले असतील. मी हा त्यांच्यावर आरोप करीत आहे. तो चुकीचा असेल तर मी त्यांची माफी मागेन. महाराष्ट्रात एमाअरपीए आणण्यामध्ये देखील काही कारणे होती. ट्रेड युनियन रजिस्ट्रेशन ॲक्ट संबंधी देखील कायदा आहे. एकदा युनियनला मान्यता मिळाल्यानंतर कायदेशीर हक्क प्राप्त होतो. मग चर्चा करता येऊ शकते. ट्राय पार्टी चर्चा करता येऊ शकते. लेबर कमिशनर चर्चेसाठी बोलावू शकतात. माननीय

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

मंत्री देखील चर्चेसाठी बोलावू शकतात. मान्यता प्राप्त युनियनला देखील चर्चेसाठी बोलाविले जाते. मालकाला चर्चेलसाठी बोलाविले जाते, त्यांच्या प्रतिनिधीला चर्चेसाठी बोलाविले जाते. सरकार त्यात हस्तक्षेप करीत असल्यामुळे त्यांना हा कायदा नको आहे. हा फार पूर्वीपासूनचा डाव असून तो आम्ही पूर्ण होऊ दिलेला नाही. तत्कालीन श्री.गणेश नाईक यांच्याकडे हा प्रस्ताव आला त्यास आम्ही सर्वांनी विरोध केला होता. तेव्हा त्यांनी आपल्या विरोधाचे कारण काय अशी विचारणा केली असता, त्यांना सांगितले की, देशभरात जेवढा म्हणून व्यवसाय आहे त्यांची मुख्यालये मुंबईत आहेत. इथे एखाद्या कायद्यानुसार कामगाराने केस दाखल केली की, त्यांना लगेच धावत यावे लागते. दुसऱ्या राज्यात हा कायदा नसल्यामुळे ते मोकळे आहेत. तेव्हा ते कोणालाही विचारतच नाहीत. तेथे शिपाई जरी पाठविला तर चालवून घेतले जाते. येथे असे चालत नाही. कारण येथे मालकाला स्वत: यावे लागते किंवा त्याच्या प्रतिनिधीला निर्णय घेण्यासाठी यावे लागते. अशी यंत्रणा आपण वर्षानुवर्षे तयार केलेली आहे. त्या यंत्रणेला खीळ घालण्याचे काम होण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे :सन्माननीय सदस्य या ठिकाणी खूप चांगल्या प्रकारच्या सूचना करीत असून त्या सूचनांचा सन्माननीय मंत्री महोदयांना चांगला उपयोग होऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचे विचार मांडनू झाल्यानंतर आमच्या पक्षाच्या वतीने प्रा.कवाडे साहेब विचार मांडतील. आमच्या वाटयाला जेवढा वेळ आलेला आहे त्यातील पुरेपुर वेळ सन्माननीय सदस्य श्री. भाईं जगताप यांना देण्यात यावा. या चर्चेत माझे सुध्दा नाव होते परंतु मी माझे नाव मागे घेता आहे. सन्माननीय सदस्य भाई जगताप यांना अजूनही बोलण्यास वेळ लागला तर सन्माननीय सदस्य श्री. रामहरी रुपनवर यांचेही नाव मागे घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य प्रभावीपणे मुद्यांची मांडणी करीत असल्यामुळे त्यांना अधिकचा वेळ द्यावा अशी सूचना या निमित्ताने करतो.

**तालिका सभापती** (गोपीकिसन बाजोरिया) :सन्माननीय सदस्यांनी आपले विचार 15 मिनिटात पूर्ण करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : आम्ही जेव्हा विरोधी पक्षात होतो त्यावेळेस विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर सत्ताधारी सदस्यांनाही बोलू दिले जात होते. आम्हाला सुध्दा महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत.

श्री. भाई जगताप : सन्माननीय सदस्या डॉ्. नीलम गोऱ्हे यांचे म्हणणे बरोबर आहे. ताईंचेही मार्गदशन शासनाला उपयोगी पडू शकेल. आपण अन ऑर्गनाईज सेक्टरमध्ये मोठया प्रमाणात काम करतात याची आम्हाला कल्पना आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे. ही चर्चा आपल्याला अडीच तासामध्ये पूर्ण करावयाची असली तरी आपण या अगोदरही नियम 260 च्या प्रस्तावावर 5-5,6-6 तास चर्चा केलेली आहे. कामगारांच्या चर्चेच्या संदर्भात वेळ वाढवून दिली जाईल अशी मी माननीय सभापती महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी मांडलेल्या एकाही मुद्याला मी स्पर्ष केला नाही. मी माझे वेगळे मुद्दे या ठिकाणी मांडत आहे. कायद्याच्या संदर्भात बदल केले जात आहे. माझा माननीय मंत्री महोदयांच्या शब्दावर विश्वास आहे. परंतु सरकारच्या निती आणि नियतीच्या बाबतीत माझा बिलकुल विश्वास नाही. केंद्र सरकाने मालकांना शिक्षेतून सुट दिलेली आहे. त्यामुळे तुम्ही महाराष्ट्रामध्ये नक्की काय करणार आहात ? मंत्री महोदयांचे वडील कष्टकऱ्यांचे नेतृत्व करीत होते व त्यांच्या पुण्याईमुळेच तुम्ही या ठिकाणी मंत्री झाला आहात. माझी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप..........
सरकारच्या नियतीबाबत साशंकता आहे. सरकारचे असे म्हणणे नाही असे आपण म्हणालात तर मी काही बोलणार नाही. उलट आम्ही आपले स्वागतच करु नव्हे आम्ही तुमच्या अभिनंदनाचा ठराव करु.

सभापती महोदय, केंद्र सरकारचा 1970 किंवा 1971 चा कायदा असेल किंवा कॉन्ट्रॅक्ट ॲबॉलिशनचा कायद असेल. मी कॉन्ट्रॅक्टच्या संदर्भात एकाच बाबीवर बोलतो की, यासंदर्भातील अध्यादेश आता निघालेला आहे. दुकानांच्या बाबतीत आज काय स्थिती आहे हे मी येथे सांगण्याची आवश्यकता नाही. व्यापाऱ्याला कम्फर्ट दिला पाहिजे या मताचा मी सुध्दा आहे. आपल्या देशातील जी मायक्रो इकॉनॉमी आहे ती गावातील दुकानापासून सुरु होत असते. त्यामुळे आमचे म्हणणे एवढेच आहे की, त्या ठिकाणी काम करणारा जो कोणी कामगार आहे त्याला सुध्दा याचा फायदा मिळाला पाहिजे. परंतु आता आपण प्रवाहाच्या उलटया दिशेने चाललो आहोत. त्यामुळे लहान कामगाराला केंद्रीभूत ठेवून दुकानातील कामगार कसा प्रोटेक्ट होईल, त्याला न्याय कसा मिळेल अशा पध्दतीने आपण चाललो तर खऱ्या अर्थाने त्या कष्टकऱ्याला आपण काही तरी न्याय देतो आहोत अशी भुमिका तुम्हाला आणि मला या ठिकाणी मांडता येईल. या ठिकाणी चर्चा करीत असताना मी राजकीय अभिनिवेश ठेवून चर्चा केलेली नाही. केंद्र सरकारने जे मान्य केले आहे त्याचाच मी या ठिकाणी उल्लेख केला आहे. आम्हाला सुध्दा वेदना होत आहेत. हा कायदा करण्याची ज्यांनी भूमिका घेतली ते कोण लोक आहेत ? ही भूमिका घेण्याचे काही तरी कारण असू शकेल. आपल्याला माहिती आहे की, केमिकल इंडस्ट्रीजमध्ये एकही अपघात होणार नाही असे कोणताही माईचा लाल गॅरंटी देऊ शकत नाही. परंतु केमिकल फॅक्टरीमध्ये दररोज काही ना काही अपघात होत आहेत. रोज कोणत्या ना कोणत्या केमिकल फॅक्टरीत कामगार मरत आहे. असे असतांना तुम्ही मालकांना जबाबदार धरणार नाही ? म्हणून याबाबतीत आमच्या मनात चिंता आहे. आमच्या मनात जी कळकळ आहे ती कळकळ तुमच्याही मनात आहे याचा मला विश्वास आहे. परंतु ती तळमळ तुमच्या कृतीमधून आम्हाला दिसू द्या. कामगारांचे संरक्षण होते आहे हे

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप..........

तुमच्या कृतीमधून दिसू द्या. आज आपल्याकडे येऊन कोणीही फॅक्टरी टाकावी, मलिदा लाटावा आणि तेथील स्थानिक त्या कंपनीत सडून मरावा असा प्रकार चालण्ार नाही. आपल्या राज्यात जो प्रकार होत आहे तो चालणार नाही.

सभापती महोदय, कंत्राटी कामगारांमध्ये 20 कामगाराची मर्यादा आहे. परंतु ही मर्यादा 50 करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. हा कायदा आता राजस्थानमध्ये लागू झालेला आहे. कंत्राटी रजिस्ट्रेशन हा वेगळा विषय आहे. जो कोण कंत्राटदार आहे त्याचे व्हेरिफिकेशन झाले पाहिजे, तो योग्य आहे की, नाही हे ठरवले गेले पाहिजे. सोम्या गोम्या चालणार नाही. आपल्याला आठवत असेल की, मुंब्रा येथील सिक्युरीटीजमध्ये कोण होते याची आपल्याला कल्पना असेल. मुंब्रा येथील सिक्युरिटीजमध्ये कश्मिरच्या आतंकवाद्यांचा समावेश होता. सिक्युरीटीला सुट देण्याचा जो विषय होता त्यावर आम्ही सातत्याने भांडत आलो आहे. राज्य शासनाला सुट देण्याचा अधिकार आहे परंतु सुट देत असतांना तेथे कोण आहे, कोणते सिक्युरिटीज आहेत याची तुम्ही शहानिशा करणार नाही ? कामाच्या ठिकाणी राज्यातील 80 टक्के लोक स्थानिक असले पाहिजेत अश्ा प्रकारचा कायदा आहे. या कायद्याचे पालन होते आहे काय ? अशा पध्दतीचा कायदा असताना आपण जर अशा प्रकारे यांना मोकळे सोडले तर या राज्याचे काय होईल ? त्यामुळेच आम्हाला त्यासंदर्भात तळमळ आहे. आमच्या सारखीच तुमचीही ही तळमळ आहे परंतु ती तळमळ कृतीमध्ये दिसावी अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, कंत्राटदार हे फार हुशार असतात. त्यामध्ये दादागिरी हा विषय आहेच. आपण आजचा 20 चा आकडा 50 वर नेतो आहोत त्यामध्ये हे कंत्राटदार तो आकडा 49 करतील. मग बायकोच्या नावाने, मुलीच्या नावाने, मुलाच्या नावाने कंत्राट करतील. एका कुटुंबात 10 कंत्राट दाखवतील आणि 400 कागार ठेवतील. असे झाले तर त्या कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळणार नाही कारण आपण कायदा 50 चा केला आहे. हा प्रकार होऊ नये यासाठी दोन्ही गोष्टी एकमेकांशी निगडीत आहेत. रजिस्ट्रेशन करतांना सर्व गोष्टींची शहानिशा झाली पाहिजे. 3 दिवसाच्या ऐवजी 10 दिवसत लागले तर काय फरक पडणार आहे ? परंतु कंत्राटदार कोण आहेत, त्याच्या मागचा बॅकग्राऊंड काय आहे, त्याने आतापर्यंत घेतलेल्या कंत्राटामध्ये कामगाराचे

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप..........

काय केले या सर्वांची शहानिशा होणे आवश्यक आहे. आज जास्तीत जास्त म्हणजे 80 टक्के खटले हे कंत्राटी कामगारांची झालेली पिळवणूक, त्यांना न मिळणारा पगार, त्यांना कायद्याने जे फायदे दिले आहेत ते न मिळाल्यामुळेच ही सर्व प्रकरणे आहेत. आपण जर यासंदर्भात असिस्टंट लेबर कमिशनरला विचारले तर आपल्याला दिसून येईल की, जवळ जवळ 90 टक्के खटले हे याच प्रकारचे असून त्यांनाच आपण हात लावावयास निघालो आहोत. या कायद्याच्या संदर्भात अध्यादेश काढून त्यामध्ये बदल सूचवलेला आहे आणि माझा त्या बदलाला आक्षेप आहे. महाराष्ट्रातील संपूर्ण कष्टकऱ्यांचा त्या बदलााला आक्षेप आहे असे मला सांगावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, मी अगोदर दुकान आस्थापनेसंदर्भात उल्लेख केला. आता त्या ठिकाणी 20 ऐवजी 40 प्रस्तावित केलेले आहे. आपण मायक्रो इॅकॉनॉमीसंबंधी म्हणालो. आपण किराणामालाच्या दुकानातील एका कामगारांबद्दल बोलत होतो. मग ते 40 कामगार या व्याख्यामध्ये येतील काय ? त्यांनी व्याख्येला हात लावला हा भाग बाजूला ठेवू या. आज प्रचलित असलेली कामगारांची व्याख्या धरली तरी सुद्धा हा बदल झाला तर काय होईल हे मला आपल्याला सांगावे लागेल काय ? हे दिसायला फक्त बीस का चालीस किया है. कुछ नही बीस का पचास किया है. इतके ते सोपे नाही. खरे म्हणजे 21 व्या शतकात 20 चे 10 करायला पाहिजे. 10 चे 5 करायला पाहिजे. एका माणसाला न्याय देण्यासाठी तो कसा ॲम्बीटमध्ये येईल हे पाहिले पाहिजे. आम्ही आमच्याबद्‌दल बोलत नाही. आम्हाला युनियन करायला माणसे पाहिजेत असे नाही. तो अधिकार प्रत्येक भारतीयाला लोकशाहीने आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने दिलेला आहे. आपण जे बदल प्रस्तावित केलेले आहे त्याचा विचार जरी केला तरी पुढील 20-25 वर्षात अराजकता माजेल.

सभापती महोदय, आपल्याकडे पूर्वी संप का होत होते ? संपास काही कामगार नेते सुद्धा जबाबदार आहेत. मला कामगार क्षेत्रामध्ये 28 वर्षे झाली आहेत. मी एकाही दिवसाचा संप केलेला नाही. त्यामुळे संप या गोष्टीवर माझा विश्वास नाही. या देशातील सर्वात मोठा करार मी केलेला आहे. मी वैयक्तिक बोलत नाही. मी तो करार चर्चेतून केलेला आहे. मला कंपनीची बॅलन्सशीट समजते. कंपनीने कामगारांना का जादा पैसे दिले पाहिजेत हे मी चर्चेतून त्यांना सांगितले आणि त्यांना ते पटले. आपण कायद्यामध्ये अशा तऱ्हेचे बदल करून मुंबईमध्ये गिरणी कामगारांच्या बाबतीत जे काही घडले ते पुन्हा एकदा घडण्याची वाट पाहात आहात काय ? आज आपली वाटचाल खाजगीकरणाकडे चालू आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांचा विषय आपल्याशी संबंधित नाही, परंतु तो कष्टकरी कामगारांचा प्रश्न आहे. आपण एफडीआय स्वीकारला. आपण ते करायला पाहिजे, त्यामुळे जास्त सोयीसुविधा मिळतील. आज लाखो कामगार रेल्वेमध्ये काम करीत आहेत ते एखाद्या प्रायव्हेट कंपनीच्या दावणीला बांधले गेले आणि त्यांना या कायद्याचे संरक्षण मिळाले नाही तर काय

..2..

श्री.भाई जगताप...

होणार आहे ? त्या कामगारांचे काहीही ऐकले जाणार नाही, त्यांना काहीही मिळणार नाही. उलट त्यांचे आज जे शोषण होत आहे त्यामध्ये अधिकची भर पडेल. जो अध्यादेश काढलेला आहे त्याबद्दल मी बोलत आहे. माननीय मंत्री त्याचा खुलासा करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. हा अध्यादेश पावसाळी अधिवेशनात आणला तर मग गोविंदाच आहे. मला खात्री आहे की, आपण त्या गोविंदामध्ये खालच्या थराला असाल. हा कष्टकऱ्यांचा प्रश्न आहे म्हणून आम्हाला त्याची चिंता आहे. आम्ही साशंकित यासाठी आहोत की, आपण जे बदल केलेले आहेत आणि देशातील सर्व कायद्यांची जिस्ट ज्याला अर्क म्हणता येईल तो सर्व त्यामध्ये आलेला आहे.

सभापती महोदय, अलीकडे "मेक इन इंडियाची" स्थापना झाल्यानंतर फिक्कीने एआयओयु आणि सीआयआय यांनी मिळून केलेले हे डॉकेट आहे आणि आता ते सरकारने स्वीकृत केलेले आहे. सरकार ही ऑन गोईंग प्रोसेस असते. सरकार आपापल्या परीने धोरण ठरवित असते, मग ते औद्योगिक धोरण असेल, स्पोटर्ससंबंधी धोरण असेल, शेतकऱ्यांसाठी धोरण असेल, आपण ते धोरण स्वीकृत करुन त्याची अंमलबजावणी करतो त्यावेळी त्यास खऱ्या अर्थाने मूर्त स्वरुप येते. या ठिकाणी मंत्री महोदयांनी खाली बसून उल्लेख केला असला तरी मी माझ्या भाषणात त्याचा उल्लेख मुद्दाम करतो. सन 2001 मध्ये काय झाले, त्यानंतर काय झाले, मला येथे मुद्दाम सांगायचे आहे की, केंद्रीय श्रम मंत्रालयाने अनेक सेमिनार घेतले होते त्यामध्ये माझ्यासारख्याला सुद्धा संधी मिळाली होती. त्या सेमिनारमध्ये इंटक, आयटक, सीटू, माथाडी कामगारांचे नेते, किंवा अन्य सेक्टरमधील नेत्यांनी आपली मते मांडली होती. त्याचा उल्लेख येथे होत असेल तर तो चुकीचा नाही. परंतु तशाप्रकारचे कोणतेही धोरण तत्कालीन सरकारने घेतले नव्हते हे मला मुद्दाम सांगायचे आहे. आता केंद्र सरकारने ते धोरण स्वीकारले असून ते इतर राज्यांमध्ये लागू केले आहे हे मी सांगत आहे आणि ती लागण माझ्या महाराष्ट्रामध्ये होऊ नये ही आमची भीती अयोग्य आहे काय ? आम्ही कष्टकरी म्हणून आमची भीती बोलून दाखविली तर त्यावेळी असे झाले, त्यावेळी या लोकांनी असा विचार केला असे बोलून आपणास जबाबदारी टाळता येते काय ? आपणास असे बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांचे भाषण सुरु असताना मंत्री महोदयांनी

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

सुरुवातीलाच सांगितले की, अशाप्रकारचा प्रस्ताव नाही. मी त्याचे स्वागत करतो. मंत्री महोदयांनी येथे ठामपणे सांगितले पाहिजे की, कोणताही प्रस्तावच नव्हे तर अशाप्रकारचा कोणताही बदल राज्यामध्ये होऊ देणार नाही. मी त्यांच्याकडून तशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्यासाठी अधिकचा वेळ दिला त्याबद्दल आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय कामगार !

--------

यानंतर श्री.बोर्डे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 6.00 वाजेपर्यंत ठरविण्यात आली होती. सभागृहाच्या कामकाजाची वेळ पुढील आदेश होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, तत्कालीन सरकारने आमच्या सर्वांसोबत चर्चा केली आणि आम्ही या बदलाबाबतचा निर्णय होऊ दिला नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपल्या सर्वांसोबत चर्चा केल्यानंतर सुध्दा 2001 मध्ये तत्कालीन मंत्रिमंडळाने आताचे बदल संमत करुन ते मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविले होते. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी ही बाब तपासून घ्यावी, असे मला वाटते.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी भाषणास सुरुवात करावी.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, दिनांक 23 मार्च रोजी मी दिलेला तारांकित प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आला होता. विविध कायद्यांमध्ये आणि विशेषत: कारखाना कायद्यामध्ये 54 दुरूस्त्या करण्यात आल्याबाबतचा विषय मी उपस्थित केला होता. या बदलांबाबत राज्य सरकारची भूमिका काय आहे, अशा प्रकारचा मी प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाच्या चर्चेच्या वेळी माननीय कामगार मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. परंतु त्यांनी मला सांगितले होते की, अशा प्रकारचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन नाही. त्या प्रश्नाला सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्यांनी सभागृहात सुस्पष्ट सांगितले की, अशा प्रकारचे कोणतेही बदल प्रस्तावित नाहीत. इतकेच नव्हे तर कामगार कायद्यांमध्ये कोणतेही बदल करण्यापूर्वी सर्व कामगार संघटना आणि आमदारांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही सांगितले. या निसंदिग्ध आश्वासनाबद्दल माननीय मुख्यमंत्री, माननीय कामगार मंत्री आणि राज्य सरकारचे मी आभार मानते.

सभापती महोदय, भारतीय कामगार सेनेने त्यांच्या प्रश्नांबाबत मला निवेदन दिलेले आहे. त्या निवेदनातील मुद्यांच्या तपशीलात जाण्यापूर्वी एका गोष्टीचे मला आश्चर्य वाटले. या सभागृहात झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी सरकारने सांगितले की, राज्य सरकारला कामगार कायद्यांमध्ये कोणतेही बदल करावयाचे नाहीत. परंतु अभ्यासू पत्रकार आणि ज्यांच्या बातम्या बऱ्यापैकी खऱ्या ठरल्या आहेत असे श्री.प्रफुल्ल मारपकवार यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया' या वर्तमानपत्रात या बदलासंदर्भातील वृत्त प्रसिध्द केले होते. त्यात त्यांनी नमूद केले की, सभागृहामध्ये शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न उपस्थित केल्यावर सरकारच्या वतीने सांगण्यात आले की, अशा प्रकारचा बदल करण्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन नाही. परंतु त्यांनी नंतरच्या तीन पॅरांमध्ये असे नमूद केले की, एका वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्याने असे सांगितले की, या संदर्भातील बदलावाच्या प्रस्तावासंदर्भात उद्योग विभागाने एक समिती गठीत केली आहे. आम्हाला बदल करण्यासंदर्भात किंवा न करण्यासंदर्भात त्या समितीसमोर मते मांडावी लागतील. या निमित्ताने मला प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, केंद्रामध्ये ज्यावेळी अशा प्रकारचे बदल प्रस्तावित केले जातात त्यावेळी केंद्र सरकार राज्य

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

सरकारकडे विचारणा करीत असते. मी विचारु इच्छिते की, केंद्र सरकारच्या अशा प्रस्तावित बदलांच्या बाबतीत राज्य सरकारने स्वत:चे काय मत व्यक्त केले आहे ? परंतु वारंवार मागणी करुनही या बाबतची माहिती अजून मिळू शकलेली नाही. मी जाणून घेऊ इच्छिते की, उद्योग विभाग असेल किंवा कामगार विभाग असेल, त्यांनी या बदलांबाबत केंद्र सरकारकडे काय मत नोंदविले आहे ? अशा प्रकारचे प्रस्तावित बदल राज्य सरकारच्या विचाराधीन नाहीत, हे जे उत्तर दिलेले आहे ते चांगले आहे. परंतु आपण बघितले आहे की, केंद्रात अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अनेक विधेयके संमत केली जातात. कामगार कायद्यातील बदलासंदर्भात केंद्र सरकारने एखादे विधेयक संमत केल्यानंतर, त्या विधेयकाच्या अनुषंगाने केलेले बदल राज्य सरकारला स्वीकृत नाहीत या बाबतची सुस्पष्ट भूमिका राज्य सरकार केंद्र सरकारला कळविणार आहे काय ?

सभापती महोदय, इंटरनॅशन लेबर ऑर्गेनायझेशनचे 87 व 98 हे कन्व्हेंशन जागतिक स्तरावर मंजूर झालेले आहे. पण आपल्या सरकारने ते स्वीकारलेले नाही. ज्या वेगवेगळ्या बदलावर चर्चा होत आहेत त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी काही मुद्दे मांडले आहेत. या व्यतिरिक्त भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष श्री.सूर्यकांत महाडीक आणि पुण्याचे कामगार सेनेचे सचिव श्री.रघुनाथ कोचीक यांनी कंत्राटी कामगारांचा मेळावा आयोजित केला होता. त्यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनाचा मी अभ्यास केला. त्यात एक मुद्दा असा आहे की, ॲप्रेंटीस ॲक्ट-1961 मध्ये जे बदल प्रस्तावित केले आहेत त्यामध्ये शिकाऊ कामगारांकडून सर्व प्रकारचे काम करुन घेतले जाणार आहे. याचाच अर्थ कंत्राट कायद्यातून पळवाट काढण्यासाठी मालक वर्गाला मोठे अधिकार मिळणार आहेत. तसेच कारखाना बंद करण्यासाठी कामगारांची पूर्वीची मर्यादा नवीन बदलानुसार वाढविण्यात आली आहे. अनेक ठिकाणी छोट्याछोट्या प्रमाणात लोक उद्योग चालवितात. आपण सभागृहामध्ये सातत्याने म्हणतो की, आपल्या राज्यातील उद्योग परराज्यात जाता कामा नयेत. राज्यात उद्योग राहण्यासाठी त्यांना पायाभूत सुविधा उदाहरणार्थ वीज, पाणी, रस्ते उपलब्ध करुन दिले पाहिजे. कामगारांच्या प्रश्नांवर आम्ही बोलतो याचा अर्थ उद्योगाला शत्रूस्थानी मानण्याची आमची अजिबात भूमिका नाही. कामगार कायद्यामध्ये राज्य सरकारने विविध बदल प्रस्तावित केलेले नाही, असे सांगितले जात असले तरी कामगार विषयक धोरणाचा अभ्यास केल्यावर मी या बाबतीत काही उदाहरणे देऊ इच्छिते. ..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदय, कामगार धोरणानुसार बांधकाम कामगारांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी विकासकाकडून निधी जमा केला जातो. सभागृहात या बाबत अनेकदा उत्तरे देण्यात आलेली आहेत. या संदर्भात 900 कोटी रुपयांचा निधी जमा झाला असून, त्याच्या व्याजातूनच कामगारांना मदत केली जाते. शिवाय ती रक्कम सुध्दा अखर्चित राहते. राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम होत असताना, अनेक ठिकाणी कामगारांचे अपघाती मृत्यू झालेले आहेत. परंतु त्या कामगारांना मदत केली जात नाही. कामगारांना कामावर ठेवणाऱ्या मध्यस्थांकडून कामगारांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर, कामगारांचे शव तासा-दोन तासात हलविले जाते. कामगार कोणत्या ठिकाणचे रहिवासी आहेत या बाबतचा तपशील आमच्याकडे नाही असे त्यांच्याकडून सांगितले जाते. शेवटी बांधकाम कामगारांना 5-25 हजार रुपये देऊन त्यांची बोळवण केली जाते, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय कामगार राज्यमंत्री श्री.विजयकुमार देशमुख हे सोलापूरचे आहेत. मी अनेकदा सोलापूरला जाऊन आले आहे. विडी कामगार, गिरणी कामगार यांची परिस्थिती पाहिली तर त्या भागात जे उद्योग डबघाईला आले त्याचा परिणाम म्हणून सोलापूर शहरातील कामगारांचे मोठ्या प्रमाणावर बकालपण झाले आहे. घरातील पुरुष वर्गाला नोकऱ्या नसल्यामुळे व त्यांच्यावर बेकारी ओढवल्यामुळे सोलापूर शहराची काय परिस्थिती झाली हे बघितल्यानंतर असा प्रश्न पडतो की, आतापर्यंतच्या कायद्यानुसार कामगारांना संरक्षण मिळाले आहे की नाही ? आपल्याला असे दिसते की, सातत्याने या संदर्भातील पळवाटा काढण्यासाठी उद्योग जगताशी संबंधित असलेले वकील आणि मालक एकत्र येऊन त्यातून हुशारीने मार्ग काढत असतात.

महोदय, दोन दिवसांपूर्वी भिवंडी येथे एका गोदामाला आग लागून कामगारांचा मृत्यू झाला. या संदर्भात नियम 93 ची सूचना देण्यात आली होती. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या गोदामाचे मालक कोण आहेत हे सरकारला समजलेले नाही. महोदय, सरकारला जर गोदामाचा मालक कोण आहे हे माहीत नसेल तर कामगार कोणाकडून न्याय मिळवून घेतील ?

महोदय, ज्यावेळी मी सभागृहात येते त्यावेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या प्रचार सभांना जनतेचा जो प्रतिसाद होता आणि त्यावेळी ज्या घोषणा दिल्या होत्या त्या घोषणा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे....

आजही आमच्या कानात घुमत आहेत. गरीब, कामगार, शेतमजूर, शेतकरी यांनी विश्वासाने या सरकारवर धुरा सोपविली आहे, त्यामुळे त्यांच्या घोषणांचा आवाज हे सरकार विसरु शकत नाही.

**तालिका सभापती** : माननीय कामगार मंत्र्यांना त्यांच्या मतदारसंघात महत्त्वाच्या कामासाठी जावयाचे आहे. मी सभागृहाला विचारु इच्छितो की, त्यांनी या प्रस्तावावर उद्या उत्तर दिले तर चालेल काय ? सभागृहाच्या अनुमतीने माननीय मंत्र्यांना जाण्यास अनुमती देण्यात येत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, भारतीय कामगार सेनेने जे निवेदन दिले आहे त्यात त्यांची अपेक्षा अशी होती की, माननीय मुख्यमंत्री, माननीय कामगार मंत्री हे त्यांच्या दालनामध्ये त्यांच्या प्रश्नांबाबत बैठक आयोजित करतील. परंतु त्यांनी निवेदन देऊन दोन महिने उलटून देखील अशा प्रकारची बैठक अजूनपर्यंत आयोजित करण्यात आलेली नाही. सभागृहात मी तारांकित प्रश्न उपस्थित केल्यानंतर विरोधी पक्षाने या संदर्भातील प्रस्ताव आणून त्या विषयावर ही चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, आपले अधिवेशन 10 एप्रिलला संपत असून, दिनांक 20 एप्रिल, 2015 पासून संसदेचे अधिवेशन सुरु होणार आहे. त्यामुळे भारतीय कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत हे अधिवेवशन संपण्यापूर्वी बैठक आयोजित करावयास पाहिजे होती. त्या संघटनेसोबत अशा प्रकारची बैठक आयोजित करण्याविषयी संबंधित विभागाचे मंत्री आश्वासन देतील अशी मी अपेक्षा करते.

सभापती महोदय, कायद्यात बदल करण्याच्या बाबतीत जी चर्चा सुरु आहे त्या अनुषंगाने सांगते की, वार्षिक विवरणपत्र दाखल करण्याच्या नियमातून आणि नोंदणी पुस्तक ठेवण्याच्या नियमातून सूट देणारा कामगार कायदा-1988 यामध्ये बदल करण्याचा सरकारचा प्रयत्न सुरु आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

असे झाले तर त्यामधून प्रत्येक सूट त्यांना मिळणारच आहे. कंत्राटी कामगारांचा कायदा 20 कामगारांना लागू होता, तो आता 40-50 कामगारांपर्यंतचा करण्यात येणार आहे. जवळपास 54 दुरूस्त्या प्रस्तावित केल्या आहेत. वार्षिक भर पगारी रजा वाढविण्याची सध्याची 290 दिवसांची मर्यादा आहे, ती 90 दिवसापर्यंत करण्यात येणार आहे असे प्रस्तावित आहे. जे लोक गरीब आहेत, असंघटित आहेत, फाडफाड इंग्रजी बोलणारे नाहीत त्यांची अवस्था खराब होते. समाजामध्ये क्लास व मास असे भाग असतात. क्लासमध्ये त्यांचे प्रतिनिधी नसतात. धोरणात्मक बैठकीत त्यांचा आवाज ऐकला जातोच असे नाही असा अनुभव अनेक वेळा अनेक प्रश्नांवरील चर्चेत आला आहे. सफाई कामगारांच्या प्रश्नावर लक्षवेधी सूचना असेल किंवा शेत मजुरांच्या प्रश्नावर आपण बोलत असलो तरी असेच चित्र सातत्याने दिसते. सरकारकडे त्या लोकांनी विश्वासाने पाहिले आहे की, आम्हाला न्याय देणारे हे एकमेव सरकार आहे. सत्ता परिवर्तन होऊन नवीन सरकार आले आहे आणि अशा वेळी मी अशी अपेक्षा करते की, जुन्या काळात काही कामगार विरोधी धोरणे घेतली गेली असतील तर ती बदलण्याची नैतिक, कायदेशीर, वैचारिक अशी सर्व जबाबदारी या सरकरची आहे. लोकांच्या अपेक्षा आपण पूर्ण केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, संघटित कामगारांबरोबर असंघटित कामगारांची संख्या वाढत आहे. लोकांना आयटी सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत अहे. परंतु आयटीमध्ये सध्या जे लोक काम करीत आहेत त्या प्रत्येकाचे जीवन कंत्राटावर अवलंबून असते. मग प्रश्न असा येतो की, कंत्राट पध्दतीत आर्थिक सुरक्षितता मिळण्याच्या संदर्भात त्या संदर्भातील काही नियम बदलता येतील का ? मुळात कंत्राटी कायद्यामध्ये बदल करण्याची राजकीय इच्छाशक्ती सरकारने दाखविली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मला हेही सांगितले पाहिजे की, महिला कामगारांच्या नोकरीच्या ठिकाणी पळवाटा काढण्यात येतात. स्वच्छतागृहे, सुरक्षा, पिण्याचे पाणी, कामाचे तास, साप्ताहिक सुटी, ओव्हर टाईम, बाळंतपणाची रजा यामधून पळवाटा काढण्याचा प्रयत्न सातत्याने आस्थापनांचा असतो. ही वस्तुस्थिती आहे. सत्तेच्या बाजूने कोण आहे आणि विरोधात कोण आहे यापेक्षा आम्हाला खास महत्त्वाचे वाटते की, राज्य शासनाने हे कायदे बदलले जाणार नाहीत अशा पध्दतीची

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आम्हाला खात्री दिली असली तरी त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. मी सूचवेन की, राज्य शासनातील माननीय मंत्र्यांचे शिष्टमंडळ माननीय केंद्रीय कामगार मंत्र्यांना भेटून दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांची या संदर्भातील मते त्यांच्यापर्यंत पोहचविली पहिजेत.

सभापती महोदय, काही ठिकाणी हळू काम करणे याबद्दलच्या नियमात सुध्दा बदल होणार आहे. एखादा कामगार चांगले काम करीत असेल तरी मुद्दामहून तो हळू काम करीत आहे असे म्हणून त्याला काढून टाकण्यासाठी सुध्दा तरतूद करण्यात येणार आहे. त्यामुळे या सर्व प्रश्नांचा विचार करताना मी अपेक्षा ठेवते की, लवकरात लवकर या संदर्भातील बैठक शासन आयोजित करेल.

सभापती महोदय, टाईम्स ऑफ इंडियामध्ये बातमी आली आहे. वरिष्ठ अधिकारी म्हणत आहेत की, आम्ही या पध्दतीचा प्रस्ताव दिला असला तरी सुध्दा प्रत्यक्षात केंद्र सरकार नक्की बदल करणार आहे. मला ही खूप चिंतेची बाब वाटत आहे. केवळ विरोधासाठी विरोधाचा मुद्दा नाही. प्रश्न असा आहे की, ज्यांची बैठकच घेतली नाही त्यांच्याबद्दलचे निर्णय प्रस्तावितच कसे होतात ? शासनाने या संदर्भात निसंदिग्धपणे आश्वासन द्यावे. मुंबई शहर हे संयुक्त महाराष्ट्राची राजधानी असून कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या श्रमामधून उभी राहिली आहे. शाहिर अण्णाभाऊ साठे यांचे म्हणणे आहे की, पृथ्वी नागाच्या शेषावर आधारलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या श्रमातून तयार झाली आहे. आपण अण्णाभाऊ साठेंचे नाव घेतो, संयुक्त महाराष्ट्राचा उदो उदो करतो. पण कामगारांच्या धोरणामध्ये त्याचे प्रतिबिंब पडले नाही तर ज्या लोकांनी आपल्यावर विश्वास ठेवला त्यांच्या मनातील विश्वासाला तडा जाईल. शासनाने अशी कोणतीही भूमिका घेऊ नये अशी आमची अपेक्षा आहे. धन्यवाद ! जय भीम ! जय महाराष्ट्र !

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबई महापौर दूरध्वनी संभाषण, नागपूर येथील कैदी पलायन प्रकरण, नागपूर येथील तडीपार गुंडाकडून एका मुलीला झालेली मारहाण, नागपूरमध्ये झालेली फायरिंग या बाबतीत निवेदन करण्याच्या संदर्भात**

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सकाळच्या कामकाजामध्ये मुंबई महापौर दूरध्वनी संभाषण यावर चर्चा झाली होती. आज त्यावर निवेदन केले जाईल असे माननीय सभापतींनी सांगितले होते. नागपूर येथील कैदी पलायन प्रकरण, नागपूर येथील तडीपार गुंडाकडून एका मुलीला झालेली मारहाण या संदर्भातही निवेदन केले जाईल असे सांगण्यात आले होते. मी मुद्दाम त्या संदर्भातील आठवण करून देतो.

सभापती महोदय, आता आलेल्या बातमीनुसार नागपूर येथे फायरिंग झाली आहे. त्यामुळे या सर्व बाबींच्या संदर्भात आज सभागृह संपण्याच्या आत निवेदन करण्यात यावे.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मु.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे.

**पृ.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनील तटकरे, नरेंद्र पाटील, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, जयवंतराव जाधव, प्रकाश गजभिये, आनंद ठाकूर, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, ॲड. निरंजन डावखरे, प्रा. जोगेंद्र कवाडे, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री राजेंद्र मुळक, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, ॲड. रामहरी रुपनवर, श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. आतापर्यंत उद्योधंदे आणि कामगारांबद्दलच्या कायद्यांचा किस काढण्यात आला, चर्चा झाली.

सभापती महोदय, माथाडी कामगारांमध्ये दुष्काळी भागातील बरेच शेतकरी येतात, त्यांना सोयीसुविधा शासनाकडून मिळाल्या पाहिजेत. परंतु त्या मिळत नाहीत. संघटनेत मोठ्या प्रमाणात दलाल तयार झाले आहे. मथाडी कामगारांत लिडरशीपसोबत दलाल देखील मोठा झालेला आहे. एखाद्या कामगाराला तेथून रजा घेऊन जायचे असेल तर त्याचे पहिले बक्कल विकण्यासाठी 25 लाख रुपये घेतले जातात. जत, कवठेमहांकाळ, आटपाडी या ठिकाणी अशा घटना घडत आहेत. माझी विनंती आहे की, या सर्व बाबींची चौकशी झाली पहिजे. लिडरशीप करून एखाद्या गोष्टीच्या माध्यमातून सरकारला किंवा पक्षाला पाठिंबा द्यायचा असे फार भयानक प्रकार चालले आहे. माझे सुध्दा माथाडी कामगारांमध्ये संबंधित आहेत. कामगारांमध्ये युनियन जरूर पाहिजेत. सरकारने माथाडी कामगारांच्या संदर्भातील कायदा करण्याच्या संदर्भात कटीबध्द राहिले पाहिजे. उद्योगपतींना जसा कायदा आहे तसा कामगारांना देखील असला पाहिजे. नारायण मेघाजी लोखंडे यांसारखे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. महादेव जानकर ....

युगपुरुष थोडेच असतात. लिडरशीपच्या क्वॉलिटीखाली कामगारांना लुटणाऱ्या टोळ्या आहेत. सरकारने याचाही विचार करावा. माथाडी कामगारांचा विचार करावा. बोरिवली, कल्याण, शिवाजी छत्रपती शिवार्जी टर्मिनस, मुंबई सेंट्रल येथे हमाल आहेत, त्यांच्याही मुलांसाठी काही स्पेशल क्लॉज करुन शासनाला काही मदत करता आली तर पहावे. शासन कायदे करते, मात्र कायद्याची अंमलबजावणी होत नाही. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात होतो, त्यातून काहीही निष्पन्न होत नसेल तर त्याचा काहीही उपयोग नाही. सरकार कायदा बदलून कामगार विरोधी करीत असेल आम्ही कामगारांच्या बाजूने राहू, सरकारच्या बाजूने राहणार नाही. कामगारांच्या हिताचेच काम व्हावे अशी मी विनंती करतो आणि एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, कामगार कायद्यामध्ये मोठा बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केला आहे आणि त्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री.नरेंद्र पाटील, भाई जगताप, डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्री.महादेव जानकर यांनी चिंता व्यक्त केली आहे. अशा प्रकारचा बदल खरोखरच होणार नसेल तर मग भविष्यात अशी वेळ या राज्यावर येऊ नये, याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी आपले विचार मांडले आहेत. परंतु, मला असे म्हणावयाचे आहे की, काही झाले तरी चालेल, आमचे सरकार कामगारांच्या हिताच्या बाजूने खंबीरपणे उभे राहील, एवढी शाश्वती मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच दिली असती तर आम्हाला एवढी चर्चा करण्याची गरज उरली नसती.

सभापती महोदय, कामगारांच्या हितासाठी कायदे केले जातात. कामगारांचे हित कशासाठी जपायचे असते ? भांडवलदार, पुंजीपती, उद्योगपती या वर्गामध्ये कामगारांचे शोषण करण्याची प्रवृत्ती असते. मालक वर्गाची अशी प्रवृत्ती असते की, कमीत कमी मोल देऊन जास्तीत जास्त काम काढायचे. मग कामगार वर्ग काय करतो ? कमीत कमी काम करून जास्तीत जास्त मोल पदरात कसे पाडून घेता येईल, अशा प्रकारचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे एकमेकांना उत्तर देण्याचा प्रयत्न होत असतो. अशा वातावरणात आपल्या राज्यातील उद्योग आणि कामगार सापडलेला आहे.

सभापती महोदय, आपल्या देशात कामगाराच्या हिताचे, कल्याणाचे एवढे कायदे आहेत पण तरीही आमचा कामगार सुखी नाही, सुरक्षित नाही. ही असुरक्षिततेची भावना दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कामगार कायद्यामध्ये जे बदल केले जात असतात ते कामगारांच्या फायद्यासाठी आहेत का ? जे बदल आपण प्रस्तावित केले आहेत, ते कामगारांच्या हिताचे आहेत का ? कामगार कायद्यामध्ये केले जाणारे बदल उद्योगपतींच्या हिताचे असतात आणि कामगारांना संरक्षण देण्याचा प्रयत्न त्यामध्ये नसतो. कामगारांचे शोषण करण्याची, त्यांची पिळवणूक करण्याची मोकळीक जणू या कायद्यान्वये उद्योगपतींना देण्यात येते. कामगारांना संरक्षण देण्याच्या नावाखाली प्रत्यक्षात उद्योगपतींना, भांडवलदारांना, कारखानदारांना संरक्ष्ण देण्यात येते, अशी परिस्थिती आपल्या देशात निर्माण झाली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

सभापती महोदय, आपल्या सर्वांना माहीत असेल की, या देशाचे पहिले मंत्रिमंडळ तयार झाले आणि त्यामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मजूर मंत्री होते. कामगारांच्या जास्तीत जास्त हिताचे कायदे त्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी करुन घेतले होते, हे या देशातील कामगार विसरु शकणार नाही.

सभापती महोदय, उद्योगपती, भांडवलदार, पुंजीपती यांच्या माध्यमातून केले जाणारे शोषण थांबविण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी कामगार कायद्याच्या माध्यमातून संरक्षण आणि सुरक्षितता प्रदान करण्याची पध्दत आहे. कामगार हिताला प्राधान्य मिळवून देण्यासाठी आणि मालक वर्गाला ताळ्यावर आणण्यासाठी कामगारांकडे केवळ संपाचे हत्यार होते. कामगारांना वठणीवर आणण्यासाठी मालकवर्गाकडे टाळेबंदीचे हत्यार आहे. आज मात्र संप जवळ जवळ बंद झाले आहेत. कारण, कायद्याने संप करण्यावर बंदी आणण्यात आली आहे. कामगारांचे आपल्या हक्कासाठी, अधिकारासाठी लढण्याचे हत्यारच सरकारने बोथट करुन टाकले आहे. अशा प्रकारे सरकारची धोरणे आहेत. परंतु, कारखानदार, भांडवलदार आणि उद्योगपती यांना टाळेबंदी करण्यासाठी कोणतीही बंधने घालण्यात आलेली नाहीत.

सभापती महोदय, यापूर्वी एखाद्या कारखान्यात 10 कामगार असतील आणि तेथे विजेचा वापर होत असेल तर कारखान्याची नोंदणी करणे बंधनकारक होते. आता ही संख्या 20 पर्यंत वाढविण्यात आली आहे. 50 पेक्षा जास्त कामगार असतील तर पी.एफ., राज्य विमा कर्मचारी योजना, मिनिमम वेजेस ॲक्ट लागू केला जाईल आणि ज्या ठिकाणी 50 पेक्षा कमी कामगार असतील त्या ठिकाणी या योजना लागू होणार नाहीत. एखाद्या कारखान्यात टाळेबंदी करावयाची असेल आणि त्या कारखान्यामध्ये 100 पेक्षा जास्त कामगार काम करीत असतील तर शासनाची परवानगी घेणे बंधनकारक होते. आता 100 कामगारांची ही मर्यादा 300 पर्यंत वाढविण्यात आली आहे. अशा प्रकारची धोरणे कामगार हिताची आहेत का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, माथाडी कामगारांच्या संदर्भातील व्यथा सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत. शासनाने सुरक्षा रक्षक मंडळाची स्थापना केली आहे. परंतु,

...3....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

आज सुरक्षा रक्षकांची काय अवस्था आहे ? कंत्राटी कामगारांची देखील परिस्थिती अत्यंत भयानक अशी आहे. असंघटित कामगारांची तर 'आईही नाही आणि बापही नाही', अशी परिस्थिती आहे. असंघटित कामगार निराधार आणि अनाथ आहेत. संघटित कामगारांकडे संघटनेचे हत्यार तरी आहे. परंतु, या असंघटित कामगारांना त्यांचा कायदेशीर हक्क आणि जगण्याचा हक्क मिळत नाही, ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.

सभापती महोदय, या देशात आणि राज्यात किती कामगार विषयक काय आहेत ? Industrial Dispute Act, 1948, Tri-partite Agreement, Workmen Compensation Act, Workers Participation in Management, Industrial Safety and Health Act, Contract Labour Act, Provident Fund Act, Trade Union Act, Labour Welfare Committee, Shops and Establishment Act, etc.

सभापती महोदय, बांधकाम क्षेत्रातील कामगारांची संख्या देखील मोठी आहे. बांधकाम क्षेत्रातील काम करणारे कामगार असंघटित आहेत. त्यांना संरक्षण देण्याची गरज आहे. कामगार हे कष्टकरी असतात, श्रम करुन घाम गाळतात आणि आपला उदरनिर्वाह करीत असतात. अशा कष्टकरी कामगार वर्गाच्या हिताचे, कल्याणाचे रक्षण करण्याची जबाबदारी शासन घेणार नाही तर कोण घेणार आहे ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी एक महत्त्वाचा मुद्दा येथे मांडला आहे. मालक वर्गाच्या, उद्योगपतींच्याही संघटना असतात. या मालक वर्गाने एक प्रबंध सरकारला सादर केला आहे. मालक वर्गाने त्यांच्या मागण्यांचा संच, इंडस्ट्रिअल पॉलिसी सरकारला सादर केली असती तर मी समजू शकलो असतो पण त्यांच्या संघटनेने लेबर पॉलिसी सरकारला सादर केली आहे. मेंढ्यांच्या कळपाचा रक्षक वाघाला बनविले तर मेंढ्यांचे जे काही होईल, तशीच अवस्था या माध्यमातून कामगारांची झाली आहे.

सभापती महोदय, उद्योगपतींना, मालक वर्गाला, कारखानदारांना शिक्षा करण्याची तरतूद कायद्यात निश्चितपणे आहे. परंतु, ही शिक्षेची तरतूद द्रव्यदंडाची आहे. शिक्षा म्हणून 2 लाख,

...4....



प्रा.जोगेंद्र कवाडे........

10 लाख किंवा कितीही द्रव्यदंड झाला तरी तो भरुन पुंजीपती मोकळे होतात. त्यामुळे द्रव्यदंडाबरोबरच फौजदारी दंड संहितेअंतर्गत शिक्षेची तरतूद केली तर कामगार वर्गाचे शोषण निश्चितपणे कमी होईल, कामगारांचे कमीतकमी नुकसान होईल, असे मला वाटते.

सभापती महोदय, उद्योगांचा विकास झाला पाहिजे, विस्तार झाला पाहिजे, असे कोणाला वाटत नाही ? परंतु, हा विकास करीत असताना कामगारांच्या हातावर निखारा ठेवला जात असेल तर ते शासनाने खपवून घेता कामा नये, एवढेच आमचे म्हणणे आहे.

सभापती महोदय, आपल्याला मुंबईसह महाराष्ट्र मिळाला आहे. यासाठी कामगारांनी बलिदान दिले आहे. त्यांच्या बलिदानातून संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला आहे. जगामध्ये जेवढ्या क्रांत्या झाल्या त्यामधील सर्वाधिक क्रांत्या कष्टकरी कामगारांनी केल्या आहेत.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

फ्रान्सची राज्य क्रांती असेल, रशियाची राज्यक्रांती असेल, चीन मधील राज्यक्रांती असेल, देशातील व राज्यातील सर्व क्रांत्या मुंबई व महाराष्ट्रातील कष्टकरी जनतेच्या बलिदानातून निर्माण झाल्या आहेत. कामगार आणि क्रांती याचा फार जवळचा संबंध आहे, या दृष्टीकोनातून शासनाने कार्यवाही करावी.

सभापती महोदय, भोपाळ येथे गॅसकांड झाले होते. येथील दुर्घटनेत हजारो व लाखो लोक मेले आहेत, अजून देखील त्याचे परिणाम तेथील लोक भोगत आहेत. मालकांना मोकळे सोडले व अशी परिस्थिती निर्माण झाली तर कामगारांचे मोठे नुकसान होईल. सरकार फक्त मालक धार्जिण्या लोकांचे आहे, उद्योगपती लोकांचे आहे, त्यांच्याच संरक्षणासाठी आहे, भांडवलदार व उद्योगपतींच्या संरक्षणासाठी कामगारांच्या हिताचा बळी दिला जात आहे. अशा प्रकारची भावना राज्यातील कामगारांमध्ये निर्माण झाली तर ते योग्य होणार नाही. याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले की, असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. या संदर्भातील अध्यादेश शासनाने काढलेला आहे. जेथे धूर दिसतो तेथे निश्चित कोठे तरी आग लागलेली असते. महाराष्ट्रात लागणाऱ्या आगीची पूर्व कल्पना सरकारला व्हावी, कोणत्याही परिस्थितीत कामगारांचे नुकसान होणार नाही. कामगारांचे अकल्याण होणार नाही. कामगारांचे अधिकार व हक्कांचे रक्षण करण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठिशी त्यांच्या बाजूने ठामपणे उभे राहू अशा प्रकारचे आश्वासन किंवा ग्वाही राज्य सरकारने द्यावी अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महादेय, नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर सभागृहात बराच वेळ चर्चा चालू आहे, अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले नाहीत ते दोन तीन मुद्दे मी उपस्थित करीत आहे. कामगारांचा विचार करीत असताना संघटीत व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या बाबतीत आपण नेहमी चर्चा करतो. कामगारांच्या संदर्भातील केंद्र सरकारचे जवळपास 50 कायदे आहेत. राज्य शासनाचे 100 कायदे आहेत असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. कायदे तयार करण्यात येतात परंतु त्या कायद्यांच्या अंमलबजावणीकडे ज्या पध्दतीने लक्ष द्यायला पाहिजे तसे लक्ष दिले जात नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला घटना दिली आहे, त्या घटनेत ही बाब अंतर्भूत आहे. कामगार, शेतमजूर, शेतकरी हा शेवटचा माणूस आहे. त्या माणसाला केंद्रीत करुन त्या संदर्भातील भूमिका शासनाने घ्यावयाची आहे. म्हणून हे धोरण लवचिक आहे. या अनुषंगाने अनेक वेळा राज्यात व केंद्रात कायदे तयार करण्यात आले आहेत. कायद्यातील परिवर्तनाचा केंद्र बिंदू कामगार असला तरी कामगाराचे हीत साध्य होताना दिसत नाही. त्याचा परिणाम असा होतो की, आपणाला पुन्हा कामगार हिताची चर्चा करावी लागते. येणाऱ्या काळात जे बदल करण्यात येणार आहेत त्यामध्ये कामगाराचे व शेवटच्या माणसाचे, श्रमजिवी व्यक्तिीचे हीत कसे जोपासले जाईल याचा विचार शासनाने केला पाहिजे. आता जमाना आऊट सोर्सिंगचा निर्माण झालेला आहे. त्यामुळे कंत्राटी कामगारांचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. प्रशासनातील बऱ्याच गोष्टी पूर्वी शासन करीत होते त्या बाबी आता लेबर कंत्राटदाराच्या माध्यमातून इतर लोकांवर सोपविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यातून कामगारांची पिळवणूक होताना दिसते. प्रिन्सीपल एम्लॉयरचा मुद्दा उपस्थित केला तरी त्या दृष्टीने कायदे केले तरी त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेचा इलेक्ट्रीक मेन्टेन्सचा कंत्राट खाजगी कंपनीला देण्यात आला होता. हे इलेक्ट्रीकचे काम करताना एक लेबर विजेला चिकटून मेला. तो कंत्राटदार त्याला नुकसान भरपाई देईन. अशा प्रकरणात महानगरपालिकेची काही जबाबदारी आहे किंवा नाही ? याप्रमाणे कायद्यात तसा बदल केला पाहिजे. महानगरपालिका अशा व्यक्तींच्या वारसदारांना काही सोई सुविधा देणार किंवा नाही ? कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जेवढी गंभीरता पाहिजे

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले....

तेवढी गंभीरता कायद्यात दिसून येत नाही. सफाईचे काम देखील कंत्राटी पध्दतीवर आऊटसोर्सिंगद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे कामगारांची यात काय सुरक्षितता आहे, यासाठी कायदे तयार करण्यात आले आहेत, लाड व पागे समितीने काही शिफारशी केल्या होत्या. ती समिती शिफारस करीन त्या लोकांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात येते. याकडे देखील प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. प्रशासनात निधीची अडचण आहे, असे मुद्दे उपस्थित करुन त्या लोकांना अडचणीत आणण्यात येते. अशा पध्दतीचे वातावरण निर्माण झाले तर कामगाराला असे वाटेल की, कायदे कामगाराच्या बाजूने तयार करण्यात येत नाहीत. कायद्यात सुधारणा करण्यासाठी सभागृहात दिवसभर चर्चा करण्यात येते, या चर्चेतून जे नवनीत व निचोड बाहेर येतो, आऊटपूट किंवा आऊटकम येतो, तो कामगारांच्या हिताचा आहे असे कामगारांना वाटत नाही. त्यातून कामगाराच्या हिताचे काही कायदे झाले असतील तर त्याच्या अंमजबजावणीत अनेक अडचणी व प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी कशी करता येईल या दृष्टीने शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. कामगार हिताच्या सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.निलम गोऱ्हे यांनी सांगितले की, ज्यात कामगारांचे हित आहे अशा सुधारणा करणे आवश्यक आहे. कायदे जर उद्योगधार्जिणे होत आहेत. मी अनेक ठिकाणी पाहिले की एखादा उद्योग बंद झाल्यावर उद्योगपतीच्या दैनंदिन जीवनात व आर्थिक परिस्थितीत कोणताही फरक पडत नाही. कारखाना बंद झाल्यावर कामगार मात्र देशोधडीला लागतो. उद्योग बंद होण्याचा आरोप कामगारांवर करण्यात येतो. उद्योगपती असे सांगतात की, कामगारांनी संप केल्यामुळे उद्योग बंद करावा लागला आहे. कामगारांनी काम केले नाही, त्यांनी उत्पादन वाढविले नाही, त्यामुळे मला उद्योग बंद करावा लागला. परंतु उद्योग बंद झाल्यामुळे कोणताही उद्योगपती अडचणीत आल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, देशाचे औद्योगिकरण झाले पाहिजे परंतु उद्योगांचे कामगारीकरण होणार किंवा नाही ? उद्योगपती कामगारांच्या हिताचा विचार करणार किंवा नाही ? उद्योगाची व्याख्या करताना असे लक्षात येते की, 'मालक व त्याचे कामगार सहयोगी, यांच्या परस्पर एकमताने निर्माण

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले...

केलेली एक शिस्तबध्द प्रणाली म्हणजे उद्योग होय'. यामध्ये कामगाराचे हित कोठेच दिसत नाही. कामगार हा त्याच्याच हिताची चिंता करणार, मायबाप सरकारकडे मागणी करण्याचा कामगाराला शेवटचा मार्ग असतो. म्हणून शासनाने कामगारांच्या हिताचे कायदे केले पाहिजेत.

सभापती महोदय, पुढील काळात मी सरकारकडून अपेक्षा करतो की, हे कल्याणकारी राज्य आहे, या राज्यातील शेवटचा माणूस हा श्रमजिवी कामगार आहे. कामगाराच्या हिताचे बदल कायद्यात करता आले तर कामगाराच्या हिताचे रक्षण होईल तो जीवनात उभा राहू शकतो. उद्योगपतींचा सन्मान करण्याचे बदल कायद्यात केले तर ते स्वीकारले पाहिजेत. कामगाराचे हित जोपासणारे कायदे व त्या अनुषंगाने करण्यात येणारे बदल होणे आवश्यक आहे असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----------

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचे संकेत मिळालेले आहेत. कोणत्याही क्षणी हे बदल केले जाऊ शकतात. त्या अगोदर सरकारकडे काही गोष्टींच्या मागण्या करण्यासाठी सदनामध्ये या आयुधाचा वापर करुन हे होणारे बदल किती चांगले आहेत, किती वाईट आहेत, हे सांगण्याची आवश्यकता होती. सन्माननीय सदस्य सर्वश्री नरेंद्र पाटील, भाई जगताप, प्रा.जोगेंद्र कवाडे आणि इतर काही सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर आपली मते मांडलेली आहेत.

सभापती महोदय, आपण सन 1960 पूर्वी बघितले तर एक प्रकारची लाट होती. अगोदर जी लाट होती ती शेतकऱ्यांची लाट होती. शेती करुन स्वतःची उपजीविका करणारा आणि देशाच्या प्रगतीमध्ये मोठा हातभार लावणारा वर्ग म्हणजे शेतकरी वर्ग होता. शेतकऱ्यांच्या लाटेनंतर इकॉनॉमिकल लाट म्हणजे उत्पादनाची लाट आली आणि ती लाट जवळपास 1985 ते 1990 पर्यंत चालली. मग त्यामध्ये गिरणी, ऑटोमोबाईल, फार्मासिटीकल कंपन्या किंवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या आणखी काही छोट्या-छोट्या कंपन्या असतील. मघाशी एका सन्माननीय सदस्यांने प्रिमियर कंपनीचे उदाहरण दिले. परंतु, प्रिमियर कंपनीच्या आजुबाजूला इतर स्पेअर पार्ट बनविणाऱ्या जवळपास 250 पेक्षा जास्त कंपन्या होत्या. आपण त्याला स्मॉल स्केल इंडस्ट्रीज म्हणतो आणि ती उत्पादनाची लाट जवळपास 1985 ते 1990 पर्यंत चालली. परंतु, सन 1982 नंतर हळूहळू गिरण्या बंद होऊ लागल्या. ऑटोमोबाईल इंडस्ट्री, फार्मासिटीकल आणि मॅनिफॅक्चरर मुंबईतून बाहेर निघून गेले. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. परंतु, मुंबई शहराला आर्थिक राजधानीचा दर्जा देण्याचे काम मालकांनी केलेले नाही तर ते कुशल कामगारांनी केलेले आहे. आज कामगारांची काय अवस्था आहे ? आपण असे म्हणाल की, आता जागतिकीकरणाचे युग आहे. आपला देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. परंतु, उत्पादनाची प्रगती कोठपर्यंत गेलेली आहे ? तर त्याचा जो भाग होता, जी जागा होती ती संपूर्ण

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.......

इंडस्ट्रीने घेतलेली आहे. ती सर्व्हिस इंडस्ट्री म्हणजे काय होती ? आयपीओ असेल, बीपीओ असेल, हाऊस किपींगकरिता असेल, सिक्युरिटीसाठी असेल. पूर्वी बँकॉकला गेल्यानंतर तेथे इंडस्ट्री किंवा मॉलसाठी जे वातावरण दिसत होते तशा प्रकारचे वातावरण हळूहळू मुंबई सारख्या जागतिक दर्जाच्या शहरामध्ये दिसू लागले आणि यासाठी काम करणाऱ्या कामगारांना सुविधा मिळणे तर सोडूनच द्याव्यात, परंतु सिक्युरिटी देखील नसेल अशी परिस्थिती होती. मी मघाशी फार्मासिटीकल कंपन्यांचा उल्लेख केला. आपण जर पूर्वी युनिकेम कंपनीत गेलो तर तेथील कामगारांना सकाळी एक ग्लास दूध, अंडी, केळी दिली जात होती. परंतु, आता त्या कंपनीतील कामगारांना हे काहीच दिले जात नाही. मग हे कायदे बदलले कधी, या गोष्टींमध्ये बदल केव्हा झाला, या गोटी केव्हा बंद करण्यात आल्या, हे तुम्हालाही कळले नाही आणि आम्हालाही कळले नाही. या संदर्भात कायदे करण्याची कधी गरज भासली नाही. सर्व्हिस इंडस्ट्रीसाठी आम्ही काय काय केले पाहिजे ? आज एखादा मुलगा कंपनीत कामाला लागला आणि तो उद्या तेथे राहिला काय किंवा निघून गेला काय, या विषयी प्रश्न येत नाही. मघाशी सर्वच सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात कॉन्ट्रॅक्ट सिस्टिमवर झोड उठविली. कॉन्ट्रॅक्ट सिस्टिमपूर्वी कोणती सिस्टिम होती ? एखाद्या कामगाराने वर्षातील 260 दिवस कंपनीत काम केले तर त्या कामगाराला त्या कंपनीत परमनन्ट करुन घेतले जात होते आणि तसा कायदा होता. त्या कामगाराने जर 260 दिवस कंपनीत काम केलेले असेल तर आम्ही कंपनीच्या मालकाला सांगत होतो की, या कामगाराने कंपनीत 260 दिवस काम केलेले आहे, त्यामुळे तो परमनन्ट झालाच पाहिजे. त्या कामगाराला परमनन्ट कामगारांप्रमाणे सर्व फायदे मिळत होते. परंतु, ते कधी बंद झाले, कायद्यात ती लक्ष्मण रेषा कधी ओढली गेली, हे कळले देखील नाही. आता कोणताही कामगार परमनन्ट होण्याचे स्वप्न बघू शकत नाही, मला परमनन्ट करा असे सांगूही शकत नाही. आता तर परिस्थिती अशी होईल की, खरोखरच कामगारांना 8 तास, 16 तास काम करण्याची गरज आहे काय ? आपण कामगारांकडून 20 तास काम करुन घेणार आहात काय ? कामगारांनी जास्त वेळ काम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

केले तर त्याचा मोबदला त्यांना मिळणार आहे काय ? आता कामगारांना ओव्हर टाईम मिळतो

..3....



श्री.किरण पावसकर.......

काय ? तुमच्या कामगारांच्या डिक्शनरीमध्ये पेन्शन स्किम कोठे तरी आहे काय ? ईएसआयसी म्हणजे तो कामगार आजारी पडला तर कार्ड काढायचे आणि हॉस्पिटलमध्ये घेतलेल्या उपचाराचे फायदे मिळवायचे, हे सर्व आहे काय ? जागतिकीकरणाच्या गप्पा मारत असताना आम्ही कामगारांना कोठे नेऊन सोडले याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कामगार युनियनचा नेता म्हणून जेव्हा आम्ही कंपनीच्या गेटवर जाऊन कामगारांशी बोलतो तेव्हा आम्ही त्यांना सांगतो की, ज्या प्रमाणे पोलीस कमिशनर आहे त्या प्रमाणे आमच्याकडे लेबर कमिशनर आहे, लेबर डिपार्टमेंट आहे, लेबर मिनिस्टर देखील आहे. कामगारांसाठी जे कायदे आहेत त्या कायद्यांच्या माध्यमातून आम्ही कामगारांना न्याय देऊ शकतो काय ? आता तर स्पर्धा सुरु आहे. सरकार कोणाचे होते ? राज्यात 15 वर्षे तुमच्या पक्षाचे सरकार होते, आमच्या पक्षाचे सरकार 5 वर्षे होते, तुमचे सरकार सत्तेवर असताना तुम्ही राज्यात किती परदेशी गुंतवणूक आणली, हे सांगितले जाते. माननीय उद्योग मंत्री सांगतील की, आमच्या काळात राज्यात एवढे उद्योग आणण्याचे करार झाले, आम्ही राज्यात एवढी परदेशी गुंतवणूक आणली. आपल्या शासनामध्ये हे सांगण्याची स्पर्धा सुरु आहे. आपण हे सर्व करण्यासाठी जी कन्सल्टन्ट वगैरे गोंडस नावे दिलेली आहेत, ते काय करतात याचे मी एक उदाहरण देतो. युएसमध्ये कोकाकोला कंपनी आहे. आपण त्या कंपनीची कॅसेट्स बघावी. त्या कंपनीतील कामगारांना तेथे गमबुट, हँडग्लोज दिले जातात, आरोग्याच्या बाबतीत कामगारांची सर्व काळजी घेतली जाते. ऑटोमायझेशन प्लँट असेल तर तेथे काम गरणाऱ्या कामगारांची काळजी घेतली जाते. तो कामगार किंवा त्या कामगाराच्या घरातील व्यक्ती आजारी पडली तर त्यांना सुविधा दिल्या जातात. त्या कामगाराचा अपघात झाला तर त्याला पूर्ण भरपाई दिली जाते. मग याच कोकाकोला कंपनीने ठाणे जिल्ह्यातील वाडा येथे उद्योग सुरु केला आणि त्या कंपनीत दोन कामगारांचा मृत्यू झाला तर कंपनीचा वकील सांगतो की, त्या कामगारांच्या कुटुंबीयांना एक-दीड लाख रुपये द्यावेत. त्यांना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणी आणले ? युएस आणि वाडा येथे असणाऱ्या कोकाकोला कंपनीतील उत्पादनाची पद्धत सारखीच आहे. युएसमध्ये कोकाकोलाला जी टेस्ट आहे तीच टेस्ट येथील कोकाकोलाला देखील

..4...



श्री.किरण पावसकर.......

आहे. त्यामध्ये ते कोणतेही कॉम्प्रमाईज करीत नाहीत. परंतु, युएस येथील कंपनीत काम करणाऱ्या कामगारांना मिळणाऱ्या सुविधा वेगळ्या आहेत, त्यांना मिळणारा रोजगार वेगळा आहे. तेथील कामगाराने 1 तास काम केले तर त्याला 10 डॉलर मिळतात आणि येथील कामगाराने 10 तास काम केले तरी त्याला तेवढे डॉलर्स मिळत नाहीत. आपण कधी तरी याचा विचार करणार आहात काय ? तुम्ही काय जागतिकीकरणाच्या गप्पा मारता ? चायना, हाँगकाँग, लंडन, न्युयॉर्क कोठे गेले ? आमचे नियम कोठे गेले ते प्रथम शोधा ? हे नियम जर केले तर तुम्ही स्पर्धा करु शकता.

सभापती महोदय, मी आपल्याला एक उदाहरण देतो. मध्यंतरी कुवेत एअरवेज कंपनी बंद झाली. कुवेत एअरवेज बंद झाल्यानंतर पैसे कमी पडत असल्यामुळे ज्या ज्या देशांमध्ये आपले कर्मचारी काम करीत आहेत ते कमी करावयाचे, असा त्यांनी निर्णय घेतला. मी सुध्दा मॅनेजमेंटला भेटण्यासाठी कुवेतला गेलो होतो. त्यांनी ज्यावेळी कुवेत येथील कामगार कमी केले त्यावेळी त्या कामगारांना सर्व सुविधा देण्यात आल्या. त्या कामगारांना पुढील 20 वर्षे बायका मुलांसह 4 वेळा विमानाने प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली आणि मुंबईतील स्टाफ कमी केला त्यावेळी टाईम्स ऑफ इंडिया दैनिकात एक छोटी जाहिरात देण्यात आली की, आम्ही या कामगारांना कामावरुन काढलेले आहे, त्यांनी आपापले पास जमा करावेत. मग कोठे गेले कायदे, कोठे गेले जागतिकीकरण ? ते त्यांच्या देशात कामगारांसाठी त्यांच्या नियमांचे पालन करु शकतात, परंतु आम्ही मात्र कामगारांच्या बेसिक गरजांच्या संदर्भातील जे नियम आहेत ते कचऱ्याच्या पेटीत टाकलेले आहेत. असे का होते ? आपल्याला राज्यात किती परदेशी गुंतवणूक वाढविता येईल, मी उद्योग मंत्री असताना राज्यात किती उद्योग आणले, राज्याची किती भरभराट झाली, किती फंड आला यासाठी आपण बळी कोणाचे देत असू तर ते कामगारांचे देत आहोत. आपण अशा प्रकारे कामगारांचे बळी देत असताना नियमांकडे बोट दाखवितो. अशा असंख्य घटना सांगता येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आता जे बदल आपल्यासमोर आलेले आहेत ते बदल तर आणखी इतिहास घडवतील. मघाशी कोणी तरी म्हणाले की, यादवी युद्ध होईल. खरोखरच अशी परिस्थिती येईल.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.......

सभापती महोदय, आपण जर केनियामध्ये गेलो तर सायंकाळी 7-8 वाजता काळोख पडल्यानंतर तेथील पंचतारांकित हॉटेलचा मॅनेजर आपल्याला सांगतो की, तुम्ही घड्याळ, अंगठी घालून रस्त्यावरुन फिरु नका. कारण, तुमच्याकडून ते सर्व काढून घेतले जाईल. आपल्याकडे जर कामगार देशोधडीला लागला तर त्याच पद्धतीचे सोशल वॉर सुरु होईल. परंतु, तुम्ही जर मालक वर्गाला वर आणत असाल आणि कामगार वर्गाला खाली नेत असाल तर असमतोल निर्माण होईल आणि तो असमतोल दूर करण्यासाठी अशा सभागृहाची गरज भासेल. लाल बहादूर शास्त्री यांनी "जय जवान, जय किसान" अशी घोषणा केली होती. त्या संदर्भात आपण बोलतो. आमचे राज्य फुले, शाहू, आंबेडकरांचे राज्य आहे, असे आपण भाषणामध्ये सांगतो. माननीय शिवसेना प्रमुखांनी एका कार्यक्रमात "जय जवान, जय किसान आणि जय कामगार" अशी घोषणा केली होती. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दत्ताजी साळवी, मधुकर सरपोतदार हे कामगार नेते होते. म्हणून ते या सभागृहापर्यंत पोहोचले.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.....

पण त्यांनी सगळया गोष्टी मांडलेल्या होत्या. मी नियमाला धरुन म्हणत नाही. कधी कधी नियमाला डावलून त्यांनी काम केले म्हणून या सदनामध्ये आम्ही त्यांची नावे घेतो. शिवसेना प्रमुखांनी 'जय कामगार' म्हटले. मी त्यांच्या संघटनेमध्ये काम केले आहे. 'कारखाना जगला तर कामगार जगेल' ही त्यांची घोषणा होती. आज काय घोषणा आहे? कामगार नसला तरी कारखाना चालेल किंवा जगेल. कामगार नसला तरी चालण्यासारखे आहे. 40-40 कामगारांच्या तुकड्या घेऊन कॉन्ट्रॅक्टवर काम देता येऊ शकते. आता तुम्ही 50 कामगारांचा नियम आणत आहात. 40-40 कामगार ठेवायचे. माझ्याकडे 150 ते 200 कामगार ठेवून मी सुरुवात करेन. काय फरक पडणार आहे? फरक पडणार नसेल तर कारखाना जगला तर कामगार जगेल ही भूमिका एखाद्या ट्रेड युनियनिस्टने किंवा आमदाराने का घ्यावी? कारखाना चालविण्याची जबाबदारी जेवढी मालकाची आहे, तेवढीच आमचीही आहे, तेथे काम करणाऱ्या कामगारांची सुध्दा आहे.

सभापती महोदय, या कामगारांच्या व्यथा मांडताना मी फक्त माझ्या कारकिर्दीत काय काम केले तेवढाच उहापोह करणार असेन तर हे काम होऊ शकणार नाही. यापूर्वी असे सांगण्यात आले की, राजस्थान, गुजरात व मध्यप्रदेश राज्यांनी कामगार कायद्यात बदल केले. महाराष्ट्रात पण तसे बदल घडविले जाणार आहेत. मध्यप्रदेश, गुजरात किंवा राजस्थान ही राज्ये देशाची आर्थिक राजधानी नाहीत. महाराष्ट्र राज्य ही देशाची आर्थिक राजधानी असून तिचे स्थान अबाधित राखायचे असेल तर जे बदल त्या राज्यांनी घडविले ते महाराष्ट्र राज्यात घडवून चालणार नाही. होऊ घातलेले बदल थांबवावे लागतील. त्या राज्यांची भौगोलिक स्थिती, तेथे उपलब्ध असलेले पाणी या दृष्टीने त्यांना ते बदल चालण्यासारखे असतील. परंतु महाराष्ट्रामध्ये असे घडले तर यातून महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या प्रगती करु शकेल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, ज्या कारखान्यात 100 कामगार काम करीत आहेत, तो कारखाना बंद करावयाचा असेल तर मालकाला सरकारची परवानगी घ्यावी लागते. आता कायद्यामध्ये अशी व्यवस्था करुन ठेवली आहे की, 300 पर्यंत कामगार असतील तर सरकारची परवानगी घेण्याची गरज नाही. आज मुंबईमधील मोठमोठया कंपन्या बंद पडल्यामुळे त्यांच्या जागेवर गाळे बांधण्यात आले. त्या गाळयांमध्ये 150 ते 200 कामगारांच्या सहाय्याने छोटे मोठे व्यवसाय चालविले जात आहेत. बंद पडलेल्या कंपन्यांमधील कामगार देशोधडीला लागले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, कारखाने निरीक्षक कंपन्या किंवा कारखान्याच्या ठिकाणी तपासणी करण्यासाठी जातात, त्यांना आम्ही सांगितले की अमुक एका कारखान्यात 1000 कामगार काम करीत आहेत, परंतु तो कारखाने निरीक्षक वेगळी भूमिका घेऊ शकतो, मी स्वत: भेट देऊन पाहणी केली आहे, तेथे 200 कामगार आहेत असा अहवाल त्यांनी दिला तर त्या बेसवर कारखान्याचा मालक कदाचित तो कारखाना बंद करु शकतो. मग तेथील कामगारांचे काय होणार?

सभापती महोदय, एका खासदाराने किंग फिशर कंपनी चालविली, त्या कंपनीमधील 800 कामगार देशोधडीला लागले. एकाही कामगाराला एक रुपयाही मिळालेला नाही. अशा कंपनीमध्ये पती आणि पत्नी पायलट म्हणून काम करीत असतील तर त्यांना दरमहा किमान 3 लाख रुपये प्रत्येकी पगार मिळतो. म्हणजे दोघांना महिन्याला 6 ते 7 लाख रुपये पगार मिळतो. त्यांची कंपनी बंद पडल्यामुळे त्यांना एक रुपयाही भरपाई मिळालेली नाही. त्यांच्या ग्रॅच्युईटीची रक्कम 6 ते 7 लाख रुपये इतकी होते. कोर्टात केस दाखल केली तर कंपनीच्या वतीने बाजू मांडण्यासाठी वकिलांची फौज उभी केली जाते, कामगारांच्या वतीने एक वकील उभा राहतो. त्यांच्या हक्काचा पैसा त्यांच्या पदरात पडावा असे शासनाला वाटत नाही का? एखाद्या घरामध्ये दरोडा पडला तर संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लावली जाते. परंतु या 800 कामगारांच्या घरावर दरोडा पडला, त्या कामगारांना वाचविण्यासाठी लेबर कोर्ट आणि कायदे तोकडे पडतात. ते त्यातून वाचू शकत नाहीत, वाचलेले नाहीत. किंग फिशर कंपनी बंद पडून 2 वर्षे उलटून गेली आहेत. एखाद्या घरावर दरोडा पडला तर एस.पी.ने काय केले, डी.सी.पी.ने काय केले, ए.सी.पी.ने काय केले म्हणून विचारणा केली जाते. 800 कामगारांच्या घरावर दरोडा पडला त्यांच्यासाठी जाब कोणाला विचारणार, हा कायदा आमच्यासाठी काय करणार आहे? कायद्याने दरवाजे उघडे करुन ठेवले आहेत. या आणि उचलून घेऊन जा. राहील त्याचे घर आणि चोरेल त्याच्या वस्तू अशा पध्दतीने कामगारांना रस्त्यावर आणण्याचे धोरण असेल तर कामगारांचे भवितव्य काय आहे हे सांगण्यासाठी कोणत्या भविष्यवेत्त्याची गरज नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, 2001 मध्ये काय झाले, कोणाच्या काळात काय झाले हा विषय मी मांडणार नाही. परंतु बांधकाम कामगारांच्या संदर्भात मी अशासकीय विधेयक मांडले होते. दीड ते दोन तास मी त्यावर भाष्य केले होते. बांधकाम कामगारांची काय परिस्थिती आहे हे मी

..3..



श्री.किरण पावसकर.....

आकडेवारीसह सभागृहासमोर सादर केले होते. माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, शासनाकडे 1500 कोटी रुपये जमा झालेले आहेत. शासनाच्या तिजोरीत 1 टक्क्याप्रमाणे वसूल झालेली रक्कम बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी वापरावयाची आहे. त्या कामगारांना सरकार काय देते? सायकल दिली जाते, घोंगडी दिली जाते. ते किती तास काम करतात? एखादी इमारत बांधली जात असेल तर त्या इमारतीच्या तळ मजल्यावर त्यांना राहण्यासाठी तात्पुरती जागा दिली जाते. 10 ते 12 तास ते कामगार काम करीत असतात. कोणाचे सुपरव्हिजन आहे? माझ्या माहितीप्रमाणे सरकारकडे 3000 कोटी रुपये जमा झालेले आहेत. याकरिता एक स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे अशी मी मागणी केली होती. देशात तोटा न होता केवळ नफाच मिळवून देणारा एकमेव व्यवसाय हा बांधकाम व्यवसाय आहे. बांधकाम व्यवसाय कोल्हापूरमध्ये करा, सिंधुदुर्गमध्ये करा, रायगडमध्ये करा, तो व्यवसाय नफ्यातच चालतो. नियम भरपूर केलेले आहेत. कामगारांनी काम करीत असताना हेल्मेट वापरले पाहिजे, सेफ्टी शूज घातले पाहिजेत. परंतु 12 ते 15 तास कोणत्याही सवलती न मिळता तो काम करीत असतो. त्याची लहान मुले असतील तर ती सुध्दा डोक्यावर वीटा वाहून नेण्याची काम करीत असतात. याची तपासणी करण्यासाठी नियम केलेले आहेत. परंतु आज कामगार आयुक्त कार्यालयात पुरेसा स्टाफ नाही. मी याची आकडेवारी सभागृहाला देऊ इच्छितो. मंत्री महोदयांनी याबाबत स्पष्टीकरण दिले पाहिजे.

सभापती महोदय, ज्या कामगारांना न्याय देण्यासाठी व्यवस्था केली आहे, ज्यांच्याकडे न्यायाची याचना केली जाते, कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कामगार न्यायालयात जातो त्या कामगार न्यायालयाच्या कार्यालयातील खुर्च्या टेबल पाहिल्यानंतर कळते की यांची ही परिस्थिती असेल तर आमचे काय होणार? उघडयासमोर नागडा गेला अशी परिस्थिती आहे. त्या कोर्टात गेल्यानंतर आम्हाला न्याय देण्यासाठी पुरेसा स्टाफ कुठे आहे? जास्तीत जास्त उद्योग या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महाराष्ट्रामध्ये यावेत, महाराष्ट्र औद्योगिकदृष्टया प्रथम क्रमांकावर रहावा असा प्रयत्न असतो. मग शासनाने कामगार न्यायालयांची संख्या वाढविली पाहिजे. किती वाढली हे मंत्री महोदयांनी सांगावे. किती स्टाफ, उप कामगार आयुक्त, कामगार आयुक्तांची पदे मंजूर केली? 10 ते 15 लाख लोकांना रोजगार मिळाला असे सांगण्यात येते. मग त्या प्रमाणात न्यायालयांची संख्या

..4..



श्री.किरण पावसकर.....

वाढली का? त्यांची संख्या तेवढीच आहे. न्याय देण्यासाठी कायदे बनविले जातात. कायद्यामध्ये बदल केल्यानंतर त्याची अंमबजावणी करणारे, त्या कारखान्यांवर कारवाई करणारे कर्मचारी पुरेसे आहेत का? अन्यथा कायदे मंजूर करून उपयोग होणार नाही. अंमलबजावणी करायला कोण जाणार आहे?

सभापती महोदय, आज गट अ मधील अतिरिक्त कामगार आयुक्त, उप कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्तांची 32 पदे रिक्त आहेत. गट ब मधील शासकीय कामगार अधिकाऱ्याची 47 पदे रिक्त आहेत. गट क मधील लिपिक, अधीक्षक, टंकलेखक आदी 160 पदे रिक्त आहेत. आज गावाच्या ठिकाणी पाऊस कमी पडतो, शेती करणे परवडत नाही म्हणून प्रत्येक शेतकऱ्याच्या घरातील एक मुलगा नोकरीच्या आशेने शहराकडे धाव घेतो. शहरामध्ये आल्यानंतर त्याला नोकरी मिळते. त्यामुळे दिवसेंदिवस असंघटित कामगारांची संख्या वाढत आहे. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कामगार न्यायालय व कामगार आयुक्त कार्यालयाची स्थापन केली गेली आहे. मी रिक्त पदांची माहिती दिली ती दोन वर्षापूर्वीची आहे. ही रिक्त पदांची संख्या आता दुप्पट झाली असण्याची शक्यता आहे. ही रिक्त पदे केव्हा भरली जाणार आहेत याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा. तरच आम्हाला कायद्याच्या बदलावर बोलून उपयोग होईल, अन्यथा कितीही टाहो फोडून काही उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, कामगार न्यायालयांची काय अवस्था आहे? तेथे टॉयलेट नाही, बसायला जागा नाही. कामगार उभे राहतात. एखादी कंपनी बंद पडली, तेथे 50 कामगार काम करीत असतील तर त्या कामगारांना आपली बाजू मांडण्यासाठी कामगार न्यायालयात गेल्यानंतर व्हरांड्यामध्ये सुध्दा उभे राहू शकत नाहीत. कोर्टाची अवस्था तर त्यातून बिकट आहे. पुरेसे अधिकारी उपलब्ध नाहीत. पुरेसे कर्मचारी नाहीत. मग आम्ही तक्रार करायची का? हवालदाराच्या हातामध्ये काठी द्यायची नाही आणि गॅंगस्टरला पकडून आणायला सांगायचे अशी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्थिती निर्माण झालेली आहे.या संदर्भात शासन ठोस पावले उचलणार नसेल तर कायदे आहेत त्याच स्थितीत ठेवावेत, त्यात हात घालू नका.

नंतर 2वाय.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, वेगवेगळ्या लोकांना न्याय देण्यासाठी आपण महामंडळे निर्माण केली आहेत. माथाडी बोर्डाचे सर्व विषय सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी मांडले आहेत. सुरक्षा रक्षकांचा विषय मी अनेक वेळा सभागृहात उपस्थित केला आहे. सुरक्षा रक्षकांसाठी राज्य शासनाने ध्येय धोरणे निश्चित केली आहेत. त्याप्रमाणे राज्य शासनाने किती खाजगी सुरक्षा एजन्सींना परवाने दिले आहेत ? आजही बाहेरच्या राज्यातील सुरक्षा रक्षक स्वत:चे व्हेपन घेऊन येतात. मागच्या वेळी जम्मू-कश्मीरचे सुरक्षा रक्षक पकडले होते. असे सुरक्षा रक्षक बँकेला सुरक्षा पुरवत असतात. प्रत्येक एटीएमसाठी एक सुरक्षा रक्षक असतो. पण त्याला कुठलाही नियम लागू होत नाही. तेथे एखादी वाईट घटना घडल्यानंतर मग पोलीस स्टेशनला कळते की, त्या सुरक्षा रक्षकाच्या मदतीनेच चोरी झाली. त्या सुरक्षा रक्षकाला पकडल्यानंतर त्याचा मालक यु.पी.मध्ये आहे हे लक्षात येते व त्याच्याकडे 300 शस्त्रधारी माणसे आहेत हे लक्षात येते. हे सर्व कुठून येते. त्यासंबंधी कुठलीही अंमलबजावणी होत नाही. मग आपण सुरक्षा मंडळ कशासाठी स्थापन केले आहे ? त्यांचे अहवाल आपण सभागृहात मांडतो. ते मांडण्याचे आपण बंद केले पाहिजे. हे सर्व चाचपडून बघण्यासाठी लेबर कमिशनरकडे स्टाफ नसतो. तेव्हा यासंबंधी आपण कोणती ध्येय व धोरणे राबविणार आहात हे कळले तर त्यावर आम्हाला भाष्य करता येऊ शकेल. असे असंख्य प्रश्न आहेत.

माझी युनियन चांगली कशी काय चालेल हे एकमेव ध्येय प्रत्येक कामगार संघटनेने समोर ठेवलेले आहे. माझ्या युनियनमध्ये 200 कंपन्या असतील तर 300 कशा होतील हे पाहण्यात येते. मग त्या कामगाराला पी.एफ., ग्रॅज्युईटी मिळो अगार न मिळो, त्यांचे नुकसान झाले असले तरी अशा रॅट ट्रेसमध्ये जाऊन कामगारांना देशोधडीला लावण्याचे काम होत आहे ही वस्तुस्थित आहे.

काही कामगारांनी खरोखरच कामगारांना न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. आज आपण श्री.नारायण मेघाजी लोखंडे, कॉ.डांगे, श्री.दत्ता सामंत, श्री.अण्णासाहेब पाटील यांचे नाव घेण्यात आले. या सर्वांनी प्रवाहाच्या विरोधात जाऊन खंबीरपणाने काम करून कामगारांना उभे करण्याचे काम केले आहे. ते प्रवाहाबरोबर भरकटले नाहीत म्हणून त्यांची नावे घेतली आहेत. धनगर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर....

समाजाची लोक माथाडी कामगार म्हणून काम करीत आहेत. त्याचे क्रेडिट श्री.शिवाजीराव शेंडगे यांना द्यावे लागेल. धनगर समाजातील जास्तीत जास्त लोकांना त्यांनी माथाडी कामगार म्हणून आणले अशी माझ्याकडे माहिती आहे. मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांसाठी देखील काही नियम आहेत. आज मुंबई महानगरपलिकेत 28 हजार सफाई कामगार आहेत. त्यांना आज कुठल्या प्रकारच्या सोयी सुविधा मिळत आहेत ? आज आपण त्यांच्या जीविताशी खेळत आहोत. त्यावर काही नियंत्रण मिळविणार आहोत काय ? आज तसे पाहिले तर कामगार खड्डयातच आहेत. आता आपण कामगार कायद्यात बदल करून त्याच्यावर माती टाकत आहात. ती माती आपण टाकू नये अशी माझी विनंती आहे. आपण त्यांच्यावर माती टाकली तर तो गरीबवर्ग त्यात अजून गाडला जाईल. या कामगार वर्गामध्ये जेव्हा असमतोल निर्माण होईल त्या दिवशी तुम्हा-आम्हा सर्वांना बाहेर फिरणे मुश्किल होऊन जाईल.

आज आपल्याला कामगारवर्गाची गरज आहे. आधुनिकतेची कास धरून आपण किती रोबो आणले तरी तो रोबो हॉटेलच्या टेबलावर जाऊन प्लेट ठेवू शकणार नाही. दोन हात आणि दोन पायाच्या माणसांकडूनच ती कामे केली जातील. जास्तीत जास्त काय झाले आहे. पोस्टाची जागा कुरियर कंपनीने घेतली. कुरिअर कंपनीची जागा ई-मेल आणि फॅक्सने घेतली. त्याच्यापुढे कोणीही जाऊ शकत नाही. आपण पेपर वाचू शकाल. पण ठराविक कामासाठी दोन हाताचा माणूसच लागणार आहे. त्या माणसाची आपण काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, सभागृहात आपणा सर्वांना दिलगिरी व्यक्त करावी लागेल. सदनातील सदस्यांकडे ड्रायव्हर नसेल तर आपण येथे येऊ शकत नाही. घरी काम करणारे कोण नसेल तर आपण येथे पोहचू शकणार नाही. आम्ही चांगले कपडे घालून येथे येऊ शकत नाही. कामगारांविषयी बोलत असताना आज सदनातील किती टक्के सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत ते आपण पहावे. नगरविकास विभागाचा, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असता तर आज सगळे सदनात येऊन बसले असते. पण कामगारांच्या प्रश्नाला कोणीही महत्त्व देत नाही ही परिस्थिती आज सदनामध्ये दिसून येत आहे. आज आपण कामगारांचे कायदे बदलण्याविषयी बोलला आहात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

आपल्याला हे डिपार्टमेंट सक्षम करावयाचे असेल तर त्यासाठी स्टाफ द्यावा लागेल. लेबर कमिशनर, न्यायालये यांना मजबूतीने उभे करावे लागेल. ते जर केले तर कमी जास्त बोलता येईल. मघाशी कोणी तरी सांगितले की, प्रस्ताव विचाराधीन आहे. कोणत्याही क्षणी हे डोक्यावर येणार आहे. याचा कामगारांना फायदा होणार नाही. उलट त्यांचे भरपूर नुकसान होणार आहे. त्याचा पुरेपूर फायदा सर्व मालकवर्ग उचलणार आहेत. सर्व मालकवर्ग याचा फायदा उचणार असतील तर सर्वपक्षीय आमदारांना बरोबर घेऊन यात सुधारणा केल्याशिवाय मार्ग निघू शकणार नाही. हा मार्ग काढण्यासाठी माथाडी बोर्ड, सुरक्षा रक्षक बोर्ड, बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी काढलेले बोर्ड यांचे तसेच ज्या विविध संघटनांचे पदाधिकारी त्यांच्या सूचना व हरकती घेतल्याशिवाय यात बदल करू नका अशा विनंती मी करतो. आपण बदल केला तर तो कामगारांपुरता करता कामा नये. तसे केले तर हे कामगार रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाहीत. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. या प्रस्तावावरील सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली आहेत. या प्रस्तावावर फक्त माननीय मंत्र्यांचे उत्तर होईल. या प्रस्तावावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलण्यास संधी मिळणार नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपण मघाशी निवेदन करण्यासंबंधी निदेश दिले होते.

**तालिका सभापती :** ते निवेदन आलेले नाही. उद्या ते निवेदन करण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या बुधवार, दिनांक 1 एप्रिल 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत अर्धा तास चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 8 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 1 एप्रिल 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

............................

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बुधवार दिनांक 1 एप्रिल 2015 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत अर्धा तास चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुनः भरेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION